आणखी एक उदाहरण विक्रीकराच्या बाबतीत मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. सन २००२ मध्ये मुंबई सारख्या शहरामध्ये पेट्रोल व डिझेलवर प्रत्येक लिटरमागे १ रुपये असा अधिभार लावला गेला. २००५ ला विक्रीकर कायदा जो बॉम्बे सेल्स टॅक्स ॲक्ट आहे, तो रद्द करून मूल्यवर्धित करप्रणालीचा टॅक्स आपण स्वीकारून वॅट आणला. त्या कालखंडामध्ये मोटार स्पिरिट ॲक्ट जो आहे, तो ॲक्ट आपण वॅटमध्ये मर्ज केला. त्यामुळे तो कायदा अस्तित्वात राहिला नाही. यातून नवीन वॅट पद्धती आपण सुरू केली. या वॅट पद्धतीमधून, जो १ रुपया प्रती लिटर डिझेल व पेट्रोलवर अधिभार घेतला गेला. त्यासाठी जे नोटिफिकेशन काढले गेले, त्यावर हा कर कोणत्या तारखेपासून घ्यायचा, कोणत्या तारखेपासून त्याची अंमलबजावणी होईल याबाबतीतील तारखेचा उल्लेखच नाही. हा उल्लेख नसल्याने, काय झाले की, ऑईल कंपन्यांनी कर जमा करून, त्यांच्याच जवळ ठेवला. प्रत्यक्षात अंमलबजावणीची तारीख यामध्ये नसल्याने, चार ऑईल कंपन्यांमधून आता एक कंपनी गेल्याने तीन राहिल्या. या तीन प्रमुख ऑईल कंपन्यांकडे तुमचा ४ हजार कोटी रुपयांचा कर आहे. राज्य सरकारकडून, या बाबतचे नोटीफिकेशन वेळेवर न काढले गेल्याने, आज या कंपन्यांनी आपल्याकडे पैसे परत मागितलेले आहेत. पैसे परत मागण्याची जी अपिले आपल्याकडे आलेली आहेत, त्यात जी कारणे दिलेली आहेत त्यामध्ये असे म्हटले आहे की, एक तर अंमलबजावणीची तारीख दिलेली नाही, दुसरे म्हणजे राज्य सरकारला क्वांटिटीवर कर लावण्याचा अधिकार नाही, विधानमंडळालाही नाही. हा जो कायदा आहे, त्यानुसार क्वांटिटीवर कर लावण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारला आहे. लोकसभेमध्ये तसा कायदा मंजूर व्हायला पाहिजे. आपल्याला फक्त किमतीवर कर लावण्याचे अधिकार आहेत. अमूक एका वस्तुची किंमत १ हजार, ५ हजार रुपये आहे त्यावर कर लावण्याचे आपणास अधिकार आहेत. परंतु १ लीटर, १० लीटर किंवा १ मोटार, २ मोटार्स यावर अशाप्रकारचा कर लावण्याचा अधिकार नाही. त्यामुळे हा जो कर लावण्यात आलेला आहे तो बेकायदेशीर आहे. आमचा जो पैसा घेतलेला आहे तो आम्हाला परत मिळावा असे कंपन्यांनी शासनाकडे अपील केलेले आहे. आता तो पैसा परत देण्याची वेळ शासनावर आलेली आहे. जवळपास ४ हजार कोटी रुपये शासनाच्या तिजोरीतून परत द्यावे लागणार आहेत. जो मोटार स्पिरिट ॲक्ट आहे तो आपण फोरफिट करू शकत नाही. तो यामध्ये मर्ज झालेला आहे. त्यामधील बाबी आपणास पुढे न्यायावयाच्या असतील तर त्या सेव्ह आहेत. तेवढ्याच बाबी आपणास करता येतील, पण त्या आपण केलेल्या नाहीत.

अध्यक्ष महाराज, आम्हाला उड्डाणपूल बांधायचे आहेत, डेव्हलपमेंट करावयाची आहे या कारणासाठी मुंबईतील नागरिकांकडून हा पैसा वसूल करण्यात आला. कोणत्या ना कोणत्या नागरिकांवर हा बोजा बसला आहे. पेट्रोल आणि डिझेलवर प्रत्येकी १ रुपया वसूल करण्यात आला. हा वसूल केलेला पैसा आता तेल कंपन्यांना मिळणार आहे. मग आपण कोणाचे हित साधत आहात ? सरकारने चार हजार कोटी रुपये जमा केले ते तेल कंपन्यांसाठी जमा केले की नागरिकांच्या हितासाठी जमा केले ? आज हा पैसा शासनाच्या तिजोरीमध्ये असला तरी तो तेल कंपन्यांना द्यावा लागणार आहे अशी स्थिती आहे. तेव्हा या संदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी चूक केली असेल त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. मूल्यवर्धित कराची चुकीच्या पद्धतीने आखणी केल्यामुळे आपल्या महसुलाची हानी होत आहे.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

अध्यक्ष महाराज, मला मूल्यवर्धित कराच्या संदर्भात बोलावयाचे होते, परंतु वेळ थोडा आहे. त्या विधेयकावर बोलण्याची इच्छा होती, परंतु आपण ते विधेयक गोंधळामध्ये मंजूर केले. तेव्हा साडेतीन किंवा चार हजार रुपयांच्या संदर्भातील नेमकी वस्तुस्थिती आम्हाला समजली पाहिजे. मोटार स्पिरिट ॲक्टच्या संदर्भातील स्थिती आहे काय ? जो अधिभार जमा केलेला आहे तो कायदेशीर आहे किंवा कसे याचे उत्तर देखील मिळाले पाहिजे. क्वॉन्टिटी बेस टॅक्स लावण्याचा अधिकार सरकारला आहे काय या प्रश्नाचे देखील समाधानकारक उत्तर मिळणे अपेक्षित आहे. जर तसे नसेल तर तो टॅक्स का लावण्यात आला याचे उत्तर मिळाले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, मोटार स्पिरिट ॲक्टच्या संदर्भात दिनांक ४ मे २००२ रोजी विधिमंडळात दुरुस्त्या पारित केल्या. सदर कायद्यातील भाग क्रमांक १ मधील २ (ब) मधील तरतुदीनुसार सदर दुरुस्ती कायद्यातील ९, १६, १९, २८ व विहित केलेल्या तारखांना अंमलात येतील असे म्हटलेले आहे. भाग ४ मध्ये सदर दुरुस्ती कायद्यातील कलम ९, पोट-कलम (ब) द्वारा मुंबई मोटार स्पिरिट ॲक्ट कायद्यातील कलम ५ (२) नंतर ५ (३) नव्याने अंतर्भूत केले. परंतु सदर नवीन कलम ५ (३) कोणत्या दिनांकापासून अंमलात येईल याचा उल्लेख नाही. आपण नवीन कलमाचा समावेश केला. हे अधिकार आपण विधानमंडळाला दिलेले आहेत. ते आपण घेतले. त्याप्रमाणे २७ जून, २००२ रोजी पेट्रोल व डिझेलवर प्रति १ रुपया टॅक्स लावला. हा टॅक्स किमतीवर लावावयास पाहिजे होता. परंतु तो क्वॉन्टिटीवर लावण्यात आला. सदर कलमान्वये सन २००२ पासून साधारणतः प्रतिवर्षी ६०० कोटी रुपये शासनाच्या तिजोरीमध्ये जमा झाले. दिनांक २७ जून रोजी काढलेली अधिसूचना नियमबाह्य ठरते. शासनाने दिनांक २७ जून २००२ रोजी अधिसूचनेद्वारे पेट्रोल आणि डिझेलवर १ रुपया प्रतिलीटर विक्रीवर अधिभार लावण्याचे सूचित केले, परंतु सदर अधिभार लावण्याचे अधिकार भारतीय संविधानाने राज्य विधानमंडळाला दिलेले नाहीत.

भारतीय संविधानातील आर्टिकल ३६६ मध्ये क्लॉज २९ (अ) अंतर्गत राज्य विधानमंडळ केवळ विक्री-खरेदीवर कर लावू शकते. या दोन्ही बाबी भिन्न आहेत. दिनांक २७ फेब्रुवारी २००२ च्या अधिसूचनेत पेट्रोल, डिझेलवर १ रुपया कर लावला तो, विक्रीवरील अधिभार या अंतर्गत विक्री झाली म्हणून लावण्यात आलेला कर आहे. सदर कर हा क्लॉज बेस्ड नसून क्वॉन्टिटी बेस्ड आहे आणि क्वॉन्टिटी बेस्डचा अधिकार तुम्हाला नाही, हे मी आपल्याला सूचित केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, तेल कंपन्यांना हा पैसा परत देण्याची वेळ आली तर काय करणार ? मुंबईतील जनतेच्या खिशातून काढून घेतलेला हा पैसा आहे, तो मुंबईतील जनतेकडे परत जाणार आहे काय ? शासनाने नियमबाह्य अधिभार मुंबईतील जनतेच्या डोक्यावर बसविला आहे, तो त्यांना परत देणार काय ? तुम्ही मुंबईतील जनतेला तो पैसा परत देणार असाल तर कशारितीने देणार आहात ? तुम्हाला तो पैसा कसा देता येईल ? कोणत्या व्यक्तीने डिझेल घेतले, कोण व्यक्ती मुंबईबाहेर गेली, हे कसे समजेल. अध्यक्ष महोदय, यामधून झालेला घोळ हा ४ हजार कोटी रुपयांचा आहे. शासनाने या संदर्भात लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज मुंबईतील जनतेची निव्वळ फसवणूक, लूट सुरू आहे, दिवसाढवळ्या त्यांच्या खिशावर घातलेला हा दरोडा आहे.

[ **श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** ]

अध्यक्ष महोदय, नियोजन विभागाच्या बाबतीत मी एकाच ओळीत मागणी करणार आहे. डोंगरी विकास आराखड्यासंदर्भातील निधी वाढवून देऊन असे आपण संगितले आहे. डोंगरी क्षेत्रामध्ये पूर्वीपासून सवलती देण्याचे ठरविले आहे. डोंगरी क्षेत्र घोषित झाल्यापासून, तेथील गावांतील मुलांना मेडिकल, इंजिनिअरिंग, बी.एड्., डी.एड् या कोर्सेसमध्ये प्राधान्य ठेवले आहे. परंतु, या संदर्भातील शासन निर्णयाची अंमलबजावणी राज्यात होत नाही. डोंगरी क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना न्याय मिळाला पाहिजे. त्यामुळे या संदर्भात सुधारित शासन निर्णय काढण्याची आवश्यकता आहे. डोंगरी क्षेत्रातील नागरिकांसाठी जुन्या सवलती नव्याने घालून नवीन शासन निर्णय काढण्याची आवश्यकता आहे. अनेकांना अजूनही या विषयाची माहिती नाही. हा जुना शासन निर्णय आहे. त्यामुळे आपण नव्याने करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, डोंगरी क्षेत्राच्या विकासासंदर्भात उपगटाला २०-२५ लाख रुपये आणि पूर्ण गटाला ५० लाख रुपये देऊन उपयोगाचे नाही. डोंगरी क्षेत्रातील गावे अजूनही सुविधांपासून वंचित आहेत. टेकडीवर राहणाऱ्या लोकांसाठी रस्त्यांची, पिण्याच्या पाण्याची, विजेची व्यवस्था नाही. अजूनही त्या गावांत नागरी सुविधा मिळालेल्या नाहीत. आमदार निधीसारखा हा प्रकार नसला तरी यामध्ये विशिष्ट गावे नोटिफाय केली आहेत. हैद्राबादच्या रिमोट सेन्सिग सेंटरकडून, नियंत्रण केंद्राकडून, त्यांना आयडेन्टिफाय केलेले आहे. या गावांना एकत्रित किमान १ कोटी रुपयांच्या वर निधी दिला पाहिजे, अशी माझी मागणी आहे. कमीत कमी तेवढ्याचसाठी हे केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, डोंगरी क्षेत्रामध्ये काही नियम शिथिल केले पाहिजेत. डोंगरी क्षेत्रामधील काही नियमांचा वापर करून तेथील स्थानिक अटी लावल्या जातात, त्या अटी काढून टाकल्या पाहिजेत. गावांमध्ये आवश्यकतेनुसार काम करण्याची मुभा दिली पाहिजे. सपाट क्षेत्रात राहणाऱ्या आणि डोंगरी क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींच्या अडचणींमध्ये अंतर आहे. त्यामुळे त्या संदर्भात तेथील कोणत्याही अटी न घालता, गावाच्या विकासासाठी प्रयत्न करावेत. गावातील लोकांच्या आवश्यकतेनुसार खर्च करण्याची परवानगी डोंगरी क्षेत्रामध्ये दिली पाहिजे. नियोजन विभागाच्या माध्यमातून जिल्हा नियोजन विकास मंडळामध्ये तरतुदी करीत आहात. मागील वेळी मी सांगितले होते की, तरतुदींचे समान वाटप झाले पाहिजे. अर्थसंकल्प तयार करताना लावलेले निकष जिल्हा नियोजन मंडळाला पैसे देत असताना असले पाहिजेत. ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्सप्रमाणे, लोकसंख्येच्या आधारावर, एससी, एसटीच्या लोकसंख्येच्या आधारावर, बॅकवर्ड क्लास असेल, अवर्षणप्रवण क्षेत्र असेल, दुष्काळी क्षेत्र असेल, या सगळ्या क्षेत्राच्या संदर्भात तालुका हा युनिट धरला पाहिजे. जिल्ह्याला जो १००, ५०० कोटी रुपयांचा निधी मिळेल, त्या निधीचे वाटप जिल्ह्यामध्ये नीटपणे, समान तत्त्वावर झाले पाहिजे. त्यामध्ये थोडे कमी-अधिक होऊ शकते. परंतु, जे अविकसित तालुके आहेत, ज्या तालुक्यांना अधिक निधीची गरज आहे, त्यांना प्राधान्याने निधी दिला पाहिजे. तो देखील याच रेशोप्रमाणे दिला पाहिजे. कारण, असा अनुभव आहे की, जे विकसित तालुके आहेत त्यांना निधी मिळतो. पण अविकसित, मागास भाग आहे, ज्यांचा आवाज बंद असतो, जे दबलेले असतात, त्यांना निधी मिळत नाही आणि त्यांचा बॅकलॉग मोठ्या प्रमाणावर वाढतो. मग नवीन निर्देशांक समिती नेमण्याची गरज निर्माण होते. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, यापुढील कालखंडामध्ये जरी आपण तालुका हा युनिट धरून समान न्याय देऊ शकलो नाही, तरी त्यांना प्राधान्य दिले पाहिजे. तालुका हे युनिट समजून तालुक्यांना निधी देण्याची व्यवस्था जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून केली पाहिजे.

[ **श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** ]

अध्यक्ष महोदय, जिल्हा नियोजन समितीची रचना करीत असताना कायद्यानुसार पदाधिकारी नेमले पाहिजेत. परंतु, पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार पालकमंत्र्यांना दिले तर जिल्हा नियोजन व विकास समितीला काही अर्थ रहात नाही. निवडून आलेले जिल्हा परिषद सदस्य, नगरपालिका सदस्य यांनी कितीही मागण्या केल्या तरी पालकमंत्र्यांना अधिकार असल्यामुळे, त्यांच्या इच्छेनुसार निधीचे वाटप केले जाते व त्यामुळे असमानता निर्माण होते.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाबाबत सांगावयाचे झाले तर आज कधी नव्हे एवढे विविध प्रकारच्या भेसळीवरील राज्य सरकारचे नियंत्रण सुटले आहे. भेसळीचे प्रमाण फार वाढले आहे. वाळू, तेल भेसळीबाबत या सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे. भेसळीवर प्रतिबंध घालावयाचा असेल, अधिक कडक, मजबूत नियंत्रण आणावयाचे असेल तर फूड ॲण्ड ड्रग्ज विभागाचे नियंत्रण वाढविले पाहिजे. भेसळ प्रतिबंध करणाऱ्या यंत्रणांना कार्यान्वित करण्यासाठी सरकारच्या माध्यमातून कोणते प्रयत्न झाले ? या यंत्रणा शासनानेच तयार केलेल्या आहेत. यामध्ये धाडी घालण्याच्या संदर्भातील अधिकार खालच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले असले तरी संबंधित मंत्र्यांची परवानगी त्यांनी मागावयाची आहे. धाडी टाकण्यासाठी मंत्र्यांची परवानगी का लागावी ? जर एखाद्या ठिकाणी धाड घालावयाची असेल तर ते अधिकार खालच्या अधिकाऱ्यांकडेच असले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, या विभागाने भेसळीवर नियंत्रण आणण्यासाठी एक विशेष यंत्रणा जिल्हा पोलीस अधीक्षकस्तरावर निर्माण केली आहे. ही फ्लाईंग स्कॉडसारखी यंत्रणा मुंबई, पुणे यासारख्या शहरांमध्ये स्थापन करण्यात आली आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून एखादे लायसन्स निलंबित केले असेल, त्याबाबत कडक कारवाई केली असेल तर मंत्री पातळीवर निलंबित लायसन्स पुन्हा दिले जातात. घाऊक आणि अर्धघाऊक लायसन्सची यादी मी माहितीच्या अधिकारात घेतली आहे. या माध्यमातून जी माहिती मला मिळाली आहे त्यानुसार एकूण ४० लायसन्स निलंबित करण्यात आले होते. या ४० पैकी ३९ निलंबित लायसन्स पुन्हा देण्यात आले आहेत. ४० लायसन्स निलंबित करण्याची अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई वरच्या पातळीवर चुकीची वाटली का ? चूक कोणी केली, खालच्या स्तरावर चूक झाली की, वरच्या पातळीवर झाली, कोणत्या मार्गाने पुन्हा लायसन्स परत देण्यात आले, याची माहिती मला नाही. शासनाकडून अशा स्वरूपाचे लायसन्स देण्याच्या संदर्भात चर्चा होत असेल तर ती योग्य नाही. सन २००१ ते दिनांक १९ जानेवारी २०१० पर्यंतच्या ४० लायसन्सची यादी माझ्याकडे आहे. यामध्ये सन २००४-२००५ मधील काही लायसन्स आहेत. काही अर्ज, मंजूर व नामंजूर करण्यात येतात. यातील ४० पैकी ४ प्रकरणे फक्त नामंजूर करण्यात आली आहेत. बाकीची सर्व प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. काही प्रकरणांच्या संदर्भात दिनांक २८ एप्रिल २००९ रोजी अर्ज केला व सदर प्रकरण दिनांक १ सप्टेंबर २०१० रोजी मंजूर करण्यात आले. यासाठी इतका वेळ कशाला लागतो ? प्रकरण मंजूर किंवा नामंजूर करण्यासाठी वर्षे ते दीड वर्ष वाट कां पहावी लागते. १४ प्रकरणांमध्ये मंत्री महोदयांकडून सुनावणी करण्यात आली. दिनांक २८ एप्रिल २००१

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

रोजी पुनर्विलोकन अर्ज करून आदेश पारीत करण्यात आले आहेत. येथे जो विलंब झालेला आहे तो संशयास्पद आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात तडजोड करण्यात आलेली आहे. यामध्ये भ्रष्टाचार होतो अशा तक्रारी आल्या आहेत. महाराष्ट्रातील अन्न व नागरी पुरवठ्याच्या संदर्भात दोन तीन उदाहरणे मी देतो. ही बाब स्पष्ट केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना अर्धन्यायिक अधिकार आहेत. त्यावर अनेक आक्षेप येत आहेत. आमचे सरकार होते, तेव्हा सुद्धा असे आक्षेप येत होते. आता तुमचे सरकार आहे तरी आक्षेप येतात, भ्रष्टाचार केल्याच्या तक्रारी येतात. भ्रष्टाचाराचे आरोप लावले जातात. यासाठी मंत्री महोदयांना दिलेले आधिकार काढून ते न्यायालयांना दिले पाहिजेत. ग्रामीण भागात १५ वर्षापूर्वी ग्रामपंचायत सदस्यांना निलंबित करण्याचा अधिकार मंत्री महोदयांना होता. त्यामध्ये ग्रामपंचायत सदस्यांवर स्टे आणला जात होता, तो स्टे मागे घेण्यात येत होता. या अधिकाराचा राजकीय वापर होत होता. सन १९९६-९७ मध्ये या अधिकाराचा राजकीय वापर होत असल्याकारणाने ते अधिकार राज्य सरकारने कोर्टाकडे दिले आहेत. मंत्री महोदयांना मी विचारू इच्छितो की, मंत्री महोदयांना जे अर्धन्यायिक अधिकार आहेत, ते काढून कोर्टाकडे देण्यात येणार आहेत काय ? असे केले तर आक्षेप येणार नाहीत, आपल्यावर कोणतेही आरोप होणार नाहीत. आता भ्रष्टाचाराचे प्रकार वाढत चालेले आहेत.

अध्यक्ष महोदय, अर्ध घाऊक किरकोळ विक्रेत्यांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याचा एक विषय आहे. यासंदर्भात किरकोळ व अर्ध घाऊक परवानाधारकांना मिळणाऱ्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत दिनांक २५ सप्टेंबर, २००१ नुसार अर्ध घाऊक परवाना धारकांना १५ पैसे प्रतिलिटर व किरकोळ परवाना धारकांना २० पैसे प्रति लिटर इतके कमिशन मिळते. परवाना धारकांच्या नूतनीकरणाच्या फी मध्ये वाढ करण्यात आलेली आहे. दुकानाचे भाडे विजेचे बील सर्व नैमित्तिक खर्च वाढले आहेत. या खर्चाचा विचार करता त्यांच्या कमिशनमध्ये वाढ झालेली नाही. हे विक्रेतेयोग्य रीतीने काम करीत असतील तर कमिशनमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, वित्त विभागाच्या संदर्भात एक विषय मांडावयाचा राहिला आहे. जी कामे आमदार निधीतून करण्यात येतात, त्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात रॉयल्टी घेण्यात येते. पूर्वी रॉयल्टी कमी होती, त्यामुळे फारसा त्रास होत नव्हता. एका बाजूला ईटीपी चार्जेस भरावयाचे, आणि दुसऱ्या बाजूने कामांसाठी रॉयल्टी लावण्यात येत आहे. त्यामुळे आमदार निधी आता दोन कोटी रुपये केला असला तरी त्यातून ईटीपी चार्जेस आठ ते दहा टक्के घेण्यात येतात. एक कोटी पैकी दहा लाख रुपये ईटीपी चार्जेसमध्ये जातात. एवढ्या मोठ्या कामांची २० ते २५ लाख रुपये रॉयल्टी जाते. आमदारांना ५० लाख रुपये आमदार फंड वाढवून दिला तरी हे ५० लाख रुपये ईटीपी चार्जेस व रॉयल्टीमध्ये जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे करण्यात येतात. ती रॉयल्टी ठेकेदारास परत मिळते. आमदार निधीच्या स्वरूपात जी कामे करण्यात येतात, त्याची रॉयल्टी परत मिळाली पाहिजे. ही कामे जनतेची आहेत. आमदार निधी म्हणजे आमदाराकडे पैसा जात नाही. त्याच्या खिशात तो पैसा जात नाही. शासनाच्या माध्यमातून त्याला फक्त गावाच्या आवश्यकतेनुसार कामे करण्याच्या संदर्भात स्वेच्छाधिकार देण्यात आलेला आहे. यासाठी ईटीपी चार्जेस १०० टक्के रद्द करावेत. रॉयल्टी

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

सार्वजनिक बांधकाम विभागाला परत मिळते. हा आपल्याच खात्याचा निर्णय आहे. त्यामुळे आमदार निधीच्या कामांसाठी लावण्यात आलेली रॉयल्टी काढून टाकण्यात यावी. तहसीलदार प्रमाणपत्र देतो की, हे आमदार निधीतील काम आहे. हे काम मंजूर झालेले आहे. या कामाला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे असे कळविल्यानंतर त्यासाठी रॉयल्टी लागत नाही. आमदार निधीसाठी रॉयल्टी काढून टाकणे आणि ईटीपी चार्जेस वगळण्याची व्यवस्था शासनाने करावी. म्हणजे शासनाने १०-२० लाख आमदार निधी वाढविला नाही तरी यामध्ये अप्रत्यक्षरित्या १०-२० लाखाचे अधिक काम करता येईल, म्हणून मंत्री महोदयांची या सूचनेचा जरूर विचार करावा.

अध्यक्ष महोदय, मी तेलमाफियांच्या विषयी बोलणार आहे. मी मघाशी वारंवार सांगत आहे की, आमचा उत्तर महाराष्ट्र वर्षानुवर्षे तेल माफियांच्या बाबतीत प्रसिद्ध आहे. धुळे जिल्ह्याला देण्यात आलेल्या केरोसीनच्या कोट्याच्या संदर्भात मी अनेक वेळा या सभागृहात मुद्दा उपस्थित केलेला आहे. धुळे-नंदुरबार जिल्हा एकत्र असताना जो कोटा देण्यात आलेला आहे तोच कोटा आजही देण्यात येतो. आता धुळे-नंदुरबार जिल्ह्याचे विभाजन झालेले आहे. धुळे जिल्ह्यामध्ये फक्त ४ तालुके आहेत. मग तुम्ही धुळे जिल्ह्याचा कोटा का कमी करीत नाही ? यातील गैरव्यवहाराचे खरे कारण कोणते असेल तर ते अतिरिक्त कोट्याचे आहे. धुळे जिल्ह्याला तेवढा कोटा लागत नाही. सर्वात जास्त केसेस धुळे जिल्ह्यामध्ये होत असतात. सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य अनेक वेळा सभागृहामध्ये मुद्दा उपस्थित करतात की, तुम्ही लोकसंख्यानिहाय कोटा का देत नाही ? केरोसीनचा किती कोटा द्यावयाचा यासंदर्भात शासनाने युनिट ठरवून दिलेले असेल. धुळे जिल्ह्याला मोठ्या प्रमाणावर केरोसीनचा कोटा दिला जातो. धुळे-नंदुरबार जिल्ह्यामध्ये गैरप्रकार होत असतील तर त्याला प्रतिबंध घालण्यासाठी तुम्ही तातडीने अन्य तालुक्यांना, अन्य जिल्ह्यांना ज्या निकषाच्या आधारावर केरोसीनचा कोटा देता, त्या निकषाच्या आधारे धुळे जिल्ह्याला केरोसीनचा कोटा देण्यात येणार आहे काय ? त्या ठिकाणी केरोसीनचा तिप्पट कोटा दिला जातो. तेथे फक्त दोन-तीन हजार लिटर केरोसीन लागत असेल. तेथे राजा उदार झालेला आहे आणि मग सोनावणे यांच्या सारख्या अधिकाऱ्यांच्या हत्या होतात. त्या भागातील गैरव्यवहाराचे मुख्य कारण अतिरिक्त कोटा हे आहे.

अध्यक्ष महोदय, तेल वाहतूक करणाऱ्या टँकरसाठी सध्या प्रचलित असलेल्या टँकर ट्रॅकिंग व्यवस्थेमध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. दिनांक १३ जानेवारी २००६ रोजी विहित केलेल्या टँकर ट्रॅकिंग सिस्टिमप्रमाणे टँकर डेपोतून भरल्यानंतर टँकर तहसील कार्यालयात आणून त्याबाबतची योग्य ती नोंद ट्रॅकिंग शीटवर करण्यात यावी. प्रथम टँकर तहसील कार्यालयामध्ये आणावा. त्याची ट्रॅकिंग शिटवर नोंद करावी आणि तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन टँकर केरोसीन साठवणुकीच्या ठिकाणी तहसील कार्यालयातील प्रतिनिधी समक्ष खाली करण्यात यावा. तहसील कार्यालयातील चपराशी किंवा इतर कोणताही कर्मचारी तेथे जाईल. परंतु त्यांच्या समक्ष टँकर खाली करण्यात यावा. कंपनीचे एजन्ट, घाऊक परवानेधारक यांनी केरोसीन साठवणुकीच्या ठिकाणी मीटर असलेला पंप बसवून त्याद्वारे अर्ध घाऊक परवाने धारकांना केरोसीन भरून द्यावे आणि घाऊक परवाने धारकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन ट्रॅकिंग शिटवर मीटर रीडिंग नोंदविण्याची तरतूद करण्यात यावी. अर्ध

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

घाऊक परवाने धारकाने एजन्टच्या घाऊक परवानाधारक डेपोवरून टँकर भरल्यानंतर कर्मचाऱ्याने टँकरपर्यंत सोबत जाऊन अर्ध घाऊक परवानाधारकाचे केरोसीन तेथे खाली करण्याची व्यवस्था करावी. या सर्व नोंदी ट्रॅकिंग शीटवर घेऊन त्यावर स्वाक्षरी घेऊन त्याची एक प्रत तहसीलदार यांना द्यावी. जेथे अर्ध घाऊक विक्रेते असतील तेथे किरकोळ विक्रेत्यांनी आपले टँकर एजन्टच्या डेपोवरून करोसीन घेऊन हीच पद्धत त्या ठिकाणी अंमलात आणावी. मला असे वाटते की, या पद्धतीने शासनाच्या पेट्रोलियम ॲक्ट व पेट्रोलियम रुल्स अंतर्गत बंधनकारक असलेली स्टोअरेज परवाना घेण्याची तरतूद आहे. त्याची अंमलबजावणी होत नाही. स्टोअरेज परवाना प्रत्येकाला लागतो. स्टोअरेज परवाना घेण्याची पद्धत अंमलात आल्यास सदर स्टोअरेजमधून कोणत्या तारखेला मीटर रीडिंग प्रमाणे किती केरोसीन उतरविण्यात आले, वाटप करण्यात आले याची कोणत्याही क्षणी अधिकाऱ्याला माहिती घेणे शक्य होईल. त्यामुळे कंपनीचे एजंट व अर्ध घाऊक विक्रेते यांच्या संगनमताने जे व्यवहार सुरू आहेत ते बंद होतील.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहामध्ये सॉलव्हन्ट प्लॅनच्या संदर्भात सांगितले होते. मोटार वाहन स्पिरिटच्या संदर्भात सॉल्व्हन्ट पदार्थाच्या भेसळीस प्रतिबंध करण्याच्या संदर्भात केंद्र शासनाने अध्यादेश काढला होता. केंद्र शासनाने अध्यादेश काढल्यानंतर राज्य शासनाला एक वर्षे विलंब का लागला ? ही माहिती मागवा, ती माहिती मागवा यासाठी ही फाईल एक वर्षे तुमच्याच लेव्हलला फिरत होती. केंद्र शासनाने यासंदर्भात आदेश काढला की, आजपासून हा आदेश अंमलात येईल. मग राज्य सरकारला त्यासंदर्भात माहिती मागण्याचा काय अधिकार होता ?

राज्य शासनाकडे तेल कंपन्यानी, इंडस्ट्रीमधून निवेदने दिली होती की, सदर केंद्र शासनाच्या अधिनियमाची तत्काळ अंमलबजावणी केली जावी. परंतु त्यासाठी वर्षभर का विलंब लावण्यात आला ? अशा स्वरूपाच्या फाईल्स माननीय मंत्री महोदयांच्या पातळीवर आल्यानंतर परत पाठविल्या जातात. या बाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देणे गरजेचे आहे. परिणामी कार्यालयामध्ये विलंब लागतो, अशा प्रकारचे आरोप केले जातात. एखाद्या लाभाच्या दृष्टीने किंवा काही तरी मिळावे या हेतूने हा विलंब होतो. माझ्याकडे केंद्र शासनाची अधिसूचना आहे. त्यात सदर अधिसूचना तत्काळ, त्याच दिवशी, त्याच क्षणापासून अंमलात येईन असा उल्लेख केला असताना सुद्धा, त्या अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी एका वर्षाचा कालावधी का लागला, याबाबत शासनाने स्पष्टीकरण करणे अत्यावश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या विभागामध्ये, मंत्री महोदयांकडे असलेले खाजगी सचिव श्री. अहिरराव यांच्याबद्दल अनेक लेखी तक्रारी आहेत. तक्रारदारांनी दूरदर्शनवर तक्रारीसंबंधी माहिती दिली. संबंधित तक्रारदारांनी माझ्याकडे सदर तक्रारीची एक प्रत पाठवली आहे. कोणताही कारभार संशयाच्या बाहेर असायला पाहिजे. श्री. प्रकाश बबनराव लोळगे, यांचा अर्धघाऊक केरोसीन परवाना क्रमांक १८/९३, छत्रपती एजन्सी, घर नं.१४१, रा.खाणगाव, लोहसर, तालुका पाथर्डी या भागीदारी संस्थेच्या नावाने वर्ग करण्याच्या संदर्भात पुनर्निरीक्षण अर्ज निकाली काढण्यासाठी श्री. अहिरराव यांनी त्यांच्याकडे ५ लक्ष रुपयांची मागणी केल्याची तक्रार अर्जदाराने सही, शिक्क्यानिशी, प्रतिज्ञापत्र करून दिलेली

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

आहे. सदर तक्रारदाराने यासंबंधी टीव्हीवर सुद्धा मुलाखत दिली होती. त्यांनी सन २००२ व २०११ च्या पत्रान्वये माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना ही बाब कळविली होती. अर्जदाराने सदर रक्कम देण्यास नकार दिल्याने त्याचा अर्ज गेल्या एक वर्षापासून जाणूनबुजून प्रलंबित ठेवलेला आहे.

श्री. चंद्रभान डाखोरे, शिवाजी चौक, भंडारा यांनी सुद्धा श्री. अहिरराव यांच्याविरुद्ध तक्रार केली की, १२०० लिटरचा किरकोळ घासलेट विक्रीचा बंद झालेला परवाना पुन्हा सुरू करण्याच्या संदर्भात श्री. अहिरराव यांनी त्यांच्याकडे एक लक्ष रुपयांची मागणी केली असून, दिनांक ७ मार्च २०११ अन्वये माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे त्यासंबंधी तक्रारही केली आहे. श्री. अहिरराव प्रत्येक लायसन्स धारकाकडून २५,००० ते ३०,००० रुपये ॲडव्हान्स घेत असून त्यांनी श्री. डाखोरे यांना असे सांगितले की, मला सदर रक्कम श्री. अजित पवार साहेब, मुख्य सचिव व दिल्लीवरून १०० कोटी रुपये देऊन आलेले माननीय मुख्यमंत्री यांना देऊन प्रत्येकाचा रिपोर्ट व त्यांना देणगी द्यावी लागते. यामध्ये काही तथ्य आहे का ? याबद्दल मला काही माहिती नाही. अध्यक्ष महोदय, एखाद्या व्यक्तीविरुद्ध वारंवार अशा प्रकारच्या तक्रारी येत असल्यास, माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधी खात्री करायला पाहिजे. अध्यक्ष महोदय, हा अनुभव सर्व सामान्य माणसांनाच नव्हे तर या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांना आला आहे. एखाद्या व्यक्तीविरुद्ध साध्या प्रकारचे पत्र देणे ही वेगळी बाब आहे. परंतु ज्यावेळी एखादी व्यक्ती दूरदर्शनला तक्रारीच्या संबंधी मुलाखत देते, स्वतःच्या सहीनिशी व प्रतिज्ञापत्र करून एखाद्या व्यक्तीविरुद्ध तक्रार करते, त्यावेळी त्यांचे म्हणणे तपासून पाहिले पाहिजे. त्यांचे म्हणणे खरे नसल्यास त्याच्याविरुद्ध फौजदारी कारवाई केली पाहिजे. परंतु त्यांचे म्हणणे खरे असल्यास, त्या बाबतची माहिती आपण जनतेसमोर आणली पाहिजे. आपण या सर्व तक्रारींची तपासणी ॲन्टी करप्शन ब्युरोकडून करून घेणार आहात का ?

महोदय, एका वर्षाच्या कालावधीत ६-७ तक्रारी आलेल्या आहेत व त्या अतिशय गंभीर स्वरूपाच्या आहेत. एखाद्या अधिकाऱ्याविरुद्ध, राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून वेगवेगळ्या तक्रारी येत असल्यास, त्यात तथ्य आहे असे आम्हाला वाटते. एखाद्या व्यक्तीने तक्रार केली असल्यास ती बायस असेल. त्याच जिल्ह्यातील व्यक्तीने तक्रार केली असल्यास ती वेगळ्या कारणासाठी केली असेल. परंतु ५-६ जिल्ह्यातून वेगळ्या स्वरूपात एकाच अधिकाऱ्याविरुद्ध तक्रारी येत असल्यास, त्यासंबंधी ॲन्टी करप्शन ब्युरोकडून चौकशी होणे अत्यावश्यक आहे व त्यामधून खरी माहिती समोर आली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांचे खाजगी सचिव पैसे मागत असल्यासंबंधी एखादी व्यक्ती सहीनिशी तक्रार करते, प्रतिज्ञापत्रावर लिहून देते व यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार केली जाते, त्यावेळी नक्कीच त्यामध्ये तथ्य आहे. खाजगी सचिव पैसे घेऊ शकत नाही. या प्रकरणी माननीय मंत्री महोदयांकडे बोट दाखविले जाते. त्यामुळे साहजिकच संशयाला जागा निर्माण होते. म्हणून या सर्व तक्रारींची तपासणी ॲन्टी करप्शन ब्युरोकडून करून घ्यावी.

अध्यक्ष महोदय, राज्यात दूध भेसळीच्या गुन्ह्यात वाढ होत आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात दुधात भेसळ केली जाते. दुधात भेसळ करीत असताना, त्यात पाणी नव्हे तर युरिया व सिंथेटिक पावडर टाकली जाते. ही सिंथेटिक पावडर चायनामधून येते. दुधात भेसळ करून जनतेच्या आरोग्याशी

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

खेळण्याचा प्रयत्न केला जात आहे. अहमदनगर, शिरपूर, बीड, फलटण आदि ठिकाणी दुधाची भेसळ करणारे अनेक टँकर पकडण्यात आलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात संबंधित गुन्हेगारांना कठोर शिक्षा करण्याची गरज आहे. जनतेच्या आरोग्याशी कुणी खेळण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते योग्य नाही. मध्यंतरीच्या काळात नाशिक जिल्ह्यात सोनवणे जळीत हत्याकांड झाले. त्यानंतर राज्यात धाडसत्र मोहीम सुरू झाली. धाडी टाकायला सुरुवात केल्यानंतर मुंबई शहरात ८ लाख लिटर्स दूध कमी यायला लागले होते. आपण याची माहिती दुग्धविकास विभागाच्या सचिवांकडून घेऊ शकता. याचा अर्थ असा की, मुंबई शहरात धाडी टाकण्यापूर्वी ८ लाख लिटर्स भेसळयुक्त दूध येत होते. मुंबई शहरातील नागरिकांना सिंथेटिक दूध दिले जाते. त्याच्यात आता दोन रुपयांची भाव वाढ करण्यात आलेली आहे. यासंदर्भात राजकारणाच्या पलीकडे जाऊन अभ्यास करून योग्य ती कार्यवाही केली पाहिजे. सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या जिवाशी जर कोणी खेळण्याचा प्रयत्न करीत असेल तर अशा भेसळ माफियांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची गरज आहे. लहान मुले आणि गरोदर महिला दूध पीत असतात. भेसळयुक्त दूध प्यायल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो.

अध्यक्ष महोदय, मी माननीय श्री. सुरेश शेट्टी यांना सांगू इच्छितो की यासंदर्भातील अहवाल माझ्याकडे आहे. या भेसळीचा फटका गोरगरीब मुले आणि गरोदर महिलांना होत असतो. यावर कशा प्रकारे नियंत्रण आणणार ? यासंदर्भात शासनाने कठोर भूमिका घेण्याची गरज आहे. दूध भेसळ माफियांविरुद्ध शासनाने कठोर भूमिका घेण्याची गरज आहे. मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की, अनेक भेसळयुक्त दुधाचे टँकर पकडले जातात. परंतु यामध्ये फक्त संबंधित ड्रायव्हर आणि क्लिनर यांनाच अटक केली जाते. टँकरच्या मालकांना अटक केली जात नाही. टँकर पकडले जातात आणि त्यानंतर ते सोडून दिले जातात. यामध्ये भेसळ करणाऱ्या टँकरचे चालक, क्लिनर, मालक यांना कठोर शिक्षा करण्याची गरज आहे. भेसळमाफियांचे राज्य आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. यासर्व दोषी लोकांच्या विरुद्ध कठोर कारवाई करण्याची गरज आहे. एवढे बोलून मी माझे भाषण या ठिकाणी संपवितो.

**श्री. सुभाष देसाई** (गोरेगाव) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आज कामकाजपत्रिकेवर अतिशय महत्त्वाच्या विभागाची चर्चा दर्शविण्यात आलेली आहे. ते विषय खूप महत्त्वाचे आहेत. कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या विषयांपैकी वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या सार्वभौम सभागृहात राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत वेगवेगळ्या आयुधांमार्फत आम्ही तारांकित प्रश्न किंवा लक्षवेधी सूचनेद्वारे चर्चा उपस्थित केलेल्या आहेत. राज्यातील रुग्णालयांची परिस्थिती कशी आहे, औषधाच्या खरेदीत झालेला घोटाळा आणि एकंदरीत खालावलेली वैद्यकीय सेवा याबाबत खूप गांभीर्याने सभागृहात चर्चा झालेल्या आहेत. यासंदर्भात आम्हाला योग्य ती उत्तरे मिळत नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे. राज्यातील ग्रामीण भागात एक लाख लोकसंख्येमागे फक्त २२ खाटा अशी रुग्णालयांची परिस्थिती आहे. शहरामध्ये हे प्रमाण ४३१ खाटांचे आहे. एवढ्या मोठ्या

[ श्री. सुभाष देसाई ]

लोकसंख्येच्या प्रमाणात, या खाटा कमी असल्यामुळे, रुग्णांना सेवा मिळत नाहीत. ज्या मिळतात, त्यांचा दर्जाही अत्यंत खालावलेला आहे. दर्जा खालाविण्यासाठी अन्य काही कारणे आहेत. आपल्याकडे डॉक्टरांची संख्या सुद्धा अत्यंत कमी आहे. इतकी कमी आहे की, १७०० लोकांमागे एक डॉक्टर आहे. ही महाराष्ट्राची आजची स्थिती आहे, असे चित्र आपणास बघावयास मिळते. अनेक प्रगत देशामध्ये डॉक्टरांचे हे प्रमाण अतिशय चांगले आहे. आपल्या आजुबाजूच्या अनेक राज्यांमध्ये हे प्रमाण चांगले आहे. मी ती आकडेवारी सांगून सभागृहाचा अधिकचा वेळ घेणार नाही. राज्य शासनाने प्रयत्न करून एक हजार लोकसंख्येमागे किमान एक डॉक्टर असेल असे धोरण आखले तर जनतेच्या आरोग्याचे काही प्रमाणात का होईना रक्षण होऊ शकेल. यामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्यत: वैद्यकीय शिक्षणाकडे खऱ्या अर्थाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षणाच्या बाबतीत पदवी आणि पदव्युत्तर या अभ्यासक्रमासाठी देशामध्ये एकच प्रवेश परीक्षा देण्याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने ठरविले आहे. यामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने काही अभ्यास करून अशा प्रकारचा निर्णय घेतला असेल. परंतु या निर्णयाचा आपल्या राज्यावर काय परिणाम होणार आहे, याचा अगोदर विचार झाला पाहिजे. यामध्ये खूप गुंतागुंत आहे, तो तपशील सांगण्यासाठी, मी आपला वेळ घेणार नाही. यावरून एक निष्कर्ष असा दिसतो आहे की, एस.एस.सी. बोर्डाचे विद्यार्थी हे वैद्यकीय शिक्षणापासून मोठ्या प्रमाणात, या नव्या पद्धतीमुळे वंचित होऊ शकतील आणि म्हणून अजूनही माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये राज्य सरकारच्यावतीने रिव्हिव्ह पीटिशन दाखल करून आपल्या विद्यार्थ्यांची होणारी पिछेहाट रोखण्यासाठी या पद्धतीत आणखी काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तामिळनाडू सरकारने, या एका सेंट्रलाईज सी.ई.टी परीक्षा पद्धतीवर प्रयत्न करून, थेट माननीय राष्ट्रपती महोदयांकडून निवाडा मिळविला आहे. यामुळे तेथील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाच्या मार्गात थोडीशी सवलत मिळालेली आहे, हेही उदाहरण आपल्या समोरच आहे. महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्यांची पिछेहाट रोखण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावयाला काय हरकत आहे आणि तसे झाले तर डॉक्टर्स उपलब्ध होऊ शकतील, त्यामुळे जे वाईट परिणाम आहे ते कोठेतरी कमी होऊ शकतील.

अध्यक्ष महोदय, यामधील आणखी मुख्य अडथळा म्हणजे वैद्यकीय शिक्षणासाठी आकारण्यात येणारे शुल्क. वैद्यकीय शिक्षणासाठीची फी राज्य सरकारने प्रचंड प्रमाणात वाढविली आहे. याचे सुद्धा फार दुष्परिणाम वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांवर तसेच विद्यार्थ्यांवर साहजिकच होणार आहेत. येथून पुढे, श्रीमंताचीच मुले वैद्यकीय शिक्षण घेऊ शकतील अशी परिस्थिती येणार आहे. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाची कॅपिटेशन फी व इतर शुल्क यांचा विचार केला तर, सर्वसामान्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न हे सर्वसामान्यांनी न बाळगलेले बरे, अशी परिस्थिती या फी वाढीमुळे झालेली आहे. अजूनही शासकीय महाविद्यालयांबाबत थोडीशी आशा होती, परंतु त्यांनीही फी वाढविल्यामुळे, ती आशाही आता संपुष्टात आली आहे. एम.बी.बी.एस. चे शिक्षण घेणाऱ्यांसाठी पूर्वी १८ हजार रुपये फी होती, ती आता ४० हजार रुपये करण्यात आली. म्हणजे शिक्षणाला ४ लाख ८० हजार रुपये करण्यात आली आहे. दंत शिक्षणासाठीची फी १५ हजार होती ती आता २० हजार रुपये करण्यात

[ श्री. सुभाष देसाई ]

आली आहे. आयुर्वेदिक शिक्षणासाठीची फी १ लाख ८० हजार झाली. परिचारिकेच्या शिक्षणासाठीची फी २ लाख १६ हजार करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षणाची फी वाढविल्यामुळे मुलगा कितीही हुशार असला, तो परीक्षेत मेरिटमध्ये आला असला तरी, शिक्षणासाठीची फी भरता येत नाही म्हणून त्याला डॉक्टर होता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**श्री. सुरेश शेट्टी :** अध्यक्ष महोदय, ४० हजार रुपये फी ही महिन्यासाठी नसून वर्षासाठीची आहे. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी ही बाब आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

**श्री. सुभाष देसाई :** अध्यक्ष महोदय, माझ्याकडे वैद्यकीय शिक्षणाच्या फी संबंधीचा तक्ता आहे. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री याबाबत कोठे आहेत ? वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व पालकांना सवलत मिळेल अशा प्रकारे शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. दर वर्षी १० टक्के फी वाढ करण्यात यावी असे ठरले आहे. आमच्याकडे यासंदर्भात तक्ते आहेत. सर्वसामान्य लोकांच्या मुलांना देखील डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार व्हावे या करिता शासनाने ठोस सवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते यांनी बरीच चर्चा केली. दूध भेसळीच्या संदर्भात त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आता कृत्रिम दूध तयार होऊ लागले आहे. यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. लोक हे दूध विश्वासाने खरेदी करतात. कित्येक पालक आपल्या लहान मुलांना हे कृत्रिम दूध पाजतात. त्यांना माहीत नाही की, कोणते दूध नैसर्गिक आहे व कोणते दूध कृत्रिम आहे. दूध तयार करण्याचे अनेक कारखाने तयार झालेले आहेत. अनेक रसायने एकत्रित करून हुबेहूब दुधासारखे वाटणारे, त्याच चवीचे दूध तयार केले जात आहे. तसेच या बनावट दुधातील फॅटस देखील खऱ्या दुधाएवढेच आहेत. अत्यंत हुशारीने कृत्रिम दूध तयार करण्याचा प्रयोग केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, मागील वेळी भेसळयुक्त मावा पकडण्यात आला होता. त्यावेळी लोकांच्या पोटात किती विष जाते, हे लक्षात आले. मसाले, तेल यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात भेसळ होत असते. सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील यांनी आपल्या जिल्ह्यातील भेसळयुक्त सीलबंद पामोलिन तेलाचे नमुने आणून दाखविले होते. प्लॅस्टिकच्या आवरणाखालील तेल खाण्याचे आहे की, एखाद्या इंजिनमध्ये घालण्याचे आहे, असा आम्हाला प्रश्न पडला. ते तेल इतके खराब होते. ही भेसळ रोखण्यासाठी राज्य शासनाची अन्न व औषध प्रशासन विभागाची यंत्रणा तोकडी पडत आहे. या विभागाला अधिक निरीक्षकांची आवश्यकता आहे. मात्र त्या बाबत शासन उदासीन आहे. २६५ अन्न निरीक्षक व २८७ औषध निरीक्षकांची आज आवश्यकता आहे. मात्र शासनाकडून त्यांची भरती केली जात नाही. निरीक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवली व अधिक दक्षता बाळगली तर नागरिकांच्या पोटात जाणारे विष आपल्याला थांबविता येईल.

[ श्री. सुभाष देसाई ]

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय महाविद्यालयांच्या बाबतीत आपली प्रगती कासवासारखी आहे. अनेक ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये सुरू होण्याची घोषणा झाली, मात्र त्याबाबत अंमलबजावणी होत नाही. काही ठिकाणी ती अंमलात येते, मात्र त्यामध्ये गोंधळ झाल्याचे दिसून येतो. लातूर व अकोला येथे वैद्यकीय महाविद्यालये सुरू झाली, मात्र त्यांना आवश्यक परवानगी नसल्यामुळे त्यांची मान्यता आता धोक्यात आली आहे की काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत या ठिकाणी खुलासा होणे गरजेचे आहे. मुंबई, अलिबाग व नंदुरबार या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये कधी सुरू होणार या संदर्भात जिल्ह्यातील व सर्व आजूबाजूच्या परिसरातील जनता वाट पाहत आहे. अनेकदा घोषणा झाली, बातम्या आल्या, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देखील दिले आहे. मात्र या भागातील वैद्यकीय महाविद्यालयांचा क्रमांक कधी लागणार आहे, हे या ठिकाणी मंत्री महोदयांनी सांगितले तर बरे होईल.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय उपकरणे, औषधे यांच्या खरेदीमध्ये अनेकदा घोटाळे होतात. याचा परिणाम असा झाला आहे की, गेल्या वर्षी एक संचालकांवर खटला दाखल केला गेला व त्यांच्या साथीदारांची देखील चौकशी सुरू आहे. अशा प्रकरणांमध्ये होणारा राजकीय हस्तक्षेप थांबला नाही, तर आपल्याला दोषी व्यक्ती सापडणार नाहीत व हे प्रकार कायमस्वरूपी बंद होणार नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये राजकीय हस्तक्षेप होणार नाही, याची आपण व्यवस्था केली पाहिजे. जे जे रुग्णालयामध्ये झालेल्या मृत्यूकांड च्या संदर्भात लेन्टीन आयोग नेमण्यात आला होता. या अहवालामध्ये सुंदर मार्गदर्शन केले आहे. मात्र शासन त्याकडे लक्ष देण्यास तयार नाही.

अध्यक्ष महोदय, सत्तेची साठमारी सार्वजनिक आरोग्य विभागात होत आहे, त्यामुळे आम्हाला चिंता वाटते. सार्वजनिक आरोग्य विभाग एका पक्षाकडे आहे व वैद्यकीय शिक्षण विभाग दुसऱ्या पक्षाकडे आहे. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपापसात खाते वाटून घेतले आहेत. त्याबाबत आमची तक्रार असण्याचे काही कारण नाही. या दोन्ही विभागाने हातात हात घालून सामंजस्याने काम करण्याची गरज असताना अनेकदा एकमेकांवर कुरघोडी करून, एकमेकांचे पाय ओढण्याच्या प्रयत्न केला जातो. यामुळे अनेकदा विभागाचे चांगले निर्णय तसेच बाजूला राहतात आणि जनतेला मात्र चांगल्या वैद्यकीय सेवेपासून वंचित रहावे लागते, ही फार मोठी दु:खाची बाब आहे.

अध्यक्ष महाराज, यानंतर मी औषध खरेदीबाबत बोलणार आहे. याबाबत सरकारने एक चांगली योजना स्वीकारून ती राबविली, तर महाराष्ट्रातल्या जनतेला आरोग्य रक्षणासाठी फार मोठी मदत होणार आहे. यासाठी मी एक प्रस्ताव मांडत आहे. आपल्याकडे औषध खरेदी हे रेट कॉंट्रॅक्ट पद्धतीने, ठोक पद्धतीने होते आणि ही औषधे सगळ्या रुग्णालयांना दिली जातात. त्यांचा लाभ रुग्णालयातील रुग्णांना होतो. पण याच्या पलीकडे, फार मोठ्या संख्येने लोक ज्यांना आपण बाह्यरुग्ण विभाग, ओपीडी म्हणतो तेथे रुग्ण डॉक्टरांकडून तपासून घेतात. तेथे डॉक्टर त्यांना औषधांच्या चिठ्ठ्या देतात, त्यामुळे त्यांना बाजारात जाऊन औषधी घ्यावी लागतात, ही औषधी खूप महाग पडते. तिथे या रुग्णांची पिळवणूक होते. या खेरीज मोठ्या संख्येने छोट्या-मोठ्या आजारांसाठी जनता आपल्या खाजगी डॉक्टरांकडे जाते. डॉक्टर त्यांना जे प्रिस्क्रिप्शन लिहून देतात, त्यासाठी त्यांना दुकानात जाऊन औषधी घ्यावी लागतात. मोठमोठ्या कंपन्यांची ब्रँडेड औषधी खूप महागडी असल्याने, जनतेची पिळवणूक होते आहे.

**[ श्री. सुभाष देसाई ]**

जनतेच्या पिळवणुकीचे मी एकच उदाहरण सांगतो की, ब्रॅंडेड औषधी व नॉन-ब्रॅंडेड औषधी असे प्रकार असतात. नॉन-ब्रॅंडेड औषधांना जेनेरिक असे म्हटले जाते, औषधाचे जे मूळद्रव्य असते ते एक असते, पण वेगवेगळ्या कंपन्या आपल्या पॅकिंगमध्ये ते टाकल्यावर त्याला एक नाव देतात, ब्रॅंड देतात व त्या ब्रॅंडची किंमत मनाप्रमाणे प्रचंड वाढवतात, त्यामुळे लोकांची एक प्रकारे फसवणूक होते. उदाहरणच द्यावयाचे झाले, तर डोकेदुखी, अंगदुखी, तापावर अॅस्प्रो, अॅनासिन, सॅरिडॉन, क्रोसिन अशी कितीतरी औषधी आहेत. ही नावे जरी वेगळी असली, तरी त्याचे मूळद्रव्य एकच आहे ते म्हणज पॅरासिटॅमॉल. पॅरासिटॅमॉल नावाची गोळी फक्त २० पैशांना मिळते, पण जर क्रोसिन गोळी घेतली, तर तेच औषध असणाऱ्या गोळीची किंमत १ रुपये २० पैसे इतकी आहे. ब्रॅंडेड औषधांचे हे जे फार मोठे रॅकेट आहे, ते मोडून काढण्यासाठी सरकारने जेनेरिक औषधे उपलब्ध करण्याच्या बाबतीत उपायोजना बनविणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महाराज, अल्बेंडेझॉल नावाचे एक औषध आहे, ते लहान मुलांना पोटामध्ये जंत होतात, तेव्हा डॉक्टर हे औषध लिहून देतात. याची एक गोळी घेतल्यानंतर, लहान मुलांच्या पोटातील जंत, कृमी मरून जातात. त्या एका गोळीची किंमत १७ रुपये आहे. लाखो मुलांना, शाळेतल्या विद्यार्थ्यांना हे औषध अधूनमधून घ्यावे लागते. त्यामध्ये किती लूट आहे. जर जेनेरिक स्वरूपाचे अल्बेंडेझॉल नावाचे औषध, जे बल्क स्वरूपात मिळते, ते घेतले तर फक्त ७ रुपयाला १ गोळी पडते. मात्र कंपन्या त्यांची १ गोळी १७ रुपयांना विकतात. यात जर शासनाने लक्ष घातले, तर ही औषधी मोठ्या प्रमाणात स्वस्त होऊ शकतात आणि जनतेला त्याचा लाभ मिळू शकतो.

अलीकडे रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार हे आजार लोकांमध्ये सर्वसामान्यपणे खूप मोठ्या प्रमाणावर आढळतात. खासकरून ज्येष्ठ नागरिकांना यांचा खूप त्रास होतो. निवृत्त झाल्यानंतर त्यांचे उत्पन्न कमी असते व आजारांवरील औषधांचा खर्च जास्त असतो. त्यांना जर ही अशा प्रकारची जेनेरिक किंवा नॉन-ब्रॅंडेड औषधे उपलब्ध करून दिली, तर एका ज्येष्ठ नागरिकाला महिन्याला औषधांसाठी जो २.५ ते ३ हजार रुपये इतका खर्च येतो, तो ५०० ते १,००० रुपयांवर येईल, इतकी ही सर्वसाधारण औषधी आहेत, जी स्वस्त आहेत.

जेनेरिक औषधी तयार करण्याचे प्रयत्न देशात, राज्यात इतर ठिकाणी चालू आहेत. राजस्थानमध्ये, नागूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, डॉ. समित शर्मा आहेत, त्यांनी त्यांच्या जिल्ह्यामध्ये अशी ३६ दुकानांची साखळी तयार केली. त्यामध्ये सर्व मूलद्रव्ये असलेली, जेनेरिक, ज्यांना ब्रॅंड नाही, अशी औषधे ठेवली आणि ती चळवळ फार मोठ्या प्रमाणावर फोफावली. तिथली जनता आता दुवा देत आहे की, त्यांची औषधांवर होणारी लुबाडणूक आता थांबलेली आहे. वैद्यकीय शिक्षणात किंवा क्रमिक पुस्तकात कुठेही ब्रॅंडेड औषधांचा उल्लेख नाही, त्यामध्ये जे मूलद्रव्य असते, ज्याला जेनेरिक हे नाव आहे, तेच वापरले जाते. पण ब्रॅंडचे प्रस्थ एवढे वाढलेले आहे की, कंपन्यांनी त्यांची जाहिरात प्रसिद्धी आणि डॉक्टरांना चालू असलेली ‘कट’ प्रॅक्टीस, याचा गैरफायदा घेतघेत औषधांच्या किमती प्रचंड वाढविलेल्या आहेत आणि लोकांची लूटमार होते आहे. पूर्वी आपण डॉक्टरांकडे गेल्यानंतर त्यांचा कंपाऊंडर आपल्याला गोळ्या किंवा औषध एखाद्या छोट्याशा बाटलीत भरून देत असे. कधी कधी डॉक्टर स्वतः औषध

[ श्री. सुभाष देसाई ]

देत असे आणि त्याचे १०-२० रुपये घेत असत. परंतु आता डॉक्टरकडे गेल्यानंतर, डॉक्टर आपल्याला प्रिस्क्रीप्शन लिहून देतात. आपण ते प्रिस्क्रीप्शन घेऊन मेडिकल स्टोअरमध्ये गेलो, तर आपणास १०० ते २०० रुपये औषधांसाठी माजावे लागतात. या विषयातील एका तज्ज्ञाने म्हटले आहे की, " जुने डॉक्टर्स २० रोगांवर एक औषध देत असत, परंतु आताचे नवीन डॉक्टर्स एका रोगावर २० औषधे देत आहेत." इतके औषधांचे मार्केटिंग वाढलेले आहे. हे प्रकार आपणास कुठेतरी थांबवावयाचे असतील तर शासनाने एखादी चांगली योजना राबविली पाहिजे. केंद्र सरकारने 'जनौषधी' नावाची योजना सुरू केलेली आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये जनौषधांची दुकाने सुरू करायची आणि केंद्र सरकारने नेमून दिलेल्या कंपन्यांची स्वस्त जेनेरिक औषधे उपलब्ध करून द्यायची. ज्यामुळे जनतेच्या औषधी खरेदीमध्ये खूप मोठा फरक पडेल आणि त्यांना स्वस्त दरात औषधे मिळतील. शिवाय जनतेच्या आरोग्याचे देखील रक्षण होईल. तेव्हा मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी देखील अशाच प्रकारची जनौषधांची योजना महाराष्ट्रामध्ये सुरू करून त्याचा लाभ गोरगरिबांना द्यावा.

अध्यक्ष महाराज, आज वित्त आणि नियोजन विभागावर देखील चर्चा आहे. मी विषयाच्या अनुषंगाने एक सूचना मांडणार आहे. मी हा विषय यापूर्वी देखील मांडलेला आहे. म्हाडाच्या कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा विषय आहे. मी माननीय वित्त मंत्र्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, म्हाडाने दिनांक ७ ऑगस्ट २००४ रोजी पेन्शनसंदर्भात ठराव (क्रमांक ६०५५) केला. या संदर्भातील सर्व जबाबदारी म्हाडाने घेतलेली आहे. म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ मिळावा अशा प्रकारचा ठराव करून निर्णय घेतला. फक्त प्रशासकीय रचनेनुसार शासनाच्या मान्यतेची त्यांना आवश्यकता आहे. परंतु शासन त्यास मान्यता देत नाही. गेली अनेक वर्षे हा प्रस्ताव पडून आहे. सन १९९९ मध्ये प्रथम तात्विक विचार झाला होता. त्यानंतर प्रयत्न करीतकरीत ठराव क्रमांक ६०५५ झाला. म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करण्याबाबत राज्य शासन का अडवणूक करीत आहे, हे आम्हाला कळत नाही. यामध्ये राज्य सरकारच्या तिजोरीतून एकही पैसा जात नाही. म्हाडाकडे पैशाची अडचण आहे, असेही नाही. म्हाडाने आर्थिक जबाबदारी घेतलेली आहे. राज्य सरकार परवानगी देत नसल्यामुळे म्हाडातील हजारो कर्मचारी पेन्शनपासून वंचित राहिलेले आहेत. काही कर्मचारी निवृत्त झालेले आहेत, काही निवृत्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांच्या मनात एकच चिंता आहे की, सरकार या संदर्भात केव्हा निर्णय घेणार आहे.

अध्यक्ष महाराज, खादी ग्रामोद्योग व इतर महामंडळातील कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू झालेली आहे. मग एका मंडळाला एक न्याय आणि दुसऱ्याला एक न्याय, असे शासन का करीत आहे ? खादी ग्रामोद्योग महामंडळ तोट्यात आहे, तरी देखील त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू आहे. त्यांना पेन्शन मिळण्याबद्दल आमची काही हरकत नाही. परंतु पेन्शन देण्यासंदर्भात म्हाडा स्वतः आर्थिक जबाबदारी घेत आहे आणि त्यांनी तसा ठराव केलेला आहे. तेव्हा या संदर्भात शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा आणि म्हाडातील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा दुवा घ्यावा, अशी विनंती करून माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. गोपालदास अग्रवाल** (गोंदिया) : अध्यक्ष महोदय, मैं वित्त एवं नियोजन विभाग की अनुदान मांगों का समर्थन करते हुए माननीय वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार साहब का स्वागत करता हूं. दादा उस दिन आमदार फंड २.५ करोड़ करने की घोषणा करने वाले थे लेकिन २ करोड़ रुपये आमदार निधि होने पर सम्माननीय सदस्यों ने तालियां बजा दीं इसलिए यह मामला २ करोड़ रुपये पर अटक गया, ऐसा मेरा मानना है. दिल्ली जैसे राज्य में आमदार फंड २.५ करोड़ रुपये है लेकिन महाराष्ट्र जैसे प्रगतिशील राज्य में आमदार फंड को बड़ी मुश्किल से और लड़ झगड़कर २ करोड़ रुपये किया गया है. इसके बारे में सरकार को पुनर्विचार करने की जरुरत है. अध्यक्ष महोदय, आमदार फंड का करीब २० प्रतिशत पैसा रॉयल्टी और ईटीपी के नाम वापस सरकारी खजाने में जमा हो जाता है इसलिए विकास के कामों पर इसकी केवल ८० प्रतिशत निधि ही खर्च हो पाती है. मैं सरकार से आमदार फंड की निधि बढ़ाने के संबंध में पुनर्विचार करने की मांग करता हूं.

अध्यक्ष महोदय, जिला नियोजन मंडल के अधिकारों को ज्यादा मजबूत करने के लिए, उन्हें ज्यादा अधिकार देने के लिए, सत्ता के विकेन्द्रीयकरण के लिए अनेक योजनाओं को जिला नियोजन मंडल के माध्यम से कार्यान्वित किया गया परन्तु योजनाओं की जिस प्रकार से जांच होनी चाहिए, कामों का दर्जा जिस प्रकार का होना चाहिए, उसमें हम लोग निश्चित रुप से कमी देखते हैं. विशेषकर हमारे ग्रामीण रास्तों के लिए ३०/५४ और ५०/५४ के अंतर्गत जो निधि मिलती थी वह भी जिला नियोजन मंडल के माध्यम से मिलने के कारण कई बार हम इन कामों को न्याय नहीं दिला पाते. इसके साथ ही साथ आऊट-ले के नाम पर जो एक निर्धारित निधि हमारे जिले को मिलती है वह पहले से मिलने वाली निधि से कम होती है इसलिए इन योजनाओं को जिले में लागू करना है कि नहीं करना है, चूंकि यह मंत्री मंडल का निर्णय है इसलिए इसके बारे में पुनर्विचार करने की अत्यंत आवश्यकता है.

अध्यक्ष महोदय, मैंने बजट की सर्वसाधारण चर्चा के दौरान गॉगल पर से १२.५ प्रतिशत टैक्स हटाये लगाये जाने के संबंध में मंत्री महोदय से निवेदन किया था. मुझे लगता है कि गॉगल पर यह टैक्स सम्माननीय सदस्य श्री बांजळे के गॉगल को देखकर लगाया गया है. मंत्री महोदय ने अपने उत्तर में कहा था कि इसका असर सामान्य लोगों पर नहीं पड़ेगा. मैंने उनसे मांग की थी कि १० हजार रुपये तक के गॉगल पर टैक्स नहीं लगना चाहिए लेकिन दादा ने बड़ी होशियारी के साथ यह मुद्दा टाल दिया ...

(माननीय उपमुख्यमंत्री बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

आपण १० हजार रुपयांपर्यंत करा. सर्वसामान्यांचा चष्मा १० हजार रुपयांपर्यंत असतो. तुम्ही २५ लाख रुपयांचा चष्मा बघून साडेबारा टक्के टॅक्स लावू नका. सर्वसामान्यांना जगू द्या. मैं उनसे मांग करता हूं कि १० हजार रुपये तक के गॉगल पर टैक्स की माफी होनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, आठ जिलों में जिला नियोजन अधिकारी के कार्यालय में भर्ती की जानी है. हमारे गोंदिया जिले में पिछले २ साल से असिस्टेंट डिस्ट्रिक्ट प्लानिंग ऑफिसर की नियुक्ति नहीं हुई है. जिला नियोजन मंडल के माध्यम से करोड़ों रुपये की निधि खर्च की जाती है, इसलिए जिला नियोजन अधिकारी हर जिले में होना चाहिए.

**[ श्री. गोपालदास अग्रवाल ]**

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण के बारे में सम्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई जी ने कहा कि सीईटी की परीक्षा केन्द्रीय स्तर पर होने वाली है. इसके बारे में मेरा एक ही निवेदन है कि इस परीक्षा का जो निर्णय है वह इस साल की ११ वी की जो बैच है, उससे लागू होना चाहिए. इस साल जिसने ११ वी की परीक्षा पास की है और जो १२ वी में जाने वाले हैं उनके संबंध में जो सीईटी के बारे में सुप्रीम कोर्ट का निर्णय है, उसके संबंध में सरकार की ओर से पुनर्विचार याचिका दाखिल की जानी चाहिए. अगर सरकार ने इस संबंध में पुनर्विचार याचिका दाखिल नहीं की तो हमारे महाराष्ट्र के हजारों बच्चे जो एमबीबीएस में जाना चाहते हैं, उन पर अन्याय होने वाला है.

अध्यक्ष महोदय, जैसा कि सम्माननीय सदस्य श्री. देसाई साहब ने कहा कि पिछली बार तीन मेडिकल कॉलेज खोलने की घोषणा की गई थी. इसके बाद मंत्री महोदय ने इसी सभागृह में बजट पर जब चर्चा हुई तो गोंदिया में भी मेडिकल कॉलेज खोलने की बात कही थी. इस सभागृह में आश्वासन देने के बाद भी और इस सभागृह में घोषणा करने के बाद भी न तो उन तीन मेडीकल कॉलेज का कोई ठिकाना है और न गोंदिया के चौथे मेडिकल कॉलेज के बारे में इस बजट में कोई प्रोवीजन किया गया है. मैं शासन के मंत्री महोदयों से आग्रह करता हूं कि लोगों को संतुष्ट करने के लिए इस सभागृह में बड़े-बड़े आश्वासन दिये जाते हैं लेकिन सभागृह के सम्मान को कायम रखने के लिए जो आश्वासन इस सभागृह में दिये जाते हैं, उनको पूरा करने का दायित्व भी सरकार का होता है. चाहे वह नंदूरवार हो, चाहे वह रायगड हो या अलीबाग हो, चाहे हमारा गोंदिया या मुंबई हो, इन चारों जगहों पर जो मेडीकल कॉलेज खोलने की घोषणा सरकार की ओर से हुई है, उनको शुरु करने के लिए मंत्री महोदय जरुर कदम उठायेंगे, ऐसा मैं उनसे निवेदन करना चाहता हूं. इसका खुलासा मंत्री महोदय अपने रिप्लाय में करेंगे, ऐसी मैं उनसे अपेक्षा करता हूं.

मैं इसके साथ साथ यह भी कहना चाहता हूं कि हमारे मेडिकल कॉलेज में उपकरण बहुत खरीदे जा रहे है. बिल्डिगों के इन्फ्रास्ट्रक्चर पर बहुत सारा पैसा खर्च हो रहा है. लेकिन वहां पर डॉक्टरों की कमी है. मेडिकल कॉलेज में दवाई की कमी है. दवाई की कमी के कारण कई बार सामान्य नागरिक वैद्यकीय सेवाओं का पूर्ण लाभ नहीं ले पाता है. मेडिकल कॉलेज के रिक्त पदों को भरने की कार्यवाही पूरी की जानी चाहिए. उसी तरह मेडिकल कॉलेज में दवाओं की पूर्ति की जानी चाहिए. वहां दवाओं की कमी नहीं होनी चाहिए. इस बात की शासन ने दखल लेने की जरुरत है.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग के मंत्री, जो हमारे जिले के पालक मंत्री भी है. मैं उनका ध्यान धान उत्पादक किसानों की ओर खींचना चाहता हूं. धान खरीदी की ओर उनका ध्यान आकर्षित करना चाहता हूं. तीन तीन महीने तक, खरीदी किए गए समर्थन मूल्य के धान खरेदी का चुकारा नहीं हुआ. धान खरीदी का चुकारा किसानों को नहीं मिला है. कई केंद्रों पर धान रखने की जगह न होने के कारण धान खरीदने का काम रोक दिया गया है. एक ओर चावल

[ श्री. गोपालदास अग्रवाल ]

की निर्यात पर बंदी लगायी जाती है और दूसरी ओर समर्थन मूल्य पर धान खरीदने के लिए नकार देना, यह हमारी सरकार का टोटल फेल्युअर है. समर्थन मूल्य पर सरकार की जो जबाबदारी है, किसानों को मदद करने की जो जिम्मेदारी है, उसके अंतर्गत, समर्थन मूल्य की व्यवस्था को मजबूत करने का काम राज्य सरकार के द्वारा निश्चित रुप से होना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं इस बात का भी निवेदन करना चाहता हूं कि चाहे वह चंद्रपुर हो, गडचिरोली हो, गोंदिया हो या भंडारा हो. इस क्षेत्र के धान उत्पादक किसानों का धान का चुकारा अभी तक नहीं हुआ है, दो महीने से धान का चुकारा नहीं हुआ है. धान का चुकारा देने की व्यवस्था एक सप्ताह में सरकार ने करनी चाहिए.

अन्न व नागरी पुरवठा विभाग में अधिकारियों की बहुत कमी है. विशेष कर के जो अनाज हम सस्तें दुकान के माध्यम से लोगों को वितरीत करते है, सार्वजनिक वितरण प्रणाली के माध्यम से जो अनाज सामान्य नागरिकों तक पहुंचना चाहिए, चाहे वह अनाज हो, चाहे वह रॉकेल हो. उस पर किसी प्रकार का भी नियंत्रण नहीं है. सामान्य लोगों तक अनाज पहुंचने के बजाय वह अनाज कालाबाजारियों के हाथों में पहुंचता है. मेरा तो यह मानना है कि रॉकेल का जितना भी साठा, जितना भी पुरवठा, हमारे राज्य सरकार के माध्यम से, केंद्र सरकार के माध्यम से होता है, उसका २५ प्रतिशत भी अनाज या रॉकेल सामान्य लोगों तक नहीं पहुंचता है. इसलिए सार्वजनिक वितरण व्यवस्था को बहुत मजबूत बनाने की अत्यंत आवश्यकता है, ऐसी मैं मांग करता हूं.

अध्यक्ष महोदय, मैं विनती करना चाहता हूं कि "चावडी वाचन" का यह नया नियम राज्य सरकार ने अंत्योदय और बीपीएल के लिए लागू किया है. उसके बजाय साल में एक बार "चावडी वाचन" संपूर्ण वितरण के बारे में राज्य सरकार के माध्यम से हर गांव में किया जाना चाहिए जिसके कारण से इस वितरण व्यवस्था को लोकाभिमुख करने का काम इस वितरण व्यवस्था में हो रहे घोटाले बाजी को रोकने का काम हम कर सकेंगे. १९९७ की बीपीएल की यादी के अनुसार लोगों को अनाज मिल रहा है. २००२ की बीपीएल की यादी के अंतर्गत सामान्य लोगों को सरकार की सारी सुविधाएं मिल रही है. लेकिन २००२ के बीपीएल के लाभार्थियों को अनाज नहीं मिल रहा है. मैं शासन से निवेदन करना चाहता हूं कि अब २०११ की बीपीएल की नई यादी बन रही है, उस यादी को ही प्राथमिकता देते हुए, तमाम यादियों को रद्द कर के, २०११ की बीपीएल की यादी के मुताबिक सभी लोगों को, जो बीपीएल की यादी में सम्मिलित होते है, उसके अनुसार उनको राशन कार्ड देने का निर्णय लिया जाना चाहिए. उसी प्रकार सभी कार्ड धारकों को "स्मार्ट कार्ड" देने की भी योजना सरकार ने बनाने की जरुरत है.

मैं विशेष रुप से माननीय मंत्री महोदय का ध्यान आकर्षित करना चाहता हूं कि कालाबाजारियों पर रोक लगाने के लिए, सार्वजनिक वितरण व्यवस्था को मजबूत बनाने के लिए, विशेष कर के जन सामान्य तक सरकार की योजनाओं का लाभ पहुंचाने के लिए जब तक आवश्यक अधिकारियों की भर्ति नहीं होगी, तब तक यह योजना कागजों पर ही रहेगी. गरीब व्यक्ति और भी गरीब होते

[ श्री. गोपालदास अग्रवाल ]

जाएगा. सरकार उसको जो मदद करना चाहती है, वह मदद उनके पास नहीं पहुंच पाएगी. इसलिए सरकार ने इस दिशा में कडक कदम उठाना चाहिए, ऐसी मैं उनसे विनती करना चाहता हूं. मैं उम्मीद करता हूं कि हमारे सभी माननीय मंत्री मेरे निवेदन पर जरुर गौर करते हुए, अपने उत्तर में इसका जवाब देंगे. आपने मुझे बोलने का अवसर प्रदान किया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

**श्री. सुरेश धस** (आष्टी) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आज वित्त विभाग, नियोजन विभाग,अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग आणि रोजगार व स्वयंरोजगार विभागांच्या मागण्यांवर चर्चा आहे. मी सुरुवातीला वित्त व नियोजन विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. वित्तमंत्री महोदयांनी आमदार फंड दीड कोटी रुपयांवरुन दोन कोटी रुपये केल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही मुद्दे येथे मांडले आहेत. येथे दोन कोटी रुपये आमदार फंड मिळत असला, तरी यातून ईटीपी व रॉयल्टीपोटी जवळपास ३० ते ३५ टक्के रक्कम काही ठिकाणी कपात केली जाते. आमदार फंडाच्या रकमेतून ३० ते ३५ टक्के रक्कम कपात होत असते. एखाद्या गावात सामाजिक सभागृह बांधण्यासाठी आमदार फंडातून पाच लाख रुपये आम्ही देतो. अशा प्रकारे सामाजिक सभागृह बांधण्यासाठी अमुक अमुक गावात पाच लाख रुपये देण्याची घोषणा करण्यात येते. पाच लाख रुपये दिल्यानंतर, त्या गावात सामाजिक सभागृह बांधण्यासाठी गावातील लोकांची एक समिती नियुक्त करण्यात येते. ही समिती सभागृहाचे बांधकाम करते. त्यामुळे तेथे कंत्राटदाराचा प्रश्न निर्माण होत नाही. परंतु ज्यावेळी प्रत्यक्षात बील हातामध्ये पडते त्यावेळी गावकरी म्हणतात की, आमदार महोदयांनी पाच लाख रुपये देण्याचे कबूल केल होते, परंतु फक्त सव्वाचार लाख रुपये मिळाले आहेत. यातील ७५ हजार रुपये ईटीपी व रॉयल्टी चार्जेसमध्ये जातात. त्यावेळी गावातील लोक आम्हाला म्हणतात की, "आपण सांगत होता की, पाच लाख रुपये दिले परंतु प्रत्यक्षात सव्वाचार लाख रुपये मिळाले आहेत." त्यामुळे ईटीपी व रॉयल्टी चार्जेस कमी करावेत अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, श्री. अजित पवार वित्त मंत्री महोदय आल्यापासून वित्त विभागात काही सुधारणा होत आहेत, ते मी मान्य करतो. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात सुधारणा व्हाव्यात असे आम्हाला अपेक्षित आहे. त्यामुळे मी त्यांचे दुसऱ्यांचा अभिनंदन करतो. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्याला भरपूर वाटा दिलेला आहे. वित्त विभागात किंवा नियोजन विभागाच्या आजपर्यंतच्या कोणत्याही मंत्री महोदयांनी एवढा मोठा निधी बजेटमधून दिला नव्हता.

अध्यक्ष महोदय, बीड जिल्हा ऊसतोडणी कामगारांचा आहे. या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन झाले आहे. कापूस उत्पादनाबाबत क्रमांक एकवर बीड जिल्हा आलेला आहे. या जिल्ह्यात ड्रीप इरिगेशनची मागणी करण्यात येत आहे. माझ्या गेवराई व शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांना एका

[ श्री. सुरेश धस ]

एकरात जेथे १४ ते १५ क्विंटल कापूस होत होता, तेथे आता एका एकरात २७ ते २८ क्विंटल कापूस होत आहे. या जिल्ह्यासाठी नियोजन विभागाने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून १३ कोटी रुपये देण्याचे मान्य केले आहे. या जिल्ह्यात १८ ते २४ हजार हेक्टर क्षेत्रावर सूक्ष्म सिंचनाची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. यासाठी साहाय्य करण्यात येत आहे. वित्त विभागाकडे फाईल गेल्यानंतर ती निगेटिव्ह कशी होईल हे पाहिले जाते, हे मी मान्य करतो. मागील काळात अनेक फाईल्स् वित्त विभागात निगेटिव्ह झाल्या आहेत. या विभागातून फाईल कशी परत जाईल, असा प्रयत्न काही अधिकारी करीत असतात. साडेचार महिन्यांतील कालावधीचे मी सांगत नाही. मागील काळात रोजगार हमी योजनेच्या फाईल्स् तसेच काही जनरल फाईल परत पाठविण्यात आल्या आहेत. श्री. शरद पवार मुख्यमंत्री असताना रोजगार हमी योजनेसाठी सुरुवातीला संपूर्ण राज्यभर दौरा केला होता. आपण आता रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फलोत्पादनाची योजना सुरू ठेवलेली आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन २००५ मध्ये सुरू झालेली आहे. आपण एका वर्षानंतर, म्हणजे सन २००६ मध्ये आपल्या राज्यात एमआरईजीएसचा कायदा स्वीकृत केला. परंतु ज्या वैयक्तिक लाभाच्या योजना आहेत, त्या योजना राज्यात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून स्वीकारल्या गेलेल्या नाहीत. काही योजनांमध्ये आता सुधारणा करण्यात आलेली आहे. जवाहर रोजगार योजनेअंतर्गत विहिरींसाठी १ लाख रुपयांचे अनुदान दिले जात होते. माननीय श्री. अजित पवार वित्तमंत्री झाल्यानंतर एमआरईजीएसमध्ये विहिरींचे अनुदान १ लाख ९० हजार रुपये करण्यात आलेले आहे. आता विहिरींसाठी दोन लाख रुपये देण्यात येतात. गोरगरीब माणसाला, सामान्य शेतकऱ्याला १५ मीटर खोलीच्या आणि ४.५ मीटर व्यासाच्या विहिरींसाठी २ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. आपल्याला त्यामुळे चांगला रिझल्ट बघावयास मिळेल.

अध्यक्ष महोदय, फलोत्पादनाचे, सपाटीकरणाचे जी.आर. संबंधित विभागाच्या संचालकांकडून रोजगार हमी योजनेच्या नियोजन शाखेकडे येतात. नियोजन शाखेमध्ये टेक्निकल कमिटी आहे. त्या टेक्निकल कमिटीने मंजूर केल्यानंतर, त्या विभागाचे सचिव स्वाक्षरी करून वित्त विभागाकडे फाईल्स् पाठवितात. व्यक्तिगत स्वरूपाच्या नाहीत तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या अशा काही फाईल्स् एक-एक वर्षे वित्त विभागामध्ये पडून राहात असतील तर ते योग्य नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, फलोत्पादन आणि सपाटीकरणाच्या बाबतीतील काही फाईल्स् वित्त विभागाकडे पेंडिंग असतील, तर त्या तातडीने क्लीअर झाल्या पाहिजेत. कारण या योजनेसाठी केंद्र शासनाकडून पैसा मिळतो आणि तो पैसा रोजगार हमी योजनेमार्फत वापरला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी माननीय डॉ. नितीन राऊतसाहेबांचे अभिनंदन करतो. जिल्हाधिकारी आणि सीईओ यांच्याकडे प्रशासकीय मंजुरीचे आणि कार्यारंभ आदेश देण्याचे अधिकार होते. त्यांनी मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर, ते अधिकार गट विकास अधिकारी आणि तहसीलदार यांना दिलेले आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा पैसा खर्च होत नाही. त्याचे कारण असे आहे की, जी.आर. जेवढ्या प्रमाणात काढून ते सर्क्युलेट करावयास पाहिजेत, तेवढ्या प्रमाणावर ते होत नाही. माझ्या माहितीनुसार फलोत्पादन आणि सपाटीकरणाच्या फाईल्स् पेंडिंग आहेत. मी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो की, लवकरात लवकर जी.आर. काढले पाहिजेत.

[ श्री. सुरेश धस ]

अध्यक्ष महोदय, मानवी विकास निर्देशांकामध्ये ११ जिल्हे आहेत. त्यामध्ये आमच्या बीड जिल्ह्याचा सुद्धा समावेश झालेला आहे. त्याचे निकष ठरविण्यामध्ये एक वर्ष निघून गेलेले आहे. या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी ३७५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी जाहीर केलेले आहे की, सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाचे पैसे वेगळे येतील. ते सर्व एकत्रित करून राज्य शासनाची पैसे देण्याची तयारी आहे. हे पैसे देत असताना तालुक्याचा निकष लावला पाहिजे. आपण नियोजन मंडळामध्ये ओटीएसपीचा प्लॅन करतो. सर्व जिल्हा नियोजन मंडळाची तयारी करताना आपण भाग-१, भाग-२ तयार करतो आणि त्यानंतर सर्वात शेवटी ओटीएसपीचा प्लॅन येतो. त्या समाजाची लोकसंख्या जरी जास्त असली, तरी राज्य शासनाकडून सांगितले जाते की, ८४ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च करू नये. ८४ लाख रुपयांमध्ये आम्ही त्यांना कोणता न्याय देऊ शकतो ? आदिवासी विकास विभागाच्या ज्या योजना आहेत त्या फक्त टीएसपी एरियासाठी आहेत. आदिवासी विकास विभागाच्या बऱ्याच योजना ओटीएसपी एरियासाठी लागू होत नाहीत. ओटीएसपी भागातील पारधी, भिल्ल, महादेव कोळी तसेच ठाकर समाजाचा माणूस आहे, त्यांना आम्ही असे सांगायचे का, तुम्ही ओटीएसपी भागामध्ये न राहता, टीएसपी भागात राहण्यासाठी गेल्यास तुमचे भले होईन. अशा प्रकारे आमच्या भागात त्यांनी राहू नये, असे म्हणण्याची वेळ आमच्यावर आली आहे. या संदर्भात अतिशय कमी प्रमाणात तरतुदी केल्या जातात.

अध्यक्ष महोदय, नियोजन विभागाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवारसाहेब यांनी ॲन्युटी नावाची योजना या राज्यात आणण्याचे ठरविले आहे, याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. जे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत, परंतु त्याचे थोडे काम शिल्लक राहिल्यास अशा प्रकल्पांची कामे करण्यासंबंधी ही योजना आहे. कृष्णा खोऱ्यात मोठ्या प्रमाणावर प्रकल्प झाले आहेत. माननीय राज्यपालांच्या आदेशानुसार निधी खर्च करता येत नसल्यामुळे, कृष्णा खोऱ्यात असलेल्या प्रकल्पांसाठी निधीचे वाटप थांबवण्यात आले. प्रकल्पांसाठी १,००० ते ३,००० कोटी रुपयांच्या तरतुदी न केल्यामुळे कृष्णा खोरे महामंडळाला ८८ टीएमसी पाणी अतिरिक्त देण्यात आले. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवारसाहेब, तत्कालीन जलसंपदा मंत्री असताना त्यांनी मराठवाड्यावर प्रेम दाखविले. तसेच मराठवाड्याच्या संदर्भात त्यांनी या सभागृहात व सभागृहाच्या बाहेर दिलेला शब्द पाळला. त्यानुसार त्यांनी मराठवाड्यासाठी २३.६६ टीएमसी पाणी दिले. त्यापैकी ५.६८ टीएमसी पाणी बीड जिल्ह्याला, १७.१८ टीएमसी पाणी उस्मानाबाद जिल्ह्याला मिळाले. यापूर्वीचे कृष्णा खोरे अस्तरीकरणाचे काम सुरुच राहणार आहे. त्यासाठी दिलेला निधी बुकलेटमध्ये दिसत आहे. परंतु पुढील योजना घेत असताना, शासन आता ॲन्युटीसारखी योजना सुरू करणार आहे.

माझी शासनाला विनंती आहे की, अनेक योजनांपैकी एखादी संपूर्ण योजना स्वीकारून त्यामधून रिझल्ट दाखविल्यास, एखाद्या विभागाचा किंवा जिल्ह्याचा संपूर्ण प्रश्न सुटू शकतो. आमच्या भागात असलेली कुंटेफळ साठवण तलाव योजना किंवा आष्टी क्रमांक १, २ व ३ उपसासिंचन योजना क्र. ३ अशा प्रकारच्या योजना ॲन्युटी योजनेमध्ये घेतल्यास, त्या भागातील जवळपास २७,५८३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत होऊ शकेल. आमच्या आजोबांनी व वडिलांनी पश्चिम महाराष्ट्रातच नव्हे, तर कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेशामध्ये जाऊन ऊस तोडला. त्याच्या पुढील पिढीची ऊसतोडीची

[ श्री. सुरेश धस ]

अजिबात इच्छा नाही. म्हणून ज्या भागातील लोक आजपर्यंत अठराविश्व दारिद्र्यात जगत आहेत, तेथील लोक ऊसतोड कामगार होऊ नयेत म्हणून ॲन्युटी योजनेअंतर्गत त्यासंबंधी योजना घेतल्यास फार आनंद होईल. माननीय नियोजन मंत्री अशा प्रकारची योजना राज्यात सुरू करीत असल्यामुळे मी त्यांचे पुनश्च: अभिनंदन करतो.

मी माननीय नियोजन मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, डोंगरी विकासाचे निकष एकदाच ठरविण्यात आले. युती शासनाच्या कालावधीत डोंगरी विकासामध्ये काहीकाही गावांचा समावेश झाला. ४०० मीटर खोली आणि ३०० मीटर उंचीचा डोंगर किंवा दरी असावी, अशा प्रकारचे त्यात निकष आहेत. त्यात आमच्या मतदारसंघातील काही गावे आली. उदाहरण द्यावयाचे झाल्यास डोंगरी विकासाच्या निकषानुसार माझ्या मतदारसंघातील निरगुडी नावाचे गाव जाहीर झाले. त्या गावाच्या खालच्या बाजूला बेदरवाडी आणि खडकवाडी अशा दोन वाड्या होत्या. ज्यावेळी निरगुडी गावाचा डोंगरी विकासाच्या कामामध्ये समावेश झाला त्यावेळी ही ग्रुप ग्रामपंचायत होती. त्यात दोन वाड्या आणि एक गाव एकत्र होते. नंतर लोकसंख्या वाढली. या संदर्भात आयुक्तांकडे ठराव गेला. त्यानंतर निरगुडी गावातील ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या बेदरवाडी आणि खडकवाडी या दोन स्वतंत्र ग्रामपंचायती झाल्या. त्या वाड्या स्वतंत्र होईपर्यंत, त्यांचा समावेश डोंगरी विकासामध्ये होता. आम्ही या संदर्भात लेखी पत्र देऊन हे अशा अशा पद्धतीने झाले आहे, असे सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून "नाही" असे उत्तर आले होते. ते म्हणाले होते की, निरगुडी हे गाव विकासामध्ये आहे. परंतु खालच्या वाड्या विकासामध्ये येत नाहीत. बीड आणि अहमदनगरपासून चांदबीबी महालापासून जो डोंगर सुरू होतो, तो धारूर ते परळी या तालुक्यांपर्यंत आहे. माझा मतदारसंघ हा डोंगरात आहे. मेळघाट आणि चिखलदरा तालुक्यानंतर सर्वात मोठा भौगोलिकदृष्ट्या माझा मतदारसंघ होऊन बसलेला आहे. अहमदनगरमधील अवघ्या १३ कि.मी. पासून ते गेवराईच्या २८ कि.मी. परिसरातील डोंगरामध्ये माझा मतदारसंघ आहे. माझा मतदारसंघ पूर्णपणे डोंगरात आहे. त्या ठिकाणी विरळ लोकसंख्या आहे. शेजारचे गाव डोंगरी विकासामध्ये आहे, पण आमचे गाव डोंगरी विकासामध्ये का नाही ? परिणामी आमच्या मतदारसंघात दोन टक्के शिकण्याचे आरक्षण मिळत नाही. डोंगरी विकासाच्या संदर्भात जे निकष ठरविलेले आहेत, त्यामध्ये बदल करण्याची गरज आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय नियोजन मंत्री महोदयांनी लक्ष देण्याची गरज आहे, अशा प्रकारची विनम्र विनंती मी त्यांना करीत आहे.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री अतिशय चांगले काम करीत आहेत. त्यांनी यापूर्वी एक चांगला शासन निर्णय काढला होता. बोगस कार्डच्या बाबतीत योग्य तो निर्णय शासन घेईल, अशा प्रकारची घोषणा माननीय मंत्री महोदयांनी केली होती. त्यांनी बोगस कार्ड कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझ्या मतदारसंघातील अनेक लोक मुंबई, कल्याण, पुणे येथे २५ वर्षांपूर्वी शिफ्ट झालेली आहेत. पण त्यांची कार्डे अजून आमच्या विभागात सुरू आहेत. त्यांनी चांगले मिशन हाती घेतलेले आहे. पण याची भानगड अशी झाली आहे की, त्याची चावी त्यांनी स्वस्त धान्य दुकानदारांच्या हातामध्ये दिलेली आहे. म्हणजे चोराकडेच तिजोरीची चावी देण्याचा प्रकार झालेला आहे. अशा

[ श्री. सुरेश धस ]

प्रकारची कार्यवाही केली तर तो चोर पुन्हा चोरीच करणार आहे. बोगस कार्डधारक कमी करण्यासंदर्भात महसूल विभागाकडून प्रयत्न केले असते, तर ते निश्चितपणे कमी झाले असते. माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांनी ग्रामविकास विभागामार्फत याद्यांच्या संदर्भातील जी.आर. काढला होता. त्यामुळे प्रतीक्षा यादीमधील धनदांडग्यांचे प्रमाण आता कमी झालेले आहे. परिणामी गरजू, गोरगरीब लोकांची नावे यादीमध्ये आलेली आहेत. द्वारपोच योजना अतिशय चांगली योजना आहे. नाशिक जिल्ह्यातील अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. गायकवाड यांनी द्वारपोच योजना चांगल्या तऱ्हेने राबविलेली आहे. सदर योजना माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी पुणे जिल्ह्यासाठी लागू केलेली आहे. ज्या ठिकाणी जेथून मागणी येईल, त्या ठिकाणी द्वारपोच योजना राबविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. या संदर्भात शासन निर्णय काढलेला असून, त्यामध्ये एक दुरुस्ती करण्याची गरज आहे. द्वारपोच योजनेच्या संदर्भातील वाटप तलाठी यांच्यामार्फत चावडीमध्ये किंवा ग्रामपंचायतीमध्ये जाऊन करावे असे आहे. परंतु त्याचे वाटप स्वस्त धान्य दुकानदाराला देत असताना कमिशनची तरतूद आहे. यामध्ये ६० टक्के कार्डधारक एकत्र आल्यानंतर, त्यामधील प्रमुख कार्डधारकांच्या नावाने पैसे जमा करून घेतले पाहिजेत. स्वस्त धान्य दुकानदारांची तक्रार असल्यामुळे, द्वारपोचची योजना त्यांना देण्यात येऊ नये. कधीकधी तलाठी गावातील लोकांकडून पैसे घेतात आणि दोनदोन दिवस आपले स्वतःचे मोबाईल बंद करून ठेवतात. द्वारपोचच्या कमीशन जे वाटपाचे अधिकारी स्वस्त धान्य दुकानदाराला न देता, त्या गावातील शिधापत्रिकाधारकांनी नियुक्त केलेल्या व्यक्तींना ते द्यावेत, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महाराज, शासनाने कार्डवाटपाचा अतिशय चांगला निर्णय घेतला आहे. माझ्या मतदारसंघात २० ते २५ हजार कार्ड वाटप झाले असून, काही कार्डांचे वाटप आजोबांच्या नावावर असून त्यांना तीन मुले आहेत. त्यांचा विस्तार झाला असून आता त्यांचा नातू कारभार पाहतो आहे, परंतु कार्ड मात्र आजोबांच्या नावावर आहे. हे कार्डवाटप लवकरात लवकर झाले पाहिजे अशी माझी विनंती आहे. स्वस्त धान्य दुकानदाराचे लायसन्स निलंबित करण्यात आल्यानंतर, अपील हे अपर आयुक्तांकडे करावयाचे असते. नियमाप्रमाणे ते बरोबरही असेल, याबद्दल माझे काहीही म्हणणे नाही. परंतु अपर आयुक्तांनी किती दिवसांमध्ये त्यावर निर्णय घ्यावा, याबाबत बंधन घातले पाहिजे. दीडदीड वर्ष स्वस्त धान्य दुकानदारांच्या निलंबित केलेल्या परवान्याच्या अपिलांवर निर्णय होत नाही, अशा प्रकारच्या तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत. या बाबतीतील निकष माननीय मंत्री महोदयांनी ठरवावेत आणि दारिद्र्यरेषेखालील सन २००२ पासूनचा नवीन सर्व्हे अद्यापपर्यंत फायनल झालेला नाही. याबाबतची माहिती केंद्र सरकारच्या वेबसाईटवर टाकलेली आहे, ती मी वाचली आहे. सन १९९७ ची जी यादी आहे, ती अजूनही सुरू आहे. सन २००० साली सुशिक्षित बेकारांना असे सर्व्हे करण्याबातचे काम दिले. आता सरकारी यंत्रणेमार्फत केले जाईल, परंतु सन २००२ बाबत माननीय सर्वोच्च न्यायालयात वाद सुरू आहे. एवढेच नव्हे तर सन २००६ पर्यंतचाही वाद चालू होईल. या न्यायालयीन प्रकरणामुळे कोणती यादी ग्राह्य धरावी, अशा प्रकारचे वाद भविष्यात निर्माण होऊ शकतात. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, पुन्हा एकदा ग्रामसभा लावून चांगल्या पद्धतीने यादी दुरुस्त करून केंद्र सरकार जोपर्यंत यादी लागू करीत नाही, तोपर्यंत सन २००२ पर्यंतची दारिद्र्यरेषेखालील लोकांना न्याय द्यावा.

[ श्री. सुरेश धस ]

अध्यक्ष महोदय, दूधभेसळीबाबत सभागृहात चर्चा झाली. दूधभेसळीवर त्यावेळी काही ठिकाणी छापे टाकण्यात आले. त्यानंतर एका जिल्ह्यातून दोन लाख लिटर्स दूध कमी झाले आहे. याबाबतच्या बातम्या टी.व्ही. वर प्रसिद्ध झाल्या होत्या. नगर जिल्ह्यातील दोन लाख लिटर्स दूध हे कमी झाले. आमच्या जिल्ह्याशेजारी नगर जिल्हा आहे. आमच्या जिल्ह्यापर्यंत त्याचे लोण आले होते. सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री. खडसेसाहेब यांनी दुधाच्या भेसळी बाबतचा आकडा आठ हजार लिटर्सपर्यंत असल्याचे सांगितले. कदाचित हा आकडा एवढा नसेलही. दूधभेसळी संदर्भात टाकण्यात आलेल्या धाडीनंतर कोणत्या खाजगी संघाचे दूध कमी झाले, याची तपासणी झाली पाहिजे. दूधभेसळीबाबत पोलीस अधिकाऱ्यांनी सुद्धा गैरफायदा घेतला आहे. भेसळीसंदर्भात कलम ३२८ नुसार अन्नपदार्थ भेसळ करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करता येते.

अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कायदा, १९५४ यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. मात्र त्यामध्ये अद्याप सुधारणा केली गेली नाही. दूधभेसळीच्या संदर्भात काही अधिकार डीडीओ यांच्याकडे देणे आवश्यक होते. मात्र ते अधिकार त्यांच्याकडे देण्यात आले नाहीत. ३२८ कलम लावायचे असेल तर त्यांनी प्रथम कलम ५११ लावले पाहिजे. माझ्या भागातील श्री. हरघुडे या नवीन पोलीस अधिकाऱ्याने काही दूधसंघाकडून ८ ते १० लाख रुपये घेतले. पैसे द्या अन्यथा तुमच्यावर गुन्हा दाखल केला जाईल, अशी त्यांना धमकी दिली व त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले. कोर्टाने ते प्रकरण फेटाळले. यानंतर ही गोष्ट लक्षात आल्यानंतर, तेथील एसपी यांनी चुकीचे गुन्हे दाखल केल्याबद्दल संबंधित पोलीस अधिकाऱ्याला सस्पेंड केले. या प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ केलेली नसून देखील दूधसंघाचे प्रतिनिधी, संचालक मंडळातील लोकांच्या घरातील सर्व मंडळी यांना २ ते ३ महिने जेलमध्ये राहावे लागले. सिंथेटिक दुधामध्ये जी पावडर मिसळली जाते, ती त्या ठिकाणी सापडली होती. पोलीस अधिकारी १२.३० वाजता त्यांच्या घरी गेले. दुधात मिसळली जाणारी पावडर तेथे होती. ही पावडर खाण्यायोग्य आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार, ती पावडर जवळ बाळगता येते. दिनांक १४ जुलै २०१० रोजी या संदर्भात शासनाने एक जी.आर. काढलेला आहे. तत्कालीन मंत्री डॉ. नितीन राऊत त्यावेळी संबंधित विभागाचे मंत्री होते. दुधामध्ये ही पावडर मिसळणे गुन्हा असेल, तर पहिला गुन्हा राज्य शासनाच्या कॅबिनेट मंत्र्यांवर दाखल करा, संबंधित सचिवांवर दाखल करावा व त्यानंतर इतरांवर दाखल करावा.

अध्यक्ष महोदय, शासनाच्या आरे डेअरीला त्यावेळी कोणीही दूध देत नव्हते. त्यामुळे शासनाने हा जी.आर. काढला होता. त्यावेळी असा निर्णय घेण्यात आला होता की, कमी प्रतीचे दूध असले, तरी सर्वांकडून दूध गोळा करावयाचे व ३:५, ८:५ या प्रमाणात एकत्र करून ते विकायचे. त्यावेळी दुधामध्ये लागेल तेवढी पावडर मिसळण्याचे आदेश जी.आर. मध्ये देण्यात आला होता. दुधातील डीग्री वाढविण्यासाठी ही पावडर मिसळली जाते. या पावडरीमुळे दुधातील फॅट्स वाढत नाहीत.

अध्यक्ष महोदय, सदर अधिकाऱ्याने रात्री १२ वाजल्यानंतर घरात घुसून झाडाझडती घेतली. खरे तर डीवायएसपीपर्यंतच्या अधिकाऱ्यांना रात्री १२ नंतर लोकांच्या घरात जाता येते. मात्र या ठिकाणी एका पीएसआय अधिकाऱ्याने घरात घुसून झडती घेतली. दूध उत्पादक संघाच्या सोसायटीचे चेअरमन

**[ श्री. सुरेश धस ]**

यांना रात्री उचलले. आम्ही त्यांना विचारले की, रात्री १२.३० वाजता आपण त्यांना कसे काय नेऊ शकता ? त्यांनी रेकॉर्डवर रात्री १२.३० वाजता धाड टाकल्याची नोंद केली. रात्री २.३० वाजता दूधभेसळीचे गुन्हे कसे काय दाखल करता येतील ? साधारणपणे दूधभेसळीचे गुन्हे पहाटे ५.३० किंवा ६.०० वाजता पकडले जातात. अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कायदा, १९५४ यामध्ये भेसळीच्या संदर्भात कलम ५११ मध्ये तरतूद केलेली आहे. मात्र तरी देखील कलम ३२८ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. सदर पावडर दुधामध्ये मिसळता येते व ती जवळ बाळगता येते, असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिलेले आहेत. त्यानुसार भेसळीचे गुन्हे दाखल करता येत नाहीत. यानंतर साधारण दीड महिन्यानंतर कोर्टाने सांगितले की, कलम ५११ न लावता कलम ३२८ अंतर्गत गुन्हा कसा काय दाखल करण्यात आला ? त्यावेळी या सर्वांची बोबडी बंद झाली. कलम ५११ लावलेले नाही, तरी देखील कलम ३२८ कसे काय लावण्यात आले असे कोर्टाने विचारल्यानंतर, एसपी यांनी संबंधित अधिकाऱ्याला सस्पेंड केले. मात्र तोपर्यंत संपूर्ण आष्टी तालुक्यामध्ये दूधभेसळ माफिया असल्याची खबर पसरली होती.

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

सगळीकडे माफियाबाबतच्या बातम्या येत होत्या. नवीन नोकरीला लागलेले, मुंबईसारख्या स्टाईल-मधून आलेले लोक, त्यांनी १०-१०, २०-२० लाख रुपये आमच्याकडील दूध संस्थांकडून गोळा करावयाचे, नाही दिले तर त्यांच्या चालकांना उचलायचे व जेलमध्ये टाकायचे अशा पद्धतीने जर लोक चुकीचे वागले असतील, तर माननीय राज्यमंत्री येथे बसले आहेत, माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे की, त्यांच्यावर काय कारवाई केली पाहिजे, हे ठरविले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, नगर जिल्ह्यामध्ये पहिल्यांदा तेथील एसपींनी रेड टाकली. त्यानंतर ज्याज्या दूध संघातील दूध कमी झाले, ज्या खाजगी डेअऱ्यांचे दूध कमी झाले, त्याची तपासणी झाली पाहिजे. पूर्वी ज्या दूधसंघाचे दूधसंकलन ५३ हजार लिटर्स दूध होते ते ११ हजार लिटर्सवर आले, काही जणांचे ४० हजार लिटर्सवरून ७ हजार लिटर्सवर आले, हे आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. अशा लोकांचे रेकॉर्ड तपासायला सरकारला फारसा वेळ लागणार नाही. आमचेही दूधसंकलन तपासले, तर ते ५४ हजार लिटर्स दूध इतके होते, ते हजार लिटर्सचा फरक वगळता तेवढेच राहिलेले आहे. परंतु, आमच्या आष्टी या मतदारसंघाचे नाव मला वाटते, यामुळे सगळीकडे झाले. सन्माननीय सदस्य, श्री. देवेंद्र फडणवीस आपल्यापर्यंतही ते आले असेल.

अशा प्रकारे चुकीचे गुन्हे दाखल केले जात असतील, दूध संस्थाचालकांना घरातून ओढून पोलीस ठाण्यात आणले जात असेल, ते बरोबर आहे काय ? गावामध्ये २,५ हजार लिटर्स दूधसंकलन किंवा ५०० लिटर दूधसंकलन असलेल्या संस्थेचा चेअरमन हा इज्जतदार माणूस असतो. अशा प्रकारे इज्जतदार माणसाची इज्जत विनाकारण घेऊन, त्यांना २-२ महिने जेलमध्ये टाकण्याचे प्रकार बरोबर नाहीत. यातील काही लोकांचा अजून जामीन झालेला नाही. अशा लोकांवर ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी चुकीचे गुन्हे दाखल केले आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे माझे मत आहे. एवढे बोलून व मागण्यांना पठिंबा देऊन मी माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**ॲड. उत्तमराव ढिकले** (नाशिक-पूर्व) : अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील वित्त, नियोजन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, रोजगार व स्वयंरोजगार या विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग याबाबतीत मी केवळ वितरण-व्यवस्था यावरच बोलणार आहे. जर सार्वजनिक वितरणव्यवस्था पाहिली तर, ही व्यवस्था म्हणजे जनतेला भाववाढीपासून संरक्षण देणारी गोष्ट आहे. जनतेला वाजवी किमतीमध्ये अन्नधान्य उपलब्ध व्हावे, म्हणून ही व्यवस्था निर्माण झालेली आहे. त्यातूनही केंद्र व राज्य शासन या दोघांचीही, या व्यवस्थेबाबत सामुदायिक जबाबदारी आहे. अन्नधान्याची खरेदी, साठवणूक, वाहतूक, वितरण हे केंद्राने करावे आणि राज्याने स्वस्त, रास्त भावाची दुकाने काढून, त्यांचे जाळे पसरवून हे धान्य सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहाचवावे, हा यामागे हेतू आहे. दारिद्र्यरेषेखालील लोकांना शिधावाटप करण्याचे, त्यांना गहू, तांदूळ, साखर डाळ, पामतेल, केरोसीन, अन्नधान्य देणे आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप या जाळ्यामार्फत करण्याचे काम राज्य शासनाचे आहे.

अध्यक्ष महाराज, मी सहज सर्व्हे केला, त्यात मला असे आढळले की, ३१ डिसेंबर २०१० अखेरपर्यंत महाराष्ट्र राज्यात जवळजवळ ५० हजार ४०५ स्वस्त धान्याची दुकाने आहेत आणि जवळपास २१५ लाख ९५ हजार शिधापत्रिकाधारकांची संख्या आहे. शासनाने बनावट शिधापत्रिका शोधमोहीम सुरू केली, त्यामध्ये जवळपास ४२ लाख ११ हजार बनावट शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या.

अध्यक्ष महाराज, राज्य शासनाने अनेक योजना अमलात आणल्या. द्वार वितरण योजना, अंत्योदय योजना, अन्नपूर्णा योजना यासारख्या अनेक योजना केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून राबविल्या जातात. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, योजना कितीही चांगली असली, तरी ती राबविण्यासाठी चांगल्या कार्यकर्त्यांचा आणि चांगल्या प्रामाणिक अधिकाऱ्यांचा संच असला पाहिजे, तरच योजना चांगल्या प्रकारे राबविली जाईल. अन्यथा योजना चांगली असते, परंतु ती राबविण्याचा अधिकारी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत नसतील, तर ती योजना फलद्रूप होत नाही. काहीवेळा असेही घडते की, योजनेमध्ये काही दोष असतात, परंतु प्रामाणिक आणि चांगल्या अधिकाऱ्यांमुळे ती योजना यशस्वीपणे राबविली जाते आणि योजनेमध्ये दोष असताना देखील ते नाहिसे होतात व ते आपणास दिसत नाहीत. तेव्हा कोणतीही योजना यशस्वीपणे राबवावयाची असेल, तर त्यासाठी मेहनती व प्रामाणिक अधिकाऱ्यांची जरुरी असते.

अध्यक्ष महाराज, आज महाराष्ट्रामध्ये काय परिस्थिती आहे ? आज दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. या महागाईमुळे लोक त्रस्त झालेले आहेत. सर्वसामान्यांना आपला जीवनचरितार्थ चालविणे कठीण होऊन बसले आहे. आज महाराष्ट्रात स्वस्त धान्यांच्या दुकानांवर रांगाच रांगा लागलेल्या दिसतात. परंतु या स्वस्त धान्यांच्या दुकानांवर कधी धान्य मिळते, तर कधी मिळत नाही. दुकानदार सांगतो "आज धान्य नाही, उद्या या." उद्या गेले की सांगतो "परवा या". अशा प्रकारे गरिबांना दुकांनावर हेलपाट्या माराव्या लागतात. दुकानावर धान्य का आले नाही असे विचारले तर सांगतो "वरून धान्य आले नाही." मग धान्यपुरवठा अधिकाऱ्यांकडे विचारणा केल्यास, तो देखील तेच सांगतो "वरून धान्य आले नाही" अशा प्रकारे चेंडू एकमेकांच्या कोर्टात ढकलण्याचे प्रकार सुरू आहेत.

[ ॲड. उत्तमराव ढिकले ]

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात एक दावा दाखल करण्यात आला असता, न्यायालयाने केंद्र सरकारवर चांगलेच ताशेरे मारलेले आहेत. केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार यांनी लोकसभेत प्रश्नोत्तरांच्या तासाला उत्तर देताना सांगितले होते की, "जे धान्य सडत आहे त्याची जबाबदारी फक्त केंद्र सरकारची नाही, तर राज्यांची देखील आहे." धान्य सडते, त्याला राज्य सरकारे देखील जबाबदार आहेत.

अध्यक्ष महाराज, केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार यांनी चाकण येथे स्टेटमेंट केले की, "गरिबांना तीन रुपयांमध्ये २५ किलो धान्य दिले जाईल."... (अडथळा)... अशा प्रकारचा कायदा होत असेल तर त्याबाबत अगोदर वातावरण निर्माण केले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, सन १९७२ मध्ये जो दुष्काळ पडला होता, त्याची झळ संपूर्ण महाराष्ट्राला बसली होती. आम्ही देखील ती झळ अनुभवली आहे. त्यातूनच रेशनिंगचा जन्म झाला. दुष्काळामध्ये गरिबांना रेशनिंगच्या माध्यमातून धान्य पुरविण्यात आले. अशा प्रकारे हा रेशनिंगचा पसारा झालेला आहे. आज परिस्थिती काय आहे, ते आपणच पहा.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपले भाषण सुरू होऊन ८ मिनिटे झाली आहेत.

**ॲड. उत्तमराव ढिकले :** अध्यक्ष महोदय, मी घड्याळाकडे पाहूनच बोलत आहे. मी तर म्हणेन की, आज दुकानदारांवर वेगळी परिस्थिती आली आहे. सन २००१ मध्ये दुकानदारांसाठी नियमावली तयार करण्यात येऊन, असे सांगितले की, "महिनाभर दुकान उघडे ठेवले पाहिजे, माल विकला गेला नाही तर तो पुढील महिन्यात विकला पाहिजे, त्याचे फलक लावले पाहिजेत. किमान ६ महिन्यांतून ते दुकान तपासले पाहिजे." अध्यक्ष महोदय, या नियमांची पायमल्ली होत चालली आहे. मी फारसा वेळ न घेता, एवढेच सांगेन की, दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठीच्या पिवळ्या रेशनकार्डाची उत्पन्न मर्यादा सन १९९७ मध्ये १५ लाख रुपये ठरली आहे. आज २०११ साल सुरू आहे. आज उत्पन्नाची मर्यादा ३० लाख रुपये ठेवली आहे. परितक्त्या, विधवा यांना बीपीएलचे कार्ड वाटण्यात येत नाही. शिधापत्रिका वाटप योजनेचा फज्जा पाडलेला आहे. राज्यात २० लाख बोगस कार्डधारक आहेत. मी नाईलाजाने असे म्हणेन की, वेळेवर, वक्तशीर पद्धतीने पुरवठा होत नसल्यामुळे सावळा गोंधळ निर्माण झालेला आहे. दुकाने, गोडाऊन्स बंद झालेली आहेत.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपल्या भाषणाचा समारोप करावा. आपल्या पक्षासाठी १० मिनिटे वेळ दिलेला आहे.

**ॲड. उत्तमराव ढिकले :** अध्यक्ष महोदय, मला वाटते की, यापेक्षा न बोललेले फार बरे. ही प्रथा असेल, तर ती ठीक नाही. नवीन आमदार आहेत, त्यांच्याबाबतीत तरी असे बोलू नका. आपण नवीन आमदारांच्याबाबतीत दोन मिनिटांत बोला असे म्हटले, तर ते नवीन आमदार वाचणार सुद्धा नाहीत. आपण या सवयी कृपया सभागृहाला लावू नका. मी आपणाला येथे वचन देतो की, असे जर असेल, तर मी आजपासून विधानसभेत बोलणार नाही.

**उपाध्यक्ष :** आपले असे वचन नको. आपणाला बोलण्यासाठी १० मिनिटे वेळ दिलेला आहे.

**ॲड. उत्तमराव ढिकले :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी २-३ मिनिटांत बोलावे, या सवयी ठीक नाहीत. कृपया आपण सभागृहाला या सवयी लावू नका.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य महोदय, आपणाला दहा मिनिटे दिलेली आहेत. आपण बोला, माझी हरकत नाही.

**ॲड. उत्तमराव ढिकले :** अध्यक्ष महोदय, २-३ मिनिटांत विषय मांडणे कसे शक्य आहे ? मी सर्व विषयांना स्पर्श न करता, एकाच विषयाला स्पर्श केला आहे. असे असेल तर मी बसलेले बरे.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना आणखी ५ मिनिटे वेळ देतो. आपण बोलावे. आपले बाकीचे खूप विषय राहिले आहेत. आपण बोलावे.

**ॲड. उत्तमराव ढिकले :** अध्यक्ष महोदय, मी याचा निषेध करतो आणि जातो.

(सन्माननीय सदस्य ॲड. उत्तमराव ढिकले बहिर्गमन करतात.)

**श्री. ग. आ. देशमुख** (सांगोला) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या चर्चेसाठी एकाच दिवशी ५ विभाग ठेवण्यात आले आहेत. मी रोजगार हमी योजनेसंदर्भात बोलणार आहे. सन १९७२ मध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्यामध्ये रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली. आपल्या घटनेच्या ४१ व्या कलमामध्ये, देशातील प्रत्येक नागरिकाला रोजगाराचा हक्क मिळाला पाहिजे, असे सांगितले आहे. अध्यक्ष महोदय, त्यावेळच्या राज्यकर्त्यांनी ग्रामीण भागातील शारीरिक काम करणाऱ्या पुरुष आणि महिला यांना रोजगाराचा हक्क सन १९७२ मध्ये दिला. त्यामध्ये त्यावेळेचे राज्याचे मुख्यमंत्री मा. वसंतरावजी नाईक, विधान परिषदेचे सभापती मा. वि. स. पागेसाहेब यांचा उल्लेख करावा लागेल.

अध्यक्ष महोदय, मला आठवते की, माहे मे, १९७३ या वर्षी, या राज्यात, एका दिवसामध्ये ५५ लाख मजूर रोहयोच्या कामावर होते. माहे जानेवारी, १९७९ मध्ये या योजनेचे कायद्यामध्ये रूपांतर केले आणि रोजगार हमी योजना सुरू झाली. ही रोजगार हमी योजना सुरू करताना व्यवसायकर आणि इतर ५ करांच्या माध्यमातून या राज्यातील जनतेकडून रक्कम गोळा करण्यासाठी विरोधी पक्षाने सुद्धा संमती दिली होती. या रकमेचा रोहयो निधी म्हणून स्वतंत्र खाते उघडले. सुरुवातीला ५० कोटी रुपये या कराच्यारूपाने जमा होत होते. आज सन २०१०-२०११ मध्ये व्यवसायकर आणि इतर ५ करांच्या माध्यमातून रोजगार हमी योजना निधीमध्ये दरवर्षी ३ हजार कोटी रुपये जमा होतात.

अध्यक्ष महोदय, राज्याने सुरू केलेल्या या योजनेतून केंद्र सरकारने प्रेरणा घेतली व सन २००५ मध्ये ग्रामीण भागातील स्त्री आणि पुरुषांना, शेतमजूर, अल्पभुधारक शेतकऱ्यांना १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देणारी योजना संबंध देशासाठी तयार केली आणि त्याचे कायद्यामध्ये रूपांतर केले गेले. आपल्या राज्यामध्ये वर्षभर रोजगाराची हमी देण्याची योजना आहे. पण केंद्र सरकारने ही योजना तयार केल्यानंतर, केंद्र सरकार या योजनेवर दरवर्षी ४० हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. राजस्थानसारख्या राज्यामध्ये सुद्धा राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करीत आहे. आंध्र राज्यामध्ये गेल्यावर्षी या योजनेवर ७ हजार कोटी खर्च झाले आणि आपल्या राज्यामध्ये ३०० कोटी रुपयेही खर्च होत नाहीत, अशी परिस्थिती आहे.

[ श्री. ग. आ. देशमुख ]

अध्यक्ष महोदय, एकीकडे देशाच्या पातळीवर ही योजना सुरू केल्यानंतर महाराष्ट्र राज्यामध्ये या योजनेचा अस्त होत चालला आहे, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. त्यामुळे या मागील कारणांचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकार ५-५ हजार कोटी रुपये आपल्या राज्याला देण्यास तयार असताना आपण ते खर्च करू शकत नाही, ही शोकांतिका आहे.

अध्यक्ष महोदय, सन २००५ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू केल्यानंतर आपण आपल्या रोजगार हमी योजनेच्या कायद्यामध्ये "महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना" या नावाने दुरुस्ती केली. ही दुरुस्ती केल्यानंतर आपल्या राज्यामध्ये याची अंमलबजावणी आज जवळजवळ बंद पडली आहे. मी शासनाला विचारणार आहे की, ग्रामीण भागामध्ये ज्या स्त्री आणि पुरुषांना आपण रोजगाराचा हक्क दिलेला आहे, त्यांच्यामध्ये कामाची गरज नाही का ? या राज्यामध्ये १ कोटी शेतमजूर आहेत. १ कोटी पेक्षा जास्त १ हेक्टरच्या आत जमिनीची मालकी असलेले लहान शेतकरी आहेत. शेतकऱ्यांना रोजगाराची हमी दिलेली असताना त्याची अंमलबजावणी होऊ शकत नाही, ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे.

अध्यक्ष महोदय, देश पातळीवरील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्यावर सोपविलेली आहे. आपण तर अभिमानाने हे सांगतो की, या राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अतिशय मजबूत केलेल्या आहेत, ज्यामधून ग्रामीण नेतृत्व तयार झाले आहे.

अध्यक्ष महोदय, काही भागामध्ये आज असे बोलले जाते की, शेतामध्ये मजूर मिळत नाहीत. हे खरे आहे काय ? एकीकडे असे बोलले जात असताना दुसरीकडे बीड जिल्ह्यात, तसेच सांगोला तालुक्यात ऊस तोडणी कामगार आपले घरदार, जनावरे व आईवडिलांना सोडून, तसेच सात लाख शेतमजूर शेतावर थंडीमध्ये, चिखलामध्ये उस तोडणी करण्यास दुसऱ्या ठिकाणी जातात. त्यांना या कामाची हौस आहे काय ? काही ठिकाणी काही प्रमाणात मजुरांची टंचाई आहे. मजुरांमध्ये दोन भाग आहेत, एक स्कील्ड मजूर व दुसरा माती काम करणारा मजूर. स्कील्ड मजुरांची काही प्रमाणात टंचाई आहे. माती काम करणारे महिला व पुरुष मजूर यांची टंचाई नाही. माती काम करताना माती खोदून रस्त्यांवर टाकणे, पाझर तलाव तयार करणे, नालाबंडिंगची कामे करणे, अशी कामे मजूर करतात. हे लोक बेकार आहेत. त्यांना त्या भागात कामे मिळत नसल्यामुळे, ते दुसरीकडे जाऊन कामे करतात. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून दरवर्षी तीन हजार कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा होतात. ही रक्कम या कामावर खर्च करणे अपेक्षित आहे. दुर्दैवाची बाब अशी आहे की, हा प्रश्न उपस्थित करण्यात आला तेव्हा मंत्री महोदयांकडून सभागृहात सांगण्यात आले होते की, "रोजगार हमी योजनेची पुनर्रचना करण्यात येईल. राज्यामध्ये जो निधी गोळा होईल तो या योजनेवर खर्च करण्यात येईल." यासंदर्भातील अहवाल जानेवारी २०१० मध्ये येण्याची अपेक्षा होती, परंतु माझ्या माहिती प्रमाणे अद्यापपर्यंत अहवाल आलेला नाही. येथे मी अशी मागणी करणार आहे की, रोजगार हमी योजना दुष्काळी भागात तसेच जिरायती भागात राबवावयाची आहे. परंतु बारमाही बागायती असणाऱ्या भागात ही योजना राबविली तर त्या ठिकाणी मजूर मिळत नाहीत. तेथे मजुरांची टंचाई आहे. दुष्काळी भागात योजना राबविण्यासाठी १९७२ मध्ये ही योजना तयार करण्यात आली आहे. ही योजना काही ठिकाणी यशस्वीपणे राबविण्यात आलेली आहे. अजूनही या योजनेची अंमलबजावणी खूप मोठ्या प्रमाणात करण्याची आवश्यकता आहे.

[ श्री. ग. आ. देशमुख ]

अध्यक्ष महोदय, रोजगार हमी योजनेची निर्मिती करताना, या योजनेच्या निधीतून निरनिराळ्या योजना राबविण्यात येत आहेत, त्यामध्ये वैयक्तिक लाभाच्या योजना आहेत. यामध्ये फळबाग योजना, जवाहर विहीर योजना, शेत तळे, अशा योजना घेण्यात आल्या आहेत. फळबाग योजनेच्या माध्यमातून दुष्काळी भागात पीक पद्धती मध्ये मोठी क्रांती झाली आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही असे मला वाटते. सन १९९० मध्ये मा. श्री. शरदराव पवार मुख्यमंत्री होते, त्यावेळी रोजगार हमी योजनेमार्फत फळबाग योजना राबविण्यात आली होती. त्यावेळी राज्यात २ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्रावर फळबागा होत्या. आता हे क्षेत्र १५ लाख हेक्टरवर गेलेले आहे. फळबागांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. यातील राज्यामध्ये शेती क्षेत्रातून जेवढे उत्पन्न येते त्यापैकी २५ टक्के उत्पन्न फळबागा पासून मिळते. कोकणामध्ये आंबा, काजू या फळबागामध्ये क्रांती झाली आहे असे चित्र पहावयास मिळत आहे. जवाहर रोजगार विहिरीवर या योजनेतून निधी खर्च होत आहे. या जवाहर विहिरीसाठी ७० हजार रुपयांची मर्यादा होती, ती आता एक लाख रुपये करण्यात आली आहे. ही मर्यादा वाढविण्याची आवश्यकता आहे. शेत तळ्यांच्या माध्यमातून शेतामध्ये पाणी साठविण्यात येत आहे. ही यंत्रणा अत्यंत कार्यक्षम होण्याची गरज आहे. आपल्या राज्यात रोजगार हमी योजनेसाठी दरवर्षी तीन हजार कोटी रुपये व्यवसाय कराच्या माध्यमातून जमा केले जात आहेत.

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सुशिक्षित बेकारांची संख्या मोठी आहे. सुरुवातीला असा विचार करण्यात आला होता की, यामधील काही रक्कम सुशिक्षित बेकारांना उद्योगधंदे सुरू करण्यासाठी किंवा त्यांची बेकारी नष्ट करण्यासाठी खर्च करावा मा. पागेसाहेबांनी विधेयकेच्या चर्चे मध्ये हे मत मांडले. त्यावेळी कै. वसंतरावजी नाईक, कै. वसंतदादा पाटील यांची पहिली पिढी होती. त्यांनी ही योजना सुरू केली. त्यानंतरच्या दुसऱ्या पिढीने रोजगार हमी योजना फक्त कर जमा करण्यासाठी सुरू ठेवली. या योजनेतून गरजे प्रमाणे रोजगार निर्माण होऊ शकत नाही. अध्यक्ष महोदय, या योजनेची पुनर्रचना झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. या योजनेतून व्यवसाय कराच्या माध्यमातून जी रक्कम जमा होते, त्यातील काही रक्कम ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारासाठी खर्च करण्याची गरज आहे. त्यासाठी योजनेतील निधी तिकडे वळविला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांकडून सभागृहात आश्वासन दिले आहे. परंतु त्या आश्वासनाची अंमलबजावणी केली जात नाही. रोजगार हमी योजनेची पुनर्रचना करण्यासंबंधी आग्रहाची मागणी करणार आहे. रोजगार हमीची गाव पातळीपासून राज्य पातळीपर्यंत स्वतंत्र यंत्रणा असली पाहिजे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातल्या ग्रामीण भागातल्या कष्ट करणाऱ्या माणसाला, त्याच प्रमाणे सुशिक्षित बेकारी कमी करण्यासाठी खर्च करावा, अशी मी शासनाकडे मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, वेळेअभावी मी दुसऱ्या विषयांसंबंधी बोलू शकत नाही. आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. शिरीष कोतवाल** (चांदवड) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

[ श्री. शिरीष कोतवाल ]

अध्यक्ष महोदय, या राज्यात आर्थिक शिस्त असणे अतिशय गरजेचे आहे. विक्री कर, व्हॅट अशा विविध करांची वसुली करण्यासाठी प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. नियोजन विभागाने नकारात्मक भूमिका बदलून सकारात्मक भूमिका स्वीकारण्याची गरजेचे आहे. राज्यात विकास योजना राबविण्यासाठी त्यासाठी ठराविक कालमर्यादा असते. त्या कालावधीतच विकास योजना पूर्ण करणे असा कायदा आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने विकासाला चालना मिळू शकेल. यावर्षी राज्याचा अर्थसंकल्प मांडीत असताना माननीय उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री श्री. अजितदादा पवारसाहेब यांनी अशी घोषणा केली की, सर्व आमदारांचा आमदार निधी २ कोटी केला आहे. अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, त्या रकमेतून रॉयल्टीची ३५ टक्के व्हॅट वगैरेची रक्कम ४० ते ४५ टक्क्यांपर्यंत जाते, ती वजा केल्यास २ कोटी रुपयांपैकी ८० लक्ष रुपये पुन्हा सरकारच्या तिजोरीत जमा होतात व १.२० कोटी रुपये शिल्लक राहतात. त्यामुळे आमच्या मतदारसंघातील जनतेच्या वाट्याला आमदार फंडाची फार थोडी रक्कम येते. या सर्व बाबींचा विचार करता, शासनाने आमदार निधी दुप्पट म्हणजे ४ कोटी रुपये करावा किंवा रॉयल्टी माफ करावी. मतदारसंघात आमदार फंडातून कामे करीत असताना अनेक अडचणी येतात.

अध्यक्ष महोदय, इरिगेशन व सार्वजनिक बांधकाम विभागांच्या कामांच्या निधीसाठी मोठ्या प्रमाणावर मागणी होत असते. आम्हाला आमच्या मतदारसंघात कालव्याची, धरणांची कामे करायची असतात. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली नसणे, माननीय राज्यपालांच्या गाईड लाईन्स असल्यामुळे निधी खर्च करता येत नाही. अशा प्रकारच्या अनेक अडचणी येतात. काही मोठी मंडळी आपापल्या मतदारसंघात निधी घेऊन जातात.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात अशीच परिस्थिती आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची मी माहिती घेतली असता, निवडणुकांपूर्वी आमदार निधीतून ५-५ कोटी रुपयांची कामे मंजूर केली होती. त्यापैकी ४०० कोटी रुपये देणे बाकी आहेत. या अर्थसंकल्पात नाबार्डसाठी ६०० कोटी रुपये दिलेले आहेत. ती रक्कम सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये टाकलेली आहे.

सीआरएफ ४५० कोटी, व्हीडीएफ १५० कोटी, वेगवेगळ्या पॅकेजसाठी ६०० कोटी रुपये आहेत. ४५० कोटी रुपये जुन्या कामांसाठी देणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन कामे आमच्या मतदारसंघात येऊ शकत नाहीत. या विभागाला जास्तीचा बजेट देण्याची गरज आहे. जिल्हा परिषदेत ५०५४ आणि ३०५४ या हेडखाली संघर्ष होत आहे. संबंधित यंत्रणा आपल्याकडे काम घेण्याचा प्रयत्न करीत असतात. यामध्ये शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. जिल्हा परिषदेच्या कॅफोला प्रशासकीय मान्यता घ्यायला खूप उशीर लागत असतो. सदर फाईल एका विभागातून दुसऱ्या विभागात फिरत असल्यामुळे त्याला प्रशासकीय मान्यता मिळायला खूप उशीर लागतो. याकरिता जिल्हा परिषदेकडे हे काम न नेता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हे काम न्यायला पाहिजे, असे आम्हाला सातत्याने वाटत आहे.

[ श्री. शिरीष कोतवाल ]

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरीपुरवठा विभागामार्फत अन्न दिले जात नाही. खऱ्या अर्थाने आपण धान्य देत असतो. धान्य नागरीपुरवठा खाते असे त्याचे नाव असले पाहिजे. सन्माननीय सदस्य कृषिभूषण साहेबराव पाटील म्हणत आहे की, या विभागाचे अन्न, व नागरीपुरवठा आहे की, धान्य व नागरी पुरवठा आहे ? असा ते मला प्रश्न विचारीत आहे. यासंदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, धान्य व नागरीपुरवठा असले पाहिजे. नाशिक जिल्ह्यात अपर जिल्हाधिकारी श्री. सोनवणे यांना रॉकेल टाकून जीवंत जाळण्याची घटना घडली होती. त्यानंतर संपूर्ण राज्यात जवळजवळ ५०० ते ५५० धाडी टाकण्याचे सत्र चालू होते. त्या माध्यमातून अनेक भेसळखोर माफियांना पकडण्यात आले होते. परंतु आता कोणतीही धाड टाकली जात नाही. धाड टाकण्याची मोहीम आता थंडावलेली आहे. नाशिक जिल्ह्यात पोच रॉकेल देण्याची व्यवस्था केली आहे. परंतु किरकोळ दुकानदाराच्या वाट्याला जेवढे रॉकेल यायला पाहिजे, तेवढे त्यांना ते मिळत नाही. फक्त त्याची पावतीवर सही घेतली जाते. हे खऱ्या अर्थाने चेक करण्याची गरज आहे. माझ्या मतदारसंघात ५ ते २५ रेशन दुकानांवर धाडी टाकल्या होत्या. दुपारच्या वेळेस दुकान बंद ठेवले म्हणून त्यांच्या दुकानावर धाडी टाकल्या होत्या. दुकानदाराने जेवायला जाऊ नये का ? संबंधित रेशन दुकानदाराच्या बाहेर बोर्ड लावला होता की, दुकान दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत बंद राहील. अशा अनेक रेशनच्या दुकानांवर धाडी टाकण्यात आलेल्या आहेत. यामध्ये धान्य सप्लायर हा मुख्य डॉन होता. त्याच्याकडून पैसे जमा केले गेले आणि संबंधितांकडे पोहोचविले. पुन्हा त्यांनाच परमिट दिले असा प्रकार माझ्या मतदारसंघात सुरू आहे. ज्यांनी पैसे दिले नाही, अशा दुकानदारांना दंड ठोठाविण्यात आला होता. गुन्हा एकच आहे. एकाने पैशाचे पाकिट दिले म्हणून त्याच्याविरुद्ध कारवाई केली जात नाही आणि ज्याने पैशाचे पाकिट दिले नाही म्हणून त्याच्याकडून दंड आकारला जातो, असा प्रकार कुठे तरी थांबविण्याची गरज आहे. यामध्ये अन्न व नागरीपुरवठा विभागातील काही यंत्रणा योग्यरीतीने काम करीत नाही....अडथळा...

एखाद्या व्यक्तीचे रेशन कार्ड हरविल्यानंतर त्याला नवीन रेशन कार्ड हवे असेल तर त्याला संपूर्ण नवीन प्रकरण करावे लागते. त्याच्या जुन्या रेशनकार्डचा नंबर लक्षात घेता त्याला नवीन रेशन कार्ड द्यायला काय अडचण आहे ? जुन्या रेशनकार्डचा नंबर लक्षात घेता त्याला नवीन रेशनकार्डाचे नूतनीकरण करून द्यायला पाहिजे. परित्यक्त्या तसेच निराधार महिलांना पिवळे रेशन कार्ड दिले पाहिजे. संगणकीकृत कार्ड देण्याच्या बाबतीत शासनाकडून घोषणा केली जाते, परंतु अंमलबजावणी मात्र होताना दिसत नाही. संगणकीकृत रेशन कार्ड सर्वसामान्य माणसांना मिळाले पाहिजे, ते कधी मिळेल, याबाबतचा उल्लेख, माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये करण्याची आवश्यकता आहे. जे दारिद्र्यरेषेखालील लाभधारक होते, त्यांची कार्ड रेशन दुकानदार चेक करणाऱ्या अधिकाऱ्याने स्वतःच्या अधिकारात रद्द केली, का केली माहीत नाही ?

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. शिरीष कोतवाल आपणास भाषण सुरू करून दहा मिनिटे झाली आहेत....(अडथळा) ....

**श्री. शिरीष कोतवाल :** अध्यक्ष महोदय, मला बोलण्यासाठी २४ मिनिटांचा वेळ आहे...(अडथळा)...

**उपाध्यक्ष :** २४ मिनिटे आपणांस कोणी दिली...(अडथळा) ..... आपण ज्यांचा वेळ घेतला तर आपल्यानंतर एकाही अपक्ष सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार नाही.

**श्री. शिरीष कोतवाल :** अध्यक्ष महोदय, मला भाषण सुरू करून ९ मिनिटे झालेली असून अजून १४ मिनिटे शिल्लक आहेत. रेशनिंगमधील भ्रष्टाचार थांबवायचा असेल तर शासनाने यासंबंधी कडक पावले उचलण्याची खरी गरज आहे. भेसळ माफिया आणि रेशन दुकानदार यांचे मधूर संबंध असतात. त्यामुळे त्यांच्या संगनमताने भेसळीचे हे प्रकार होत असतात. जिल्हा आणि तालुका पातळीवर असे प्रकार होत असतात, त्याला कोठेतरी पायबंद घालण्याची खरी गरज आहे. त्यांच्याविरुद्ध खऱ्या अर्थाने कारवाई झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. परवाना देताना कुटुंबातील एका व्यक्तीकडे एकच परवाना दिला पाहिजे. काळ्या बाजारात मोठ्या प्रमाणात यामुळे पायबंद बसेल. अतिरिक्त जिल्हाधिकारी, कै. यशवंत सोनावणे यानी माफियांच्या अवैध धंद्यावर धाडी घातल्या म्हणून त्याला जाळण्याचा अतिशय क्रूर प्रकार नियोजनबद्ध रीतीने करण्यात आला. याबाबतच्या बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाल्या होत्या. शासनाने माफियांवर वचक न ठेवल्यामुळे, अशा प्रकारचे कृत्य या महाराष्ट्र राज्यात होत आहेत.

अध्यक्ष महोदय, पंधरा वर्षांपूर्वी नाशिक शहराच्या आयुक्त, श्रीमती लिना मेहेंदळे होत्या. त्यांनी तेल भेसळ, पेट्रोल भेसळ या प्रकरणी कारवाई करण्याबाबतचा एक अहवाल मंत्रालयात पाठविला होता. परंतु सदरचा अहवाल अजूनही धूळ खात पडून आहे, त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शासन त्या अहवालावर कार्यवाही करणार आहे की नाही, याबाबत शासन खुलासा करणार आहे काय ? जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल, घासलेट आणि धान्य वितरण यावर जिल्हा प्रशासनाचे नियंत्रण असते आणि तेच अशा भेसळीना जबाबदार असतात. अशा भेसळीचे प्रकार रोखण्याची जबाबदारी ही शासनाची आहे, संबंधित विभागाची आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी नेमकी कशाची तपासणी करीत आहेत, असा प्रश्न आम्हास पडतो. फूड ॲण्ड सिव्हील सप्लॉय विभागाने तसेच तहसीलदार, जिल्हाधिकारी यांनी पेट्रोल, रॉकेल, डिझेल अशा द्रावणीय पदार्थाची तपासणी करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणी मागील दहा वर्षांत शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली, किती लोकांना शिक्षा झाली, किती लोकांचे परवाने रद्द केले ? त्याबाबत खऱ्या अर्थाने श्वेतपत्रिका राज्य सरकारने प्रसिद्ध केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, जे गरजू लोक आहेत, जे गरीब लोक आहेत. त्यांचे कुटुंब जर विभक्त झाले असेल तर मुलांचे नाव आई-वडिलांच्या कार्डावरून वेगळे करण्यासाठी शासनाने त्यांना मदत केली पाहिजे. त्यांच्या रेशन कार्डाची विभागणी करून दिली पाहिजे. एखाद्याचे रेशन कार्ड हरविले असेल आणि त्याच्याकडे जुन्या रेशन कार्डाचा नंबर असेल तर त्यांना नवीन रेशन कार्डासाठी सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्याची आवश्यकता नसावी, अशा प्रकारचा शासनाने निर्णय घ्यावा. त्याला जुन्या नंबरवरूनच नवीन रेशन कार्ड दिले पाहिजे. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र !

**श्री. देवेंद्र फडणवीस** (नागपूर दक्षिण-पश्चिम) **:** अध्यक्ष महोदय, सन २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पातील फक्त दोन विभागाच्या मागण्यांवर मी या ठिकाणी बोलणार आहे. सर्वप्रथम रोजगार आणि स्वयंरोजगार या विभागावर मी माझे विचार मांडणार आहे. स्वयंरोजगार हा अत्यंत महत्त्वाचा असा विभाग आहे, आपल्याला याची कल्पना आहे. आज, राज्यामध्ये सन २०११ ची लोकसंख्या ही ११ कोटी २३ लाखांवर पोहोचली आहे. आपल्याकडे जो वर्कफोर्स उपलब्ध आहे, तो आज जवळजवळ ७ कोटी लोकांचा आहे. राज्यासमोर सर्वात मोठी समस्या कोणती असेल तर ती ७ टक्के युवा लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याची आहे. राज्य शासनाने याकडे योग्य प्रकारे लक्ष दिले नाही तर येणाऱ्या काळात ही लोकसंख्या मानव संसाधनामध्ये रूपांतरित होऊ शकणार नाही. यामुळे एक मोठी क्रांती घडेल. ही क्रांती राज्य सत्ता व राज्य शासन थांबवू शकणार नाही.

अध्यक्ष महोदय, अतिशय गंभीर अशा प्रश्नाकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मी केवळ नोंदणीकृत माहिती या ठिकाणी सांगणार आहे. मात्र नोंदणी न झालेला डेटा आपण पाहिला तर आपल्याला राज्यामध्ये किती विस्फोटक परिस्थिती आहे, हे दिसून येईल. सन २०१० अखेर राज्यातील बेरोजगारांची संख्या २६ लाख ८२ हजार ४११ होती. त्यापैकी सुशिक्षित बेरोजगारांची संख्या २३ हजार ७० आहे. म्हणजेच राज्यात ८८ टक्के सुशिक्षित बेरोजगार तरुण आहेत. या ८८ टक्के तरुणांपैकी इंजिनियर्स, डिप्लोमाचे शिक्षण घेतलेले १ लाख २९ हजार तरुण आहेत. वेगवेगळ्या विभागाच्या पदवीधर तरुणांची संख्या ४ लाख १२ हजार ५१९ आहे. पोस्ट ग्रॅज्युएटस तरुणांची संख्या ४५ हजार ३९५ आहे. म्हणजेच आज राज्यात जवळजवळ ३० टक्के उच्च शिक्षित तरुण हे नोंदणीकृत बेरोजगार आहेत.

अध्यक्ष महोदय, २६ लाख पैकी ३ लाख ३१ हजार ७८८ लोकांना कौशल्य प्रशिक्षण प्राप्त आहे. म्हणजेच केवळ १२ टक्के लोकांना कौशल्य प्रशिक्षण प्राप्त झाले आहे. राज्यात ८८ टक्के सुशिक्षित बेरोजगार असून त्यापैकी केवळ १२.३६ टक्के लोकांना कौशल्य प्रशिक्षण प्राप्त झाले आहे. राज्यात कौशल्य प्रशिक्षणाचा, मोठ्या प्रमाणात अभाव आहे. एकीकडे माननीय पंतप्रधान देशातील ५२ कोटी लोकांना कौशल्य प्रशिक्षण द्यावयाचे आहे असे म्हणतात. मात्र राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये त्या बाबत साधा उल्लेख देखील शासनाकडून केला गेला नाही. यंदाच्या वर्षी केंद्र शासनाने देशातील १.५ कोटी लोकांना कौशल्य प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य ठरविले आहे. मात्र राज्य शासनाने कौशल्य प्रशिक्षण देण्याचे लक्ष्यच ठरविलेले नाही. यापेक्षा आणखी दुर्दैवी गोष्ट कोणती असू शकते ? ३ लाख ५३ हजार ९०६ बेरोजगारांना लोकांना रोजगार मिळवून दिला. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या केवळ १३ टक्के लोकांना रोजगार देण्यात आला आहे. ३ लाख ५३ हजार पैकी ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, पुणे या ६ जिल्ह्यांमध्ये २ लाख ७० हजार लोकांना रोजगार मिळवून देण्यात आला आहे. एकूण रोजगारापैकी ७० टक्के रोजगार केवळ ६ जिल्ह्यामध्ये पुरविण्यात आला. उर्वरित सर्व जिल्हे मिळून केवळ ३० टक्के रोजगार देण्यात आला आहे. विदर्भातील ११ जिल्ह्यांमधील एकूण १६ हजार लोकांना रोजगार दिलेला आहे. एकूण रोजगाराच्या ४.४९ टक्के विदर्भात रोजगार देण्यात आला आहे. विदर्भातील अमरावती, चंद्रपूर, नागपूर या ३ जिल्ह्यांमध्ये ११ हजार लोकांना रोजगार देण्यात आला. विदर्भातील उर्वरित ८ जिल्हे मिळून केवळ ५ हजार लोकांना रोजगार देऊ शकलो. अशा प्रकारे संपूर्ण राज्यामध्ये रोजगाराच्या संदर्भात अतिशय भीषण परिस्थिती आहे.

**[ श्री. देवेंद्र फडणवीस ]**

अध्यक्ष महोदय, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्य, मागासवर्गीयांकरिता काम करणारे राज्य अशी आपल्या राज्याची ओळख आहे. आपल्या राज्यामध्ये मागासवर्गीयांकरिता ५० टक्के आरक्षण जाहीर केले आहे. एससी, एसटी, डीटीएनटी, ओबीसी यांची राज्यातील लोकसंख्या पाहिली तर आपल्याला दिसून येईल की, राज्यात ४ हजार ९२ एससी आहेत, १२ हजार ७८ एसटी आहेत, १४०० डीटीएनटी आहेत व ७ हजार ६६० ओबीसी तरूण बेरोजगार आहेत. ३ लाख ५३ हजार लोकसंख्येपैकी केवळ १४ हजार ५३० मागासवर्गीयांना आतापर्यंत शासनाने रोजगार दिलेला आहे. म्हणजे महाराष्ट्रात निर्माण झालेल्या एकूण रोजगाराच्या केवळ ४ टक्के रोजगार मागासवर्गीयांना दिला. खरे तर त्यांना ५० टक्के द्यायला पाहिजे होता. आपण सामाजिक न्यायाच्या गोष्टी करतो आणि ही महाराष्ट्रातील रोजगाराच्या बाबतीतील आपली परिस्थिती आहे.

अध्यक्ष महाराज, आपण जर विचार केला तर ३ लाख ५३ हजारांपैकी २ लाख ५० हजारांचा रोजगार हा खाजगी क्षेत्रामध्ये तयार झाला. याचा अर्थ ७० टक्के रोजगार हा खाजगी क्षेत्रात तयार झाला आणि केंद्र व राज्य सरकार मिळून केवळ ५ टक्क्यांचा रोजगार आपण निर्माण करू शकलो, ही आज आपली परिस्थिती आहे.

आज आपण आदिवासींच्या संदर्भात प्रशिक्षणाची योजना तयार केली. ८ जिल्ह्यांमध्ये आपण केवळ ८८५ उमेदवार त्यासाठी निवडू शकलो. त्यापैकी ज्यांनी ट्रेनिंग पूर्ण केले ते ४६९ उमेदवार आहेत. त्यापैकी ४५ लोकांना आपण केवळ रोजगार दिला. याचा अर्थ एका वर्षामध्ये आदिवासींना रोजगार देण्याच्या संदर्भातील राज्याची प्रगती किती तर केवळ ४५. ही किती दुर्दैवाची गोष्ट आहे. ८ जिल्ह्यांमध्ये आपण ही योजना राबविली परंतु, या ८ जिल्ह्यांपैकी ४ जिल्ह्यांमध्ये तर एकाही आदिवासीला रोजगार आपण देऊ शकलो नाही. ज्या ४५ लोकांना रोजगार दिला, त्यापैकी २० लोक पुणे जिल्ह्यातील आहेत. इतर सगळे जिल्हे मिळून, २५ लोकांना आपण रोजगार देऊ शकलो, ही आपली परिस्थिती आहे.

ही रोजगाराची परिस्थिती आहे, परंतु, स्वयंरोजगाराची परिस्थिती तर त्याहूनही भीषण आहे. स्वयंरोजगार एका वर्षामध्ये आम्ही १७ हजार ४५८ लोकांना देऊ शकलो म्हणजे एकूण रोजगाराच्या ६७ टक्के हे प्रमाण, एकूण रोजगाराच्या एक टक्काही नाही. ही आमची स्वयंरोजगाराची परिस्थिती आहे. याहून भयानक परिस्थिती अशी की, विदर्भातील ११ जिल्ह्यांपैकी ६ जिल्ह्यांमध्ये एकाही व्यक्तिला आम्ही स्वयंरोजगार देऊ शकलो नाही. स्वयंरोजगाराच्या नवीन स्कीम अंतर्गत विदर्भाच्या ६ जिल्ह्यांची प्रगती शून्य टक्के आहे. उरलेले जे ५ जिल्हे आहेत, त्यामध्ये एकूण ४०० लोकांना स्वयंरोजगार दिला. ही आमची रोजगाराची परिस्थिती आहे.

एकूण रोजगारापैकी विदर्भातील एकूण ११ जिल्ह्यांमध्ये केवळ २ टक्के लोकांना आपण रोजगार दिला. एकीकडे आपल्याकडे ७ कोटी लोकांचा एवढा कार्यबल गट / वर्क फोर्स आहे. आपल्याकडे २६ लाख बेरोजगार नोंदणीकृत व नोंदणी न केलेले २ कोटी बेरोजगार आहेत. परंतु, आमच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे एकूण बजेट किती तर ४ कोटी रुपये आहे. मग कशासाठी ठेवला जात आहे, हा विभाग ? त्यापेक्षा तो बंद केला पाहिजे. त्यातील सगळा पैसा वेतनावर जातो, एक

[ श्री. देवेंद्र फडणवीस ]

योजना या ठिकाणी आम्ही कार्यान्वीत करू शकत नाही, यापेक्षा दुसरी दुर्दैवाची गोष्ट नाही. या महाराष्ट्राचे जे पुरोगामी म्हणविणारे सरकार आहे, या सरकारने या अर्थसंकल्पामध्ये मागण्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील बेरोजगारांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. याचा मी निषेध करतो.

दुसरा विषय मी मेडिकल एज्युकेशनच्या संदर्भात मांडणार आहे. खरे म्हणजे मला एका गोष्टीचे, मेडिकल एज्युकेशनच्या, आमच्या माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे की, या विभागाचे जे डायरेक्टर श्री. तायडे आहेत, त्यांच्या बाबत नेमकी काय परिस्थिती आहे ? त्यांच्याबाबत पेपरमध्ये असे वाचले जाते की, "कधी त्यांची चौकशी चालू आहे. कोणी म्हणते ते व्हिक्टीमाईज झाले आहेत, कोणी म्हणते फेक चौकशी झाली, कोणी म्हणते पत्र बोगस आहे." यासंदर्भात त्यांच्या बाबत नेमकी काय वस्तुस्थिती आहे, या सभागृहाला कळले पाहिजे. त्यांच्यावर खरेच आरोप ठेवले आहेत काय, ते खरे आहेत की खोटे आहेत ? त्यांच्या संदर्भात काय कारवाई झाली आहे, शासनाने काय कारवाई केली आहे, याची माहिती या सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महाराज, सीईटीच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यानंतर आज राज्यामध्ये मोठी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. आमच्या स्टेट बोर्डाचा जो कोर्स आहे, तो सेंट्रल सीईटीच्या कोर्सला मॅच होऊ शकत नाही. त्यामुळे स्टेट बोर्डाचे, आमचे जे स्टुडंट आहेत, ते जर परीक्षा झाली तर त्याला अपिअर होऊ शकणार नाहीत. अपिअर झाले तरी पास होऊ शकणार नाहीत. त्यामुळे स्टेट बोर्डाचा एकही स्टुडंट डॉक्टर होऊ शकणार नाही. यासंदर्भातही आपण केंद्र सरकारला किंवा सुप्रीम कोर्टाला विनंती करून दोन वर्षांची मुभा मागितली पाहिजे व कोर्स इक्वल केला पाहिजे, त्याच्या नंतरच ही सेंट्रल सीईटी परीक्षा घेतली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, सन २००६ मध्ये आपण एमएचआयएस नावाची सिस्टीम मेडिकल कॉलेजेसमध्ये लावली. ही सिस्टीम लावताना अतिशय गाजावाजा करण्यात आला. त्या सिस्टीमचे प्रेझेन्टेशन माझ्याजवळ आहे. प्रेझेन्टेशनमध्ये अतिशय सुंदर चित्र दाखविलेले आहे. त्या योजनेची मी प्रशंसा करतो. ही एक योजना चांगली आहे, परंतु त्या योजनेचा कसा बोजवारा वाजविण्यात आला, हे मी माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देत आहे. कंपनीने प्रेझेन्टेशन करताना अनेक बाबी सांगितल्या होत्या. त्यामध्ये ओबामा यांनी काय केले इथपासून ओबामांपेक्षा आम्ही कसे चांगले करणार आहोत हे सर्व सांगण्यात आले. पण नंतर त्यातील " ओ" ही झाला नाही, "बा" ही झाला नाही आणि "मा" देखील झाला नाही, अशी परिस्थिती आहे.

अध्यक्ष महाराज, एमचआयएसच्या माध्यमातून १४ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पायलट प्रोजेक्ट राबविण्याचा निर्णय झाला. त्यापैकी मुंबईतील दोन वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आणि अन्य ठिकाणी हा प्रोजेक्ट राबविण्याचे ठरले. राज्य सरकार हार्डवेअरसाठी जवळपास २५० कोटी रुपये खर्च करणार आहे. हा प्रोजेक्ट बी.ओ.ओ.आर. पद्धतीने चालणार आहे. प्रेझेन्टेशनच्या वेळी आम्हाला सांगण्यात आले की, युनिक हेल्थ कार्ड मिळेल, मेडिकल रेकॉर्डसचे संगणकीकरण होईल, पेशंटचा मेडिकल रिपोर्ट उपलब्ध होईल, हॉस्पिटलमधील औषधांचा हिशोब राहील, आतंरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा रुग्णांना उपलब्ध होतील, हॉस्पिटलची प्रशासकीय माहिती उपलब्ध होईल, रुग्ण हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर कमीत कमी वेळेत रजिस्ट्रेशन होईल, हॉस्पिटलच्या कामात पारदर्शकता येईल, रुग्णाचा

[ श्री. देवेंद्र फडणवीस ]

एक्स-रे, सिटी स्कॅन, एमआरआय इत्यादी रिपोर्ट इलेक्ट्रॉनिक फॉरमॅटमध्ये ट्रान्सफर होईल. हे सर्व झाल्यानंतर आपण एचपी कंपनीला हार्डवेअरचे काम दिले. यासंदर्भातील करारनामा माझ्याकडे आहे. हा करारानामा अगदी विचित्र आहे. आपणास एचपी कंपनी हार्डवेअर देईल तर अमृता नावाची कंपनी सॉफ्टवेअर देईल. या ठिकाणी अमृता कंपनीचा काहीही संबंध नाही. परंतु करारनाम्यामध्ये उल्लेख आहे की, एचपीच्या संदर्भात काही तक्रार असेल आणि राज्य सरकारला त्यांचे काम आवडले नसेल तर एचपीचे कॉन्ट्रॅक्ट आपणास रद्द करता येईल, परंतु आपणाला अमृताचे सॉफ्टवेअर वापरावे लागेल. आपणास दुसरे सॉफ्टवेअर वापरता येणार नाही. या ठिकाणी मूळ काम एचपी कंपनीला देण्यात आले आणि एचपी कंपनीशी करारनामा केला असताना ही अमृता नामक कंपनी कोण आहे ? या अमृता नामक कंपनीने अतिशय चुकीचे सॉफ्टवेअर दिले आहे. ज्यादिवशी आपण हे सॉफ्टवेअर इन्स्टॉल केले त्याच दिवशी ते सॉफ्टवेअर आऊटडेटेड असल्याचे दिसून आले. त्या कंपनीने आपणास आऊट डेटेड सॉफ्टवेअर दिलेले आहे. आज काय परिस्थिती आहे ? गेली चार-पाच वर्षे शासनाच्या मेडिकल कॉलेजमध्ये मॅन्युअल रजिस्ट्रेशन सुरू आहे. आजही त्याठिकाणी एक्स-रे आपणास स्वतःला घेऊन जावा लागतो तो इलेक्ट्रॉनिकली ट्रान्सफर होत नाही. डॉक्टर्स प्रिस्क्रिप्शन देतात त्यावेळी कोणती औषधे स्टॉकमध्ये आहेत, हे पाहत नाहीत कारण त्यांच्या संगणकावर डाटा भरलेला नाही. ही प्रणाली दोन मेडिकल कॉलेजेसमध्ये फेल होत असताना देखील आपण ती इतर ठिकाणी लागू केली. यासंदर्भात सन २००९ मध्ये जी.आर. काढून आता नागपूरला देखील लागू करीत आहात. यामध्ये शासनाची काय मजबुरी आहे हे समजत नाही. हा उपक्रम चांगला होता, परंतु त्याचा बोजवारा वाजविला.

अध्यक्ष महाराज, शासनाचा पायलट प्रोजेक्ट देखील सफल झालेला नाही. पायलट प्रोजेक्टच्या वेळी जी आश्वासने दिली त्यातील एकही आश्वासन पूर्ण झालेले नाही. आजही इलेक्ट्रॉनिकली एकही डेटा ट्रान्सफर होत नाही. औषधांचा गैरव्यवहार एका मिनिटात थांबेल असे सांगण्यात आले होते. परंतु हॉस्पीटलमध्ये औषधांचा गैरव्यवहार होत आहे. आजही आम्ही चांगले मॅनेजमेंट करू शकत नाही. मी ही सर्व माहिती आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांकडे पाठवितो. या करारानाम्यातील अटी विचित्र आहेत. आता त्यामध्ये आपण काहीच बदल करू शकत नाही. मंत्री महोदयांनी देखील करारनामा वाचलेला आहे. हा करारनामा करताना शासन झोपले होते त्यामुळे आता आपण त्यामध्ये काहीच करू शकत नाही. ही सिस्टीम पूर्णपणे बोगस झालेली आहे. आता आपणास ही सिस्टीम अपग्रेड करण्यासाठी प्रथम प्रयत्न केला पाहिजे. आऊट डेटेड सॉफ्टवेअर काढून नवीन सॉफ्टवेअर इन्स्टॉल केले पाहिजेत. नवीन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तसे हार्डवेअर पुरविले पाहिजेत. माननीय मंत्री महोदय डॉक्टर असल्यामुळे त्यांना सर्व कल्पना आहे. वेगवेगळ्या विभागांना कोणती माहिती शेअर करावी लागते त्याच्या आधारावर आपले मॉड्युल्स तयार झाले पाहिजेत. आपण असे केले तरच या सिस्टीमचा उपयोग होणार आहे. ज्यांनी या सिस्टीमचा बोजवारा वाजविला अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि नवीन सिस्टीमद्वारे मेडिकल कॉलेजेसच्या सर्व प्रकारच्या इन्फर्मेशन शेअरिंग सिस्टीममध्ये अद्ययावत कराव्यात, अशी माझी विनंती आहे. ते झाल्याशिवाय मेडिकल कॉलेजमधील भ्रष्टाचार संपणार नाही. शासनाने त्यादृष्टीने कार्यवाही करावी, एवढीच विनंती करतो आणि माझे बोलणे संपवितो. धन्यवाद !

**ॲड. आशिष जयस्वाल** (रामटेक) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मला माननीय मंत्री श्री. अजितदादा पवार यांचे अंशतः अभिनंदन करायचे आहे. वचन पूर्ण झाल्यानंतर मी त्यांचे पूर्णतः अभिनंदन देखील करणार आहे. माननीय मंत्री श्री. अजितदादांनी अर्थसंकल्पावरील चर्चेच्या उत्तरात सांगितले आहे की, मी राज्याच्या हिताकरिता कठोर निर्णय घेईन, खालून किंवा वरून कोणाचाही दबाव ऐकणार नाही. निश्चितपणे राज्याच्या माननीय वित्त व नियोजन मंत्र्यांनी अशाप्रकारे कठोर निर्णय घेतल्याशिवाय राज्याच्या विकासाला नवीन दिशा मिळू शकणार नाही. माननीय वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार यांनी पहिल्यांदाच राज्याचा अर्थसंकल्प मांडला आहे. नियोजन विभागावर चर्चा करताना मला काही महत्त्वाच्या बाबी माननीय वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या लक्षात आणून द्यायच्या आहेत. नियोजन विभागावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत.

अध्यक्ष महोदय, मला सर्वप्रथम डोंगरी तालुक्यांबद्दल बोलायचे आहे. माननीय श्री. शिवाजीराव देशमुखसाहेब ग्रामविकास मंत्री असताना यासंदर्भात समिती स्थापन झाली आणि सन १९९० पासून राज्यात डोंगरी विकास निधी सुरू झाला. त्यानंतर राज्य शासनाने निर्णय घेतला आणि नियोजन विभागाने नागपुरला महाराष्ट्र रिमोट सेन्सिगचे ऑफिस उघडले. नियोजन विभागाने आधुनिक पद्धतीने सॅटेलाईट सर्व्हे केला. कोणत्या तालुक्यांना डोंगरी तालुके म्हणता येईल, कोणत्या तालुक्यांना डोंगरी तालुका उपगट म्हणता येईल, त्यासंदर्भात शासनाचे नॉर्म्स होते, त्याप्रमाणे सर्व्हे केला गेला. मला माननीय मंत्र्यांच्या लक्षात ही बाब आणून द्यायची आहे की, आपण आता डोंगरी तालुका पूर्ण गटाला, प्रत्येक तालुक्याला, वार्षिक ८० लाख रुपये देतो आणि अंशतः डोंगरी तालुक्याच्या प्रत्येक तालुक्याला ४० लाख रुपये देतो. आमदारांच्या स्थानिक निधीत वाढ केल्यानंतर, आता डोंगरी तालुक्याच्या निधीमध्ये देखील वाढ करण्याची बाबतीतील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. राज्यामध्ये सत्ताधारी लोकांनी आपला तालुका डोंगरी व्हावा म्हणून निवेदने दिली आणि बहुतांश लोकांचे तालुके डोंगरी झालेत, कोणाचे पूर्णतः डोंगरी झालेत तर कोणाचे अंशतः डोंगरी झाले. हे सर्व होत असताना, रिमोट सेन्सिंग सेंटरने आपला अहवाल शासनाकडे सादर केला.

मी आपल्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, पूर्वी ७३ तालुक्यांना पूर्ण गट डोंगरी आणि ३५ तालुक्यांना उपगट डोंगरी असे जाहीर केले होते. रिमोट सेन्सिंग सेंटरने शासनाला अहवाल देऊन सांगितले की, रिमोट सेन्सिंग सेंटरने अगदी ॲक्युरेट सर्व्हे केलेला आहे. रिमोट सेन्सिंगच्या अहवालाप्रमाणे, महाराष्ट्रात नियमाप्रमाणे कोणते तालुके सरासरी येतात, ते पाहिले गेले. ३० टक्के असेल तर पूर्णतः डोंगरी आणि १७ ते ३० टक्क्यांपर्यंत असेल तर अंशतः डोंगरी, १०० चौ.कि.मी. हे त्याचे भौगोलिक क्षेत्रफळ असले पाहिजे, असे निकष होते. रिमोट सेन्सिंग सेंटरचा अहवाल मंत्रिमंडळात गेल्यावर मंत्रिमंडळाने एक समिती गठित केली. मंत्रिमंडळाच्या उपसमितीने हा अहवाल स्वीकारावयास हवा होता. तो स्वीकारला असता तर नियमात, निकषात न बसणारे राज्यातील २५-३० पूर्णगट डोंगरी किंवा अंशतः डोंगरी असणारे तालुके सगळ्यांच्या लक्षात आले असते. हे तालुके डोंगरी विकासाच्या नियमात बसत नसताना आपण या तालुक्यांना वर्षानुवर्षांपासून निधी देत

[ ॲड. आशिष जयस्वाल ]

आहोत. एकीकडे राज्याच्या एकूण तरतुदीतून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निकषात न बसणाऱ्या डोंगरी तालुक्यांना निधी देत असताना दिनांक २६ डिसेंबर, २००६ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये एक निर्णय घेतला गेला. पूर्ण तपासणी एमएसआरसीने केलेली आहे. त्यांनी केलेल्या तपासणी अहवालानुसार पात्र ठरणारे वर्तमान डोंगरी किंवा पूर्णगट डोंगरी तालुके व उपगट या बाबतचे सुधारित आदेश निर्गमित करण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळाच्या उपसमितीने जो निर्णय घेतला आहे, त्याचा काही भाग मी मुद्दाम या ठिकाणी वाचून दाखवितो. तो पुढीलप्रमाणे आहे.

"दिनांक ६ ऑगस्ट २००८ रोजीच्या बैठकीमध्ये अपर मुख्यसचिव, नियोजन यांनी वरील विषयाच्या अनुषंगाने स्पष्टीकरण केले. उपस्थित असलेल्या मंत्री महोदयांनी विचारविनिमय केला. काही मंत्री महोदयांनी विचारविनिमय केल्यानंतर अहवालानुसार डोंगरी तालुक्याबाबत होणाऱ्या बदलास संमती दर्शविली. तर काही मंत्र्यांनी असहमती दर्शविली. सध्या अंतर्भूत असलेले कोणतेही तालुके वगळण्यास नापसंती दर्शविली. त्यामुळे कोणतेही एकमत न झाल्यामुळे जी सद्यःस्थिती आहे, ती तशीच ठेवण्यात यावी." अध्यक्ष महोदय, शासनाचे नियोजन रिमोट सेंसिंग अहवाल माझ्याकडे आहे. आपल्या माध्यमातून माझी माननीय वित्त व नियोजन मंत्र्यांना विनंती आहे की, राज्यात अनेक तालुके असे आहेत की, जे डोंगरी तालुके म्हणून समाविष्ट होऊ शकतात.

अध्यक्ष महोदय, मागील काळात दिनांक १३ जून २००३ रोजी कडेगाव तालुक्याचा समावेश डोंगरी तालुक्यांच्या यादीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला. सरकारने सन २००० मध्ये असे ठरविले होते की, रिमोट सेंसिंग करावयाचे असल्यामुळे जोपर्यंत रिमोट सेंन्सिग दाखला देत नाही तोपर्यंत कोणत्याही तालुक्याचा नव्याने समावेश करण्यात येणार नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून प्रस्ताव पाठविले. पण नियोजन विभागाने या प्रस्तावांना मान्यता दिली नाही. दुसरीकडे मात्र दिनांक १३ जून २००३ रोजी कडेगाव तालुक्याचा समावेश करण्यात आला. कडेगाव तालुक्याचा रिमोट सेंसिंगचा मॅप माझ्याकडे आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यातील नागरिकांबद्दल मला आदर आहे. कडेगाव तालुक्याच्या मॅपबाबत मी आपल्याला माहिती देऊ इच्छितो. या कडेगाव तालुक्यामध्ये जो सरासरी उतार आहे आणि भौगोलिक क्षेत्रफळ आहे ते उदाहरण माझ्या मतदारसंघातील पारशिवनी तालुक्यापेक्षा कमी आहे. पारशिवनी तालुक्याचे भौगालिक क्षेत्रफळ १०७ चौ.कि.मी. आहे. डोंगरी योजनेमध्ये तालुक्याचा समावेश होण्यासाठी क्षेत्रफळ १०० किलो मीटर पेक्षा जास्त पाहिजे. त्यामुळे कडेगाव तालुका या निकषात बसणारा नाही. परंतु, हा तालुका डोंगरी विकास योजनेत समाविष्ट करण्याचा निर्णय या सरकारने घेतला आहे. अशा पद्धतीने निर्णय घेताना सरकारकडून चूक झाली आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक वर्षांपासून रिमोट सेंसिंगचा रिपोर्ट सरकारकडे सादर झाला आहे. रिमोट सेंसिंग एजन्सी ही राज्य सरकारची यंत्रणा आहे. त्यामुळे या यंत्रणेकडून कोणतीही चूक होऊ शकणार नाही. राज्य सरकारला सध्या समाविष्ट नसलेल्या तालुक्यांचा समावेश या योजनेत करायचा असेल तर त्यासाठी नवीन निर्णय करा, निकषात बदल करा. असे केले तर त्यास माझा विरोध राहणार नाही. किमान त्यामुळे राज्यात निधीचे समन्यायी वाटप होईल. समन्यायी निकष लागतील व तालुक्यातील लोकांना समन्यायी न्याय देता येईल.

**श्री. संभाजी पवार :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य कडेगाव तालुक्याचा वारंवार उल्लेख करीत आहेत. तो कडेगाव तालुका माझ्या मतदारसंघात आहे. तो तालुका पूर्ण डोंगरी आहे. असे असताना हा तालुका डोंगरी नाही, असे सांगण्यात येत आहे.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य राज्याच्या वतीने बोलत आहेत.

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महोदय, मी जे म्हटले आहे ते मंत्री महोदयांनी तपासून पहावे, मी अभ्यास करून बोलत आहे. महाराष्ट्र स्टेट रिमोट सेंसिंग रिपोर्ट सादर करण्यात आलेला आहे, त्या रिपोर्टप्रमाणे मी बोलत आहे. सरकारच्या कोणत्याही निर्णयाबद्दल माझा आक्षेप नाही. त्या तालुक्याच्या निकषाप्रमाणे सर्व राज्यातील तालुक्यांना न्याय द्यावा, असे मला म्हणावयाचे आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आजपर्यंत जे निकष ठरविण्यात आले, त्या निकषाप्रमाणे राज्यात एक तत्त्व लागू करावे. आपणास असे वाटत असेल की अमुक अमुक तालुक्यांना न्याय दिला पाहिजे तर निकषामध्ये बदल करावा. सरासरी उतार, सापेक्ष उंची किंवा भौगोलिक क्षेत्रफळ असे निकष सरकारने ठरविले आहे. सरकारला काही विशिष्ट तालुक्यांना लाभ द्यावयाचा असेल तर निकषामध्ये शासनाने दुरुस्ती करावी. निकषामध्ये दुरुस्ती करण्यात येत नाही. जे तालुके निकषात बसत नाहीत, अशा तालुक्यांचा समावेश यामध्ये करण्यात येत आहे. अशा तालुक्यांना निधी दिला गेला तर राज्यातील इतर तालुक्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होईल. अशा पद्धतीने अनेक वर्षापासून नियमबाह्य पद्धतीने ही रक्कम देण्यात येत आहे. अशाप्रकारे राज्याच्या अर्थसंकल्पावर टाकलेला हा एक दरोडा आहे. राज्य सरकारला माझी विनंती आहे की, यासंदर्भात त्वरित योग्य तो निर्णय घ्यावा.

अध्यक्ष महोदय, दुसरा महत्त्वाचा विषय जिल्हा नियोजन समितीच्या संदर्भातील आहे. राज्य सरकारने ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार जिल्हा नियोजन समितीला मोठ्या प्रमाणात अधिकार दिले आहेत. हे अधिकार दिल्यावर राज्य सरकारने १४६ योजना जिल्हा नियोजन समितीकडे दिल्या आहेत. प्रत्येक जिल्हा नियोजन समितीला त्या जिल्ह्यांचे भौगोलिक क्षेत्रफळ, त्या जिल्ह्यांची ग्रामीण लोकसंख्या, त्या जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या, जिल्ह्यांचा मानवी विकास निर्देशांक या सूत्रानुसार प्रत्येक जिल्ह्याचा नियतव्यय ठरवून दिलेला आहे. ७३ व्या घटना दुरुस्ती नंतर जिल्हा नियोजन समितीची रचना झाली. त्या समितीवर लोकप्रतिनिधीची निवड करण्यात आलेली आहे. त्या समितीचे सदस्य आमदार आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या सभेच्या नियमाप्रमाणे समितीने घेतलेला निर्णय असला पाहिजे. अर्थमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर जिल्हा नियोजन समितीचे घेतलेले निर्णय हे बहुमताने घेतलेले असावेत, परंतु असे न होता पालक मंत्री महोदय घरी बसून इतिवृत्त तयार करून निर्णय घेत आहेत. आपण नियोजन मंत्री असताना आपल्या निदेशाची पायमल्ली करून पालक मंत्री घरात बसून, कार्यालयात बसून इतिवृत्त लिहित आहेत. मनात आले ते काम त्यामध्ये टाकण्यात येते, त्यांच्या मनाप्रमाणे काम वगळण्यात येते, हे बरोबर नाही. यासाठी शासनाने ज्या मार्गदर्शक सूचना तयार केलेल्या आहेत त्या निर्णयांची पायमल्ली पालक मंत्री महोदय करीत आहेत, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. जिल्हा नियोजन समितीमध्ये जो निर्णय होतो, त्या बैठकीत जे-जे ठरले त्याप्रमाणे इतिवृत्त तयार केले पाहिजे. दुर्दैवाने तसे होत नाही. जिल्हा नियोजन समितीमध्ये सरकारने १४६ योजनांचा समावेश केला आहे. सरकारच्या त्या-त्या विभागाने त्यांचे जी.आर. काढले आहेत. अनेक योजनांचे जी. आर. काढण्यात आले नाहीत. जिल्हा नियोजन समितीने मूल्यमापन करण्यासाठी ०.५ टक्के तरतूद केली असते.

[ ॲड. आशिष जयस्वाल ]

अध्यक्ष महोदय, राज्याच्या दृष्टीने विचार केल्यास राज्यात असंख्य योजना सुरू झाल्या आहेत. परंतु कालांतराने शासनाने त्या योजनांचे कधीही मूल्यमापन केले नाही. नगरपरिषदांमध्ये वैशिष्टपूर्ण योजना सुरू झाली. नगरपरिषदांना मागणीनुसार आऊट-ले देतो. नगरपरिषदांच्या रोड प्लॅनसाठी २०० ते ३०० कोटी रुपयांची तरतूद केली जाते व त्यांना नगरपालिकांप्रमाणे निधीचे वाटप केले जाते. परंतु प्रत्यक्षात सदर निधी नगरपरिषदांमध्ये आल्यानंतर तेथील विविध नगरसेवक आपापल्या वॉर्डात त्या निधीचे वाटप करतात. तसेच ज्या वॉर्डामध्ये रस्ते झालेले आहेत त्याच वॉर्डामध्ये पुन्हा रस्ते केले जातात. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, ज्यावेळी नियोजन विभागाकडून विविध विभागांसाठी आऊट-ले ठरवून निधी उपलब्ध करून दिला जातो त्यावेळी प्रत्यक्षात त्या विभागाने निधी मिळाला आहे म्हणून खर्च करण्याचे धोरण न स्वीकारता, राज्याला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी सदर निधी खर्च करणे अत्यावश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला एक उदाहरण सांगतो. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने एक निर्णय घेतला. कॅबिनेटची मिटींग सुरू होती. त्यावेळी सामाजिक न्याय विभागाच्या मंत्री महोदयांनी असे सांगितले की, "माझा विभाग सर्व अनुसूचित जातीच्या लोकांची रक्कम भरू शकतो." त्यानंतर आदिवासी मंत्री महोदयांनी असे सांगितले की, "आमचा विभाग रक्कम भरण्यास तयार आहे." त्यानंतर व्हीजेएनटी व ओबीसी विभागाचे अधिकारी तेथे आले त्यांनी असे सांगितले की, "आम्ही ५० टक्के रक्कम भरतो." कालांतराने प्रत्येक शैक्षणिक अभ्यासक्रमाची फी वाढत गेली. १०० टक्के एससी व एसटी तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या ओबीसींसाठी ५० टक्के फी माफ केली.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, आपले भाषण सुरू होऊन १६ मिनिटे झाली आहेत. आपल्या पक्षातील आणखी ७ सन्माननीय सदस्यांची भाषणे बाकी आहेत.

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महोदय, मला यासंबंधी माननीय गटनेत्यांनी पत्र दिले. आमच्या पक्षाला एक तास व दहा मिनिटांचा वेळ आहे.

**उपाध्यक्ष :** आपण जास्त वेळ घेतला तर, आपल्या पक्षातील उर्वरित ७ सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी कमी वेळ राहील.

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महोदय, कालातंरानुसार मोठ्या प्रमाणावर खर्च वाढत आहे. सदर योजना अतिशय चांगली आहे. अध्यक्ष महोदय, शासनाने राज्यात योजना सुरू केल्यानंतर ती योजना बंद करता येत नाही. म्हणून नियोजन विभागाने कोणताही निर्णय घेत असताना त्याचे कशा प्रकारे दूरगामी परिणाम होतील, याचा सुद्धा विचार करणे आवश्यक आहे. मी वेळेअभावी त्यासंबंधी चर्चा करणार नाही. परंतु प्रत्यक्षात अशाप्रकारे शिक्षण शुल्कात वाढ झाल्यामुळे त्याचा शासनावर मोठ्या प्रमाणात बोजा पडत आहे. तसेच शिक्षण शुल्काच्या वाढीमुळे मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार व गैरप्रकार होत आहेत यासंदर्भात शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. शासनाच्या तिजोरीतून योजनेसाठी निधी दिला जात असताना, प्रत्येक योजनेचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. परंतु दुर्दैवाने तशा प्रकारे योजनांचे मूल्यमापन केले जात नाही, याची मला खंत वाटते.

**[ ॲड. आशिष जयस्वाल ]**

अध्यक्ष महोदय, मी यासंदर्भात सभागृहाला एक उदाहरण सांगतो. यावर्षी शासनाने ''पर्यटन वर्ष'' जाहीर केलेले आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात पर्यटन व सांस्कृतिक विभागासाठी २५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे त्यापैकी २०० कोटी रुपयांची तरतूद पर्यटनासाठी केलेली आहे. २०० कोटी रुपयांमधून पर्यटनाची कामे घेत असताना किती लोकांना रोजगार मिळणार आहे, देश-विदेशातून किती प्रमाणात पर्यटक येणार आहेत अशा महत्त्वाच्या दृष्टिकोनातून पर्यटन विभागाकडून कामे केली जात आहेत किंवा नाहीत, यासंबंधी नियोजन व संबंधित विभागाने आत्मचिंतन करण्याची गरज आहे. एकीकडे तीर्थक्षेत्र विकासासाठी भरीव निधी दिला जात असताना पर्यटन विकास निधीतून राज्यातील महत्त्वांच्या पर्यटन स्थळांचा विकास न होता, वारंवार वेगवेगळ्या तीर्थक्षेत्रांचाच विकास केला जात आहे. अध्यक्ष महोदय, गुजराथ व मध्य प्रदेशासारख्या राज्यात एक किलोमीटरचा समुद्रकिनारा नसताना सुद्धा पर्यटनाच्या दृष्टीने विचार केल्यास, ती राज्ये आपल्या राज्यापेक्षा फार पुढे गेलेली आहेत. तेथे इतर राज्यांतून, देशातून व विदेशातून येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. अशा परिस्थितीत आपल्या राज्यातील विविध विभागांवर नियोजन विभागाने सक्त नियंत्रण ठेवले पाहिजे. या सर्व बाबींकडे माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवारसाहेब कटाक्षाने लक्ष देतील अशी मला त्यांच्याकडून अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास २-३ महत्त्वाचे मुद्दे आणून देणार आहे. एकीकडे राज्यात मोठ्या प्रमाणावर खर्चात वाढ होत असताना, डेव्हलपमेंट स्टेजमध्ये आपल्या अर्थसंकल्पातून किती प्रमाणात निधी विकास कामांवर व इन्फ्रास्ट्रक्चरवर होत आहे, यासंबंधी शासनाने विचार करण्याची गरज आहे.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, आपले भाषण सुरू होऊन जवळपास २० मिनिटांचा अवधी झाला आहे. आता आपण आपल्या भाषणाचा समारोप करावा. अन्यथा आपल्या पक्षातील उर्वरित सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ मिळणार नाही.

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महोदय, मला ४-५ मिनिटे बोलण्याची संधी द्यावी. सन्माननीय सदस्य श्री. शिरीष कोतवाल यांनी त्यांच्या भाषणात असा उल्लेख केला की, सोनावणे यांची हत्या झाल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांनी राज्यात होणारे सर्व अवैध धंदे थांबविले. अचानकपणे लोकांच्या मनात ही जागृतीची भावना कशी काय निर्माण झाली ? आज पुन्हा धाडसत्राची मोहीम का थांबविण्यात आलेली आहे ? या प्रश्नाची उत्तरे मला माननीय मंत्री महोदयांनी दिली पाहिजेत.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी भाषणाचा समारोप लवकरात लवकर करावा, ही विनंती.

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महोदय, धाडीच्या माध्यमातून राज्याच्या उत्पन्नात भर पडणार असेल तर अशा प्रकारची कार्यवाही सातत्याने केली पाहिजे. महसूल विभागामध्ये रॉयल्टी निरीक्षकाची पदे आहेत...अडथळा....

[ ॲड. आशिष जयस्वाल ]

मी अन्न व नागरीपुरवठा विभागाच्या संदर्भात शेवटचा मुद्दा उपस्थित करणार आहे. अजूनही एका एका माणसाकडे जुन्या तालुक्यात १० ते १५ गावाची दुकाने आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना केरोसीन मिळण्यास फार अडचण येत आहे. तालुका स्तरावरील प्रत्येक गावागावात रेशनची दुकाने देण्याच्या संदर्भात निर्णय घ्यावा, अशा पद्धतीची विनंती करून वेळे अभावी मी माझे भाषण येथेच संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र !

**श्री. दीपक केसरकर** (सावंतवाडी) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्याने करप्रणाली स्वीकारलेली आहे. कर आकरणी सुलभ आणि सुटसुटीत व्हावी हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. राज्यातील जकात रद्द करण्याचा ज्यावेळी निर्णय घेतला त्यावेळी शासनाने अतिरिक्त कर लागू केला होता. पुन्हा एकदा पर्यायी कर आकारणीच्या संदर्भात महाराष्ट्रातील सर्व व्यापाऱ्यांची एक बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींनी असे सुचविले होते की, असे वेगवेगळे कर वसूल करण्याऐवजी व्हॅटमध्ये एखाद्या टक्याची वाढ करावी आणि तो कर नगरपालिकांना द्यावा. करप्रणाली सुटसुटीत करावयाची असेल तर जे लोक कर भरतात त्यांचा सुद्धा शासनाला विचार करावा लागणार आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी योग्य तो विचार करण्याची गरज आहे. रिझर्व्ह बँकेने अनेक बँकांना कोषागाराचे काम करण्याची मंजुरी दिलेली आहे. आज अनेक तालुके नवीन आहेत. त्यांना कर भरण्यासाठी दुसऱ्या तालुक्यामध्ये जावे लागते. अशा नवीन तालुक्याच्या ठिकाणी अशा अनेक ब्रँचेस आहेत. त्यांना ट्रेझरीचे काम सोपवावे असे मला वाटत आहे.

अध्यक्ष महोदय, बजेट हेड क्रमांक २०७० मध्ये अल्पबचतसाठी ग्रॅन्ट देण्यात आलेली आहे. त्यामाध्यमातून अनेक जिल्ह्यांमध्ये अल्पबचत भवने उभारली गेली आहेत. आज त्या अल्पबचत भवनांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. पायाभूत सोयीसुविधा दिलेल्या असताना सुद्धा जर त्याची ग्रॅन्ट बंद होणार असेल तर त्यात कशारीतीने सुधारणा केली जाणार याचा देखील विचार केला पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवृत्ती वेतनाचा हेड २०७१ आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हटल्या की, जिल्हापरिषदेलाच निवृत्ती वेतन देण्याचा विचार केला जातो. परंतु महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेत निवृत्ती वेतनाच्या खर्चात खूप वाढ होत आहे. एक काळ असा येणार आहे की, निवृत्ती वेतन दिल्यानंतर विकास कामे करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पैसा शिल्लक असणार नाही. यासंदर्भात शासन ठोस असा निर्णय घेणार आहे काय ?

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय वित्त आयोगाच्या संदर्भात २०७० हेड आहे. १९७३-१९७४ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्य वित्त आयोगाची स्थापना केलेली आहे. वित्त आयोगाकडून केल्या जाणाऱ्या शिफारशीच्या संदर्भात सभागृहात चर्चा होण्याची गरज आहे. घटना दुरुस्तीनुसार हा आयोग निर्माण झालेला आहे. राज्य शासनाने कोणकोणते टॅक्स महानगरपालिकेबरोबर शेअर करावे यासंदर्भातील सूचना देण्याचे अधिकार वित्त आयोगाला आहे. यासंदर्भातील चर्चा सभागृहात झाली पाहिजे अशी

**[ श्री. दीपक केसरकर ]**

मी विनंती करीत आहे. २५१५ हा हेड सुद्धा १९७४ च्या घटना दुरुस्तीनुसार झालेला आहे. डीपीडीसीची रचना होत असताना ७० टक्के मेंबर हे स्थानिक स्वराज्य संस्थांचे असले पाहिजेत असे घटनेमध्ये लिहीलेले आहे. परंतु उरलेल्या ३० टक्क्यांचा कोणताही विचार शासनाने केलेला नाही.

डी.पी.डी.सी.च्या बैठकींना आमदारांसारख्या लोकप्रतिनिधीना निमंत्रित सदस्य म्हणून बोलाविण्यात येते, ही या सदनासाठी अत्यंत कमीपणाची गोष्ट आहे. यासंदर्भात एक बैठक घ्यावी अशी माझी मागणी आहे. आमदारांना त्या बैठकीवर सदस्य म्हणून निवड व्हावी जेणेकरून निमंत्रित सदस्य म्हणून आपल्याला त्या ठिकाणी जावे लागता कामा नये, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, पूर्वी सन्माननीय सदस्य हे डी.पी.डी.सी.चे सदस्य असायचे. त्यामुळे त्यात काही कामांचा अंतर्भाव व्हावयाचा. माझा मतदारसंघ डोंगरी विभाग असूनही त्याला डोंगरी विभागाचा दर्जा अद्यापपर्यंत मिळाला नाही. डोंगरी विभाग म्हणून तालुक्याचे विभाजन झालेले आहे. सन १९९९ मध्ये दोडामार्ग तालुक्याची निर्मिती झालेली आहे, परंतु आता सन २०११ साल उजाडले आहे तरी सुद्धा त्याला डोंगरी तालुका म्हणून मान्यता मिळालेली नाही. महागाईनुसार किमान दीड कोटी रुपये प्रत्येक डोंगरी तालुक्याला दिले गेले पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने पर्यटनासाठी एक वेगळे हेड निर्माण केले आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्याच्यासाठी वेगळे हेड करण्यात यावे, अशी माझी मागणी आहे. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून संपूर्ण महाराष्ट्राला निश्चितपणे न्याय मिळाला पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विकास पर्यटन जिल्हा म्हणून थांबविण्यात आला परंतु तरी सुद्धा स्वतंत्र हेड शासन निर्माण करू शकलेले नाही. यासर्व गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, फलोद्यानासंदर्भात कोकणाचा विचार शासनाने निश्चितपणे करावा. आमच्या कोकणात चिरा दगड मोठ्या प्रमाणावर आहे. आमचा लाल मातीचा परिसर आहे त्यामुळे शासनाने यासंदर्भात निकष बदलण्याची गरज आहे. नियोजन खात्याने या बाबींचाही साकल्याने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने बेकार भत्ता या नावाने हेड निर्माण केले, परंतु कोणत्याही सुशिक्षित बेरोजगार तरुणांना बेकार भत्ता दिला नाही. सन्माननीय आमदारांसाठी स्थानिक विकास निधी दिला जातो. आमदारांचा स्थानिक निधी खर्च करण्यासाठी शासनाकडून वेगवेगळे सर्क्युलर्स काढले जाते. या निमित्ताने माझी शासनास सूचना आहे की, एखाद्या ठिकाणी आमदारांच्या स्थानिक निधीतून काही कामे करावयाचे असतील, उदा. एखाद्या भागात विजेचे काम करावयाचे असेल तर त्या ठिकाणी ट्यूब लावावयाची, की बल्ब लावावयाचा याबाबतचे अधिकार हे जिल्हाधिकाऱ्यांना देण्याची आवश्यकता आहे. अशा स्वरूपाची कामे मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले पाहिजेत. शासनाने शिक्षणाविषयीचे अनुदान मोठ्या प्रमाणात कमी केलेले आहे. माननीय नियोजन मंत्री महोदयांचे मला अभिनंदन करावयाचे आहे की, आमदार निधीतून माध्यमिक शाळांना निधी देता येऊ शकतो, अशा प्रकारचे चांगले सर्क्युलर काढण्याबाबत निर्णय घेतला आहे. अनुदान वाटपाबाबत योग्य ते नियोजन होणे आवश्यक आहे ...(अडथळा) ..... कॉंग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष या दोन्ही पक्षांच्या वतीने मी बोलत आहे.

[ श्री. दीपक केसरकर ]

अध्यक्ष महोदय, फूड ॲण्ड सिव्हील सप्लायच्या बाबत आदरणीय मंत्री महोदयांचे मी लक्ष वेधू इच्छितो की, गोडाऊन्समध्ये धान्य रेल्वेने येते. तेथून ते धान्य ट्रकद्वारे रेशनिंग धान्यपुरवठा दुकानात सप्लाय केले जाते. परंतु एखाद्या वेळेस ट्रक वाहतूकदारांचा संप असेल तर त्या कालावधीत रेशनिंगचे धान्य हे शिधापत्रिकाधारकाला पुढील महिन्यात मिळत नाही, ते मिळाले पाहिजे. ग्रामीण भागात ज्यांच्याकडे गॅस आहे, त्यांना रॉकेल मिळाले पाहिजे. मच्छीमार जे रॉकेल वापरतात, त्यांनाही सबसिडी देण्याबाबत शासनाने विचार करावा, अशी माझी मागणी आहे.

**उपाध्यक्ष :** आता सभागृहाची वेळ संपत आलेली आहे. सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

**श्री. दिपक केसरकर :** अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षणा संदर्भातील मला काही बाबी आपल्या निदर्शनास आणावयाच्या आहेत. वैद्यकीय कॉलेजमध्ये महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलनुसार पदे भरली नसतील तर अशी कॉलेजेस बंद होण्याची शक्यता आहे म्हणून आपल्यामार्फत वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांना विनंती करतो की, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या नॉर्म्सनुसार आवश्यक ती पदे तातडीने मंजूर करावी, जेणेकरून महाराष्ट्रातील मेडिकल कॉलेजेस बंद होणार नाहीत, याबाबत शासनाने दक्ष रहावे. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**श्री. प्रवीण दरेकर** (नागोठणे) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी प्रामुख्याने रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. अर्थसंकल्प तयार करीत असताना रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडे शासनाने पुरेसे लक्ष दिले नाही, असे दिसून येत आहे. एका बाजूला शासन युवा धोरण तयार करण्यासाठी पुढाकार घेते. मात्र दुसऱ्या बाजूला तरुणांना रोजगार मिळवून देण्याकडे दुर्लक्ष करते. हे योग्य नाही. यामुळे राज्यातील बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या समस्येवर उपाय शोधून काढण्यासाठी शासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पात निरनिराळ्या विभागांकरिता तरतूद केली जाते. ही तरुण मंडळी आपली ताकद आहे. निवडणुकीमध्ये हे तरूण आपल्यासाठी काम करतात. आपले घरदार बाजूला ठेवून झेंडे नाचवतात. त्यांच्यासाठी शासनाने भरीव निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. मात्र या अर्थसंकल्पामध्ये तशा प्रकारची तरतूद केल्याचे दिसून येत नाही. राज्यात सन २०११ पर्यंत २६ लाख ८२ हजार ४११ बेरोजगार असल्याची माहिती रोजगार स्वयंरोजगार विभागाने दिलेली आहे. बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासाठी शासनाने आतापर्यंत किती उद्योगधंदे उभारले ? आपण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून अनेकदा रोजगाराच्या गोष्टी करीत असतो. मात्र आतापर्यंत या योजनेच्या माध्यमातून किती जणांना रोजगार मिळवून दिला या बाबत ऊहापोह होणे अत्यंत आवश्यक आहे, असे मला वाटते.

[ श्री. प्रवीण दरेकर ]

अध्यक्ष महोदय, बेरोजगारांना काम देण्यासाठी स्वयंरोजगाराची संकल्पना शासनाने पुढे आणली होती. राज्य शासनाकडून बेरोजगार तरुणांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. या बेरोजगारांच्या संस्थेला सेवा सहकारी संस्थांना शासनाचे वेगवेगळ्या प्रकारचे लहान मोठ्या स्वरूपातील काम देण्याच्या संदर्भात शासनाने जीआर काढला होता. सन २०१०-२०११ मध्ये स्थापन झालेल्या सेवा सोसायट्यांची संख्या २५७ होती. त्यापैकी कार्यरत असणाऱ्या सेवा संस्थांची संख्या २५३ आहे. मात्र आतापर्यंत किती बेरोजगार सहकारी संस्थांना काम दिले आहे ? दिनांक ११ फेब्रुवारी २००४ मध्ये शासनाने निर्णय पारित करून सेवा सहकारी सोसायट्यांना व्यवस्थापकीय अनुदान म्हणून १२०० रुपये अर्थसहाय्य देण्यास सुरुवात केली. माझी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे. सेवा सहकारी संस्थांना आतापर्यंत किती काम देण्यात आले आहे, त्यापैकी किती संस्थांना अनुदान देण्यात आले आहे, ही माहिती त्यांनी सादर करावी. अध्यक्ष महोदय, ही सर्व माहिती आपण पाहिली तर परिस्थिती अतिशय चिंताजनक असल्याचे आपल्या लक्षात येईल. या सेवा सहकारी संस्थांना काम मिळत नाही. शासनाच्याच जीआरचे पालन शासनाची अंगीकृत आस्थापना करीत नाही. एका बाजूला शासन आपली भूमिका बजावण्यामध्ये कमी पडत असताना आमच्या सारखे काही सामाजिक काम करणारे कार्यकर्ते शासनाला चांगली योजना देतात. मात्र अशा चांगल्या योजनांना शासनाकडून केराची टोपली दाखवली जाते.

अध्यक्ष महोदय, मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचा मी अध्यक्ष आहे. ५ कोटी बेरोजगार तरुणांना रोजगार देण्यासाठी ५०० कोटी रुपयांची योजना महानगरपालिकेला सादर केली गेली. मनसे पक्षाचे अध्यक्ष माननीय श्री. राज ठाकरे यांनी महानगरपालिकेचे आयुक्त यांची भेट घेतली. या योजनेकरिता मुंबई शहरातील ५ हजार फूटपाथ आयडेंटीफाय करून देण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली होती. ५ हजार फूटपाथ आयडेंटिफाय करून दिले तर प्रत्येक फुटपाथवर एका ठिकाणी ५ स्टॉल्स अशा २५ हजार स्टॉल्सच्या माध्यमातून ५० हजार बेरोजगार तरुणांच्या हातांना काम देण्याची योजना दिली. महापालिकेने फक्त जागा द्यावयाची होती, तेथे अत्याधुनिक स्टॉल उभारण्याचे काम मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अर्थसहाय्यातून होणार होते. हे स्टॉल मग, ते स्टेशनरी, फळांचे वा इतर व्यवसायांचे असतील, त्याचे मार्केटिंग करण्याचीही यंत्रणा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून उभी करण्यात येणार होती. राज्य शासनाकडे ही योजना आली होती. परंतु, केवळ राजकीय भावनेतून महापालिकेने नकारघंटा वाजविली.

अध्यक्ष महाराज, मी या विषयावर लक्षवेधी सूचनाही उपस्थित केली होती. परंतु, त्या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीतही नकारात्मक भूमिका घेऊन महापालिकेला फेरीवाला धोरणाचे कारण सांगून ही योजना बासनात गुंडाळण्यात आली. आपल्या माध्यमातून माझी सन्माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती आहे. त्यांना, एखादी रचनात्मक गोष्ट पटली तर, त्यासाठी ते भूमिका घेणारे आहेत, याविषयी कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. आजही मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक यासाठी ५०० कोटी रुपये देण्यास तयार आहे. याबाबतचे धोरण कोर्टाने जाहीरही केलेले आहे की, मुंबई महानगरपालिकेने फेरीवाला धोरण जाहीर करावे आणि ते धोरण राज्यशासनाकडे कायद्यात रूपांतर करण्यासाठी आले आहे.

**[ श्री. प्रवीण दरेकर ]**

अध्यक्ष महाराज, मुंबईचा फूटपाथ निश्चित करण्यास सांगितलेले आहे, माझी आपल्या माध्यमातून माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती आहे की, या धोरणामध्ये फूटपाथ निश्चित करून, मुंबईमध्ये २५ हजार स्टॉल्सच्या माध्यमातून ५० हजार बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देण्याचे पुण्याचे काम होणे अत्यंत आवश्यक आहे. ते स्टॉल बांधत असताना वाहतुकीला अडथळा होणार नाही, सर्व गोष्टींची कायदेशीर पूर्तता केली जाणार आहे.

अध्यक्ष महाराज, आपल्या माध्यमातून माननीय अर्थ मंत्र्यांना ही देखील विनंती आहे की, महिला बचत गटांना ६ टक्के व्याज दराने कर्जपुरवठा केला जात असला तरी, प्रत्यक्षात महिला बचत गटांना ४ टक्के व्याज दराने कर्जपुरवठा केला जातो. उर्वरित २ टक्के व्याज दराची पूर्तता केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून केली जाते. तशाचप्रकारे हे जे अर्थसहाय्य केले जाईल त्यासाठी काही भाग हा राज्य शासनाने उचलल्यास एक चांगली योजना कार्यान्वित होऊ शकते. माझी आपल्या माध्यमातून सन्माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती आहे की, दादा, मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, मुंबई अर्बन बँक पैसे द्यायला तयार आहे. फक्त महापालिका व राज्य शासन यांनी जर सकारात्मक भूमिका घेतली तर एका वेळेला २५-५० हजार बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देता येईल. त्यामुळे या कामी अतिशय गांभीर्याने शासनाने लक्ष दिले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न अन्न व नागरी पुरवठ्याबाबत आहे. माननीय मंत्र्यांना मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघामध्ये १६-१७ आदिवासी पाडे आहेत. त्यांची आदिवासी म्हणून ओळख नाही, त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारचा पुरावा नाही, बीपीएल कार्डही नाही. ते कार्ड जर त्यांना मिळाले तर, निदान शासनाच्या, ज्या आदिवासींच्या सवलती, फायदे आहेत ते घेण्यासाठी एक पुरावा त्यांना मिळेल. याबाबत माननीय अन्न व नागरीपुरवठा मंत्र्यांनी लक्ष घातले पाहिजे व ते कार्ड देण्याबाबत सहकार्य करावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

तसेच, मुंबई शहरामध्ये मी एक नावीन्यपूर्ण प्रकल्प राबवू इच्छितो. माननीय अर्थमंत्र्यांना मी याबाबतीत पत्रही दिले आहे. याबाबत मुंबईतील बोरिवली या ठिकाणी नॅशनल पार्क आणि श्रीकृष्णनगर नदीच्या दरम्यान बंधारा घालून पाण्याची साठवण करून पर्यटनाच्या दृष्टीने बोटींगची सोय करणे, जॉगर्स ट्रॅक तयार करणे आणि तेथील पाणी पिण्याव्यतिरिक्त जलकुंभाच्यामार्फत लोकांना पुरविण्याची एक महत्त्वाकांक्षी योजना सादर केली आहे. महानगरपालिकेने यासाठी अडीच कोटी रुपयांची तरतूद करून, या प्रकल्पाला मान्यता दिलेली आहे. पर्यटन खात्यानेही २५ लाख रुपयांचा टोकन निधी दिलेला आहे. हा मुंबईतील एक नावीन्यपूर्ण प्रकल्प होईल. मुंबईमध्ये नॅशनल पार्कमध्ये पर्यटक मोठ्या संख्येने येतात, त्यामुळे ते पर्यटनाचे एक मोठे केंद्र होऊ शकते. त्या शिवाय पाण्याची साठवण करून पिण्याव्यतिरिक्त पाणी तेथे उपलब्ध होऊ शकते. माननीय दादा, माझी आपल्याला, माननीय अध्यक्षांच्या माध्यमातून विनंती आहे की, या नावीन्यपूर्ण योजनेसाठी भरीव असा निधी उपलब्ध करून द्यावा.

अध्यक्ष महाराज, श्री. राहुल गांधी यांनी सांगितले होते की, 'आम्ही पाच लाख बेरोजगारांना रोजगार देणार आहोत.' असा प्रस्ताव आम्ही मंत्रिमंडळासमोर आणणार आहोत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. मुंबई शहरामध्ये वाहन चालक, हमाल, गवंडी किंवा त्यांच्या संकल्पनेनुसार

**[ श्री. प्रवीण दरेकर ]**

ग्रामीण भागासारखी बेरोजगारी मुंबई शहरामध्ये आहे. तेव्हा त्यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने श्री. राहुल साहेब यांनी सुचविल्याप्रमाणे आपण लवकरात लवकर कार्यवाही करावी आणि ग्रामीण भागाप्रमाणे मुंबईतील बेरोजगार हातांना रोजगार देण्याचे काम करावे अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, आपण ग्रामीण भागासाठी डोंगरी विकास निधी देतो. मी मागील अधिवेशनात देखील सांगितले होते की, मुंबईतील शिवडी, घाटकोपर, गोळीबार, बोरिवली येथील एक्सर व्हिलेज, दहिसर येथे काजूपाडा, हनुमान टेकडी हे भाग मोठ्या टेकड्यांवर आहेत. त्या ठिकाणी पायवाट करायचे किंवा पाणी चढवावयाचे झाले तर त्यासाठी विशेष निधी नाही. शासन ग्रामीण भागासाठी डोंगरी विकास निधी देते त्याप्रमाणे मुंबई शहरातील काही भाग टेकड्यांवर असल्यामुळे तेथील विकासासाठी निधी देण्यात यावा. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश महेता यांनी घाटकोपर भागामध्ये असा निधी वापरलेला आहे. तेव्हा मुंबई शहरांतील टेकड्यांवर जे पाडे आहेत त्यांच्या विकासासाठी निधी देण्यात यावा अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. अमिन पटेल** (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर, वित्त व नियोजन विभागांवर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आपके माध्यम से मैं माननीय उप मुख्यमंत्री जी को बताना चाहता हूं कि ज्यादा से ज्यादा रेवेन्यू मुंबई से मिलता है. लेकिन हमारे माननीय उप मुख्यमंत्री जी ने मुंबई की तरफ थोड़ा कम ध्यान दिया है, ऐसा मुंबई के लोगों को और आमदारों को लगता है.

मुंबई में १६ हजार इमारतें है. म्हाडा का फंड १०० करोड़ रुपये का है. १०० करोड़ से बढ़ाकर इसको २०० करोड़ रुपये करने की मांग पिछले दो सालों से सदन में हो रही है. मैं दादा से निवेदन करुंगा कि १६ हजार बिल्डिंग में रहने वाले, २५ लाख लोगों के लिए, खास कर उस बारे में ऐसी कोई घोषणा करें ताकि उन लोगों को कोई राहत मिल सके.

आपने बहुत अच्छा निर्णय लिया है. सभी मजहब के जो तिर्थस्थान है, उसके ब्युटीफिकेशन के लिए आपने पैसा दिया है. आपने हजरत ख्वाजा मुहम्मद पीर साहब के दरगाह के लिए पैसा दिया है. मैं माननीय मंत्री का ध्यान इस ओर आकर्षित करना चाहूंगा कि पिछले बजट के समय स्पीच में कहा गया था कि और भी दूसरे जो तिर्थस्थान है, जहां लाखों की तादाद में लोग दरगाह में आते है. मुंबई में, थाना में, नागपुर में लोग दरगाह में जाते है. बाबा मगदुमशा माहिम में है. बाबा पीरवलीशा है. बाबा बाहहूद्दिनशा है. हाजी अली है. हाजी मलंग है. नागपुर में बाबा ताजुद्दिन है. उन जगहों के लिए भी पैसा दिया जाएगा, ऐसा कहा गया था. पिछले साल के बजट में भी उसके लिए कोई प्रोविजन नहीं किया गया है. इस साल के बजट में भी उसके लिए कोई प्रोविजन नहीं किया गया. सभी लोग वहां पर, दरगाह में आते है. मेरी आपसे गुजारीश है कि इस बजट में ऐसी जगहों के लिए कुछ खास प्रावधान कीजिए.

[ श्री. अमिन पटेल ]

अक्लीयत के लोग ज्यादा तादाद में महाराष्ट्र में है. उनकी तरक्की के लिए महाराष्ट्र सरकार ने एक अलग विभाग बनाया है. उसके लिए पिछले साल २२० करोड़ रुपये की जगह २७५ करोड़ रुपये दिए गए थे. अभी यहां पर सही वक्त पर माननीय मंत्री श्री. नसीम खान जी आए है. हम सभी लोगों की यह मांग है, एक विनती है कि यह निधी ५०० करोड़ रुपये की जानी चाहिए. २७५ करोड़ रुपये में जो योजना कार्यान्वित हो रही है, उसमें काम पूरा नहीं हो रहा है. उसको ५०० करोड़ रुपये किए जाने चाहिए, ऐसी मेरी विनती है.

अध्यक्ष महोदय, गवर्नमेंट ने मुझे मौलाना आजाद मायनारिटी फायनान्स कॉरपोरेशन का चेअरमेन बनाया है. उसका कॉरपस फंड १७० करोड़ रुपया है. मेरी विनती है कि उसका कॉरपस फंड ५०० करोड़ रुपये किए जाने चाहिए. मौलाना आजाद मायनारिटी फायनान्स कॉरपोरेशन की नॅशनल मायनारिटी फायनान्स कॉरपोरेशन को गवर्नमेंट गॅरंटी देती है, वह पैसा दिल्ली से मिलता है. उस गॅरंटी की फाईल एफडी विभाग के अंदर काफी दिनों से पड़ी है. मेरी विनती है कि वह गॅरंटी दी जानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, १ जून २००९ को उस समय के मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण जी से मैंने मुलाकात की थी. ५० लोगों को फ्री स्कॉलरशीप, फॉरेन भेजने की स्कीम मैंने उनके सामने रखी थी. मैंने २५ लोगों के बारे में कहा था. मुख्यमंत्री जी ने कहा था कि हम गोल्डन ज्युबली, ५० वा साल मना रहे है, ५० लोगों को फॉरेन भेजना चाहिए. एक बच्चे को, मेरिटोरिअस बच्चे को १० लाख रुपये स्कॉलरशीप दी जाएगी. उन्होंने उस पर रिमार्क लिखा. वह फाईल श्री सोहनी साहब के पास गई. उन्होंने उस पर लिखकर भेज दिया कि यह मौलाना आजाद फायनान्स कॉरपोरेशन इस स्कीम को अमल में नहीं ला सकता. मैंने उनसे जाकर कहा कि मौलाना आजाद फायनान्स कॉरपोरेशन ने नहीं करना चाहिए. गवर्नमेंट ने स्कीम करनी चाहिए. मायनॉरिटी के ५० बच्चों को फॉरेन में भेजने के लिए १० लाख रुपया एक बच्चे के लिए दिया जाना चाहिए और ५ करोड़ रुपये का निधी इसके लिए दी जानी चाहिए इससे मॉयनॉरिटी के बच्चों का हौसला बढ़ेगा. ५ करोड़ रुपये यह बहुत कम निधि है. यह काम आपने करना चाहिए. दूसरे भी समाज के लोग है. दलित है, ओबीसी है, एससी, एसटी है. उनके बच्चों के लिए फंड दिया जाता है. एक एक बच्चे को १८-१८, २०-२० लाख रुपये स्कॉलरशीप दी जाती है. मेरी दादा से विनती है कि आपने मायनॉरिटी के ५० बच्चों को दस-दस लाख रुपये स्कॉलरशीप देनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मुंबई के डीपीडीसी के लिए फंड बहुत कम है. उस फंड को बढ़ाना चाहिए. आपने डेढ़ करोड़ रुपये का फंड दिया है. इस साल आप दो करोड़ रुपये का फंड देंगे. पिछले साल डेढ़ करोड़ रुपये का फंड था. उसमें, मेरा एक करोड चालीस लाख रुपया सिर्फ पूरानी इमारतों के लिए चला गया है. १० लाख रुपये में मैंने दूसरे काम किए है. मेरा आपसे निवेदन है कि मुंबई के डीपीडीसी के फंड को बढ़ाना चाहिए. आपने मुझे बोलने का मौका दिया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

**कृषिभूषण श्री. साहेबराव पाटील** (अमळनेर) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. आमच्या जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील दलवेल येथे पाझर तलाव क्रमांक २ आहे. दिनांक २१ नोव्हेंबर १९८० ला रोजगार हमी योजनेअंतर्गत, तो पाझर तलाव मंजूर झाला होता, त्याची मूळ किंमत ६ लाख ६२ हजार रुपये होती, प्रत्यक्ष खर्च १५ लाख ८६ हजार होता. आता ३१ वर्षानंतर या बाबतीतील काम पूर्ण करण्यासाठी २५ लाख रुपये एवढा आवश्यक निधी पाहिजे. मात्र वन विभाग १ कोटी ८५ लाख रुपये मागत आहे. अध्यक्ष महोदय, आपल्या विभागाने याबाबत जाणीवपूर्वक अभ्यास करावा. माझी आदरणीय दादांना या संदर्भात विनंती आहे. आपण आमदार निधी भरपूर वाढवून दिला आहे. केंद्र शासनाच्या खासदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाप्रमाणे, राज्य शासनाने केलेली तरतूद जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यावी, जिल्हाधिकारी हा निधी राष्ट्रीयकृत बँकेकडे स्वतंत्र पीएलए (स्वीय प्रणाली लेखा खाते) उघडून त्यामध्ये ठेवतात. आपण त्याप्रमाणे कार्यवाही करावी. मानव विकास निर्देशांक हा मानव विकास दर्जा सुधारण्यासाठी चांगला असा अभिनव उपक्रम आहे. सतत अवर्षण प्रवण तालुक्यात येणाऱ्या अमळनेर व पारोळा तालुक्यांचा समावेश आपण त्यामध्ये करावा. दादांनी, नावीन्यपूर्ण अशी चांगली योजना राज्याला दिली आहे. माननीय दादांनी त्यांचा निधी वाढवून द्यावा. वित्त व नियोजन विभागाचे मंत्री असणाऱ्या दादांकडे बरीच कार्यक्षमता आहे. शासनाने जिल्ह्याच्या व्हिजन डॉक्युमेंटसाठी प्रत्येक जिल्ह्याला सचिव दिलेला आहे. परंतु, जळगाव जिल्ह्याला दीड वर्षापासून कोणी पालक सचिव आहे की नाही हे आम्हाला माहीत नाही. नियोजन मंडळाच्या योजनांचा फॉलोअप शासन पातळीवर करण्यासाठी जळगाव जिल्ह्याला पालक सचिव मिळावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, रोजगार हमी योजनेमध्ये फळबाग योजना व शेततळ्यांची योजना या योजनांचा समावेश करावा, अशा प्रकारची मागणी करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. प्रकाश शेंडगे** (जत) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वित्त विभागाच्या एकूण खर्चाच्या तक्त्यावर नजर फिरविली तर राज्यातील भटक्या आणि विमुक्तांचे पित्त खवळल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्रामध्ये २५ टक्के भटक्या व विमुक्तांचा समाज आहे आणि वित्त विभागाचा खर्चाचा तक्ता बघितला तर किती टक्के खर्च या समाजासाठी शासनाने केला आहे ? आपण एससी समाजावर खर्च करतो, एसटी समाजावर खर्च करतो. महाराष्ट्र शासनाने भटक्या, विमुक्तांना मागासवर्गीयांचा दर्जा दिलेला आहे. असे असतांना महाराष्ट्राच्या विकास निधीमध्ये त्यांना जागा का नाही, या समाजासाठी निधी का उपलब्ध करून दिला जात नाही ? असा माझा सरकारला सवाल आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने या समाजासाठी अनेक योजना जाहीर केल्या आहेत. परंतु, या सर्व योजना केवळ कागदावरच आहेत. भटक्या, विमुक्तांसाठी वसंतराव नाईक महामंडळ स्थापन करण्यात आले. परंतु, या महामंडळाला गेल्या ३ वर्षापासून निधी दिलेला नाही. या महामंडळाच्या जिल्ह्यातील सर्व कार्यालयांना टाळे लागलेले आहे. आपण कोणत्याही जिल्ह्यामध्ये जा आणि बघा. वसंतराव नाईक महामंडळाच्या कार्यालयांना टाळे लागलेले आपल्याला दिसून येईल.

**[ श्री. प्रकाश शेंडगे ]**

अध्यक्ष महोदय, तांडा विकास योजना शासनाने सुरू केली आहे. परंतु, निधी न दिल्यामुळे या योजनेचा बोजवारा उडाला आहे. शेळी-मेंढी विकास महामंडळाला गेल्या ८ वर्षामध्ये १९५ कोटी रुपये देण्याच्या घोषणा झाल्या आहेत. निवडणुकीच्या आधीच्या अर्थसंकल्पामध्ये तर भटक्या, विमुक्तांच्या महामंडळांना निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी भीमगर्जना सत्तारूढ पक्षाने केली होती. मेंढपाळ तरुणांनी उतारे जमा केले, दोन-चार हजार रुपये खर्च केले, योजना तयार केल्या. शासन आता सत्तारूढ झाल्यामुळे आपल्याला काही तरी मिळेल, अशी वाट ते बघत राहिले. पण त्यांना पुढच्याच अर्थसंकल्पात फक्त ठेंगा मिळाला.

अध्यक्ष महोदय, यापूर्वीच्या माननीय उपमुख्यमंत्र्यांनी अनेक घोषणा केल्या. आता तर माननीय श्री. अजितदादा पवार यांच्या रूपाने नवीन उपमुख्यमंत्री या राज्याला मिळाले आहेत, त्यांच्याकडून आमच्या अनेक अपेक्षा होत्या. त्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पामधून या समाजाला काही तरी मिळेल, असे वाटले होते. परंतु, त्यांनीही आमच्या तोंडाला पाने पुसली आहेत.

अध्यक्ष महोदय, शेळी-मेंढी महामंडळाच्या माध्यमातून मेंढपाळांचा विकास झालेला नाही, धनगरांचा विकास झालेला नाही. त्यामुळे एकदाच्या या सर्व योजना आणि महामंडळे शासनाने बंद करून टाकावीत आणि असे सांगावे की, भटक्या, विमुक्तांशी या सरकारचे काही देणेघेणे नाही. यापूर्वी पॅकेजचीही घोषणा झाली. परंतु, कोणतेही पॅकेज या समाजापर्यन्त पोहोचलेले नाही.

अध्यक्ष महोदय, सध्या पूर्ण डोंगरी गटासाठी ८० लाख रुपये आणि अंशतः डोंगरी गटासाठी ४० लाख रुपयांचा निधी खर्च केला जातो. कोकणामध्ये धनगर समाजाच्या वाड्यावस्त्या आहेत. या वाड्यावस्त्या अतिदुर्गम भागामध्ये आहेत. डोंगरी विकास निधीचा एक टक्का निधीही या भागामध्ये पोहोचलेला नाही. डोंगरी विकास निधीतून या वाड्यावस्त्यांचा देखील विकास झाला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला भाषण पूर्ण करण्याविषयी सांगत आहात. परंतु, मी मागासवर्गीयांविषयी बोलत आहे. २८८ आमदारांमध्ये मी एकटाच या विषयावर बोलत आहे. त्यामुळे मला आणखी थोडा वेळ बोलण्याची संधी द्यावी, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जिल्हा नियोजन व विकास समितीमध्ये मानव विकास निर्देशांकानुसार प्रत्येक तालुक्याला निधीचे वाटप केले गेले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. अन्यथा, असे होते की, जिल्ह्याला निधी मिळाल्यानंतर प्रत्येक तालुक्याला समान वाटप करण्याच्या सूचना पालकमंत्री देतात. त्यामुळे दुष्काळी तालुक्यांवर अन्याय होतो. त्यामुळे माझी या ठिकाणी मागणी आहे की, प्रत्येक तालुक्याचा बॅकलॉग काढणे आवश्यक आहे. काही जिल्ह्यांमध्ये तर मंत्रीच निधीवर डल्ला मारतात. दुष्काळी भागात जे मागास तालुके आहेत, त्यांचा अनुशेष काढून त्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीचा निधी दिला गेला पाहिजे. तालुक्यातील रस्त्यांची लांबी पाहून, त्यांना निधी दिला पाहिजे. तालुक्यातील लोकसंख्या पाहून, आरोग्य विभागाचा निधी दिला गेला पाहिजे. परंतु असे होत नाही. जिल्हा नियोजनाचे धोरण ठरविण्यात आल्यानंतर मानव विकास निर्देशांक जाहीर करण्यात आला आहे. त्यासंदर्भातील अनुशेष काढून तो निधी खर्च करण्यात यावा, अशी मी मागणी करीत आहे.

[ श्री. प्रकाश शेंडगे ]

अध्यक्ष महोदय, उर्वरित विकास महामंडळ आहे. हे महामंडळ दुष्काळी व मागास तालुक्यासाठी आहे. या महामंडळासाठी फक्त ३० ते ४० लाख रुपयांची तरतूद करण्यात येते. एवढ्या रकमेत या तालुक्याचा विकास कसा काय करता येईल ? माझी मागणी अशी आहे की, जे तालुके पात्र आहेत, त्या प्रत्येक तालुक्यासाठी किमान दोन कोटी रुपयांचा निधी दिला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, वखार महामंडळाची गोदामे आहेत. ही गोदामे शासनाची आहेत. या गोदामात जे कर्मचारी काम करीत आहेत, त्यांना कोणत्याही सुविधा मिळत नाही. त्यांची हजेरी तेथे असते, त्यांना ओळखपत्रे देण्यात आलेली आहेत. हे कर्मचारी कायद्याप्रमाणे काम करीत आहेत. गेल्या १२ वर्षापासून या कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ करण्यात आलेली नाही. त्यांना चौथा, पाचवा किंवा सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. पुणे येथे काही माथाडी कामगार आहेत. त्यांचे पगारवाढीचे करार झाले नाहीत. त्यांना पगारवाढ दिली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात बोलताना रोजगार हमी योजनेचा निधी सुशिक्षित बेरोजगारांना दिला गेला पाहिजे, अशी मी शासनाकडे मागणी करतो व माझे भाषण संपवितो.

**श्री. आर. एम. वाणी** (वैजापूर) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचा अर्थसंकल्प मांडत असताना अर्थमंत्री महोदयांनी भाषण केले त्यातील काही मुद्दे बरोबर नाहीत. काही मुद्दे चुकीचे मांडण्यात आले आहेत. माझा मुद्दा असा आहे की, रोजगार हमी योजनेवर २०११ अखेर ३६२ कोटी रुपयांचा खर्च झाला असे सांगण्यात आले आहे. प्रत्यक्षात या योजनेतून २४२ कोटी रुपये खर्च झाला आहे, तो ३६२ कोटी रुपये झालेला नाही. रोजगार हमी योजनेची सुरुवात १९७२ मध्ये झालेली आहे. या कामाची खरी सुरुवात १९७९ मध्ये कायदा करून झालेली आहे. सन २००७ अखेरपर्यंत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ११,५५९ कोटी रुपये खर्च करण्यात आले नाही. असा कॅगने अहवाल दिलेला आहे. असा आक्षेप भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांनी काढला आहे. ही रक्कम आता ११ हजार कोटी रुपयांवरून १३ ते १४ हजार कोटी रुपये इतकी झाली असेल. रोजगार हमी योजनेसाठी व्यवसायकर तसेच इतर वेगवेगळ्या पाच करांच्या माध्यमातून रक्कम गोळा करण्यात येते. दरवर्षी या रोजगार हमी योजनेतून तीन हजार कोटी रुपये जमा होतात. गेल्या तीन ते चार वर्षापासून या योजनेतून रक्कम खर्च करण्यात आलेली नाही. जवाहर विहिरी गेल्या तीन वर्षापासून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या नाहीत.

शासनामार्फत लोकांकडून तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनातून मोठ्या प्रमाणावर कर वसूल केला जातो. परंतु तो निधी लोकांपर्यंत, सामान्य माणसांपर्यंत तसेच शेतकऱ्यांपर्यंत गेला पाहिजे. पूर्वीच्या काळी हा निधी सामान्य लोकांपर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत जात होता. परंतु, त्याचे प्रमाण आता कमी झाले असून तो निधी इतर ठिकाणी जात आहे. ही बाब योग्य नाही. यात बदल होऊन सदर निधी लोकांसाठी खर्च होणे अत्यावश्यक आहे.

[ श्री. आर. एम. वाणी ]

अध्यक्ष महोदय, मी मराठवाड्यातून आलो आहे. सन २००८ साली मराठवाडा विकास कार्यक्रम झाला. त्यावेळी औरंगाबाद, संभाजीनगर येथे राज्याच्या मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीत सन २००८-०९ या वर्षासाठी मराठवाड्यासाठी पॅकेज जाहीर झाले. त्या पॅकेजमधील ३० टक्के रक्कम सुद्धा मराठवाड्याला मिळू शकली नाही. मी या संदर्भात औरंगाबाद जिल्ह्याचे उदाहरण सांगतो. सदर पॅकेजमध्ये औरंगाबाद जिल्ह्यासाठी १६ कामे मंजूर करण्यात आली होती. त्या कामांपैकी फक्त एकच काम पूर्ण झाले उर्वरित सर्व कामे अपूर्णावस्थेत आहेत. अशा प्रकारे पॅकेजमध्ये केलेल्या तरतुदीपेक्षा अतिशय कमी रक्कम देण्यात आली. या पॅकेजमध्ये माझ्या मतदारसंघासाठी गोदावरी नदीवरील पूल बांधण्यासाठी ६ कोटी रुपये आणि वैजापूर शहराचे चौपदरीकरण करण्यासाठी ६ कोटी रुपये, अशी एकूण १२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. गेल्या साडेतीन वर्षात सदर कामांसाठी १२ कोटी रुपयांपैकी फक्त २.५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. अशा प्रकारे फक्त २७ टक्के निधी प्राप्त झाला होता. यावर्षी गोदावरी नदीवरील पूल बांधण्यासाठी ६ कोटी आवश्यक असताना ४८ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली. तसेच वैजापूर शहराचे चौपदरीकरण करण्यासाठी ६ कोटी रुपये आवश्यक असताना फक्त २९ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यामुळे ही कामे किती वर्षात पूर्ण केली जाणार आहेत ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ही कामे पूर्ण करण्यासाठी जेवढा जास्त उशीर होईल तेवढ्या कामांच्या किंमती वाढणार आहेत.

(माननीय तालिका सभाध्यक्ष घंटी वाजवतात.)

अध्यक्ष महोदय, आमच्या पक्षाला १ तास १० मिनिटांची वेळ दिली आहे. त्यापैकी दोन सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली. त्यांनी भाषणांसाठी अनुक्रमे १६ मिनिटे व २४ मिनिटांचा वेळ घेतलेला आहे. अशा प्रकारे आमच्या पक्षासाठी भरपूर वेळ असल्यामुळे, आपण आम्हाला या ठिकाणी बोलू दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मानव विकास मिशनअंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तालुक्यांसाठी योजना राबविली जाते. गेल्या वर्षी या संदर्भात ५ अब्ज रुपयांची तरतूद होती. त्यापैकी एकही रुपया खर्च करण्यात आला नाही. अशा प्रकारे अर्थसंकल्पात तरतूद करायची, परंतु ती रक्कम खर्च करायची नाही असे शासनाकडून धोरण स्वीकारले जाते. ही योजना चांगल्या पद्धतीने राबविली जाण्याची गरज आहे. ही योजना राबवित असताना संबंधित मतदारसंघ कोणत्या पक्षाचा आहे याचा विचार न करता, जो मतदारसंघ आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे, अशा मतदार संघाला सदरहू योजनेचा लाभ मिळायला पाहिजे अशी मी शासनाकडे मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, काही जिल्हा परिषदांसाठी निधी मंजूर झाला परंतु तो निधी खर्च न होता पुन्हा परत गेला. या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, परभणी जिल्ह्यात माजी व विद्यमान मंत्री यांच्यात वाद सुरू असल्यामुळे, मार्च महिन्याखेर १५ कोटी रुपये परभणी जिल्हा परिषदेला प्राप्त झाले होते व ती रक्कम खर्च न होता परत गेली. या निधीचा उपयोग विकासाच्या कामासाठी करणे अत्यावश्यक असते. ही बाब योग्य नाही. या परिस्थितीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे.

[ श्री. आर. एम. वाणी ]

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, औरंगाबाद, संभाजीनगर येथे घाटी रुग्णालय आहे. एकेकाळी घाटी रुग्णालयाचे फार मोठे नाव होते. त्या रुग्णालयात औषधांचा पुरवठा होत नसल्यामुळे तेथे औषंधाचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा आहे. तेथे वेगवेगळे ३० वॉर्ड व १००० खाटा आहेत. या रुग्णालयाची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. ती सुधारणे आवश्यक आहे व त्या रुग्णालयाला पूर्वीचे वैभव प्राप्त करून दिले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात इतर अनेक योजना आहेत. अनेक ठिकाणी पदे रिक्त आहेत. आज सभागृहात मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यासंबंधी लक्षवेधी सूचनेवर चर्चा सुरू होती. त्यावेळी सत्तारूढ पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी अतिशय तुटून पडले होते.

सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांनी सदर लक्षवेधी सूचनेवर भाग घेतला होता. ग्रामीण भागातील कोणत्याही दवाखान्यात गेलो तर त्यांची अवस्था अतिशय दयनीय असते. ग्रामीण भागातील एखाद्या दवाखान्यांमध्ये ४० पदे मंजूर असताना सुद्धा २० पदे देखील भरली जात नाही. अशा ग्रामीण भागातील रुग्णालयांची अवस्था आहे. ग्रामीण भागातील रुग्णालयात औषधे, डॉक्टरांचा व इतर मनुष्यबळांचा तुटवडा असतो. रुग्णालयात कोणत्याही मूलभूत सोयीसुविधा मिळत नाही. ग्रामीण भागातील दवाखान्यांपेक्षा शहरातील दवाखान्यांची परिस्थिती अतिशय चांगली आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका आता जवळ येणार असल्यामुळे मुंबईतील दवाखान्यांची स्थिती सुधारण्याबाबत शासनाकडून प्रयत्न केले जात आहे. पण ग्रामीण भागात कोणत्याही मूलभूत सोयीसुविधा मिळत नाही हीच खरी दुर्दैवाची गोष्ट आहे. मुंबईतील केईएम रुग्णालयात रुग्णांना चांगल्या प्रकारची सुविधा मिळत आहे. पक्षीय मतभेद समोर ठेऊन अशा प्रकारचे भाषण करणे मला योग्य वाटत नाही.

अध्यक्ष महोदय, मी अन्न व नागरी पुरवठा विभागावर बोलणार आहे. सुप्रीम कोर्टात एका प्रकरणाच्या संदर्भात याचिका दाखल करण्यात आलेली आहे. भारत सरकार बीपीएल लाभधारकांसाठी दरवर्षी ५० हजार कोटी रुपयांचे अनुदान देत असते. याचा बीपीएल लाभधारकांना फायदा होतो का हे तपासण्यासाठी सुप्रीम कोर्टाने जस्टिस श्री. वधवा यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नियुक्त केली होती. ती कमिटी संभाजीनगर, औरंगाबाद जिल्ह्यात आली होती. सदर कमिटीला आमच्या जिल्ह्यात ७० हजार बोगस रेशन कार्डधारक असल्याचे आढळून आले होते. हे सर्व रेशन कार्ड रद्द करून टाकणार, असे कमिटीने त्यावेळी आम्हाला सांगितले होते. सदर कमिटीचे अध्यक्ष श्री. वधवा हे दिल्लीला गेल्यानंतर ७० हजार बोगस रेशन कार्डधारकांच्या संदर्भात पुढे कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर प्रकरण आहे त्याच ठिकाणी राहिलेले आहे. यासंदर्भात मी जिल्हाधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी आम्हाला माहिती देतो म्हणून सांगितले होते. पण त्यानंतर लगेच संबंधित जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भातील माहिती घेऊन आपल्याला सांगितली जाईल असे आम्हाला उत्तर दिले होते. राज्य आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून लाभधारकांसाठी येणाऱ्या पैशांचे नियोजन अशा पद्धतीने होणार असेल तर ते कुठे तरी थांबविण्याची गरज आहे.

[ श्री. आर. एम. वाणी ]

सदर योजनेच्या माध्यमातून १९९७ च्या लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. पण सन २००२ ते २००७ पर्यंतच्या संबंधित लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळत नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे. यामध्ये योग्य ती सुधारणा करण्याची गरज आहे. २००२ ते २००७ मधील संबंधित लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी शासनाने योग्य ती उपाययोजना करावी अशा तऱ्हेची मागणी मी करतो आणि या ठिकाणी थांबतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

**श्री. बाळा नांदगावकर** (शिवडी) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भात बोलणार आहे. राज्यातील गोरगरिबांना देण्यात येणाऱ्या केरोसिनमध्ये खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. राज्यातील १९६६ च्या घाऊक विक्रेत्यांसाठी एक कायदा केला होता. त्यानंतर राज्यातील अर्ध्याहून अधिक घाऊक विक्रेत्यांनी स्वतःची लॉबी तयार केली होती. या लॉबीला होलसेलरचा फायदा होत असतो. २० टक्के फायदा अर्धघाऊक यांना द्यावयाचा अशा प्रकारची कुठेही कायद्यात तरतूद नाही. यासंदर्भातील एक परिपत्रक माझ्याकडे आहे. ते मी आपल्याकडे पाठवू शकतो. २० टक्के फायदा अर्धघाऊक यांना द्यावयाचा अशा प्रकारची कुठेही कायद्यात तरतूद नसताना १५४८ अर्धघाऊक विक्रेत्यांना परवानगी दिलेली आहे. २० पैसे प्रती लिटर ग्राहकावर जी शुल्क आकारणी करण्यात आले आहे, त्यातील १० पैसे हे सरकारचे आहेत तर १० पैसे हे सेमी होलसेलरचे आहेत. सेमीहोलसेलरसाठी वाढ करून अशाप्रकारे ग्राहकांची लुटमार केली जात आहे असे म्हटले ते चुकीचे होणार नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या हातात नागपूर येथील कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याची कागदपत्रे आहेत. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांनी या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. खरे पाहिले तर कायद्यानुसार एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला रॉकेलचा परवाना दिला पाहिजे. अशी तरतूद असतांना माजी अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांनी गेल्या २० वर्षापासून ज्यांचे परवाने निलंबित झालेले आहेत, ते पुनरुज्जीवित केलेले आहेत. त्याची यादी माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यावेळी आपले सहकारी माननीय मंत्री महोदय, श्री. रमेश बंग हे होते. कुंपणच शेत खायला लागले तर जनतेने दाद कोणाकडे मागावयाची, असा प्रश्न पडतो. माननीय मंत्री महोदय, श्री. अजितदादा, हा जो कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झालेला आहे, जनतेची लूट झालेली आहे, या प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे. मी माझ्याकडील सर्व दस्तऐवज आपणामार्फत माननीय मंत्री महोदयांकडे सुपूर्द करतो. यामध्ये अनेक शासन निर्णय आहेत. या विषयावर मी जास्त वेळ घेणार नाही परंतु या प्रकरणाची चौकशी विशेष न्यायमूर्तीमार्फत झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. या प्रकरणात खूप मोठा घोटाळा उघडकीस आलेला आहे. आपण प्रामाणिकपणे जनतेची सेवा करू इच्छित असाल तर या घोटाळ्याची चौकशी विशेष न्यायमूर्तीमार्फत झाली पाहिजे, अशी माझी मुख्य मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, निलंबित झालेले रॉकेलचे परवाने पुनरुज्जीवित केलेले आहेत, ते कोणत्या कायद्याच्या आधारे केले आहेत, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.

[ श्री. बाळा नांदगावकर ]

अध्यक्ष महोदय, नर्सिंग होम संदर्भात मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. मुंबई शहरात जवळजवळ १४०० नर्सिंग होम्स आहेत. रुग्णालये कितीही असले तरी ती कमीच पडतात म्हणून बाहेर नर्सिंग होम्स तयार झाले आहेत. या नर्सिंग होम्सचा उपयोग मलेरिया, कावीळ अशा रोगांची जेव्हा साथ येते तेव्हा होतो. गेल्या ४०, ५०, ६० वर्षापूर्वीची ही नर्सिंग होम्स आहेत.

मुंबई विकास नियंत्रण महापालिका कायदा १९९१ चा आहे. त्या अगोदरची ही नर्सिंग होम्स आहेत. महानगरपालिकेच्या आयुक्तांनी कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन या नर्सिंग होम्सना ६० लाख रुपये, ७० लाख रुपये दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या नर्सिंग होम्सची या मुंबई शहराला किती आवश्यकता आहे याची आपणा सर्वांना जाणीव आहे. या निमित्ताने माझी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांमार्फत शासनास विनंती आहे की, या नर्सिंग होम्सकडून अत्यंत नॉमिनल दराने दंड आकारावा, जेणेकरून अशा प्रकारचा दंड त्या नर्सिंग होम्स जरूर भरतील. या संदर्भात काही विचार केला जाणार आहे की नाही ?

माझ्या मतदारसंघामध्ये परळ येथे हाफकिन इन्स्टिट्यूट आहे. ही शासनाची संस्था अतिशय उत्तम प्रकारे कारभार करीत होती. या संस्थेकडून शासनाला आर्थिक फायदा होत होता. मात्र आता या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. आर. आर. साबदे आले असून सन २००९ मध्ये श्री. सचिन देव बोरकर, महाव्यवस्थापकीय संचालक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. यांची नेमणूक झाल्यापासून सदर संस्थेमध्ये आर्थिक अनियमितता व भ्रष्टाचार हे प्रकार सुरू झाले आहेत. गेल्या २ ते ३ वर्षापासून या संस्थेमध्ये आर्थिक गैरप्रकार सुरू झालेले आहेत. या संदर्भात माननीय मंत्री श्री. मनोहर नाईक यांच्याकडे बैठक घेण्यात आली होती. या संस्थेच्या संदर्भात निर्णय घ्यावा, अशी त्यांना विनंती करण्यात आली. या संस्थेमध्ये गैरप्रकार सुरू आहेत की नाही, या बाबत त्यांनी माहिती घ्यावी. तसेच आवश्यकता असल्यास सदर संस्थेला त्यांनी भेट द्यावी अशी विनंती देखील त्यांना केली होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी मला शब्द दिला होता. त्यांनी तेथील संचालक मंडळाची व संपूर्ण बोर्डाची बैठक घेतली. त्यांनी संस्थेची माहिती घेतली. संस्थेच्या संचालक मंडळाने गैरव्यवहार केला आहे, असा रिपोर्ट दिनांक ३१ डिसेंबर २०१० रोजी श्री. मिलिंद म्हैसकर, सचिव यांच्याकडे सादर करण्यात आला. मात्र या संदर्भात अजून कोणतीही कारवाई झालेली नाही. माझी शासनाला विनंती आहे की, या अधिकाऱ्यांना ताबडतोब तेथून हलवले पाहिजे. अन्यथा अतिशय चांगली चालणारी संस्था डबघाईला येईल. या संस्थेमुळे होणाऱ्या गैरप्रकारांमुळे मुंबई शहराचे व शासनाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. त्यामुळे या अहवालाच्या संदर्भात सचिव श्री. मिलिंद म्हैसकर यांनी त्वरित कारवाई करावी, अशी विनंती करून मी माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद

**श्री. अबु आझमी** (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, मैं सबसे पहले वैद्यकीय शिक्षण विभाग और अन्न व औषधिद्रव्ये विभाग पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं. मेडिकल एज्युकेशन और हेल्थ के अंतर्गत आयुर्वेदिक, होमोपॅथिक ओर ॲलोपेथिक के लिए बजट में प्रोविजन किया गया है. परंतु युनानी कॉलेज और युनानी एज्युकेशन के लिए बजट में कोई प्रोविजन नहीं की गई है. एक तो बीएएमएस है और दूसरा बीयुएमएस है. इन दोनों में सुप्रीम कोर्ट के मुताबीक

[ श्री. अबु आझमी ]

कोई अंतर नहीं है. बीएएमएस और बीयुएमएस का फुलफॉर्म है बॅचलर ऑफ युनानी मेडिसीन अ‍ॅण्ड सर्जरी. दूसरा है बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसीन अ‍ॅण्ड सर्जरी. इसका रजिस्ट्रेशन महाराष्ट्र कौंसिल ऑफ इंडियन मेडिसीन में होता है. इसमें अंतर सिर्फ इतना है कि बीयुएमएस उर्दू और हिंदी में पढ़ाया जाता है, बीएएमएस में संस्कृत और हिंदी भाषा आना जरुरी है. बीएएमएस में ९५ प्रतिशत नॉन मुस्लिम पढ़ते है. केवल ५ प्रतिशत मुस्लिम पढ़ते है. बीयुएमएस में ९९ प्रतिशत मुस्लिम लोग पढ़ते है. सुप्रीम कोर्ट के निर्णय के मुताबीक दोनों की शिक्षा बराबर है. परंतु एक में मुस्लिम ज्यादा पढ़ते है क्योंकि वह उर्दू में पढ़ायी जाती है.

अध्यक्ष महोदय, मैं जानना चाहता हूं कि हरियाना, दिल्ली, हिमाचल प्रदेश, राजस्थान, बिहार, उत्तरप्रदेश, जम्मू और कश्मीर में बीयुएमएस वालों को नौकरी मिलती है. हमारे राज्य में २५ प्रतिशत बीयुएमएस का रिजर्वेशन है. फिर बीयुएमएस वालों के साथ ज्यादती क्यों हो रही है ? बीयुएमएस वालों को नौकरी क्यों नहीं दी जा रही है ? जिस तरह से हर जगह मॉयनॉरिटी के साथ नाइन्साफी हो रही है, क्या बीयुएमएस वालों के साथ भी वहीं हो रहा है ? मुझे मंत्री महोदय से इसका जवाब जरुर मिलेगा ऐसी मैं उम्मीद करता हूं.

अध्यक्ष महोदय, गवर्नमेंट के जितने भी बड़े अस्पताल है, वहां पर आज भी अच्छे डॉक्टरों की कमी है. मैं मुंबई की बात कर रहा हूं. शताब्दी अस्पताल मेरे इलाके में है. मैंने उस हॉस्पिटल के बारे में बात की तो म्युनिसिपल कमिश्नर ने बताया कि वहां पर कोई डॉक्टर जाने के लिए तैयार नहीं है. मैंने बहुत सारे डॉक्टरों को बुलाकर, उनके साथ मिटींग की ओर कहा कि फला डॉक्टर ऑनररी सर्विस देने के लिए तैयार है. फिर भी वहां पर कोई डॉक्टर उपलब्ध नहीं कराया गया है. आज भी शताब्दी अस्पताल की हालत बहुत खराब है, वह अस्पताल वैसे ही पड़ा हुआ है. वह अस्पताल गरीब इलाके में है. लेकिन गरीब लोगों को उसका फायदा नहीं मिल रहा है.

अध्यक्ष महोदय, खाने-पीने की चीजों में मिलावट और उसकी रोकथाम के लिए यानी नशा व कंट्रोल के लिए ४२ करोड़ ४५ लाख ७६ हजार रुपये का बजट में प्रावधान किया गया है. मैं सरकार का ध्यान फुड में होने वाली मिलावट की ओर दिलाना चाहता हूं. मुंबई और थाना में दूध की जो सप्लाई हो रही है, उसमें बहुत मिलावट है. इसके ऊपर ध्यान देकर मिलावट को रोका जाना जरुरी है.

अध्यक्ष महोदय, बेकरी प्रोडक्ट पर साढे बारह प्रतिशत वॅट लगाया गया है. छूट ३० लाख से बढ़ाकर ५० लाख कर दी गई है. मिठाई १०० रुपये से एक हजार रुपये किलो तक बिकती है, उस पर पांच प्रतिशत वॅट लगाया गया है. मैं मंत्री महोदय से निवेदन करुंगा कि ब्रेड आम आदमी के खाने की चीज है. उस पर से वॅट हटा देना चाहिए.

अध्यक्ष महोदय, नियोजन विभाग की डिमांड नंबर ८, हेड नंबर ३४५२, टूरीजम के लिए १६९ करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. इसमें टूरीजम के स्पेशल प्रोग्राम के अंतर्गत विभिन्न धर्म स्थानों के लिए ८५-८५ करोड, २५ करोड़ रुपये, ६० करोड़, दो-दो करोड़ रुपये का प्रोविजन

[ श्री. अबु आझमी ]

किया गया है. पिछली बार भी इस तरह की चर्चा हुई थी. परंतु एक भी दरगाह या मस्जिद के लिए कोई प्रोविजन नहीं किया गया है. मुसलमान, सीख, ईसाई, बुद्धिस्टों के यहां पर बहुत सारे तिर्थस्थान है. परंतु इनके लिए कोई प्रोविजन नहीं किया गया है. सिर्फ लिखा गया है लेकिन प्रोविजन नहीं किया गया है. मैं मंत्री महोदय से कहना चाहूंगा कि इस तरह की नाइन्साफी नहीं होनी चाहिए. सारे धर्म स्थानों के साथ न्याय होना चाहिए. इससे टूरीजम को बढ़ावा मिलेगा. हाजीअली के लिए प्रोविजन की जानी चाहिए. वहां काफी टूरीस्ट आते है.

अध्यक्ष महोदय, स्वयं रोजगार के बारे में मैं कहना चाहूगा. मौलाना आजाद फायनान्स कारपोरेशन में बहुत सारे लोग लाईन लगा कर खड़े है. परंतु उनको पैसे ही नहीं मिल पा रहे है. इस पर ध्यान देना बहुत जरुरी है.

अध्यक्ष महोदय, मानखुर्द-शिवाजीनगर में बीपीएल कार्डधारक सिर्फ १२९९ है. वहां का पूरा इलाका गरीब है. उनके पास खाना खाने के लिए पैसे नहीं है. अभी १२-१५ बच्चे भूख से मर गए. इस बारे में कुछ नहीं हो रहा है. वहां का जल्द से जल्द सर्वे किया जाना चाहिए और वहां के ५ हजार गरीब लोगों को बीपीएल में लाया जाए और जो बीपीएल कार्डधारक है उनको सुविधाएं नहीं मिल रही है, उनको सुविधाएं दी जानी चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं. धन्यवाद.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी फक्त सजेशन्स कराव्यात.

**डॉ. अनिल बोंडे** (मोर्शी) **:** अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील वित्त, नियोजन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, रोजगार व स्वयंरोजगार या विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाबतीत मी फक्त सजेशन करणार आहे. नागपूर येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आहे, तेथे संपूर्ण विदर्भातील जनता हार्ट, ब्रेनवरील ट्रीटमेंट करण्यासाठी जाते. परंतु, आज अशी परिस्थिती आहे की, अमरावती विभागामध्ये अकोला व यवतमाळ येथील जी दोन शासकीय मेडिकल कॉलेजेस आहेत, तेथे ह्रदयाची तपासणी होत नाही, ह्रदयावरचे उपचार होत नाहीत, मेंदु विकार, कॅन्सरवरील उपचार होत नाहीत. शासनाने ६ मेडिकल कॉलेजेसना जास्त निधी देण्याबाबतीत जेव्हा वर्तमानपत्रात बातमी आली होती, त्यावेळेस मी, तेव्हाचे संचालक, श्री. तायडे व नंतर श्री. शिंगारे यांच्याशी जेव्हा बोललो तेव्हा ते म्हणाले की "अकोला व यवतमाळमध्ये रेडिओ थेरेपिस्ट उपलब्ध नाहीत, त्यामुळे तेथे कर्करोगाचे नवीन रुग्णालय किंवा सुविधा देता येणार नाही."

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नागपूर येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल असतानाही सुपर स्पेशलायझेशन करण्याची एकही सीट किंवा सुविधा नाही. ते सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुपर स्पेशलायझेशनसाठी टिचिंग हॉस्पिटल म्हणून अजूनपर्यंत नोंदविले गेले नाही. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना माझी विनंती आहे की, ज्याप्रमाणे केईएम, जेजे रुग्णालयामध्ये डीएम आहेत, एमसीएच आहे कार्डिओलॉजिमध्ये आहे, न्यूरॉलॉजिमध्ये आहे, नेफ्रॉलॉजिमध्ये आहे, एंडोक्रॉनॉलॉजीमध्ये आहे,

[ डॉ. अनिल बोंडे ]

त्याप्रमाणे नागपूरला जर सुरू झाले, तर अमरावती विभागातील अकोला, यवतमाळ येथे कार्डिओलॉजिस्ट मिळू शकतील. कारण पुण्या, मुंबईत शिकलेले लोक अमरावतीमध्ये प्रॅक्टिस किंवा नोकरी करण्यास येत नाहीत.

सन १९६० पासून आजपर्यंत अमरावती, अकोला, यवतमाळ येथे शासकीय स्तरावर कोणतेही कार्डीऑलॉजि सेक्शन सुरू झालेले नाही.

अध्यक्ष महाराज, दुसरी एक महत्त्वाची गोष्ट मी लक्षात आणून देऊ इच्छितो की, सुपर स्पेशलायझेशनसाठी आणि पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी ऑल इंडिया लेव्हलवर परीक्षा होणार आहे, त्यामध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना किती सीटस मिळणार आहेत याबाबत शासनाचे निश्चित धोरण असणे आवश्यक आहे. कारण साऊथ इंडियामधील राज्ये या परीक्षेपासून बाजूला झालेले आहेत. आज अशी परिस्थिती आहे की, फक्त श्रीमंत व्यक्तीच सुपर स्पेशलायझेशन आणि पोस्ट ग्रॅज्युएशन करू शकतात. कारण ऑर्थोपेडिक्समध्ये एम.एस.ऑर्थो करायचा असेल तर त्यासाठी दीड कोटी रुपये लागतात. रेडिओलॉजीमध्ये एम.एस.करायचे असेल तर दोन कोटी रुपये लागतात. जी प्रायव्हेट मेडिकल कॉलेजेस आहेत त्यांचे रेट ठरलेले आहेत. एम.डी.मेडिसिन करायचे असेल तर ७० ते ८० लाख रुपये लागतात. तेव्हा सामान्य माणूस एमबीबीएस झाला तर त्याला पोस्ट ग्रॅज्युएशन करता येईल काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

अध्यक्ष महाराज, हे डॉक्टर्स दुर्गम भागात सेवा देत होते त्यांना सर्व्हिस करताना पोस्ट ग्रॅज्युएट करता येत होते. परंतु आता ही सुविधा बंद आहे. तेव्हा शासनाने ही सुविधा पुन्हा सुरू करावी अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, आज ॲनेस्थेशिअन्सचा सर्वत्र तुटवडा आहे. आज मेडिकल ऑफिसरला पंधरा दिवसांचे ट्रेनिंग देऊन ॲनेस्थेशिअन्स म्हणून काम करायला लावले जात आहे. आपल्या येथे सीपीएसच्या माध्यमातून १९९७ पासून २०१० पर्यंत फक्त १३०० ॲनेस्थेशिअन्स तयार झालेले आहेत.

अध्यक्ष महाराज, विदर्भातील अमरावती विभागामध्ये एकही कॅन्सरचे रुग्णालय मेडिकल कॉलेजेसना ॲटेच नाही. त्यामुळे कॅन्सर रुग्णांना संत तुकडोजी रुग्णालयात, नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये किंवा मुंबईला जावे लागते. हे रुग्णास परवडत नाही म्हणून त्याठिकाणी आत्महत्या वाढत आहेत. तेव्हा अकोला आणि यवतमाळ जी शासकीय महाविद्यालयांमध्ये कॅन्सरचे रुग्णालय ॲटेच करावे, अशी मी वैद्यकीय मंत्री महोदयांना विनंती करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. संजय सावकारे** (भुसावळ) : अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, टॅक्स संदर्भातील पद्धतीमध्ये वारंवार बदल होत असतात. बऱ्याच वेळा हे बदल फायनान्शिअल वर्ष संपण्यापूर्वीच केले जातात. त्यामुळे नेहमीच टॅक्स भरण्यांमध्ये गोंधळ उडत असतो.

**[ श्री. संजय सावकारे ]**

तेव्हा माझी वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण टॅक्स सिस्टिमध्ये जे बदल करता ते वर्षाच्या मधल्या पिरियडमध्ये करू नयेत. Unless and until unavoidable circumtances मध्ये असे केले तर गोष्ट वेगळी आहे. परंतु बऱ्याच वेळा हे बदल मध्येच करण्यात येतात.

अध्यक्ष महाराज, सेल्स टॅक्स भरताना एक दिवस उशीर झाला तर पाच हजार रुपये दंड आकारला जातो. जर त्यांनी दंड भरला नाही तर त्यांची नावे वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली जातात, हे काही बरोबर नाही. काही वेळेला जेन्युईन रिझन्स असू शकतात. जर एखाद्याचे जेन्युईन रिझन्स नसताना त्याने टॅक्स भरला नाही तर त्याला पाच ऐवजी पन्नास हजार रुपये दंड करा. परंतु ज्याचे जेन्युईन रिझन्स असू शकतात त्यांना संधी न देता त्यांची नावे वर्तमानपत्रात जाहीर केली जातात. याचा दुरुपयोग असा होत आहे की, असत्य आकडेवारी दाखवून टॅक्स रिटर्न भरण्यात येतात. त्यानंतर रिव्हाईज रिटर्न फाईल केले जाते. रिव्हाईज रिटर्न फाईल करण्यास नऊ महिने लागतात आणि शासनाला देखील असत्य माहिती मिळते. तेव्हा याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

सेल्स टॅक्स विभागाचे जे व्हॅट ऑडिट आहे त्याचे ऑडिट करण्याचे अधिकार फक्त महाराष्ट्रातील चार्टर्ड अकाऊन्टटन्सना आहेत. काही राज्यांनी हे अधिकार सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्स व टॅक्स कन्सल्टन्ट वकील यांना दिलेले आहेत. तेव्हा महाराष्ट्रात देखील आपण हे अधिकार सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्स आणि सेल्स ॲक्ट कन्सल्टन्ट वकील यांना द्यावेत जेणेकरून चांगल्या प्रकारचे ऑडिट होईल आणि महाराष्ट्राचा महसूल वाढण्यास देखील मदत होईल.

वैद्यकीय शिक्षणाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर शासकीय मेडिकल कॉलेजमधून जे डॉक्टर्स होतात त्यांनी ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा द्यायची असते. परंतु ते तशी सेवा देत नाहीत. या संदर्भात शासनाने नियम केलेला आहे की, जे कोणी अशी सेवा देणार नाहीत त्यांच्याकडून दंड आकारण्यात येईल. काही डॉक्टर्स ग्रामीण भागात सेवा देत नाही आणि दंड देखील भरत नाहीत. काही जण दंड भरतात तर काही जण भरत नाहीत. आपणाला ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा द्यायची आहे तर ती त्यांना बंधनकारक केली पाहिजे. कायद्यात तशी तरतूद केली पाहिजे किंवा दंड इतका अधिक केला पाहिजे की, त्यांनी दंड न भरता सेवा दिली पाहिजे, तरच ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा मिळेल. माननीय अन्न, नागरी पुरवठा मंत्र्यांना माझी बायोमेट्रिक सिस्टमसंदर्भात विनंती आहे. आम्ही निवडून आल्यापासून बायोमेट्रिक सिस्टम लवकरच येत आहे असे ऐकत आहोत. पण ती सिस्टम कधी येणार आहे ? आपण बायोमेट्रिक सिस्टम आणण्यासंदर्भात काळजी घ्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (कामठी) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अन्न, नागरी पुरवठा विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. मी अन्न, नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भातील काही विषय मांडणार आहे. मागील ३ अधिवेशनात सातत्याने आम्ही सांगत आहोत की, अन्न, नागरी पुरवठा विभाग हा महसूल विभागाकडून वेगळा केला पाहिजे. परंतु,

[ श्री. चंद्रशेखर बावनकुळे ]

तसे होत नाही. परिणामी, महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अनियमितता सुरू आहे आणि त्याचे कारण असे आहे की, अन्न, नागरी पुरवठा विभाग हा महसूल खात्याच्या अधिनस्त काम करीत आहे. माझा माननीय अन्न, नागरी पुरवठा मंत्र्यांना प्रश्न आहे की, आपण आपला विभाग महसूल विभागाकडून किती कालावधीत वेगळा करणार आहात ? आम्ही हा विभाग वेगळा करीत आहोत असे वारंवार सांगण्यात आले. परंतु, कार्यवाही झाली नाही. मंत्रिमंडळामध्ये आपले कोणी ऐकत नाही की काय ? आपला विभाग वेगळा होत नाही, तोपर्यंत तुमची यंत्रणा सक्षम होणार नाही. भ्रष्टाचार, अनियमितता वाढत राहणार. आपण आपला विभाग वेगळा केला पाहिजे. मंत्रालयीनस्तरावर आपला विभाग वेगळा आहे परंतु, विभागीय आयुक्त स्तराच्याखाली आपला विभाग वेगळा नाही. त्यामुळे अन्न, नागरी पुरवठा मंत्रालयाचे कोणतेही नियंत्रण खालीलस्तरावर नाही. अन्न, नागरी पुरवठा विभाग वेगळा करावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, अनियमितता व भ्रष्टाचार यांचे दुसरे कारण असे आहे की, आपण रेशन दुकानदारांना एका क्विंटलला ५० रुपये कमिशन देता. तुम्ही कमिशनची रक्कम वाढविली तर अनियमितता कमी होण्यास मदत होईल. माझी मागणी आहे की, रेशन दुकानदारांना देण्यात येणारे कमिशन प्रती क्विंटल ५० वरून १०० रुपये केले पाहिजे. मोटार माल वाहूतक भत्ता साडे नऊ रुपये आहे, तो ३५ रुपये केला पाहिजे. त्याशिवाय कुठेही ट्रान्सपोर्ट होऊ शकत नाही. आपण त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आपण ३ महिन्यांमध्ये धान्य उचलण्याचा निर्णय घेतला. पण हा निर्णय अनेक ठिकाणी फसला आहे. आपण तालुक्याच्या भौगोलिक स्थितीप्रमाणे प्रयत्न करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, केरोसीनच्या कमिशनमध्ये केवळ १ लिटरमागे १५ ते २० पैसे मिळतात. आपण हे कमिशन जर दीड रुपये केले तर तेवढा भ्रष्टाचार कमी होईल. आपण रेशन धान्य व केरोसीन यांच्या कमिशनमध्ये वाढ न केल्यामुळे चोरी होण्याचे प्रमाण वाढले आहे. रेशन धान्य व रॉकेल दुकानदारांना पैसे मिळत नाहीत. आपण या संदर्भात चांगला निर्णय घेतला तर निश्चितपणे फरक पडेल.

अध्यक्ष महोदय, माझी माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना सांगणे आहे की, आपण औषध खरेदी सेंट्रलाईज केली आहे. मेडिकल हॉस्पिटलला कोणतीही औषधे, यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी मुंबईच्या संचालनालयाकडे देण्याची काय गरज आहे ? आपण ते सेंट्रलाईज का केले आहे, हे मला काही समजलेले नाही. तुमच्या संचालनालयातून लवकर बिले निघत नाहीत. ऑडिट डिपार्टमेंटचे लोक औषध, यंत्र पुरवठादाराला बोलावितात आणि त्यांच्याकडून पैसे घेतल्याशिवाय पेमेंट करत नाहीत. आपण औषध व यंत्रसामग्रीची खरेदी सेंट्रलाईज केली आहे, ती जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत कोणताही फरक पडणार नाही. कोणती यंत्रे कोणत्या दराने खरेदी केली आहेत, किती योजना गरज नसताना सेंट्रलाईज्ड केलेल्या आहेत याची माझ्याकडे संपूर्ण माहिती शीट आहे. तुम्ही मुंबईतून औषध खरेदी का करीत आहात ? डीनला अधिकार का आहेत ? डीनला दिलेले अधिकार मौखिकरित्या काढण्यात आले आहेत. त्यामुळे मेडिकल हॉस्पिटलमध्ये औषध पुरवठा होत नाही, यंत्रसामग्री पुरवठा होत नाही. सन २००७ पासून मशिनरी बंद आहेत. कोणतेही साहित्य उपलब्ध नाही. माझ्याकडे असलेले पत्र मी आपल्याकडे पाठवितो. आपल्याला त्यावरून दिसेल.

**[ श्री. चंद्रशेखर बावनकुळे ]**

अध्यक्ष महोदय, वित्त विभागाच्या संदर्भात देखील माझी मागणी आहे. विदर्भासाठी सन २०११-१२ मध्ये नियोजित केलेल्या ९२१७ कोटींपैकी .... आमचा अनुभव असा आहे की, .... प्रत्येक महिन्याला ५६८ कोटी रुपये रिलीज केले पाहिजेत. परंतु, मागच्या वर्षाचा असा अनुभव आहे की, केवळ १०, १५ टक्के आऊटले प्रत्येक महिन्याला वितरित होतो. माझी अशी विनंती आहे की, ९२१७ कोटीच्या आऊटलेपैकी मासिक ७६८ कोटी रुपये सर्व विभागांनी वितरित केले पाहिजेत. माननीय वित्त मंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात आऊटलेबद्दल असे सांगितले की, "मी याबाबत लक्ष ठेवीन, यानंतर असे होणार नाही." मी त्यांना पुन्हा एकदा आठवण करून देतो की, ७६८ कोटी रुपयांचा आऊटले प्रत्येक महिन्याला वितरित झाला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, १०,८१३ कोटी रुपयांची राज्याची एकत्रित योजना आपण तयार करणार आहोत. त्यासाठी निधीही राखून ठेवला आहे. १०,८१३ कोटी रुपयांची राज्याची एकत्रित योजना तयार करताना विदर्भाच्या सर्व योजनांचा समावेश त्यामध्ये केला पाहिजे, अशी मी मागणी करतो. कारण, त्या ठिकाणी १०,८१३ कोटी रुपये आपण वाटणार आहोत.

अध्यक्ष महोदय, विदर्भ वैधानिक विकास मंडळाबाबतचा माझा शेवटचा मुद्दा आहे. दिनांक १० मार्च, २०११ च्या पुस्तकामध्ये विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचा विशेष निधी बंद करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. यापूर्वी या मंडळाला ४०-५० कोटी रुपये निधी मिळत होता. परंतु तो आता बंद करण्यात आला आहे. विदर्भ वैधानिक विकास मंडळाला ५०० कोटी रुपये विशेष निधी दिल्याशिवाय विदर्भातील छोटी-मोठी कामे होणार नाहीत. लोकप्रतिनिधी, आमदार जी कामे सुचवितात, ती होणार नाहीत. त्यामुळे यासाठी ५०० कोटी रुपयांचा विशेष निधी देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, एका गोष्टीसाठी मला माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे अभिनंदन करावयाचे आहे. परंतु, ते आता सभागृहात उपस्थित नाहीत. माननीय श्री. अजित दादा पवार हे पहिले असे अर्थमंत्री आहेत की, ज्यांनी डीपीसीच्या निधीमध्ये ५० कोटी रुपयांची वाढ केलेली आहे. माननीय श्री. अनिल देशमुख, श्री. राजेंद्र मुळक, डॉ. नितीन राऊत या मंत्री महोदयांनीही यासाठी निश्चितच प्रयत्न केले असतील. त्यांनाही मी धन्यवाद देतो. आतापर्यन्त १० ते १५ कोटी रुपयांची वाढ मी बघितली होती. परंतु, ५० कोटी रुपयांची वाढ केल्याबद्दल मी नागपूर जिल्ह्यातील जनतेच्या वतीने मानननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे अभिनंदन करतो. जिल्ह्याला देण्यात येणाऱ्या या निधीचे वाटप करताना नावीन्यपूर्ण योजनांमध्ये कोणत्या योजनांचा समावेश करायचा, कोणत्या योजनांचा समावेश करता येणार नाही, याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. माझी अशी मागणी आहे की, नावीन्यपूर्ण योजनांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतात जाणाऱ्या मातीच्या रस्त्यांचा समावेश करण्यात यावा आणि त्यासाठी धोरण ठरविण्यात यावे.

[ **श्री. चंद्रशेखर बावनकुळे** ]

अध्यक्ष महोदय, नियोजन विभागाकरिता एक लाजिरवाणी गोष्ट आहे. रस्ते विकास आराखडा १९८१-२००१ अजूनही राज्यात सुरू आहे. सन २००१-२०२१ चा आराखडा नियोजन विभागाने का प्रलंबित ठेवला आहे ? याचे उत्तर आम्हाला मिळालेले नाही. नियोजन विभागाने याबाबत निर्णय न घेतल्यामुळे जुनाच आराखडा राज्यात सुरू आहे. हा आराखडा केवळ नियोजन विभागामुळे प्रलंबित आहे, अशी माझी माहिती आहे. त्यामुळे आपले राज्य १० वर्षे मागे गेले आहे. सन २००१-२०२१ चा रस्ते विकास आराखडा नियोजन विभागाने मंजूर करून या योजनेला मान्यता दिली पाहिजे, अशी मी मागणी करतो. आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. चिमणराव पाटील** (एरंडोल) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वित्त व नियोजन विभागाच्या मागण्यांवर चर्चा करताना सगळ्या लोकप्रतिनिधींनी निधीची मागणी केली आहे. मला असे वाटते की, या राज्याचे माननीय वित्त मंत्रीच काय पण साक्षात कुबेर आला तरी ते आपल्या मागणीनुसार निधी देऊ शकणार नाही.

अध्यक्ष महोदय, या राज्याचे उत्पन्न ९ लाख १ हजार कोटी रुपये आहे. त्यामधून २५-३० हजार कोटी रुपये विकासासाठी मिळतात. एवढ्या निधीमध्ये माननीय वित्त मंत्री काय करतील, या विषयी माझ्या मनात शंका आहे. २५ ते ३० हजार कोटी रुपयांमध्ये त्यांना या राज्याचा गाडा चालवायचा आहे. त्यामुळे 'ये रे माझ्या मागल्या' उक्तीप्रमाणे दरवर्षी सारखा अर्थसंकल्प सादर करायचा आणि त्यावर आपण सभागृहात चर्चा करायची, एवढेच निष्पन्न यामधून निघणार आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री सध्या सभागृहात उपस्थित नाहीत. मला त्यांना विनंती करावयाची होती की, गेल्या ६०-६२ वर्षे आपण या राज्यात अर्थसंकल्प मांडतो आहोत. या अनुषंगाने अनेक योजना जाहीर केल्या आहेत. मला आवाहन करावयाचे आहे की, सिंचन, कृषी, शिक्षण, सहकार, डेअरी वगैरे विभागांच्या योजना आपण जाहीर केल्या आणि हजारो कोटी रुपये खर्च केले आहेत. हजारो कोटी रुपये खर्च केल्यानंतर या योजनांच्या माध्यमातून फलनिष्पत्ती काय झाली आहे ? या वर्षाच्या अर्थसंकल्प जाहीर केल्यानंतर त्यामध्ये पुढील वर्षाचे चित्र जनतेसमोर ठेवण्यात आले आहे. गेल्या ६० ते ६५ वर्षापासून या योजनांसाठी हजारो कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या योजनांचा आढावा शासन कधी घेणार आहे काय ? कृषी विभाग, पाणी पुरवठा विभाग यांच्या अनेक योजनांवर पैसा खर्च करण्यात आलेला आहे. मी लोकप्रतिनिधी म्हणून मागणी करतो की, ज्या योजना जाहीर करण्यात आल्या, त्यातून रोजगाराची निर्मिती व्हावयास पाहिजे. परंतु रोजगार निमिर्ती झालेली नाही. रोजगार निमिर्ती कोठून होणार ? ग्रामीण भागाचा विचार केला तर ग्रामीण भागात सहकारी चळवळी होत्या, सहकारी संस्था होत्या, पूर्वी सहकाराच्या माध्यमातून थोडीशी रोजगार निर्मिती होत होती. आता साखर कारखान्याची काय परिस्थिती आहे, सूत गिरण्यांची काय परिस्थिती आहे. शेतकरी सहकारी संघाची काय परिस्थिती आहे. पूर्णपणे सहकारी चळवळ मोडकळीस निघालेली आहे.

**[ श्री. चिमणराव पाटील ]**

अध्यक्ष महोदय, दैनिक लोकमत वर्तमानपत्रामध्ये आजपासून एक मालिका सुरू झालेली आहे. राज्य शिखर सहकारी बँकेच्या संदर्भात सर्व माहिती येत आहे. या बँकेची आज काय परिस्थिती आहे. ही बँक फक्त नावापुरती शिल्लक राहिलेली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची काय परिस्थिती आहे. आर्थिक स्वायत्ता ग्रामीण भागात निर्माण करण्यात आलेली नाही. या सर्व संस्था पूर्णपणे मोडकळीस आलेल्या आहेत. कोणत्याही मार्गाने रोजगार निर्मिती होत नाही. अर्थमंत्री महोदयांना मी विनंती करणार आहे की, एक स्वतंत्र अधिवेशन बोलावून या अधिवेशनात गेल्या ६० ते ६५ वर्षामध्ये कोणत्या योजना जाहीर केल्या, त्या योजनांवर किती कोटी रुपये खर्च झाला. त्याचा आढावा घेण्यात यावा, या योजनांची फलनिष्पत्ती काय आहे. याचा संपूर्ण आराखडा महाराष्ट्राच्या जनतेसमोर दिला पाहिजे. मागच्या योजना विधायक व यशस्वी असतील तर त्या पुढे चालू ठेवल्या पाहिजेत. या योजनांतून काही निष्पन्न होत नसेल तर या योजना बंद केल्या पाहिजेत. जी योजना दहा कोटी रुपयांची आहे, ती योजना २०० कोटी रुपयांची झाली आहे. १०० कोटी रुपयांची योजना १५०० कोटी रुपयांवर जात आहे. अशी परिस्थितीत महाराष्ट्रात निर्माण झालेली आहे. रिसोर्स ॲन्ड मोबिलायझेशन महाराष्ट्र शासनातर्फे होत नाही. नवीन रोजगार निर्माण होत नाही. निधीचे समन्यायी वाटप होत नाही.

अध्यक्ष महोदय, परवा असे सांगण्यात आले होते की, २५:१५ चा कार्यक्रम राबवण्यात येईल. निधीचे समन्यायी वाटप करण्यात येत नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आमदारांच्या मतदारसंघात ५० लाख रुपये देण्यात आले आहेत, विरोधी पक्षाच्या आमदारांच्या मतदार संघासाठी फक्त पाच ते दहा लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. काही ठिकाणी तर शून्य तरतूद करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे राज्याचा कारभार चालला आहे. अलिबाबा चाळीस चोर असा हा प्रकार आहे. ज्यांच्या हातात पैसा आहे त्याचा तो उपयोग करून घेत आहे. "तळे राखील तो पाणी चाखेल" अशी परिस्थिती आहे. हा निधी जनतेचा आहे तो फक्त वाटपाचा अधिकार तुम्हाला दिलेला आहे. त्याचा मनमानी वापर करण्यात येत आहे. थम्ब मॅनेजमेंट प्रमाणे निधीचे वाटप करण्यात येत आहे. निकषाप्रमाणे निधीचे वाटप करावयास पाहिजे. निकष डावलून निधीचे वाटप करण्यात येत आहे, त्यामुळे हा गुन्हा ठरत आहे. महाराट्रात गुन्हेगारी प्रवृत्तीचा कारभार सुरू आहे. याचा जनता आपणाला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही. जनतेला आधार वाटावा अशी कामे सरकारकडून होणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**श्री. सुरेश जेथलिया** (परतूर) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वित्त व नियोजन हे विभाग अत्यंत महत्त्वाचे आहेत, या विभागांच्या मागण्यांवर मी बोलणार आहे. अर्थमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आमच्या भागात जुने रस्ते आहेत. त्या रस्त्यांसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. फक्त दोन तीन रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत. परंतु काही रस्त्यांचे पेमेंट न दिल्यामुळे, ते रस्ते अर्धवट अवस्थेत आहेत. सर्व आमदारांची विनंती होती की, यावर्षी अर्थसंकल्पामध्ये नवीन रस्त्यांच्या कामासाठी निधी देऊ नका. परंतु जुन्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. परंतु तशा प्रकारचे नियोजन करण्यात आलेले नाही.

**[ श्री. सुरेश जेथलिया ]**

अध्यक्ष महोदय, सर्व आमदारांनी आमदार निधी वाढवून देण्याची विनंती केलेली आहे. रॉयल्टी आणि ईटीपीचे जे चार्जेस लावलेले आहेत ते कमी करावयास पाहिजेत. २ कोटी रुपयांमधील जवळपास ५० लाख रुपये रॉयल्टी आणि ईटीपी चार्जेसमध्ये जातात. म्हणून आमदार निधीमध्ये वाढ करण्यात यावी किंवा ईटीपी चार्जेस कमी करावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मालेगाव येथील प्रकरणानंतर अनेक ठिकाणी धाडी टाकण्यात आलेल्या आहेत. माननीय गृह राज्यमंत्री श्री. सतेज पाटील साहेब, सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मला एवढेच सांगावयाचे आहे की, या छाप्यांमुळे फक्त पोलिसांची कमाई झालेली आहे. ज्यावेळी छापे टाकण्यात आले त्यावेळी पोलिसांनी किती पैसे कमविले याचा आढावा घेतला पाहिजे. माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांकडे विषय उपस्थित केला तर ते काय करतात ? ते फक्त पोलिसांचीच बाजू घेतात. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये काय स्थिती आहे हे सुद्धा बारकाईने बघणे गरजेचे आहे. आज प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये कोणते धंदे सुरू नाहीत ? पोलीस स्टेशनमध्ये सर्व प्रकारचे धंदे सुरू आहेत. आमदारांनी पोलीस स्टेशनमध्ये फोन करून सुद्धा कामे होत नाहीत. जे छोटे-मोठे उद्योगधंदे करणारे लोक होते त्यांच्यावर धाडी टाकण्यात आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. माझ्या मतदारसंघातील मंठा उपजिल्हा रुग्णालयामध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत, मी त्यांच्याकडे वेळोवेळी मागणी केली होती. डॉक्टरांच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी आपली मत व्यक्त केलेली आहेत. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि ग्रामीण रुग्णालयामध्ये डॉक्टर नाहीत. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात व्यवस्थित औषधांचा पुरवठा करण्यात आला पाहिजे. ग्रामीण भागातील गोरगरीब माणूस कोणत्याही वेळी प्राथमिक आरोग्य केंद्रात गेला तर तेथे डॉक्टर उपलब्ध असले पाहिजेत, तेथे औषधे उपलब्ध असली पाहिजेत. परंतु आज कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ही सेवा उपलब्ध होत नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्व सेवा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी माझी आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

**ॲड. अशोक पवार** (शिरूर) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी व माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री श्री. अजित पवारसाहेबांनी एक दूरदृष्टीचा अर्थसंकल्प सभागृहामध्ये सादर केलेला आहे. आपल्याला त्यातून अनेक चांगल्या गोष्टी काही पुढील वर्षात बघावयास मिळतील. वित्त विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना मी सांगू इच्छितो की, काही ठराविक योजना आहेत. त्या योजनांसाठी बजेटमध्ये आर्थिक तरतूद केली जाते. परंतु त्या योजना केवळ कागदावरच राहतात. त्या योजना कागदावर राहात असल्यामुळे निष्कारण त्या योजनांसाठी निधी दिला जातो.

**[ ॲड. अशोक पवार ]**

अध्यक्ष महोदय, अनेक वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. माझी अशी विनंती आहे की, लोकांच्या गरजा काय आहेत हे विचारात घेऊन खऱ्या अर्थाने निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. लोकांच्या मागण्या वैयक्तिक लाभाच्या असल्यातरी त्याचा विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, महसूल वसुलीच्या बाबतीत आपण काही साध्या-सोप्या गोष्टी अंमलात आणल्या पाहिजे. उदाहरणार्थ आपण तलाठ्यामार्फत जो महसूल गोळा करतो तो ३ रुपये ५ पैसे, १५ रुपये २० पैसे अशा स्वरूपात वसूल करीत असतो. हे सर्व आकडे राऊंड फिगर केले तर महसूल जमा करणे सोपे होईल. शेतकरी थकीत वीज बिलाचे काही पैसे भरणार असेल तर त्या शेतकऱ्याला काही प्रमाणात सूट दिली जाते. तशा पद्धतीची योजना महसूल विभागात खऱ्या अर्थाने सुरू केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, संपूर्ण राज्यामध्ये, जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर धान्य साठवण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून गोडाउनची सोय नाही. आपण धान्याचे उत्पादन वाढलेले आहे असे म्हणतो. परंतु मागील ६० वर्षापासून धान्य साठविण्यासाठी नवीन गोडाउन्स् बांधले जात नाहीत. शिरूर तालुक्यात १९३० साली धान्य साठवणुकीसाठी गोडाउन बांधण्यात आले त्यानंतर एकही गोडाउन बांधण्यात आले नाही. त्या ठिकाणी गोडाउन बांधण्यासंबंधी शासनाने विचार करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, काही वर्षापूर्वी मुंबईमध्ये जवळपास १५ लक्ष रेशनिंगची कार्ड रद्द करण्यात आली होती. त्यामुळे त्या कार्डवर मिळणाऱ्या रॉकेलचा कोटा सुद्धा रद्द होणे गरजेचे आहे. परंतु तसे झाले नाही. मुंबई शहरासाठी रेशनिंगला पूर्वीप्रमाणेच रॉकेलचा कोटा दिला जातो. सदर कोटा कमी केल्यास त्याचा ग्रामीण भागांसाठी नक्कीच उपयोग होऊ शकेल. यासंबधी शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, रॉकेलचे दर प्रति लिटर ९.३१ रुपये व १०.२० रुपये अशा स्वरूपात आहेत. त्या दरांमध्ये सुधारणा करून ते नऊ रुपये, साडेनऊ किंवा दहा रुपये अशा राऊंड फिगरमध्ये निश्चित करणे अत्यावश्यक आहे. अध्यक्ष महोदय, ५ ते १० पैशांचा हिशेब ठेवला जात नसल्यामुळे दुकानदार ती रक्कम परत देत नाही. म्हणून यासंबंधी शासनाने विचार करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, बायोमेट्रीक योजनेसंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा होत असते. माझा मतदार संघ असलेल्या शिरूर तालुक्यात मी बायोमेट्रिकद्वारे धान्य वाटपाचा प्रयोग केला आहे. त्या अनुषंगाने दिनांक १५ एप्रिल, २०११ रोजी बायोमेट्रिकद्वारे धान्य वाटप केले जाणार आहे, सदर योजना मी स्वतःच्या खर्चातून राबवित आहे. त्यासाठी मी आमदार निधीतून निधी मिळण्यासंबंधी मागणी करीत आहे. यासंबंधी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती केली आहे. अशा प्रकारे एखादा आमदार जर आमदार निधीतून बायोमेट्रिकद्वारे धान्य वाटप करणार असल्यास त्याला सूट देण्यासाठी शासनाला काय अडचण आहे ? यासंबंधी कोठेतरी प्रयोग होणे गरजेचे आहे. आपण आधार, आधार असे म्हणतो. परंतु त्यासाठी जवळपास एका वर्षाचा कालावधी लागू शकतो. तो पर्यंत यासंबंधी चांगले वळण लागण्यास मदत होत असेल तर त्याचा फायदाच होईल.

[ ॲड. अशोक पवार ]

अध्यक्ष महोदय, रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, डॉ. नितीन राऊत हे रोजगार हमीचे काम अतिशय चांगल्या प्रकारे करीत आहेत. शेजारच्या राज्याला केंद्र शासनाकडून ४००० कोटी रुपये मिळत आहेत. याउलट आपल्या राज्याला केंद्र शासनाकडून ३००० कोटी रुपये मिळाले आहेत. राज्य शासनाने या गोष्टींचा विचार करून केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी आणण्यासाठी प्रयत्न करावा.

अध्यक्ष महोदय, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे भाषण संपवतो.

**प्रा. राम शिंदे** (कर्जत-जामखेड) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, ग्रामीण भागातील शेतमजूर, गरीब, दारिद्र्य रेषेखालील लोकांना वैद्यकीय सेवा देत असताना तेथे शासकीय सेवेत असलेले डॉक्टर खाजगी प्रॅक्टिस करतात. त्यामुळे त्याचा तेथील वैद्यकीय सेवेवर परिणाम होतो. शासकीय सेवेत असलेल्या डॉक्टरांना खाजगी प्रॅक्टीस करता येऊ नये, यासाठी शासन कायदा करणार आहे का ?

अध्यक्ष महोदय, मी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, आम्ही अनेक वर्षापासून मागणी करीत आहोत की, ग्राहक व नागरी पुरवठ्यासाठी स्वतंत्र विभाग असावेत. त्यामुळे दीन दलित, दारिद्र्यरेषेखाली असलेल्या बीपीएलधारक लाभधारकासांठी असलेली योजना किंवा अन्नपूर्णा सारख्या अनेक योजना कार्यान्वित करीत असताना मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार बोकाळला आहे. ग्राहक व नागरी पुरवठ्यासाठी स्वतंत्र विभाग न झाल्यास भ्रष्टाचाराला आणखी चालना मिळेल. तसेच गेल्या ३० ते ४० वर्षांपासून त्यांना प्रती क्विंटल ५० रुपये दर दिला जातो. या संदर्भात त्यांना मिळणाऱ्या कमिशनमध्ये वाढ होण्याची गरज आहे.

केंद्र शासनाची गॅस वितरण एजन्सी असते. त्यात जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांकडून सांगितले जाते की, आमच्याकडे गॅस शिल्लक नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील गॅस एजन्सीकडून जास्त दराने गॅसची विक्री केली जाते. ज्या भागात गॅस नाहीत, तेथे गॅसचा पुरवठा केला जातो. मात्र तेथे एका गॅस टाकीची किंमत ३५० रुपयांऐवजी ५०० रुपयांपर्यंत आकारली जाते. अध्यक्ष महोदय, तालुक्यांमध्ये गॅस एजन्सी नेमल्या पाहिजेत. ही वितरण व्यवस्था केंद्र शासनाच्या अखत्यारित असली तरी त्यावर महाराष्ट्र शासनाचे काही तरी बंधन असले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, नियोजन विभागाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, शासनाने नियोजन विभागाच्या माध्यमातून अर्थसंकल्प सादर करीत असताना तज्ज्ञांची एक समिती नेमून उर्वरित वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली. परंतु या संदर्भात समतोल विकास न झाल्यामुळे शासनाने जिल्हा नियोजन समितीमध्ये ३८२८ कोटी रुपयांची तरतूद केली. परंतु आमच्या व राज्यातील जनतेच्या मनात असा संशय निर्माण होत आहे की, विभागवार समितीद्वारे समान वाटप होणार नसल्यास पुन्हा एकदा जिल्हावार तज्ज्ञ समितीची नियुक्ती करावी लागेल. माझी नियोजन विभागाकडे मागणी आहे की, या संदर्भात विभागवार समिती नेमली आहे त्याऐवजी जिल्हावार नेमावी.

[ प्रा. राम शिंदे ]

**अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष**

अध्यक्ष महोदय, मी वित्त विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, माझ्या तालुक्यात अमृत लिंक व भूतवडा लिंक असे दोन प्रकल्प आहेत. १९८५ साली त्याचे भूमिपूजन करण्यात आले होते. १६ वर्षे होऊन सुद्धा अजूनपर्यंत त्याला अनुदान मिळालेले नाही. परिणामी त्या ठिकाणच्या लोकांवर शासनाकडून अन्याय केला जात आहे. त्याचप्रमाणे कर्जत तालुक्यात कुकडीसाठी ३१ हजार हेक्टर पाणी देण्याचे शासनाच्या मूळ प्रकल्पात असताना सुद्धा आजपर्यंत तेवढ्या क्षेत्राला पाणी मिळालेले नाही. या कामासाठी १०८ कोटी रुपयांची गरज आहे. त्यासाठी ८० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. दोन वर्षापूर्वी टेंडर सुद्धा काढण्यात आली होती. त्यासाठी जलसंपदा विभागामार्फत तरतूद केली जात नाही. त्यामुळे चाऱ्याची आणि पोटचाऱ्याची कामे होत नाहीत. तरी वित्त व नियोजन विभागाने यासाठी योग्य ती तरतूद करण्याची गरज आहे. एवढीच विनंती करून मी माझे भाषण या ठिकाणी संपवितो.

**श्री. संजय गावंडे** (अकोट) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात धान्य आणि रॉकेल माफियांचे एवढे प्रस्थ माजले आहे की, या योजना गोरगरिबांसाठी आहेत की माफियांसाठी आहेत हेच कळायला मार्ग नाही. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारावर देखील डल्ला मारण्याचे काम केले जाते. दिनांक १५ मार्च रोजी बार्शी टाकळी येथे एमएच-२२-१०७० च्या ट्रकमध्ये धान्याची अदलाबदल करीत असताना संबंधित तहसीलदाराने पकडले होते. संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले. परंतु त्यानंतर कोणती कारवाई केली आणि कोणावर केली हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारवाई फक्त ट्रक चालक आणि क्लिनरवर केलेली आहे. असली गुन्हेगार सापडत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. अकोट तालुका, बाळापूर तालुका, तेल्हार तालुका तसेच बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुके हे एमपीच्या बॉर्डवर असल्यामुळे शालेय पोषण आहाराचे धान्य एमपीमध्ये जात असते. यामध्ये फक्त कारवाई ट्रकचालक आणि क्लिनरवर झाल्याचेच दिसून येत आहे. रेशन धान्याचे दुकान चालविण्यासाठी ज्यांना परवाने देण्यात आलेले आहेत. अशा लोकांनी आपली रेशनची दुकाने इतरांना चालविण्यासाठी दिलेली आहेत. नोकरनामा बंद असल्यामुळे ते दुकानदार कोणत्या नियमाने चालवितात, यासंदर्भातील चौकशी करून कारवाई करण्याची गरज आहे. जी लोक रेशनची दुकाने चालवित आहेत, ते लोक चलान भरणे, शासकीय रेकॉर्डवर स्वाक्षऱ्या करणे, इत्यादी कामे संगनमताने करीत आहेत. अकोट तालुक्यातील आदिवासी सोसायटी वस्तापूर व अकोट तालुका आदिवासी कल्याण मंडळ ही संस्थेची दोन दुकाने आहेत. त्यामधील अनेक पदाधिकारी हे कित्येक वर्षापासून मयत झालेले आहेत. परंतु श्री. अशोक गोठवाल हा धान्याचा व्यापारी सदर दोन्ही दुकाने स्वतःच्या हाताने चलान भरून चालवित आहे. या व्यापाऱ्यावर आतापर्यंत का कारवाई करण्यात आलेली नाही हे मला समजत नाही.

(माननीय तालिका सभाध्यक्ष भाषण संपल्याची बेल वाजवितात)

माननीय अध्यक्षांमुळे मला आज बोलण्यासाठी संधी मिळालेली आहे. मला भाषण करण्यासाठी कमीत कमी ६ मिनिटे मिळाली पाहिजे अशी माझी विनंती आहे. एकाच व्यक्तीला दुकानाचे लायसन्स दिले पाहिजे असा मला कोणीतरी नियम सांगितला होता.

[ **श्री. संजय गावंडे** ]

अध्यक्ष महोदय, टाकळी, नखेगाव, पिलकवाडी, धामनी, करतवाडी रेल्वे, जवळखेड, टाकळी, नखेगांव आणि पिलकवाडी रॉकेल अशा ९ गावातील दुकाने श्री. पी. एम. पाटकर या व्यापाऱ्याच्या नावावर आहेत. तसेच वरील ९ गावात श्री. एम. पी. पाटकर यांच्या नावाने तीन दुकाने आहेत. अशा प्रकारे एकच व्यक्ती कोणत्या नियमाने दुकान चालवितो याचा शासनाने खुलासा केला पाहिजे आणि संबंधितांवर कठोर कारवाई केली पाहिजे. दुकानांवर सरकारी कर्मचारी कारवाई करीत असतात. कारवाई केल्यानंतर स्थगिती देण्याची तत्परता वरिष्ठांची का असते हे आपल्याला वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ही स्थगिती का दिली जाते याची माननीय मंत्री महोदयांना सुद्धा माहिती असते. 'प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे' हा वाक्प्रचार आपण ऐकला होता. सन्माननीय सदस्यांपैकी कोणीही स्वस्त धान्याचे दुकान बघितले नसेल, परंतु माननीय मंत्री महोदयांनी यांची चौकशी केली तर जवळपास ८० टक्के सदस्यांच्या नावाने स्वस्त धान्य दुकानातून धान्य उचलले जात आहे असे आपल्या निदर्शनास येईल.....(अडथळा) ...... अध्यक्ष महोदय, 'स्वर्ग' या संकल्पनेवर आपला विश्वास आहे की नाही, याची मला माहिती नाही, परंतु माझा निश्चितपणे विश्वास आहे. जे लोक मृत्यू पावलेले आहेत, ते दर महिन्याच्या एक तारखेला स्वर्गातून खाली येतात आणि आपल्या हिश्श्याचे धान्य घेऊन पुन्हा वर जातात. त्यामुळे 'स्वर्ग' या संकल्पनेचा स्वीकार करावा. मृत लोकांची बोगस नावे वगळण्यात यावी, अशी माझी मागणी आहे. यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. जे या भ्रष्टाचारास जबाबदार असतील, त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी. माननीय उपमुख्यमंत्री महोदय, श्री. अजित पवार यांच्याकडून आमच्या काही अपेक्षा आहेत म्हणून मी हे वाक्य बोलत आहे. खासदारांसाठी मिळत असलेल्या स्थानिक निधीच्या ५० टक्के स्थानिक निधी आमदारांसाठी दिला जात आहे......(अडथळा) ...... अध्यक्ष महाराज, मला अजून काही मुद्दे मांडावयाचे होते, परंतु वेळेअभावी ते मांडता आले नाही. आपण मला बोलण्याची जी संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. जयकुमार गोरे** (माण) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील वित्त विभाग, नियोजन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभागांच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या चर्चेत सहभागी होत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांसाठी शासनामार्फत रेशनिंगच्या माध्यमातून, स्वस्त अन्नधान्याचा पुरवठा केला जातो. यासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, राज्यात तेलमाफिया, वाळूमाफिया, दूध भेसळमाफिया निर्माण झालेले आहेत. अलीकडे रेशनिंगचे धान्य विकणारे धान्य माफिया निर्माण करतात. मी माननीय मंत्री महोदयांना याबाबतीत काही सूचना करणार आहे. रेशनिंग दुकानदार आणि माफियाचे यांच्या संगनमताने भेसळीचे प्रकार होत असतात. प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेला रेशनिंगचा कोटा उचलला जातो. जर आपण याबाबत स्पेसिफिक माहिती मागितली तर महिन्याच्या २० ते २५ तारखेच्या दरम्यान जास्तीचा कोटा उचलला जातो. महिन्याच्या शेवटच्या तीन-चार दिवसात तो कोटा रेशनिंग दुकानात पोहोचतो. लोकांना तीन चार दिवसात ते धान्य मिळते. जवळपास ५० टक्के कोटा हा शिल्लक राहिलेला असतो. त्यानंतर

**[ श्री. जयकुमार गोरे ]**

सर्व माल हा माफियांकडे जातो. या निमित्ताने माझी शासनास मागणी राहणार आहे की, दर महिन्याच्या १५ तारखेच्या आत रेशनिंगचा कोटा रिलीज होण्याची आवश्यकता आहे, यासाठी शासनाने आदेश देण्याची गरज आहे. अनेक रेशनिंग दुकानदारावर कारवाई होते. पुरवठा अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी हे दुकानांचा परवाना निलंबित करतात. निलंबित झालेला दुकानाचा परवाना मंत्रालयात येतो. खूप मोठ्या चुका रेशनिंग दुकानदाराने केल्यानंतरच त्यांचा परवाना रद्द केला जातो, अन्य छोट्या गोष्टीसाठी सहसा रद्द केला जात नाही. सदरहू रेशनिंगचा परवाना मंत्रालयात आल्यानंतर त्या दुकानाचे निलंबन रद्द होते त्यामुळे रेशनिंग दुकानदारांना असे वाटते की, आम्ही मंत्रालयात जाऊन निलंबित परवान्यासंदर्भात स्थगिती आणू शकतो, त्यामुळे त्यांची मुजोरी वाढत जाते, या बाबींकडेही शासनाने लक्ष घालावे.. मंत्रालयातून स्टे देण्याची पद्धत आता थांबविण्यात आली पाहिजे, अशी माझी विनंती आहे. सोनवणे जळीत हत्याकांड झाल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. रॉकेलच्या दुकानांवर धाडी टाकल्या गेल्या. मात्र या धाडी चिल्लर व किरकोळ लोकांवर टाकण्यात आल्या. त्यांच्यावर कारवाई झाली. या धंद्यातील जे मुख्य व्यावसायिक आहेत, माफिया आहेत त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. या लोकांचे अधिकाऱ्यांशी संगनमत असते. माझी अशी मागणी आहे की, या बड्या लोकांवर शासनाने कारवाई केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी माननीय अर्थ मंत्र्यांना थोडक्यात काही सूचना करणार आहे. राज्याला कराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असते. राज्यात व्यापाऱ्यांकडून जी बिलिंग सिस्टिम वापरली जाते, त्यामध्ये साधारणपणे ६५ टक्के कच्च्या बिलांचा व्यवहार होतो. यामुळे शासनाच्या उत्पन्नावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो. माझा देखील व्यवसाय आहे. त्यामुळे मला या संदर्भात माहिती आहे. आपण सरप्राईज व्हिजिट दिली किंवा अधिकाऱ्यांना त्या संदर्भात सूचना दिल्या तर आपल्याला या गोष्टी निदर्शनास येतील. सेल्स टॅक्स, व्हॅट, एक्साईज ड्युटी अनेक माध्यमातून कर चुकवण्याचा प्रयत्न व्यापाऱ्यांकडून केला जातो. तसेच व्यापाऱ्यांकडून उत्पन्न देखील कमी दाखविले जाते त्यामुळे इन्कम टॅक्स देखील चुकवला जातो. हे गैरप्रकार ताबडतोब थांबविले पाहिजेत. या गैर प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करावी व धोरण निश्चित करावे अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भाग व शहरी भागामधील प्रश्न निराळे आहेत. ग्रामीण भागातील प्रश्नांची माहिती माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना चांगल्या प्रकारे आहे. त्यामुळे त्यांना त्या संदर्भात सांगण्याची काही आवश्यकता नाही. ग्रामीण भागात १०० किमीचा एक मतदारसंघ आहे. आम्हा आमदारांचा २ कोटी रुपयांचा फंड कोठे खर्च होतो, तेच आम्हाला कळत नाही. टॅक्स, रॉयल्टी या सर्व माध्यमातून ही रक्कम खर्च होत असते. त्यामुळे या ठिकाणी सर्वच आमदारांनी हा निधी वाढवून देण्याची मागणी केलेली आहे. तसेच डोंगरी भागामध्ये देखील निधी वाढवून दिला पाहिजे, अशी मी या ठिकाणी मागणी करतो व माझे दोन शब्द संपवतो.

**उपाध्यक्ष :** ७.०० वाजता माननीय मंत्री महोदयांचा रिप्लाय सुरू होणार आहे.

**श्री. हरीश पिंपळे** (मूर्तिजापूर) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

मूर्तिजापूर येथील रहिवासी असलेला श्री. राजेंद्र नंदलाल अग्रवाल याने शासन आदेशाची पायमल्ली करून अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीर केरोसिन परवाना मिळवला आहे. शासनाच्या आदेशाप्रमाणे मूर्तिजापूर शहरातील घाऊक केरोसिन परवाना देण्यासाठी सन १९९० साली अर्ज मागविण्यात आले होते. जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक १७ डिसेंबर १९९० व १ जानेवारी १९९१ च्या आदेशान्वये श्री. राजेंद्र अग्रवाल यास घाऊक केरोसिन विक्रीचा परवाना देण्यास आला. यावर सन १९९१ मध्ये श्री. नंदकिशोर तिवारी, मूर्तिजापूर यांनी अप्पर आयुक्त, अमरावती यांच्याकडे अपील दाखल केले. या आदेशानुसार राजेंद्र अग्रवाल यांनी माननीय मंत्री श्री. हरिभाऊ बागडे यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. परंतु मंत्री महोदयांनी दिनांक ३० डिसेंबर १९९७ रोजी अपर आयुक्त, अमरावती यांचा आदेश कायम ठेवला. तसेच मंत्री महोदयांनी स्पष्ट नमूद केले होते की, राजेंद्र अग्रवाल यांनी बेकायदेशीर परवाना प्राप्त केला असून, १० वर्षापेक्षा जास्त काळापासून तो त्यांचा फायदा घेत आहे. शेवटी श्री. राजेंद्र अग्रवाल याने दिनांक २३ जानेवारी १९९८ मध्ये माननीय मंत्र्यांच्या दिनांक ३० डिसेंबर १९९७ च्या आदेशाविरुद्ध उच्च न्यायालय, नागपूर येथे अपील केले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना माननीय अपर आयुक्त, अमरावती व मंत्री महोदयांच्या आदेशाची अंमलबजावणी न करता संबंधित दोन्ही परवाने अधिकारीवर्गाच्या संगनमताने बेकायदेशीर सुरळीत सुरू आहेत, याची संपूर्ण कागदपत्रे माझ्याकडे आहेत. ती मी आपल्या माहितीसाठी आपल्याकडे पाठवित आहे. हे बेकायदेशीर परवाने रद्द केले जाणार आहेत काय ?

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी २-३ प्रश्न विचारावेत.

**श्री. हरीश पिंपळे :** माझ्या मूर्तिजापूर शहरामध्ये मूर्तिजापूर उपजिल्हा रुग्णालय, लक्ष्मीबाई देशमुख यांची ८-१० वर्षापूर्वी मोठी इमारत बांधण्यात आली. परंतु, ८-१० वर्षापासून तेथील आयसीयू विभाग बंद आहे, तेथे कोणी वैद्यकीय अधिकारी येत नाहीत, कारण तेथे ४८ कोटी रुपयांचा फ्रॉड झाला होता, त्याची चौकशी अद्याप सुरू आहे, म्हणून कोणीही डॉक्टर तेथे येत नाहीत. तेथील आयसीयु विभाग बंद असल्याने तेथे जे रुग्ण आहेत त्यांची सुविधा होत नाही. मूर्तिजापूर शहर हे रेल्वेजंक्शन असून, तेथे नॅशनल हायवे सहावर असल्याने तेथे अपघातांचे प्रमाण मोठे आहे. तसेच, तेथे कुत्रा चावला असता दिली जाणारी रेबिज ही लस उपलब्ध नाही. त्यासाठी पैशांची तरतूद आहे. परंतु, तो प्रस्ताव आरोग्य भवन येथे प्रलंबित आहे, तेथील, ज्या श्रीमती अर्चना पाटील मॅडम आहेत, त्यांना आम्ही याबाबत पत्र दिले, तसेच फोनवरुनही सांगितले तरीही अद्याप ही लस उपलब्ध होत नाही. २-३ दिवसांपूर्वी माझ्या मतदारसंघामध्ये ६ जणांना कुत्र्याने चावले असता, दोन पेशंटना मूर्तिजापूर, दोन पेशंटना अकोला, तर एका पेशंटला नागपूर येथे उपचारासाठी पाठविण्यात आले. ही लस उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने डॉ. अर्चना पाटील मॅडम यांना ताबडतोब निदेश दिले पाहिजे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल धन्यवाद !

**श्री. संजय राठोड** (दिग्रस) : अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील वित्त, नियोजन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, या विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, माननीय अर्थमंत्र्यांनी जेव्हा अर्थसंकल्प मांडला त्यामध्ये अनेक वर्षांपासून भटक्या व विमुक्त जमातींची जी मागणी होती, त्यासाठी थोडीशी का होईना, परंतु २० कोटी रुपयांची तरतूद करून ती मान्य केलेली आहे. त्यामुळे निश्चितच पूर्ण महाराष्ट्रातील भटक्या व विमुक्त जमातींच्या लोकांना समाधान मिळालेले आहे.

मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करू इच्छितो की, विमुक्त जाती, भटक्या जाती समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांचे राहणीमान, जीवनमान उंचावण्यासाठी " यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना " या नावाने शासनाने एक योजना राबविण्याचा मनोदय व्यक्त केलेला आहे. या योजनेबाबत माझी विनंती आहे की, या योजनेला जर " वसंतराव नाईक मुक्त वसाहत योजना " असे नाव दिले असते, तर खरोखर विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या लोकांना चांगले वाटले असते. माझा स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या नावाला विरोध नाही. ते नक्कीच फार महान नेते होते, त्यांनी अनेक वर्षे महाराष्ट्राचे, देशाचे नेतृत्व केलेले आहे. परंतु, वसंतराव नाईकसाहेब यांनी आमच्या विमुक्त जाती, भटक्या जमातींचे प्रतिनिधित्व केलेले आहे. त्यामुळे सातत्याने या जमातींच्या लोकांकडून या योजनेला वसंतराव नाईक यांचे नाव मिळावे, अशी मागणी होत आहे. ही मागणी मी आपल्यामार्फत शासनाकडे करीत आहे.

तांडा सुधार वस्तीच्या माध्यमातून सरकारने ज्या तांडा वस्त्या आहेत, त्यामध्ये विकास करण्याबाबत ठरविले होते. परंतु, आपण पाहतो की, फार अल्प तरतुदीमुळे तांड्यामध्ये अजूनही जाण्यास रस्ते नाहीत, विद्युत व्यवस्था नाही, पिण्याच्या पाण्याची सोय नाही. ही तरतूद कुठे तरी वाढवून महाराष्ट्रातल्या तांडा वस्त्यांचा विकास करणे अतिशय महत्त्वाचे आहे, ही देखील माझी मागणी आहे.

अध्यक्ष महाराज, वसंतराव नाईक महामंडळ आणि विमुक्त जाती, भटक्या जमातींसाठी जी महामंडळे आहेत ती फक्त नावापुरतीच राहिलेली आहेत. कारण मागील तीन-चार वर्षांपासून या महामंडळाकडून कर्जाचे एकही प्रकरण मंजूर झालेले नाही. माझ्या यवतमाळ जिल्ह्याची माहिती घेतली असता त्या ठिकाणी अनेक प्रकरणे आलेली आहेत, परंतु गेल्या तीन वर्षांत एकाही बेरोजगार व्यक्तीला महामंडळाकडून अनुदान मिळालेले नाही किंवा एकही प्रकरण मंजूर केलेले नाही. तेव्हा या महामंडळांसाठी भरीव निधीची तरतूद करावी, अशी मी माननीय वित्तमंत्री महोदयांना विनंती करतो. विमुक्त जाती व भटक्या समाजातील बेरोजगार तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे यादृष्टीने प्रयत्न केला पाहिजे अशी माझी मागणी आहे. तेव्हा माझ्या मागणीचा विचार करावा.

अध्यक्ष महाराज, वैद्यकीय शिक्षणासंबंधी मी एक महत्त्वाचा मुद्दा मांडू इच्छितो. माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी अर्थसंकल्प सादर करताना, त्यांनी अनेक वैद्यकीय महाविद्यालयांना निधी देण्याचे घोषित केलेले आहे. यवतमाळ वैद्यकीय महाविद्यालयासाठी तरतूद करण्यात येईल असा उल्लेख केला. राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी दिनांक ५ रोजी यवतमाळ येथे भेट दिली होती.

**[ श्री. संजय राठोड ]**

त्यावेळी, आम्ही त्यांना यवतमाळचे मेडिकल कॉलेज पाहण्याची त्यांना विनंती केली. होती. या मेडिकल कॉलेजची अवस्था अतिशय वाईट आहे. तेथील सिटी-स्कॅन मशीन बंद पडलेले आहे. तेथे अन्य मशिनरी देखील नाहीत. सिटी-स्कॅन मशीनची किंमत ९ कोटी रुपये आहे. तेव्हा यवतमाळ मेडिकल कॉलेजला सिटी स्कॅन मशीन उपलब्ध करून देण्यासाठी ९ कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी मी माननीय वित्तमंत्री महोदयांना विनंती करतो. यवतमाळ मेडिकल कॉलेजचे अनेक प्रश्न आहेत. त्या ठिकाणी अनेक सोयीसुविधांची कमतरता आहे. त्यासाठी निधीची आवश्यकता आहे. तेव्हा शासनाने यवतमाळ मेडिकल कॉलेजकडे लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वन्य प्राण्यापासून फार उपद्रव होत आहे. मी या संदर्भात सातत्याने मागणी करीत आहे. या वन्य प्राण्यांपासून शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना जी नुकसानभरपाई मिळते ती फार कमी असते. तेव्हा शासनाने शेतकऱ्यांना तारेचे कुंपण बांधण्यासाठी सबसिडी म्हणून अनुदान द्यावे, अशी मी मागणी करतो. तत्कालीन वित्त मंत्री श्री. जयंत पाटील यवतमाळ जिल्ह्यामध्ये आले असताना, त्यांनी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्याची पुढे अंमलबजावणी झाली नाही. माझी माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांना विनंती आहे की, वन्य प्राण्यांपासून होणाऱ्या त्रासापासून शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी तारेचे कुंपण घालण्यासाठी त्यांना सबसिडी म्हणून अनुदान द्यावे.

अध्यक्ष महाराज, माझ्या यवतमाळ जिल्ह्यामध्ये सिंचनाचे प्रकल्प होणे फार गरजेचे आहे. निम्न पैनगंगा प्रकल्प आहे, परंतु तो पूर्ण होण्यास दहा-वीस वर्षे लागणार आहेत. माझा दिग्रस मतदारसंघ हा डोंगराळ आहे. त्या ठिकाणी पाण्याची भीषण टंचाई आहे. तेव्हा या परिसरामध्ये सिंचनाचे प्रकल्प होणे फार गरजेचे आहे, त्यासाठी मी सातत्याने मागणी करीत आहे. मात्र अनुशेष संपला असे कारण सांगून अधिकारी प्रकल्पांना मान्यता देत नाही. तेव्हा माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी माझ्या मागणीचा विचार करावा अशी, त्यांना विनंती करून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**डॉ. खुशाल बोपचे** (तिरोरा) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. आज जवळपास ५ विभागांवर चर्चा आहे. परंतु, वेळ फार कमी आहे. कोणत्याही विषयाला न्याय देता येऊ शकेल, असे मला वाटत नाही. आज गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या ४ जिल्ह्यांतील धान उत्पादक शेतकऱ्यांचा ज्वलंत प्रश्न आहे. मी त्यामुळे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण या विभागांवर मत व्यक्त करणार आहे. तसेच काही मागण्या करणार आहे.

मुळात चारही जिल्ह्यांत प्रमुख पीक हे धानाचे आहे. कै. वसंतराव नाईक हे महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री होते, त्यावेळी शेतकऱ्यांना संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून एकाधिकारी धान खरेदी योजना राबविली होती. सन १९८० ला ही योजना बंद करण्यात आली, त्यानंतर संबंध चारही जिल्ह्यांतील धान उत्पादक शेतकरी व्यापाऱ्यांच्या हवाली झाले, त्यांचे शोषण सुरू झाले. तेव्हा शासनाकडे पुन्हा या संदर्भातील मागणी व्हायला लागली, आधारभूत किंमत ठरविण्यात आली आणि

**[ डॉ. खुशाल बोपचे ]**

त्यावर शासनाने शेतकऱ्यांचे धान्य खरेदी करावे, या योजनेखाली मार्केटिंग फेडरेशनला शासनाने आपली मुख्य अभिकर्ता म्हणजे एजन्सी नेमली. सदर एजन्सीने ते काम आता सुरू केलेले आहे. सन २००९-१० यावर्षीच्या अगोदर मार्केटिंग फेडरेशनने या जिल्ह्यांमध्ये धान्य खरेदी केले, त्या धान्याची भरडाई आजही, जवळजवळ १५ महिन्यानंतर देखील झालेली नाही. गोडाऊन तसेच्या तसे भरलेले आहेत. दुष्काळ असून देखील ४० टक्के आलेल्या धान्याला अगदी मातीमोल भाव देण्यात आला आहे. कारण असे की, मार्केटिंग फेडरेशन सक्षमपणे धान्य खरेदी करू शकलेले नाही. सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात सांगितले आहे की, मार्केटिंग फेडरेशनने गेल्या २-३ महिन्यांपर्यंत धानाची खरेदी केलेली आहे. परंतु, धानाचे पेमेंट, चुकारा करण्यात आलेले नाही.

मी फक्त एकट्या गोंदिया जिल्ह्याचे उदाहरण आपणासमोर देऊ इच्छितो. दिनांक ३१ मार्च २०१० पर्यंत गोंदिया जिल्ह्यातील ७ तालुक्यांतील ४० केंद्रांमधून ३१ कोटी ९८ लाख ३० हजार २५८ रुपये आणि ५० पैसे इतक्या रुपयांची धान्य खरेदी मार्केटिंग फेडरेशनने केली. ३,१३,६८७.४० इतके क्विंटल धान्य खरेदी करण्यात आले. आजही त्यातून उचल झालेली असेल, तर धानाच्या भरडाईसाठी दर ७,२६६ क्विंटल. मार्केटिंग फेडरेशन सगळ्या धानाचा या पद्धतीने बट्ट्याबोळ करीत असेल, तर ते योग्य नाही. मी सभागृहात मागणी करतो की, या शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी पुन्हा एकदा पूर्वीप्रमाणे एकाधिकार पद्धत लागू करावी. आपणाला तसे करायचे नसेल तर आधारभूत किमतीवर तरी धान्य खरेदी झाली पाहिजे. आमच्या सर्व धान उत्पादक जिल्ह्यांमध्ये मार्केटिंग फेडरेशनची तशीच अवस्था आहे. इतर जिल्ह्यांत काही वेगळी अवस्था असेल, असे मला तरी वाटत नाही. मार्केटिंग फेडरेशनची क्षमता नसेल, तर आपण एकाधिकार पद्धत सुरू करावी. आपण आधारभूत किंमत ठरविली. आधारभूत किंमतीपेक्षा कमी भावामध्ये धान खरेदी करणे गुन्हा आहे, हे शासन देखील मान्य करते. असे करणाऱ्या व्यापाऱ्यांवर एफआयआर दाखल झाले पाहिजेत. मागील वर्षी सन २००९-१० मध्ये २,०००, १,७०० रुपये भाव धानाचा होता. शेतकऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीमुळे यावर्षी सातशे रुपयांना धान विकले आहे. आपण तांदळाची किंमत देखील पहा.

अध्यक्ष महोदय, ग्राहक संरक्षण हा महत्त्वाचा विषय असून, त्या संदर्भात मी माझे मत मांडणार आहे. काही लोकांना वाटत असेल की, धानाची किंमत वाढली तर ग्राहकता वाढेल, परंतु तसे होत नाही. सन २००९-१० च्या धानाच्या खरेदीच्या वेळी फाईन तांदळाची किंमत ३०-३५ रुपये होती, त्यापेक्षां कमी नव्हती. शेतकऱ्यांना त्यावेळी फक्त १,७०० रुपये मिळाले. आज शेतकऱ्यांना फक्त सातशे रुपये मिळत आहेत. मी आपणास एक क्विंटल धान्याचे विश्लेषण सांगतो.

आज ५ टक्के तूट सोडली, तरी सुद्धा ६० किलो तांदूळ हा एका क्विंटलमधून तयार होतो आणि १० किलो पॉलिश तांदूळ तयार होतो. कोंड्यापासून सगळ्या गोष्टींचा विचार केला, तर आज जवळजवळ २,७०० रुपये १ क्विंटल फाईन तांदळातून तयार होतात आणि शेतकऱ्याच्या हातामध्ये फक्त ७०० रुपये येतात. अशा प्रकारे एकतर्फी लूट केली जाते. म्हणून मार्केटिंग फेडरेशनच्या संदर्भामध्ये गांभीर्याने विचार करून, त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. अन्यथा, एकूण विदर्भातील धानाचे पीक हे बंद होईल किंवा आज ज्या प्रकारे पश्चिम विदर्भामध्ये आत्महत्या होत आहेत, तशाच प्रकारच्या आत्महत्या पूर्वविदर्भातही होतील.

[ डॉ. खुशाल बोपचे ]

अध्यक्ष महोदय, धान खरेदीच्या संदर्भात आपण स्वतंत्र झालो पाहिजे. अन्यथा एकाधिकार धान खरेदी पद्धत सुरू झाली पाहिजे. त्यामुळे याचा गांभीर्याने शासनाने विचार करावा.

अध्यक्ष महोदय, माननीय उपमुख्यमंत्री, श्री. अजितदादा पवार सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना एवढेच सांगतो की, आमदारफंडातून केल्या जाणाऱ्या कामांवरील राजस्व आणि अंदाजपत्रक व निविदा प्रक्रिया करात शासनाने सवलत दिली पाहिजे. कारण, आमदार निधीमध्ये ५० लाख रुपयांची वाढ केली, तरी त्यातील २५ टक्के पैसे शासनाला परत जातात. त्यामुळे आता आमदार निधीतून फक्त दीड कोटी रुपयांचेच काम होणार आहे. याबाबत त्यांनी विचार करावा, अशी माझी विनंती आहे. अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. अनिल कदम** (निफाड) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आमच्या पक्षाचा १५ मिनिटांचा वेळ शिल्लक असला, तरी मी फक्त अन्न व नागरी पुरवठा विभागावर चर्चा करणार आहे. अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर मी पहिल्यांदाच बोलत आहे. त्यामुळे मला ५-७ मिनिटांचा कालावधी आपण द्यावा.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाबतीत आम्ही अनेक वेळा या सभागृहात प्रश्न उपस्थित केले आहेत. नाशिक जिल्ह्यामध्ये तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी, श्री. यशवंत सोनावणे यांच्या जळीत हत्याकांडानंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये रॉकेल माफियांवर धाडसत्र सुरू झाले. माझ्या निफाड मतदारसंघातील ओझर गावामध्ये एकमेव रॉकेलचा घाऊक विक्रेता आहे. ज्याच्याकडे सन १९९१ पासून १८,५२० लिटर रॉकेल वितरणाची व्यवस्था आहे. या सद्‌गृहस्थाकडे एवढ्या मोठ्या प्रमाणावर गेल्या २० वर्षांपासून १८,५०० लिटर रॉकेलचा कोटा आहे. हा माफिया प्रत्यक्षात सर्वसामान्य ग्राहकांना केवळ १,००० ते १,५०० लिटर रॉकेलचे वितरण करतो. प्रामाणिक ग्राहकांना रॉकेल न देता उर्वरित रॉकेल काळ्याबाजारात विकण्याचा प्रताप त्याने केला आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात ओझर येथे संरक्षण खात्याचे ११-बीआरडी हे दल आहे. सन १९९१ पासून जिल्हा पुरवठा अधिकारी आणि आतापावेतो जेवढे तहसीलदार त्या ठिकाणी कार्यरत होते, त्यांनी जो प्रताप केला आहे, तो आगळावेगळा, निराळा प्रताप आहे, असे आपल्याला दिसून येईल. प्रतीमाह ८५०० लिटरचा कोटा ११-बीआरडीच्या सिव्हिल लोकांसाठी देण्यात येतो. तालुक्यातील रॉकेलच्या नियतनाची माहिती प्रत्येक महिन्याला आमदारांना लेखी देण्यात येते. त्या माहितीवरून ही बाब आमच्या निदर्शनास आली. विजय लढ्ढा नामक या रॉकेलच्या ठेकेदारामार्फत ७५०० लिटर रॉकेल ११-बीआरडी खात्याला वितरित करण्यात येत होते. म्हणजे गेल्या २० वर्षात जवळपास ४ लाख लिटर रॉकेल ११-बीआरडी खात्याला वितरित केल्याचे विवरण आमच्याकडे येत होते. परंतु, आतापर्यंत त्या ठिकाणी प्रत्यक्षात एक थेंब रॉकेलचा पुरवठा झालेला नाही. जेव्हा हे सगळे प्रकरण बाहेर आले

**[ श्री. अनिल कदम ]**

तेव्हा या प्रकरणाची माहिती मी जिल्हा पुरवठा खात्यामार्फत मागविल्यानंतर ११-बीआरडीकडे आम्ही विचारणा केली. तेव्हा ११-बीआरडीकडून मिळालेल्या पत्रात असे नमूद केले आहे की, "It is intimated that Kerosene oil is not being supplied at Air Force Station, Ozar to any personnel including civil employees of this depot." २० वर्षे साडेसात हजार लिटर दरमाह केरोसिनचे वितरण होत होते, ते आतापर्यंत मिळाले नाही. मागच्या आठवड्यात मंत्री महोदयांसमवेत तहसीलदार, जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. दांगडे यांची एक संयुक्त बैठक घेण्यात आली त्या बैठकीत आम्ही असे सांगितले की, याबाबत वारंवार पत्र देऊन त्याची दखल घेण्यात आलेली नाही. गेल्या तीन आठवड्यापासून तेल माफिया सेंट्रल जेलमध्ये आहे, त्याची सर्व लायसेन्स रद्द झाली आहेत, त्याचा सर्व कोटा रद्द झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, या सभागृहातील जास्तीतजास्त सन्माननीय सदस्य अन्न व नागरी पुरवठा विभागावर बोलले आहेत. या प्रकरणात आमचा कोणताही वैयक्तिक इंटरेस्ट नाही. शासनाचे रॉकेल एवढ्या मोठ्या प्रमाणात अशा प्रकारे वितरित होत आहे. या लोकांवर कारवाई होत नसल्यामुळे, ते मुजोर झाले आहेत. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना याचा काहीही फरक पडत नाही. मंत्री महोदयांना मला सुचवावयाचे आहे की, रॉकेलचे नियंत्रण व वाटप याबाबतचे विचार सन्माननीय सदस्यांनी सभागृहात मांडले आहेत. रॉकेलचे नियतन अत्यंत चुकीच्या पद्धतीने होत आहे. ज्या ग्राहकांकडे दोन गॅस सिलेंडर आहेत. त्याच्या रेशन कार्डवर त्याची नोंद हे लोक होऊ देत नाहीत. परिणामी ज्यांच्याकडे दोन सिलेंडर आहेत त्यांना केरोसिन देण्याची वेळ येत नाही. हे केरोसिन त्यांना न देता पेट्रोल पंपवाल्यांना देण्यात येते, ट्रकमध्ये भरण्यात येते. यामध्ये जे लूप होल आहेत ते थांबविण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदयांना मला सूचना करावयाची आहे की, नियतनामध्ये मोठा भ्रष्टाचार आहे. संबंधित आरोपी सेंट्रल जेलमध्ये आहे. महाराष्ट्रात असे जे तेलमाफिया आहेत त्यांच्यावर अत्यंत कडक कारवाई होणे अपेक्षित आहे. तसेच आतापर्यंत जेवढ्या केरोसिनचा अपहार झाला, त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मी मागणी करतो व वेळेअभावी माझे भाषण संपवितो.

**श्री. सतेज** ऊर्फ **बंटी डी. पाटील** (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री) **:** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुभाष देसाई, शिरीष कोतवाल व इतर सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले आहेत, त्यामध्ये दूध भेसळ, मावा भेसळ, अशा या सर्व ठिकाणी सातत्याने छापे व धाडी टाकण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांनी सांगितल्याप्रमाणे जेनेरिक मेडिसिन, या ठिकाणी विकली जात आहेत. त्या औषधांच्या किमतीत फरक आहे. ही बाब केंद्र शासनाशी संबंधित असल्यामुळे, याबाबत केंद्र शासनाकडे विनंती करण्यात आलेली आहे. दुधात होणारी भेसळ रोखण्यासाठी एनजीओच्या बैठका घेऊन, दूध संघांनी टेम्पर प्रूफ पिशव्या वापराव्यात, अशा प्रकारची विनंती करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, रिक्त जागांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. ड्रग इन्स्पेक्टरी ८२ पदे भरण्यात आलेली आहेत. याबाबत मॅटने स्टे दिल्यामुळे, त्यांना नेमणुका देण्यात आलेल्या नाहीत. मॅटच्या केसची अंतिम तारीख २४ आहे. या संदर्भातील निर्णय झाला, तर ८२ ड्रग

[ **श्री. सतेज** ऊर्फ **बंटी डी. पाटील** ]

इन्स्पेक्टर राज्यामध्ये नियुक्त करता येऊ शकतील. सर्व सन्माननीय सदस्यांना मला असे सांगावयाचे आहे की, देशामध्ये १,१०० इन्स्पेक्टर आहेत, परंतु महाराष्ट्रात २२२ फूड इन्स्पेक्टर नियुक्त करण्याचे काम शासनाने केलेले आहे. इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याची प्रगती या विषयात झाल्याचे दिसून येत आहे. देशामध्ये ९ कायदे आहेत. परंतु आता केंद्र शासनाचा देश पातळीवर एकच फूड सेफ्टी ॲक्ट करण्याचा मनोदय आहे आणि त्यादृष्टीने राज्य शासनाने आपला अभिप्राय केंद्र शासनाकडे पाठविलेला आहे. २ लाखांपासून तर ५ लाखांपर्यंत दंड आणि जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद या सर्व कायद्यांमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. म्हणून या सर्व बाबतीत शासनाची सकारात्मक भूमिका आहे. राज्यातील फार्मास्युटिकल इंडस्ट्रीमध्ये वाढ व्हावी, यादृष्टीने भविष्यकाळात फार्मास्युटिकल एसईझेड करण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे. त्याचबरोबर औषध कंपन्यांबरोबर चर्चा करून, बैठका घेऊन, गरीब लोकांना स्वस्त दरात औषधे कशी उपलब्ध होतील, यासाठी देखील शासनाचा प्रयत्न असणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अन्न व औषध प्रशासन विभागाशी संबंधित असलेल्या एकूण ३५० लाख इतक्या खर्चाच्या अथसंकल्पीय मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** अध्यक्ष महोदय, फूड ॲण्ड ड्रग्ज विभागाची प्रयोगशाळा नागपूर येथे सुरू करण्याच्या संदर्भात घोषणा करण्यात आली होती. आज पब्लिक ॲनॅलिसिस्टची पदे सार्वजनिक आरोग्य विभागाकडे आहेत. खरे म्हणजे फूड ॲण्ड ड्रग्ज विभागाकडे सॅम्पल गेले पाहिजेत. परंतु फूड ॲण्ड ड्रग्ज विभागाकडे प्रयोगशाळा नाही आणि पब्लिक ॲनॅलिसिस्ट देखील नाहीत. म्हणून नागपूर येथे प्रयोगशाळा सुरू करण्याच्या बाबतीत मंत्री महोदय पुढाकार घेतील काय ? तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये फूड ॲण्ड ड्रग्ज विभागाची प्रयोगशाळा झाली पाहिजे, यासंदर्भात कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे काय ?

**श्री. सतेज** ऊर्फ **बंटी डी. पाटील :** अध्यक्ष महोदय, नागपूरमध्ये प्रशासनाच्यावतीने जागा शोधण्याचे काम सुरू आहे. जागा भाड्याने घेऊन तेथे प्रयोगशाळा सुरू करावी, असा प्रस्ताव होता. परंतु भाड्याच्या जागेमध्ये प्रयोगशाळा सुरू करावी किंवा नाही, असा विषय होता. जागा उपलब्ध झाली तर आपण निश्चितपणे त्यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत आणि आरोग्य विभागाशी चर्चा करून, आरोग्य विभागाच्या ज्या प्रयोगशाळा आहेत त्या फूड ॲण्ड ड्रग्ज विभागाकडे हस्तांतरित करण्याचा आम्ही प्रयत्न करू.

अध्यक्ष महोदय, सभागृहाने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात, अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**डॉ. नितीन राऊत** (रोजगार हमी योजना मंत्री) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या चर्चेमध्ये आज अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. ग. आ. देशमुख, कृषिभूषण साहेबराव पाटील, सर्वश्री. प्रवीण दरेकर, आर. एम. वाणी, सुरेश धस, ॲड. अशोक पवार यांनी रोजगार हमी योजनेच्या संदर्भात राज्य शासनाला अत्यंत चांगले मार्गदर्शन केलेले आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

[ डॉ. नितीन राऊत ]

अध्यक्ष महोदय, राज्यात सन १९७२ पासून रोजगार हमी योजना सुरू झालेली आहे. (...अडथळा...) नियोजन विभागामध्ये रोजगार हमी योजनेचा विषय आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ अन्वये रोजगार हमी योजनेचे कायद्यात रूपांतर करण्यात आलेले आहे. व्यवसायकर व इतर करांच्या माध्यमातून जमा होणाऱ्या महसुलाच्या रकमेत तेवढीच रक्कम राज्य निधीतून देऊन, त्या एकत्रित रकमेचा रोजगार हमी योजना निधी निर्माण करण्यात आला होता. त्यानंतर केंद्रपुरस्कृत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सन २००६-०७ पासून राज्यातील १२ जिल्ह्यांत आणि सन २००७-०८ पासून ६ जिल्ह्यांत सुरू करण्यात आली होती. उर्वरित १५ जिल्ह्यांमध्ये एप्रिल, २००८ पासून ही योजना सुरू झालेली आहे. सभागृहाने सन २००८ मध्ये विधेयक पारित करून व्यवसायकर व इतर करांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या रोजगार हमी योजनेच्या महसुलाच्या रकमा राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्याचा निर्णय घेतला होता. रोजगार हमी योजनेसाठी दरवर्षी आवश्यकतेनुसार किमान २,००० कोटी रुपयांची तरतूद केली होती.

मला आठवते, त्यावेळी याच सभागृहात ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. ग. आ. देशमुख यांनी अतिशय ज्वलंत भाषण करून २,००० कोटी रुपये या योजनेसाठी राखून ठेवण्यासाठी सुतोवाच केले होते, त्याबद्दल मी त्यांना निश्चितपणे धन्यवाद देतो. मी त्यांना सांगू इच्छितो की, सध्या राज्यात राज्यातील फाउंडेशनची योजना व दुसरी केंद्र शासनाची नरेगा योजना, अशा दोन योजना सुरू आहेत. या दोन्ही योजनांसाठी राज्य निधी तयार करण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला आहे. दिनांक १ एप्रिल २००८ पासून राज्यात सुरू झालेली योजना व जुन्या योजनेअंतर्गत राज्यात जवाहर विहिरी, धडक सिंचन विहिरी, फलोत्पादन, शेततळी किंवा पडिक जमिनीं संबंधीच्या ठिकाणी सामाजिक वनीकरण करणे इत्यादी कामे राज्य शासनाच्या योजनेच्या निधीतून केली जातात. अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम हाती घेत असताना, राज्यात मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सदर योजनेअंतर्गत राजस्थानमध्ये ४,००० कोटी रुपयांची कामे, बिहारमध्ये ३,००० कोटी रुपयांची कामे आणि आंध्र प्रदेशात ५,००० कोटी रुपयांची कामे करण्यात आली. परंतु आपल्या राज्याने ही योजना जन्माला घातली असताना सुद्धा, या कामी आपले राज्य पाठी मागे का राहिले ? मी या संदर्भात सभागृहाला सांगू इच्छितो की, केंद्राची नरेगा योजना सर्व सन्माननीय सदस्यांना समजली आहे किंवा नाही, याबद्दल माझ्या मनात शंका आहे. म्हणून माझ्या विभागाने असा निर्णय घेतला आहे की, एखाद्या माध्यमातून सर्व लोकप्रतिनिधींना ही योजना समजावून सांगू, त्यासंबंधीचे लिटरेचर व कार्यक्रम तयार करून त्या संबंधीची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित केली जाईल.

अध्यक्ष महोदय, एनआरईजीएसमध्ये सन २००८-०९ मध्ये ३६१.६४ कोटी रुपयांची, सन २००९-१० मध्ये ३२१.०९ कोटी रुपयांची, सन २०१०-११ मध्ये ३०० कोटी रुपयांची कामे केली आहेत. त्याच दरम्यान राज्याच्या ईजीएसमध्ये सन २००८-०९ मध्ये ६१३.०७ कोटी रुपयांची, सन २००९-१० मध्ये ७९२.७९ कोटी रुपयांची, सन २०१०-११ मध्ये ५५० कोटी रुपयांची अशी एकूण ८५० कोटी रुपयांची कामे केली आहेत.

अध्यक्ष महोदय, मी या रोजगार विभागाचे मंत्री पद स्वीकारल्यानंतर, माझ्या विभागाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतलेले आहेत...

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर वित्त विभाग, नियोजन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग आणि रोजगार व स्वयंरोजगार विभाग आहेत. परंतु रोजगार हमी योजनेचा विषय नाही.

**श्री. विजयराज शिंदे :** रोजगार या विषयामध्येच रोजगार हमी हा विषय आहे.

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महोदय, याबद्दल माझी काही हरकत नाही. परंतु सभागृहात चुकीची प्रथा पडू नये.

**डॉ. नितीन राऊत :** अध्यक्ष महोदय, दिनांक ३ फेब्रुवारी २०११ रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली या योजनेच्या आढाव्यासंबंधी एक बैठक घेतली होती. त्यावेळी त्यांनी विभागाला स्पष्टपणे निदेश दिले की, फ्लॅगशिपच्या कामांवर कमी खर्च होता कामा नये. या राज्यात रोजगार हमीची कामे करीत असताना, इतर राज्ये पुढे जात असल्यामुळे येणाऱ्या वर्षात आपले राज्याने ४,००० कोटी रुपयांची कामे केली पाहिजेत. ही कामे करीत असताना ८०:२० किंवा तालुका स्तरावरील ६०:४० चा रेशो असो, मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम राबविण्यासाठी ग्रामसभेने स्वतःचा आराखडा तयार करावा व त्यात जी कामे असतील, त्या कामांसाठी ८०:२० चा रेशो न लावता, स्वतः रेशो ठरवावा. ६०:४० चा रेशो गावांना लागू नाही. तालुका किंवा जिल्हास्तरावर कसा मेंटेन होऊ शकेल ते पाहण्यासाठी काही सूचना केलेल्या आहेत. याचे इम्प्लीमेंटेशन योग्य पद्धतीने व्हायला पाहिजे, परंतु ते व्यवस्थित होत नाही. त्यामुळे राज्य शासनाने रोजगार हमीसाठी स्वतंत्र आयुक्तालय निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा प्रकारचा निर्णय घेतल्यानंतर राज्याचे, विभागाचे, तालुक्याचे आणि जिल्ह्याचे प्रशासन करून तळागाळात सदर योजना राबविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, नरेगामध्ये विहिरींची किंमत १ लक्ष २५ हजार होती. आता शासनाने जवाहर विहिरींसाठी २ लाख रुपयांची मर्यादा निश्चित केलेली आहे. येणाऱ्या ११ जुलै २०११ रोजी क्रांती ज्योतिबा फुले यांची जयंती आहे. जयंतीच्या निमित्ताने महात्मा फुले जलअभियानाचा कार्यक्रम शासनातर्फे हाती घेतला जाणार आहे. हे अभियान कै. यशवंतराव नाईक यांच्या १ जुलै, २०११ रोजी जन्मदिवसापर्यंत चालविणार आहोत. महात्मा फुलेंनी आपल्या अनेक कवितामधून सॉईल कन्झरव्हेशन आणि वॉटर कन्झरव्हेशनची माहिती दिलेली आहे. त्या अनुषंगाने जवाहर विहिरीतील, सिंचन विहिरीतील, बंधाऱ्यातील गाळ उपासण्याची कामे या योजनेंतर्गत घेतली जाणार आहेत. शेत रस्ता आणि पांदण रस्त्यांचा समावेश देखील सदर योजनेअंतर्गत करण्यात आलेला आहे. ग्रामपंचायतींना रोपवाटिका देऊन गाव सुंदर बनविण्याचा उपक्रम शासनाने हाती घेतलेला आहे. सदर रोपवाटिका स्थानिक महिला बचत गटांनी चालवावे अशा प्रकारचे शासनाचे नियोजन असणार आहे. रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष रोपवनाचे कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. शाळांना पारितोषिक देण्याची योजना घेतली आहे. ज्या ग्रामपंचायती जास्त प्रमाणात वृक्ष योजनेच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करतील, अशा ग्रामपंचायतीना बक्षीस देण्याची योजना शासनाने सुरू केलली आहे. रोजगार हमीवर काम करणाऱ्या मजुरांना पूर्वी १०० रुपये मजुरी मिळत होती. आता १४ फेब्रुवारी २०११ पासून १२७ रुपये मजुरीचा दर केलेला आहे. सायबरच्या किंवा मोबाईलच्या माध्यमातून त्याचे फीडबॅक कशा प्रकारे राज्य शासनाला मिळू शकेल याचा देखील विचार केला जात आहे.

[ डॉ. नितीन राऊत ]

अध्यक्ष महोदय, तसेच राज्य शासनाकडून संबंधित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मंत्रालयात एक फीडबॅक योजना सुरू केलेली आहे. याचे उद्‌घाटन १ मे २०११ रोजी होणार आहे. राजस्थान आणि बिहामध्ये गेलो असता, आयसीटीच्या माध्यमातून मजुरांना किती काम मिळते, त्याला किती रुपये मिळणार आहेत याचा संपूर्ण आलेख येत असतो. एखाद्या मजुराने त्यादिवशी काम केलेले असेल, तर लगेच त्याला मोबदला दिला जातो. बिझनेस करस्पॉडन्स एजन्सीच्या माध्यमातून अशा प्रकारची कार्यवाही केली जाणार आहे. याचा पहिला प्रयोग नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यामध्ये करणार आहोत. त्या ठिकाणी आम्ही ती योजना लागू केलेली आहे आणि थोड्या वेळानंतर ती योजना संपूर्ण राज्यात सुद्धा लागू केली जाणार आहे. रोजगार हमीच्या संदर्भात दररोज अनेक तक्रारी येत असतात. तक्रारींचे निवारण करण्यासाठी १७ जिल्ह्यांमध्ये तक्रार निवारण केंद्रे उभी करण्यात आलेली आहेत. इतर जिल्ह्यांत देखील तक्रार निवारण अधिकाऱ्याची नेमणूक करून, तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. केंद्र सरकारला मी धन्यवाद देऊ इच्छितो. नांदेड जिल्ह्याने आपल्या राज्यात सर्वात मोठे काम केलेले आहे. ईजीएस योजनेतून जवळपास ६० कामे नांदेड जिल्ह्यात झाली असून, नांदेडच्या सरपंचाला केंद्राने पुरस्कार दिलेला आहे, त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, मजूर जेव्हा कामावर जातात तेव्हा त्यांना आरोग्याच्या सोयी बरोबर मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने हेल्थ कार्ड देण्यासंबंधीचा निर्णय माझ्या सरकारने घेतलेला आहे. शहरी भागातील सुशिक्षित बेरोजगार आहेत, ठेलेवाले आहेत, जे हातगाडीवाले आहेत, जे रिक्षा चालक आहेत, त्यांना सुद्धा कशा पद्धतीने काम मिळू शकेल याबाबत शासन विचार करीत आहे. या निमित्ताने शासनाचा उद्देश हाच आहे की, ज्यांच्या घरात एकवेळची चूल पेटत नसेल, अशांसाठी एक वेगळा कार्यक्रम हाती घेण्याचा मानस आमच्या सरकारचा आहे.

अध्यक्ष महोदय, शहरी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे लोंढेच्या लोंढे येत असतात. लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत रोजगाराचे काम करीत असतात. जर शासनाने त्यांना भत्ता देण्याबाबतचे काम हाती घेतले तर बालकामगारांचे प्रमाणही कमी होईल. शहरातील बालगुन्हेगारांचे प्रमाणही कमी होऊ शकेल, अशा प्रकारचे नियोजन करण्यात येत आहे. कृषी पदवीधारक आहेत, इंजिनिअरिंगचे पदवीधारक आहेत, मेडिकलची पदवी घेतलेले आहेत, परंतु त्यांच्या हाताला काम नाही, त्यांनी पदवी घेतली आहे, त्यांना रोजगार मिळेपर्यंत, त्यांना रोजगार हमी योजनेच्या कक्षेत कशा पद्धतीने आणता येईल, त्यांना कशा पद्धतीने रोजगार उपलब्ध करून देता येईल, यासाठी शासनाने एक स्टडी ग्रुप तयार केला आहे. माझे शासन या ठिकाणी सुशिक्षित बेकारांसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे. या वर्षात ४,००० कोटी रुपयांपर्यंत हे काम घेऊन जाण्याचा शासनाचा मानस आहे. प्रत्येक गावागावात एकेका ग्रामपंचायतीला २० लाख रुपये ईजीएसच्या कामासाठी देऊ केलेले आहेत. याचा अर्थ असा नव्हे की, २० लाख रुपयांपेक्षा जास्त काम केले, तर पैसे मिळणार नाहीत. ज्या गावाने जेवढा मोठा आराखडा तयार केला आहे त्यांना तेवढा निधी देण्याचा आमचा कार्यक्रम आहे. नियोजन विभागाअंतर्गत रोजगार हमी या उपविभागास रोजगार हमी योजनेअंतर्गत रुपये ५९५.७६ कोटी, तसेच विशेष घटक योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या योजनेस ४८.३२ कोटी रुपयेप्रमाणे ६४४.०८ इतका नियतव्यय उपलब्ध करून दिलेला आहे. सदरचा नियतव्यय, तसेच योजनेतर बाबींसाठी ००.०५ कोटी अशा एकूण ६४४.१३ कोटी रुपयांच्या मागण्यांस सभागृहाने मान्यता द्यावी, ही विनंती.

**श्री. अनिल देशमुख** (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा खात्याच्या सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी अन्न व नागरी पुरवठा खात्यासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यामध्ये कशा प्रकारच्या सुधारणा करता येतील, या बाबींचा उहापोह केलेला आहे, त्या सर्वांचे मी आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक वितरणव्यवस्था अतिशय मोठी आहे. जवळपास १ लाख १० हजार दुकाने या सार्वजनिक वितरणव्यवस्थेत आहेत. या वितरणव्यवस्थेच्या माध्यमातून धान्य, रॉकेलचा पुरवठा लाभार्थ्यांना केला जातो. लाभार्थ्यांपर्यंत धान्य पोहचविण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात सार्वजनिक वितरणव्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. राज्यस्तरावरुन धान्य व केरोसिन जिल्हास्तरावर पोहचविले जाते. जिल्हास्तरावरून धान्य व केरोसिन तालुकापातळीपर्यंत पोहचविले जाते. तेथून ते गावपातळीवर पोहचविले जाते. धान्य व केरोसिन तालुका पातळीपर्यंत चांगल्याप्रकारे पोहचते, मात्र गावांमध्ये वितरण करताना अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. किती गावांमध्ये धान्य व केरोसिन पोहचते, हा खरे तर अभ्यासाचा विषय आहे. ही परिस्थिती गेल्या अनेक वर्षांपासूनची आहे. मी या खात्याचा मंत्री झाल्यापासून सांगत आहे की, केरोसिन वाटपामध्ये किती भ्रष्टाचार होतो व धान्य वाटपामध्ये किती भ्रष्टाचार होतो. अध्यक्ष महोदय, या पूर्वी अन्न व नागरी पुरवठा विभागाचे जे मंत्री होऊन गेले आहेत, त्यांनी देखील तीच उत्तरे दिली आहेत. तत्कालीन माननीय मंत्री श्रीमती शोभा फडणवीस, तत्कालीन माननीय मंत्री सर्वश्री. दत्ता मेघे, सुरेश जैन रामदास कदम, रमेश बंग, बाबा सिद्दीकी यांच्यापासून माननीय प्रा. लक्ष्मण ढोबळे या सर्वांनी एकाच प्रकारची उत्तरे दिली आहेत. मी जी उत्तरे देतो, तशीच उत्तरे गेल्या ४० वर्षांपासून अनेक मंत्री महोदयांनी दिलेली आहेत. राज्यात धान्याचा भ्रष्टाचार होतो, केरोसिनचा भ्रष्टाचार होतो, धान्य किती लाभार्थ्यांपर्यंत पोहचते, हे लोकप्रतिनिधींना चांगल्या प्रकारे माहीत आहे. मात्र आपण आणखी किती दिवस याच गोष्टी ऐकणार ? नवीन तंत्रज्ञान वापरून नियंत्रण केले, तरच या सर्व गोष्टी बंद होऊ शकतील. हे नवीन तंत्रज्ञान कशा प्रकारे आणता येईल, याचा विचार केला पाहिजे. मागील काळामध्ये ज्या प्रकारचे उत्तर दिले, तसेच उत्तर यापुढे न देता भविष्यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून, धान्याचा काळाबाजार थांबविण्याच्या संदर्भात सुधारणा केली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, जोपर्यंत सार्वजनिक वितरणव्यवस्थेचे पूर्णपणे संगणकीकरण होत नाही, बायोमेट्रिक पद्धतीने कार्डचे वाटप केले जात नाही, तोपर्यंत या गैरप्रकारांना आळा घालता येणार नाही. या यंत्रणेमध्ये पारदर्शकता आणता येणार नाही. आता बायोमेट्रिक पद्धतीने कार्ड देण्याचे काम सुरू झालेले आहे. राज्यातील ८.५ कोटी लोकांच्या दोन्ही हाताचे ठसे, आईचे नाव, वडिलांचे नाव, पतीचे नाव, मुलाचे नाव फोटो इ. सर्व माहिती गोळा केली जाणार आहे. ही माहिती युआयडीच्या माध्यमातून गोळा केली जात आहे. अनेक सन्माननीय सदस्य विचारत असतात की, हे काम कधी केले जाणार आहे ? ८.५ कोटी लोकांची ही सर्व माहिती गोळा करण्यासाठी वेळ लागणार आहे. हे फार मोठे काम आहे. भारतात सध्या ७७ आयटी कंपन्या आहेत. त्या कंपन्यांना हे काम दिलेले आहे. प्रत्येक जिल्ह्यात ४ ते ५ कंपन्यांकडून माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. ८.५ कोटी लोकांच्या बोटाचे ठसे, फोटो काढण्याचे काम व इतर माहिती गोळा करण्याचे काम जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुरू आहे. ही सर्व माहिती गोळा केल्यानंतर संगणकीकरणाचे काम केले जाईल. त्यानंतर लाभार्थ्यांना

**[ श्री. अनिल देशमुख ]**

स्मार्ट कार्डचे वाटप केले जाणार आहे. ही अतिशय मोठी प्रक्रिया आहे. हे सर्व काम महिन्याभराच्या कालावधीमध्ये पूर्ण होणार नाही. त्यामुळे एक वर्षाच्या कालावधीमध्ये स्मार्ट कार्डचे वाटप केले जाईल, असे मी आपल्याला सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, शासनाने ३ महिन्यांचे धान्य एकत्रितपणे वाटप करण्याची योजना सुरू केली आहे. धान्य हमीयोजना शासनाने सुरू केलेली आहे. आपल्या जिल्ह्यामध्ये, मतदारसंघामध्ये ही योजना सुरू करावी. प्रत्येक गावामध्ये ३ महिन्यांचे धान्य आणून, त्याचे चावडीवर वाटप केले जाईल. यामुळे लाभार्थ्यांना आपल्या हक्काचे धान्य मिळण्यास मदत होईल व त्यांच्यापर्यंत १०० टक्के धान्य पोहचू शकेल. सध्या ही योजना काही जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आलेली आहे. ही योजना संपूर्ण राज्यात राबवली जाणार आहे. या योजनेला अतिशय चांगल्या प्रकारचा प्रतिसाद मिळत आहे. या विभागाचा मंत्री म्हणून मला खात्री आहे की, पुढील ५ ते ७ महिन्यांत संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणात चांगल्या प्रकारे ही योजना राबवली जाईल.

अध्यक्ष महोदय, धान्य वाहून नेणाऱ्या ट्रककरिता जीपीएस प्रणाली राबविण्याचा विचार केला जात आहे. धान्य वाहून नेणाऱ्या ट्रकला विशिष्ट रंग देता येईल काय, याबाबत विचार सुरू आहे. सरकारी धान्य वाहून नेणाऱ्या ट्रकला हिरवा रंग द्यावयाचा, तसेच केवळ हिरव्या रंगाच्या ट्रकमध्येच सरकारी धान्य वाहून नेता येईल, असा देखील एक विचार केला जात आहे आणि धान्याचे वाटप गोडाउनपासून थेट गावापर्यंत करता येईल का, ज्यामुळे यामध्ये जो भ्रष्टाचार होतो, तो थांबवता येईल. याबाबतही विचार केला जात आहे. तसेच, एसएमएस पाठविण्याबाबतही विचार केला जात आहे. समजा एखाद्या तालुक्याच्या ठिकाणाहून धान्य निघाले की, ते गावात पोहोचण्याअगोदर तेथील लोकांना एसएमएस करावयाचा की, तुमच्या गावामध्ये १०० क्विंटल गहू येतो आहे, ५० क्विंटल तांदूळ येतो आहे, १० क्विंटल साखर येते आहे, जेणेकरून त्या गावात एसएमएस केल्यानंतर तेथे चर्चा होते की, इतकेइतके धान्य आपल्या गावात वाटपासाठी येते आहे. गावातील लोक ते लक्षात ठेवतात व त्यांचे सहकार्यही मिळते. अशा पद्धतीने नवीन तंत्रज्ञान वापरून या सर्व गोष्टी करण्याचे ठरविले आहे. काही योजनांची अंमलबजावणीही सुरू झालेली आहे.

काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, धान्य शेवटच्या तारखेला उपलब्ध होते, ही खरी गोष्ट आहे. आजची जी पद्धत आहे, त्याप्रमाणे एप्रिल महिन्याचे धान्य २५ तारखेला उचलले जाते. आम्ही त्यातही सुधारणा करीत आहोत की, एप्रिल महिन्यातील धान्याचे १ तारखेपासून ७ तारखेपर्यंत वाटप झाले पाहिजे. गावामध्ये ते धान्य मार्च महिन्यामध्ये पोहोचेल आणि १ एप्रिल ते ७ तारखेपर्यंत महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत वाटप झाले पाहिजे. याबाबतीतही नियोजन केले जात आहे.

बीपीएलबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आणि अनेक सन्माननीय सदस्यांचा आग्रह आहे की, बीपीएलचा सर्व्हे झाला पाहिजे. त्याबाबतीत शेवटी केंद्र शासनाने आदेश दिल्यानंतर, हा सर्व्हे केला जातो. केंद्र सरकारने या बीपीएलच्या सर्व्हेबाबत काही निकष ठरविले आहेत. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, जो सरकारी नोकरीत आहे, ज्याचे दरमहा १० हजार रुपये वेतन आहे,

[ श्री. अनिल देशमुख ]

जो इन्कमटॅक्सचा रिर्टन भरतो, ज्याच्याकडे चार चाकी वाहन आहे, त्याचे नाव बीपीएलच्या यादीमध्ये येणार नाही, असे काही निकष केंद्र शासनाने ठरविलेले आहेत. याबाबत अजून त्यांचे डिटेलिंग व्हायचे आहे. एकदा याबाबत केंद्र शासनाकडून फायनल निकष आले की, बीपीएलचा सर्व्हे करण्याचे काम लवकरात लवकर सुरू केले जाईल.

बीपीएल सर्व्हेबाबत ग्रामीण भागामध्ये फार मोठ्या प्रमाणावर मागणी आहे की, बीपीएल यादीमध्ये आमचे नाव आले पाहिजे. आम्हाला पिवळे कार्ड मिळाले पाहिजे. त्यामुळे हा सर्व्हे लवकरात लवकर सुरू करण्याचा आमचा प्रयास आहे. एकदा केंद्र शासनाकडून याबाबत निकष नक्की करून आल्यानंतर हा सर्व्हे लवकरात लवकर करण्यात येईल.

केंद्र शासनाचा फूड सिक्युरिटी ॲक्ट, अन्न सुरक्षा कायदा आणण्याबाबत विचार चालू आहे. या कायद्याच्या माध्यमातून ज्या कारणांसाठी बीपीएलची कार्डे ग्रामीण भागामध्ये मागितली जातात की, त्यांना धान्य मिळाले पाहिजे, त्याची पूर्तता होऊ शकेल. या कायद्याअंतर्गत दोन रुपये किलो गहू आणि तीन रुपये किलो तांदूळ देण्याचाही केंद्र शासनाचा विचार आहे. याबाबत त्यांचा अंतिम निर्णय झाल्यानंतर, त्याचा ग्रामीण भागातील जवळजवळ ८०-८५ टक्के लोकांना, तर शहरी भागातील ६० टक्के लोकांना फायदा होणार आहे. जर याबाबत लवकरात लवकर निर्णय झाला तर इतर राज्यांबरोबर महाराष्ट्र राज्यातही त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, बीपीएलचा जो मधल्या काळामध्ये सर्व्हे झाला होता, त्यावेळेस ज्या लोकांची नावे नियमाला धरून त्या बीपीएलच्या यादीमध्ये असायला हवी होती, त्यांची नावे त्या यादीमध्ये नव्हती. तर ज्यांची नावे त्या यादीमध्ये नसायला पाहिजे, त्यांची नावे होती. आपल्यालाही याची कल्पना असेल की, गावामध्ये याबाबत मोठा संघर्ष असतो की, या यादीमध्ये भीमरावजींचे नाव आहे, तर मारुतरावजींचे नाव नाही, भीमरावजींकडे ८ एकर जमीन आहे, तर माझ्याकडे ५ एकर जमीन आहे, तरीही माझे नाव बीपीएलच्या यादीत नाही. या बाबतीतही मधल्या काळात एक शासन निर्णय काढला गेला, की जे सधन, सुखी, धनिक आहेत, त्यांची नावे जर बीपीएलच्या यादीत असतील आणि त्यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन जर बीपीएलच्या यादीतील त्यांचे नाव मागे घेतले नाही, तर त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल करण्यात येईल. त्याची अंमलबजावणी जिल्ह्यामध्ये केली जात आहे.

सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांचे पगार वाढले. पूर्वी ग्रामसेवक, पटवारी एपीएलच्या यादीमध्ये होते. आता सहाव्या वेतन आयोगामुळे सर्वांचे पगार एक लाख रुपयांच्यावर गेले आहेत. आता कोणी शासकीय कमर्चारी एपीएलच्या अटीत बसत नाही. त्यामुळे असा एक आदेश काढला गेला की, ज्यांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांचे बीपीएल कार्ड रद्द करण्यात यावे. त्याप्रमाणे त्यांचे कार्ड रद्द करण्याची कार्यवाही सुरू आहे.

अध्यक्ष महाराज, बोगस रेशनकार्डसंबंधीचा एक प्रश्न आहे. राज्यात अनेक बोगस रेशनकार्ड्स छापली जातात. त्यामध्ये काही बाहरेच्या एजन्सीमार्फत किंवा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने छापली जातात. गेल्या वर्षी बोगस रेशनकार्ड्ससंबंधी एक शोधमोहीम हाती घेतली होती. या शोध

[ श्री. अनिल देशमुख ]

मोहिमेमध्ये जवळपास १२ लाख बोगस रेशनकार्ड्स रद्द केलेली आहेत. यावर्षी सुद्धा १ मार्चपासून शोधमोहीम सुरू झालेली असून ती जून अखेरपर्यंत चालेल. या चार महिन्यांमध्ये राज्यातील जिल्ह्यांमध्ये, तालुक्यांमध्ये, गावांमध्ये जी बोगस रेशनकार्ड्स असतील, त्यांचा शोध घेऊन ती रद्द करण्यात येतील.

अध्यक्ष महाराज, राज्यातील निराधार आणि परित्यक्त्या महिलांना बीपीएल कार्ड देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. निराधार आणि परित्यक्त्या महिलांना बीपीएल कार्ड्स मिळावी, अशी त्यांची अनेक महिन्यांपासूनची मागणी होती. गावातील सरपंच किंवा ग्रामसेवकांचे त्यांनी निराधार किंवा परित्यक्त्या असल्याचे प्रमाणपत्र आणल्यास, त्यांना बीपीएल कार्ड देण्यात येईल.

अध्यक्ष महाराज, आपण चावडी वाचनाची चांगली योजना हाती घेतलेली आहे. या चावडी वाचनाचा एक चांगला फायदा असा की, फेब्रुवारी महिन्यात धान्याचे वाटप झाले तर चावडीचे वाचन मार्च महिन्याच्या १० तारखेला करण्यात येईल. धान्याचे कशा प्रकारे वाटप झाले, याचे अधिकारी चावडीवर वाचन करतील. या चावडी वाचनाचा निश्चितपणे फायदा होणार आहे.

अध्यक्ष महाराज, शासनाने नवीन रेशनकार्ड देण्याचे काम सुरू केलेले आहे. कोणाचे कार्ड फाटले असेल, कोणाला नाव ॲड करायचे असेल, परिवार विभक्त झाला म्हणून रेशनकार्ड घ्यावयाचे असेल, त्यासाठी नवीन रेशनकार्ड घेता येईल. एखाद्याने रेशनकार्डसाठी अर्ज केल्यानंतर त्याला नियमानुसार रेशनकार्ड मिळावयास पाहिजे असेल, तर त्याला ते एक महिन्याच्या आत मिळाले नाही तर तेथील अधिकाऱ्याला एक हजार रुपये दंड करून प्रतिदिवशी शिक्षेची सुद्धा तरतूद विचाराधीन आहे. हा नियम आम्ही लवकर आणत असून त्याची महाराष्ट्रभर अंमलबजावणी केली जाईल.

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अन्न व नागरी पुरवठा विभागात अधिकारी व कर्मचारी नाहीत. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर त्यांना अवलंबून रहावे लागते, ही बाब सत्य आहे. मी ही बाब माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांना देखील सांगितलेली असून, त्या संदर्भात आमची चर्चा देखील झालेली आहे. आमच्या विभागात एकूण ८ हजार कर्मचारी आहेत, त्यापैकी फक्त २३५ कर्मचारी आमच्या विभागाचे आहेत. अन्य कर्मचारी महसूल विभागाचे आहेत. एखाद्या जिल्ह्यामध्ये डीएसओने काही घोटाळा केल्यास, त्याची बदली करण्याचा अधिकार मी त्या खात्याचा मंत्री असताना देखील मला नाही. आम्हाला महसूल विभागाला विनंती करावी लागते. तेव्हा आमच्या विभागात पदे भरण्याबाबत प्रयत्न सुरू आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांनी यामध्ये कशा प्रकारे मार्ग काढता येईल, यासाठी पुढाकार घेतलेला आहे. यामध्ये लवकरात लवकर मार्ग काढण्यात येईल.

अध्यक्ष महाराज, माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी पहिल्यांदाच गोडाउन बांधण्यासाठी ४० कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. त्याप्रमाणे आम्ही काही जिल्ह्यांमध्ये गोडावून बांधणार आहोत. तसेच एफसीआयच्या माध्यमातून पीपीपी मॉडेलच्याबाबतीत ४० कोटी रुपये गोडावून बांधण्यासाठी दिलेले आहेत. जवळपास ७ लाख मेट्रिक टन गोडाउन बांधण्याच्या योजनेस सुरुवात केलेली आहे.

[ श्री. अनिल देशमुख ]

मधल्या काळात त्यांची जाहिरात झाली होती, अर्ज सुद्धा आले होते. मोठ्या प्रमाणात रेट आल्यामुळे, फेरटेंडर काढले आहेत. केंद्र शासनाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात गोडाउन बांधण्याची योजना मोठ्या प्रमाणात सुरू आहे. कुठे मोठ्या प्रमाणात तक्रारी झाल्या आहे, असे सन्माननीय विरोधी पक्षनेते बोलले. ते असेही बोलले की, धाड टाकायची असेल तर मंत्र्यांची परवानगी घ्यावी लागते. परंतु, तसे काही नाही. धाड टाकण्यासाठी आम्ही फ्लाईंग स्क्वॉड तयार केलेले आहेत. त्याचे प्रमुख कंट्रोलर ऑफ रेशनिंग आहेत. माझ्याकडे किंवा माननीय राज्यमंत्र्यांकडे या संदर्भात जाण्याची गरज नाही. फ्लाईंग स्क्वॉडच्या माध्यमातून धाडी टाकण्याचे काम जिल्ह्यात होत राहते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी, धुळे जिल्ह्यात केरोसिनची आवश्यकता नसताना पुरवठा जास्त केला जातो, असे सांगितले. मी सांगू इच्छितो की, ते सांगत आहेत त्याप्रमाणे वस्तुस्थिती नाही. धुळे येथील केरोसिनची गरज ४,०८१ कि.ली. आहे, पुरवठा २,९८८ कि.लि. आहे, म्हणजे तेथे ७३ टक्के पुरवठा होतो. नंदुरबार येथील केरोसिनची गरज २,४१७ कि.ली. आहे, पुरवठा १४५२ कि.ली. आहे, म्हणजे तेथे ६५ टक्के पुरवठा होतो. केरोसिनचा पुरवठा माणसी करण्यात येतो. मी केरोसिनच्याबाबतीत एक बाब सांगायची विसरलो की, केंद्र शासन केरोसिनची सबसिडी डायरेक्ट लाभार्थ्याच्या खात्यात जमा करण्याचा विचार करीत आहे. राज्य शासनाने प्रस्ताव पाठविला आहे, त्यावर विचार सुरू आहे. श्री. नंदन निल्किनी यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी केली असून, २ महिन्यांत सदर कमिटीचा रिपोर्ट येणार आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण भारतामध्ये केरोसिनच्या काळाबाजारावर नियंत्रण आणण्या संदर्भात ही कमिटी आहे. श्री. नंदन निल्किनी समितीचा रिपोर्ट २ महिन्यांमध्ये येईल. केंद्र शासनाने आम्हाला विचारणा केली आहे की, महाराष्ट्राने पुढाकार घेऊन या संदर्भात एखादा पायलट प्रोजेक्ट आपल्या राज्यात राबवावा. केंद्र शासनाची अंतिम परवानगी आल्यानंतर भारतातील पहिला पायलट प्रोजेक्ट एखाद्या जिल्ह्यात राबविण्यास सुरुवात करू. धुळे किंवा नाशिकपासून त्याची सुरुवात करू.

अध्यक्ष महोदय, धान खरेदीच्याबाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. धानाच्या खरेदीसंदर्भात ६ कोटी रुपये देणे बाकी आहे. एकूण २१-२२ कोटी रुपये होते. मधील काळात १५ कोटी रुपये दिलेले आहेत, ६ कोटी रुपये देणे बाकी आहे. शेतकऱ्यांच्या धानाचे लवकरात लवकर पेमेंट केले जाईल. नाशिक विभागाच्या आयुक्त श्रीमती लिना मेहंदळे यांच्याबाबतीत देखील काही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. श्रीमती लिना मेहंदळे यांनी दिलेल्या अहवालाचे काय झाले, असे विचारण्यात आले. मी सांगू इच्छितो की, श्रीमती लिना मेहंदळे यांनी सन १९९५ ला रिपोर्ट दिला होता. सन १९९७ ला तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्या रिपोर्टला स्टे दिला होता, त्याविरुद्ध सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटे हायकोर्टात गेले आणि तो स्टे उठविला. श्रीमती लिना मेहंदळे यांनी ज्या सूचना केल्या होत्या, त्या पद्धतीने राज्य शासनाने कार्यवाही केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मच्छीमारांना केरोसीन द्यावे यासाठीचा स्वतंत्र प्रस्ताव आम्ही मत्स्य विभागाच्या माध्यमातून तयार केला आहे. माननीय मंत्री श्री. अजितदादा पवार यांनी पुढाकार घेऊन या संदर्भात बैठक घेतली होती. केंद्र शासनाला देखील तशापद्धतीने शिफारस केली आहे. मच्छीमार बांधवांच्या बोटीला स्वतंत्र केरोसिनचा कोटा मंजूर करावा, या संदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे.

**[ श्री. अनिल देशमुख ]**

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी हिअरिंगच्या बाबतीत सांगण्यात आले. सनमाननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, ४० हिअरिंग आहेत, ३९ हिअरिंगच्या बाबतीत निर्णय घेतला, १ हिअरिंगच्या बाबतीत निर्णय घेतला नाही. परंतु, अशी वस्तुस्थिती नाही. अर्धघाऊक केरोसिनचे हिअरिंग घेऊन, ३५ अर्ज मंजूर करण्यात आले, १४ अर्ज नामंजूर करण्यात आले. किरकोळ केरोसीनचे १५१ अर्ज मंजूर करण्यात आले, ५६ अर्ज नामंजूर करण्यात आले. स्वस्त धान्य दुकानांचे २८३ अर्ज मंजूर करण्यात आले, ६० अर्ज नामंजूर करण्यात आले. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेल्या माहितीच्या भरवशावर मी या ठिकाणी माहिती देत आहे. अर्धघाऊकचे जवळपास १४ अर्ज नामंजूर केले आहेत. मी या खात्याचा मंत्री आहे. माझ्याकडे सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी येतात. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, राष्ट्रीय कॉंग्रेस अशा सर्व पक्षांचे सन्माननीय सदस्य माझ्याकडे येतात. माझ्याकडे सर्व यादी आहे. पाहिजे तर ती यादी मी वाचून दाखवितो.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी यादी वाचून दाखविण्यास आमची हरकत नाही. परंतु, मी त्यांना सांगू इच्छितो की, आमदारांनी कितीही पत्रे दिली, तरी निर्णय माननीय मंत्र्यांनीच घ्यावयाचा आहे. आम्ही माननीय उपमुख्यमंत्री महोदयांकडे लेखाशीर्ष-३५१५ मधील निधी देण्याची मागणी करतो. आतापर्यंत १०० पत्रे त्यांना दिलेली आहेत. परंतु, ते एक दमडाही देण्यास तयार नाहीत. त्यामुळे निर्णय मंत्र्यांनी घ्यायचा असतो. पत्र देणे हे आमचे काम आहे. सरकारला नाही, तर काय भिकाऱ्याला आम्ही पत्रे द्यायची का ? आमदारांची पत्रे तुमच्याकडे येणारच आहेत. मात्र, कायद्यानुसार निर्णय घेण्याचे काम मंत्र्यांचे आहे. लोकांच्या कामासाठी पत्रे देण्याचा घटनात्मक अधिकार आमदारांना असतो. त्यामुळे विविध पक्षांच्या सन्माननीय सदस्यांनी पत्रे दिली, असे सांगण्यात काही अर्थ नाही. कोणतेही नियमबाह्य काम करा, असे सांगणारे एक जरी पत्र असेल, तर माननीय मंत्र्यांनी निश्चितच त्यांचे नाव जाहीर करावे.

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, सर्वपक्षीय आमदार माझ्याकडे येतात, पत्रे देतात. केवळ पत्रे देत नाहीत, तर खाजगीमध्येही आग्रह धरतात. पण जे नियमामध्ये बसते, गुणवत्तेमध्ये बसते त्याच्या आधारावर आम्ही निर्णय घेतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी फर्नस ऑईलबाबत काही आरोप केले आहेत. या संदर्भात केंद्र शासनाने आदेश काढल्यानंतर राज्य शासनाने आदेश का काढला नाही ? अशी विचारणा त्यांनी केली आहे. मला एक समजत नाही की, विधान परिषदेमध्ये तेथील सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी नेमका उलट आरोप केला आहे. केंद्र शासनाच्या पेट्रोलियम मंत्रालयाने सर्व राज्यांसाठी आदेश काढला आहे. फर्नस ऑईल डी-कंट्रोल करण्यात आले आहे. हा आदेश काढल्यानंतर विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य, श्री. विनोद तावडे यांनी असा आरोप केला आहे की, "महाराष्ट्र शासनाने हा आदेश का काढला ?"

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, हा आदेश उशिरा का काढला, अशी विचारणा मी केली होती.

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते असा आरोप करीत आहेत की, राज्य शासनाने हा आदेश उशिरा का काढला ? एकाच पक्षाचे दोन सन्माननीय सदस्य परस्परविरोधी आरोप करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, केंद्र शासनाने आदेश काढल्यानंतर त्या खात्याच्या केंद्रीय मंत्र्यांना मी पत्र लिहिले. "केंद्र शासनाने डी-कंट्रोलचे जे आदेश काढले आहेत, त्या आदेशाचा फेरविचार करावा. फर्नस ऑईलचे कंट्रोलिंग राज्य शासनाकडे राहिले पाहिजे, अन्यथा, भेसळ होऊ शकते", अशा प्रकारची विनंती करणारे पत्र मी स्वतः लिहिले. त्यानंतर याबाबत फेरविचार करण्यात येत आहे, अशा प्रकारचे उत्तर केंद्र शासनाकडून आले. केंद्र शासनाने फेरविचार केल्यानंतर पुन्हा एक पत्र राज्य शासनाला असे पाठविले की, "आम्ही याबाबीचा फेरविचार केला आहे, डी-कंट्रोलचे आदेश कायम ठेवले आहेत." हे अंतिम पत्र आल्यानंतर लगेच आमच्या विभागाने याबाबतचे आदेश काढले आहेत. मला एवढेच निदर्शनास आणावयाचे आहे की, विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो आरोप केला आहे, त्याच्या अगदी उलट आरोप या सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव खडसे यांनी केला आहे. त्यामुळे मी हे स्पष्टीकरण केले आहे.

अध्यक्ष महोदय, या चर्चेत भाग घेतलेल्या इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्याबाबत निश्चितपणे लक्ष घालण्यात येईल. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाच्या सॉल्व्हंट संदर्भातील आदेशाबाबत विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांनी काय म्हटले, याची मला माहिती नाही. मी काही वरच्याकडे बघून बोलणारा माणूस नाही. त्यामुळे वरच्या सभागृहात काय झाले याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. परंतु या संदर्भात Solvent Referential Lab, २००४ चे आदेश सरकारने अगोदरच जाहीर केले आहेत. केंद्र सरकारने जो आदेश जाहीर केला आहे, त्यात असे नमूद केले आहे की, "दिनांक २३ नोव्हेंबर २००९ द्वारे केंद्र शासनाने दिनांक ३ ऑगस्ट २००९ च्या अधिसूचनेद्वारे अन्य यादीतील अनुक्रमांक १५ येथे Mixed Fuel Oil या पदार्थाचा समावेश करण्याचे आणि दिनांक २३ नोव्हेंबर २००९ च्या अधिसूचनेद्वारे उक्त सूचीतील क्रमांक १४ येथील Furnished Oil हा पदार्थ वगळण्यात आल्याचे अधिसूचित केले. जो आदेश केंद्र सरकारने निर्गमित केला, त्यामध्ये खाली असे नमूद केले आहे की, हा आदेश दिनांक २३ नोव्हेंबर २००९ पासून अंमलात येईल. अन्य राज्यांनी त्याच तारखेपासून अंमलबजावणी केलेली आहे. Fuel Oil हा पदार्थ समाविष्ट करण्यासाठी दिनांक २ डिसेंबर २००९, ४ डिसेंबर २००९ रोजी अंतिम मान्यतेसाठी मंत्री महोदयांकडे प्रस्ताव आला. तो तत्काळ लागू करण्यात यावा. सुधारणेसह प्रस्ताव मान्यतेसाठी आल्यानंतर, दिनांक ३० जानेवारी २०१० रोजी मंत्री महोदयांनी चर्चा करण्याचे निर्देश दिले. संबंधित अवर सचिव यांनी त्याबाबत मंत्री महोदयांशी चर्चा केली असता, Furnished Oil या पदार्थाचा उपयोग व वापराबातची माहिती मागविण्याचे निदेश मंत्री महोदयांनी दिले. त्यानुसार राज्यस्तरीय समन्वयक म्हणून तीन उद्योग मी सांगितल्याप्रमाणे आहेत. त्यामध्ये इंडिया ऑईल व इतर कंपन्यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०१०, १२ फेब्रुवारी २०१० च्या पत्रान्वये माहिती मागविली आहे. तसेच दिनांक ३० मार्च २०१० व दिनांक १० मे २०१० रोजी त्यांना स्मरणपत्र पाठविण्यात आली आहेत. त्यामध्ये असे नमूद केले आहे की,

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

"राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी श्रीमती आर. कोमलावल्ली, डोंबिवली, स्टील ओनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांनी राज्य शासनाकडे वेळोवेळी अर्ज करून केंद्र सरकारच्या आदेशाचे पालन करावे अशी वारंवार विनंती केली. अशी आवश्यकता असतानाही दिनांक १५ एप्रिल २०१० च्या टिप्पणीवर मंत्री महोदयांकडे फेरप्रस्ताव सादर करण्यात आला होता.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी मागील चर्चेच्या वेळी मागितलेल्या माहितीसह प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश परत दिनांक ५ मे २०१० रोजी दिले होते. या तारखा यासाठी रेकॉर्डवर पाहिजे की, एक वर्षे मंत्री महोदयांकडे फाईल वारंवार गेली. त्यानंतर दिनांक ४ जून २०१० च्या पत्रान्वये हा प्रस्ताव प्राप्त झाला. त्यानुसार मान्यता मिळालेल्या प्रस्तावाला दिनांक १६ जून २०१० च्या टिप्पणीन्वये पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मंत्री महोदयांनी Mixed Fuel Oil या पदार्थाच्या समावेशाच्या प्रस्तावाला मान्यता देऊन Furnished Oil हा पदार्थ वगळण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे दिनांक १५ जून २०१० च्या पत्रान्वये फेरविचार करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. दिनांक १९ नोव्हेंबर २००९, तसेच दिनांक ५ जानेवारी २०११ रोजी मंत्री महोदयांनी याला मान्यता दिली. दिनांक १ नोव्हेंबर २०११ रोजी तो प्रस्ताव परत आला होता. मंत्री महादयांनी तो परत पाठविला आहे. केंद्र शासनाने सांगितले आहे की, त्या आदेशात असे नमूद केले आहे की, या दिनांकापासून तो लागू होईल. त्यानंतर मंत्री महोदयांनी ही फाईल एका वर्षात इतक्या वेळा परत पाठविण्याचे काय कारण आहे ? याची विचारणा मी केली आहे. मंत्री महोदयांवर मी आरोप केलेला नाही. मी फाईलवरील तारखा दिल्या आहेत. महितीच्या अधिकारात आपल्या विभागाने मला पूर्ण फाईल दिली आहे त्यावर नोटिंग आहे, मंत्री महोदयांनी लिहिलेल्या तारखा आहेत. याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

अध्यक्ष महोदय, दुसरे असे की, मंत्री महोदयांचे खाजगी सचिव. श्री. अहिरवार यांच्या संदर्भात अनेक लेखी तक्रारी आहेत. त्यांची ॲन्टी करप्शन विभागाकडून चौकशी करण्यात येईल काय ? आपले खाजगी सचिव पाच, सात, पंचवीस लाख रुपये घेतात. खाजगीमध्ये मंत्री महोदयांनी आमदारांना विचारले तर ते आपणास सांगतील. हा काय प्रकार चालला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात आरोप होत आहेत. टीव्हीवर स्टेटमेंट दिली जात आहेत. एकतर स्टेटमेंट करणारा माणूस खोटे बोलतो म्हणून त्या माणसावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. नाहीतर खाजगी सचिव यांच्यावर कारवाई करण्यात यावी. अशा संशयास्पद माणसाला कार्यालयात ठेवण्यात येत आहे. याचा अर्थ जनतेला कळतो की, यामध्ये काय काळे बेरे आहे, किंवा आणखी काय आहे. तो माणूस चांगला आहे की वाईट आहे, हे लोकांना समजते. याबाबत चौकशी करण्यात येईल काय ?

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी Furnished Oil बाबत सांगितले आहे, मी अगोदरच सांगितले आहे की, केंद्र सरकारचे आदेश आले, त्यावेळी माननीय श्री. मुरली देवरा पेट्रोलियम मंत्री होते. राज्य शासनाने त्यांना दिनांक ९ जानेवारीच्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्यांनी अंतिम पत्र पाठवून सांगितले होते की, तुमचा जो प्रस्ताव आलेला आहे त्याचा आम्ही फेरविचार करू शकत नाही. त्यामुळे आम्ही काढलेल्या आदेशाची राज्य शासनाने अंमलबजावणी

**[ श्री. अनिल देशमुख ]**

करावी. त्यानंतर आपण लगेच आदेश काढून त्याची अंमलबजावणी केली. आम्ही त्यांना सूचना केली होती की, डी-कन्ट्रोल करू नये. यामध्ये ८-९ महिन्यांचा कालावधी गेला. त्यांचे पत्र आल्यानंतर, आम्ही आदेश काढून, त्यांची अंमलबजावणी केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माझ्या पीएसच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, आमच्याकडे सुनावणी होत असते. दोन पार्टीज् असल्यामुळे एका पार्टीच्या बाजूने निर्णय लागल्यानंतर दुसरी पार्टी नाराज होते. मध्यंतरी श्री. प्रकाश लोलगे यांनी तक्रार केली होती. श्री. प्रकाश लोलगे यांनी जो आरोप केलेला, आहे तो आरोप खोटा आहे. म्हणून आमच्या पीएसने अतिरिक्त महानगर दंडाधिकारी, बांद्रा न्यायालयामध्ये त्यांच्या विरुद्ध खटला दाखल केलेला आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

**श्री. प्रवीण दरेकर :** अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील आदिवासी पाड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांकडे बीपीएलचे कार्डच नाही.

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, आपण बीपीएल कार्ड आर्थिक निकषावर देत असतो.

**श्री. प्रवीण दरेकर :** अध्यक्ष महोदय, ते लोक आदिवासी आहेत.

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, आता नवीन फूड सिक्युरिटी ॲक्ट येणार आहे. त्या अंतर्गत त्या लोकांना ३५ किलो धान्य २ रुपये आणि ३ रुपये प्रतिकिलो दराने देता येईल. या लोकांना नवीन कायद्यानुसार कशी मदत करता येईल, हे आपण बघू.

**उपाध्यक्ष :** मंत्री महोदय, आपल्याकडे कोलाम कम्युनिटी आहे. ती ओरिजनल ट्रायबल आहे. त्या कोलाम कम्युनिटीला बीपीएल संदर्भात काही मदत करता येईल काय हे बघावे.

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, विचार करण्यात येईल.

**श्री. बाळा नांदगावकर :** अध्यक्ष महोदय, अर्ध घाऊक विक्रेते ग्राहकांची लूटमार करीत आहेत. नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी उदाहरणासह हे पटवून दिले होते. सभागृहाचा जास्त वेळ जाऊ नये म्हणून मी त्यासंदर्भात जास्त बोललो नाही. मंत्री महोदय, मी माननीय अध्यक्षांमार्फत आपल्याकडे माहिती पाठविलेली आहे. ते २० टक्के कमिशन घेतात. मग महाराष्ट्रात किती मोठा घोटाळा होत असेल ? परवाने देण्याची परमिशन नाही, तरी सुद्धा तुम्ही १,५४८ लोकांना परवाने दिलेले आहेत. तुमच्याच विभागाचा शासन निर्णय आहे, परिपत्रक आहे. परवाने देता येत नाहीत, तरी तुम्ही १,५४८ लोकांना अर्धघाऊक विक्रेते म्हणून परवाने दिलेले आहेत. ते परवाने तुम्ही रद्द करणार आहात की नाही ? अर्धघाऊक विक्रेत्यांनी जी जनतेची लूट केलेली आहे, जो भ्रष्टाचार केलेला आहे, त्याची तुम्ही चौकशी करणार आहात की नाही ?

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगावकर यांनी सांगितले की, त्यांनी आपल्याकडे माहिती दिलेली आहे. मी आपल्याकडून ती माहिती घेतो. सन्माननीय सदस्यांची नेमकी कोणती तक्रार आहे, यामध्ये नेमके काय झालेले आहे, याची चौकशी करण्यात येईल.

**श्री. सुरेश धस :** अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, द्वारपोच योजना प्रायोगिक तत्त्वावर काही जिल्ह्यांमध्ये, काही तालुक्यांमध्ये लागू करण्यात आलेली आहे. मी विनंती केली होती की, द्वारपोच योजनेमध्ये काही त्रुटी आहेत. ज्या स्वस्त धान्य दुकानदाराच्या नावाने तक्रार आहे त्या दुकानदाराला वैतागून, त्या गावातील शिधापत्रिकाधारक एकत्र येतात आणि तहसीलदाराकडे पैसे भरतात. शासन निर्णयामध्ये अशी तरतूद आहे की, त्या दुकानदाराच्या नावानेच पैसे भरण्यात यावेत. दुसरी गोष्ट अशी आहे की, चावडीवर किंवा ग्रामपंचायतीसमोर त्याचे वाटप होते. त्याचे वाटप करताना पावत्या सुद्धा त्याच स्वस्त धान्य दुकानदाराकडून फाडाव्या लागतात, ही त्यातील त्रुटी आहे. ही त्रुटी दूर करून, शासन ही योजना राबविणार आहे काय ?

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, गावातील ६० टक्के लोकांनी मागणी केल्यानंतर ही योजना त्या गावामध्ये राबविली जाते. गावातील लोकांनी तहसीलदाराकडे मागणी केली पाहिजे की, आमच्या गावामध्ये ही योजना राबविण्यात यावी आणि त्यावर ६० टक्के लोकांच्या स्वाक्षऱ्या असल्या पाहिजेत. त्यानंतर ती योजना त्या गावामध्ये राबविण्यात येते. सन्माननीय सदस्यांनी सुद्धा त्यांच्या भागामध्ये तसा प्रयत्न करून मागणी केली, तर आम्ही त्यांच्या भागामध्ये ही योजना राबवू. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या योजनेमध्ये काही त्रुटी आहेत. त्या त्रुटी दूर करण्याचा आम्ही निश्चितपणे प्रयत्न करू. त्या गावातील धान्य दुकानदाराची अशी इच्छा असते की, ही योजना आपल्या गावामध्ये लागू होऊ नये. त्यामुळे तो दुकानदार ६० टक्के लोक एकत्र येऊ नयेत, यासाठी प्रयत्न करतो.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण बाकी आहे.

**श्री. आर. एम. वाणी :** अध्यक्ष महोदय, आपण आमच्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देणार आहात का ?

**उपाध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांना संधी देणे शक्य होणार नाही. माननीय उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री यांचा रिप्लाय झाल्यानंतर, मी आपल्याला संधी देतो.

**श्री. आर. एम. वाणी :** ठीक आहे.

**उपाध्यक्ष :** माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी.

**श्री. अजित पवार** (वित्त मंत्री) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर वित्त व नियोजन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग आणि रोजगार व स्वयंरोजगार विभागांच्या संदर्भात या सभागृहात ६ तास चर्चा करण्यात आली. त्यात माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) यांच्या पासून ते सन्माननीय सदस्य श्री. अनिल कदम यांच्यापर्यंत दोन्ही बाजूच्या ३० सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडली. त्याबद्दल मी त्या सर्वांचे मनापासून आभार मानतो.

सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई या ठिकाणी उपस्थित नाहीत. त्यांनी माझ्या विभागाच्या संदर्भात म्हाडातील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्य शासनाच्या तिजोरीवर निवृत्तिविषयक दायित्वाचा सातत्याने आर्थिक भार पडत असल्यामुळे, १९९८ साली युती शासनाच्या काळात राज्यातील कोणत्याही महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन योजना लागू करायची नाही. असा शासनाने निर्णय घेतला होता.

[ श्री. अजित पवार ]

अध्यक्ष महोदय, दिनांक १४ मार्च २०११ रोजी माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुखसाहेब यांनी या संदर्भात बैठक घेतली होती. त्या बैठकीच्या वेळी सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, विनोद तावडे, कपिल पाटील व दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य उपस्थित होते. मलाही अर्थ मंत्री या नात्याने सदर बैठकीला बोलाविले होते. त्या बैठकीच्या वेळी अशी चर्चा झाली की, म्हाडामध्ये १९८९ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना तरी सेवानिवृत्ती योजना लागू करावी. अशा प्रकारे अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केले. ही बाब विचारात घेता, त्या बैठकीच्या वेळी आम्ही गृहनिर्माण विभागाच्या सचिवांना सूचना दिल्या की, म्हाडामध्ये १९८९ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती योजना लागू करायची झाल्यास, त्याचा शासनावर किती आर्थिक भार पडू शकेन, याबाबतची माहिती घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे की, यासंबंधी डायरेक्ट राज्य शासनावर आर्थिक भार पडणार नाही, तो भार म्हाडावर पडणार आहे. सदर कर्मचारी आपल्याच राज्यातील आहेत. त्यामुळे या संदर्भात राज्य शासन सहानुभूतीपूर्वक विचार करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय सावकारे यांनी व्हॅट रिटर्न सादर करण्यास एका दिवसाचा विलंब झाला तरी ५,००० रुपयांचा दंड आकारला जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. यासंबंधी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पूर्वी कराचे विवरणपत्र उशिरा सादर केल्यास १०,००० रुपयांचा दंड आकारला जात असे. राज्य शासनाने सन २००९ मध्ये या कायद्यात सुधारणा करून सदरहू दंडाची रक्कम १०,००० रुपयांवरून ५,००० रुपयांपर्यंत कमी करण्यात आली. शासनाने दंडाची रक्कम कमी करण्यासंबंधी कोणत्याही अधिकाऱ्यांकडे अधिकार दिलेले नाहीत. विहित कालावधीत कर विवरण पत्र दाखल न केल्यास त्यासंबंधी ३० टक्क्यांपासून ८५ टक्क्यांपर्यंत दंडाची रक्कम आकारली जाते. यामुळे राज्याच्या महसुली उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. दंडाची आकारणी होत असल्यामुळे, कर भरणारी व्यक्ती किंवा कंपनीचा वेळेमध्ये कर विवरण पत्र सादर करण्याकडे कल असतो. अध्यक्ष महोदय, शासनाने या संदर्भात जाणीवपूर्वक निर्णय घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, ॲड. आशिष जयस्वाल यांनी एमआरएसएससीच्या अहवालानुसार डोंगरी तालुक्याची पुनर्रचना करण्याच्या प्रस्तावाचा विचार का केला जात नाही, असा प्रश्न उपस्थित केला होता. डिसेंबर, २००७ मध्ये या विषयाच्या संदर्भात मंत्रिमंडळाची एक उपसमिती नेमली होती. त्या उपसमितीमध्ये एकमत झाले नाही, ही बाब मी मान्य करतो. कारण पूर्वीच्या काळात १९९१-१९९२ मध्ये या विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्यात आलेला होता. आता त्याला २० वर्षे झालेली आहेत. त्यामध्ये ७३ पूर्ण गट तालुके आणि ३५ उपगट तालुके अशा पद्धतीने निधीचे वाटप सुरू करण्यात आले होते. यामध्ये बदल करावा असे काहींचे म्हणणे होते. परंतु या विषयाच्या संदर्भात पुन्हा मंत्रिमंडळामध्ये चर्चा केली तर त्याला अनेक फाटे फुटतात. या संदर्भात २००८ च्या सुरुवातीला जो निर्णय घेण्यात आलेला आहे, त्याच निर्णयाशी राज्य शासन ठाम आहे. परंतु अजून एखादे वेळेस मंत्रिमंडळापुढे हा विषय नेला जाणार आहे. त्यावेळी वेगळा मार्ग निघू शकेल काय, याचा विचार केला जात आहे. परंतु या संदर्भातील मी निश्चित अशी खात्री देऊ शकत नाही. यामध्ये राहिलेल्या तालुक्यांचा अंतर्भाव केला जाणार आहे.

[ श्री. अजित पवार ]

सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना माहित आहे की, तत्कालीन वित्त मंत्री महोदयांनी मानवविकास निर्देशांकाचे काम चांगल्या प्रकारचे व्हावे, पर कॅपिटा उत्पन्न वाढावे म्हणून विशेषतः मराठवाड्यात व इतर जिल्ह्यात ५०० कोटी रुपये खर्च करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु तो खर्च झालेला नाही. हा प्रश्न दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला होता. यंदाच्या वर्षी त्या जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांक वृद्धी करण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. अर्थसंकल्पाच्या वेळेस ज्या गोष्टी वर्षभराच्या काळात करणार आहोत, त्याचा उल्लेख मी केलेला आहे. यामध्ये निधीची तरतूद देखील करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वेळेमध्ये निधी खर्च करून, त्या भागातील परकॅपिटा उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी यांनी मिठाईचा कर पूर्वी ५ टक्के होता असा मुद्दा उपस्थित केला होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, यावर्षी आम्ही ब्रेड करमुक्त केलेला आहे. उलाढालीची मर्यादा ३० लाखांवरून ५० लाख रुपयांपर्यंत केलेली आहे. मात्र अपसमे योजनेअंतर्गत कराचा दर ४ टक्के केलेला आहे. तो कर संपूर्ण काढून टाकला पाहिजे, असे काहींचे मत होते. सभागृहात सन्माननीय सदस्य ॲड. दिलीपराव सोपलसाहेब बसलेले आहेत. त्यांनी पूर्वीच्या काळात बनियन, चप्पल करमुक्त कसे केले याचे मार्गदर्शन आम्हाला लॉबीमध्ये केले होते. मी या वेळी ठरविले की, अर्थसंकल्पात जे मांडले जाईल, ते कोणत्याही परिस्थितीत कमी केले जाणार नाही. जे अर्थसंकल्पात सांगितलेले आहे, त्याचे पालन वर्षभरात केले जाणार आहे. एकदा निर्णय घेतल्यानंतर काहीही झाले तरी निर्णय बदलायचा नाही, अशा प्रकारची भूमिका राज्याचे मुख्यमंत्री आणि आमच्या सर्व सहकाऱ्यांनी अर्थसंकल्पाच्या बाबतीत घेतलेली आहे. त्यामुळे शासनाने ब्रेड आणि बेकरीच्या निर्णयात कोणताही बदल करावयाचा नाही अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, डीपीओ कमी आहेत असे सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांनी सांगितले होते. शासनाने दिनांक ३ फेब्रुवारी २०११ रोजी जिल्हा नियोजन अधिकाऱ्याची पदे भरलेली आहेत. परंतु भंडारा, गोंदिया, उस्मानाबाद, लातूर या ठिकाणी नियुक्त करण्यात आलेले डीपीओ अद्यापपर्यंत रुजू झाले नसल्यामुळे, ती पदे रिक्त आहेत. ते का रुजू झाले नाहीत किंवा ते रूजू होणार नसतील, तर जी काही कायदेशीर कारवाई करावयाची आहे ती लवकरच केली जाणार आहे. सदर चार जिल्ह्यांत तातडीने डीपीओ भरण्याची कार्यवाही केली जाणार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी विभागात पदे रिक्त आहेत असा मुद्दा उपस्थित केला होता. जो विभाग रिसोर्सेस वाढविण्याचा पुढाकार घेणार आहे, त्या ठिकाणची पदे लवकर भरण्याची कार्यवाही केली जाणार आहे. जेणेकरून निधीचे वाटप करताना अधिकारी नाहीत म्हणून निधी खर्च केला जात नाही, अशा प्रकारची ओरड आता आपल्याला ऐकायला मिळणार नाही. अशा प्रकारचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. बावनकुळे साहेबांनी एक प्रश्न उपस्थित केलेला होता. विदर्भासाठी दर्शविण्यात आलेला २,९१७ कोटी रुपयांचा निधी विविध विभागांनी अर्थसंकल्पीत केलेला आहे. या निधीचे वितरण विभागाच्या आवश्यकतेनुसार केले जाणार आहे. मी सभागृहाला सांगेन की १०,८१३ कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पित झाला असून, तो अनुज्ञेय असल्यामुळे स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेला आहे. नव्याने

[ श्री. अजित पवार ]

लोकसंख्येचा प्रश्न उद्‌भवतो, परंतु कोठल्याही परिस्थितीत निधी वाटपाबाबत अन्याय होणार नाही. मागासलेल्या भागांसाठी मराठवाडा असेल, खान्देश असेल, विदर्भ असेल अशा विभागांसाठी योग्य प्रमाणात निधी वाटपाबाबतची खबरदारी निश्चितपणे घेतली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दीपक केसरकर यांनी राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींच्या संदर्भातील चर्चा सभागृहात व्हावी, असा उल्लेख केला आहे. खरेतर तशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला जातो. मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर, ॲक्शन टेकन रिपोर्ट विधिमंडळाला सादर करीत असतो.

सन्माननीय सदस्यांनी अल्पबचत भवनासबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. अल्पबचत भवने ही अनुदानातून बांधलेली आहेत, त्याचा आता चांगला उपयोग होत आहे. त्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी ती आता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे हस्तांतरित केली गेलेली आहेत. त्यांची देखभाल व डागडुजी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी करावयाची आहे.

जिल्ह्याचा वार्षिक आराखडा मंजूर करीत असताना खूप भरीव तरतूद केलेली आहे. त्यामध्ये नावीन्यपूर्ण योजना घ्यायला सांगितले आहे. पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांनी पाच टक्के रक्कम तेथील भौगोलिक परिस्थिती पाहून खर्च करावयाची आहे. त्या त्या भागातील लोकप्रतिनिधींनी, जिल्हाधिकाऱ्यांनी अल्पबचत भवन खराब झाले असेल, तर ते दुरुस्त केले पाहिजे. अर्थ व नियोजन मंत्री म्हणून मी अशा सूचना केलेल्या आहेत, याबाबत त्यांच्या कानावर ही बाब घातली पाहिजे. एवढेच नव्हे तर तशा प्रकारच्या सूचना मी माझा विभागामार्फत निश्चितपणे देईन.

सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी वैधानिक विकास महामंडळाबाबत मुद्दा उपस्थित केला होता. जिल्हा वार्षिक आराखड्यासंबधी निधी देत असताना लोकसंख्येचे नियम लावता, किती लोकसंख्या असली पाहिजे, यामध्ये कोणकोणत्या बाबी असल्या पहिजेत, याबाबत सूचना केल्या आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, लोकसंख्येचा निकष हा तालुक्यासाठी सुद्धा लागू करावा. या संदर्भात पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांना जे अधिकार आहेत, त्या अधिकाराचा योग्य पद्धतीने वापर केला जात नाही. अशाही काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत.

नियोजन विभागाने दिनांक २६ डिसेंबर २००६ नुसार, विशेष निधी जिल्हानिहाय वितरण मंडळाच्या नियतव्ययाच्या १५ टक्के रक्कम सामूहिक विकास योजनांचा कामांसाठी, ५ टक्के रक्कम मागासलेल्या भागांच्या विकासकामांसाठी तसेच उर्वरित ८० टक्के रक्कमेपैकी ४० टक्के रक्क्म जिल्ह्यामधील शिल्लक असलेल्या अनुशेषाच्या प्रमाणात वाटप करावयाची आहे. प्रत्येक मंडळाने निधीची मर्यादा ठरवायची आहे, काहीजण याचे पालन करीत नाहीत, असे निदर्शनास आले आहे. पुन्हा अशा प्रकारच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट आदेशाद्वारे दिल्या जातील.

सन्माननीय सदस्य श्री. दीपक केसरकर यांनी जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांसबंधी मुद्दा उपस्थित केला आहे. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, जिल्हा नियोजन समितीमध्ये ७० टक्के सदस्य जिल्हा परिषदेचे असतात तर उर्वरित ३० टक्के सदस्यांबद्दल स्पष्टता नाही. डीपीडीसीच्या बैठकीस

[ श्री. अजित पवार ]

सन्माननीय आमदारांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित केले जाते. त्याऐवजी सदस्य म्हणून घ्यावे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. परंतु ७३-७४ व्या घटनेनुसार दुरुस्ती झाली. त्यानंतर आदेश निघाले आहेत. लोकप्रतिनिधीना जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मानसन्मान दिला जातो. परंतु तरीही यामध्ये काही अडचणी असतील, तर मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे तशा प्रकारच्या सूचना दिल्या जातील. तीन-तीन लाख लोकांचे प्रतिनिधित्व सन्माननीय सदस्य करीत असतात. त्यामुळे त्यांच्या सूचनेला जिल्हाधिकारी, पालकमंत्री यांच्याकडून निश्चितपणे मान दिला गेला पाहिजे.

सन्माननीय सदस्य श्री. दीपक केसरकर यांनी १६ नवीन तालुक्यांचे उपकोषागारे निर्माण करण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. शासकीय बँकींग व्यवहार हाताळण्यासाठी सदर तालुक्याच्या ठिकाणी आरबीआय मान्यताप्राप्त शाखा व आरबीआय बँक यांच्याशी पत्रव्यवहार सुरू आहे. ही कारवाई पूर्ण झाल्यानंतर, सदर उपकोषागारे सुरू केले जातील. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती व अमरावती जिल्ह्यातील भातुकली या दोन नवनिर्मित तालुक्यांतील उपकोषागारे सुरू करण्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. शासनाने इतर १६ तालुक्यांतील उपकोषागारे सुरू करण्यास मान्यता मिळवली आहे. या उर्वरित २ तालुक्यांतील उपकोषागारांना मान्यता मिळविण्याबाबतची कार्यवाही पूर्ण केली जाईल. अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्र शासनाचा रस्ते विकास आराखडा, सन २००१ ते २०२१ प्रलंबित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची धारिका दिनांक ७ फेब्रुवारी २०११ रोजी प्राप्त झालेली आहे. या संदर्भात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना चर्चा करण्याकरिता बोलाविले होते. मात्र हे काम अर्थसंकल्पामुळे पूर्ण होऊ शकले नाही. सदर काम नियोजन विभागाकडे प्रलंबित आहे. ही कामे आता झालेली असल्यामुळे, त्या संदर्भात सूचना दिल्या जातील. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्याच्याशी चर्चा करून या संदर्भात कार्यवाही केली जाईल. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे, त्याबाबत कार्यवाही केली जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार गोरे यांनी कच्च्या बिलाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. राज्यात कच्च्या बिलांचा व्यवहार ६५ टक्के होतो. त्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात कर चुकवला जात असल्याचे त्यांनी सांगितले. विक्रीकर विभागामध्ये सध्या अन्वेषण शाखा कार्यरत आहे. या शाखेचे अधिकारी कर चुकविणाऱ्या व्यापाऱ्यांच्या धंद्यावर अचानक धाडी टाकण्याचे काम करतात. सन २०११ या वर्षात ९१० धाडी टाकल्या असून, २२५ कोटी ६५ लाख रुपयांचा महसूल वसूल करण्यात आलेला आहे. यास आणखी चालना देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. तसेच त्यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे या संदर्भात आणखी माहिती आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, कशा प्रकारे कर चुकवला जातो या संदर्भातील माहिती त्यांनी शासनाला दिली, तर राज्याचे उत्पन्न आणखी वाढण्यास मदत होईल.

[ श्री. अजित पवार ]

भटक्या व विमुक्त समाजाकरिता शासनाने जी योजना सुरू केली आहे, त्यास स्व. यशवंतराव चव्हाण यांचे नाव दिल आहे. ते नाव बदलून कै. वसंतराव नाईक यांचे नाव द्यावे, अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. संजय राठोड यांनी केली आहे. हे राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. मी आपल्याला विनंती करू इच्छितो की, आता या योजनेला स्व. यशवंतराव चव्हाण यांचे नाव दिले आहे. प्रत्येकाच्या काही ना काही भावना असतात. जर या योजनेला नावच दिले नसते, तर आपल्या सूचनेचे निश्चितपणे स्वागत केले असते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीमध्ये स्व. वसंतराव नाईक यांचे मोलाचे योगदान होते, यामध्ये कोणाचेही दुमत असणार नाही. मात्र आता नाव बदलायला नको. आणखी दुसरी योजना असेल, त्याला कै. वसंतराव नाईक यांचे नाव देण्याचा शासनाकडून विचार केला जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस यांनी एक सूचना केली आहे. बीड जिल्ह्यातील निर्गुडी, बेदरवाडी, खडकवाडी हे ग्रुपग्रामपंचायत असताना, डोंगरी विभागात समाविष्ट होते. आता स्वतंत्र ग्रामपंयाचतीमध्ये केवळ निर्गुडीचा समावेश केला असून, बेदरवाडी व खडकवाडीचा समावेश केलेला नाही. शासनाने यापूर्वी असा निर्णय घेतला आहे की, एखादा तालुका डोंगरी कार्यक्रमामध्ये समाविष्ट असेल व त्याचे विभाजन झाले, तर नवीन तालुक्यास मूळ तालुक्यास अनुज्ञेय असलेल्या निधीच्या सन २००१ च्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी मिळेल. याच धर्तीवर पूर्वीची ग्रामपंचायत डोंगरी कार्यक्रमामध्ये समाविष्ट असेल, तर त्या ग्रामपंचायतीच्या विभाजनानंतर तयार झालेल्या नवीन ग्रामपंचायतीला मूळ गामपंचायतीच्या निधीतून लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्याबाबतचा विचार केला जाईल. आपल्या सूचनेला अनुसरून अशा प्रकारचा निर्णय घेऊन, खडकवाडी व बेदरवाडी यांना देखील निधी देण्याचा मी निर्णय घेत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांना सांगू इच्छितो की, चष्म्यावरील व गॉगलवरील कर कमी केला जाणार नाही. तो कर पूर्वीप्रमाणेच राहणार आहे. शासनाने गॉगलवर जाणीवपूर्वक कर लावलेला आहे. तो कमी करण्याचे काही कारण नाही. मला सभागृहाला ही गोष्ट सांगावयाची आहे की, आपले मोठ्या प्रमाणावर उत्पन्न हे सेल्स टॅक्समधील असते. गेल्या वर्षी सन २००९-२०१० मध्ये साधारण एकूण ३४ हजार ३२० कोटी रुपये हे रेव्हेन्यू-टॅक्समधून आपण मिळविलेले होते. यंदाच्या वर्षी दिनांक ३१ मार्च २०११ पर्यंत आम्ही साधारण जे टार्गेट ठेवले होते ते ३७ हजार ८०३ कोटी रुपयांचे होते. मला सांगायला अभिमान वाटतो की, सेल्सटॅक्सचे कमिशनर, त्यांची काम करणारी टिम यांनी इतक्या चांगल्या पद्धतीने काम केले की, ३७ हजार ८०३ कोटी रुपयांऐवजी ॲक्चुअली सन २०१०-२०११ मध्ये ३१ मार्चअखेर ४४ हजार २६३ कोटी रुपयांचे उत्पन्न सेल्सटॅक्सच्या माध्यमातून मिळालेले आहे. त्याची ग्रोथ गेल्यावर्षीच्या तुलनेने जवळपास २९ टक्के इतकी आहे.

(माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील जागेवर बसून बोलतात.)

ते सगळे धरून मी सांगतो आहे. त्याच्यातील परताव्याची रक्कम, रिफंड ३ हजार १८२ कोटी रुपये वजा केलेला आहे. विरोधी पक्षनेते आपणही अर्थ मंत्री होता, दरवर्षी काही रक्कम राहते, ती त्याच्यातून वजा करून राहिलेली रक्कम मी आपल्याला सांगत आहे.

[ श्री. अजित पवार ]

फ्युचर ॲक्शन प्लॅन कर विभागाचा कृती आराखडा किंवा काही यशस्वी उपक्रम देखील हाती घेतलेले आहेत. त्यामध्ये पूर्णपणे मोकळीक त्या विभागातील अधिकारी, कमिशनर व त्यांच्या सगळ्या टिमला दिलेली आहे. त्यातून निश्चितपणे उत्पन्न वाढते आहे. रिसोर्सेसच्या बाबतीत राज्य सरकारची अशाच प्रकारची भूमिका आहे, हेही मला लक्षात आणून द्यायचे आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. खडसेसाहेबांनी विशाल प्रकल्पांनी उभारलेल्या मार्केटिंग कंपनीबद्दलचा मुद्दा उपस्थित केला. खरे तर विशाल औद्योगिक प्रकल्पांना राज्यामध्ये आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या सवलती देशातील सगळीच राज्ये देतात. या सवलती अंतर्गत विशाल प्रकल्पांना आपण औद्योगिक विकास अनुदान देतो. हे अनुदान सदर कंपन्यांना राज्यामध्ये भरलेल्या विक्रीकराच्या रकमेएवढे देण्यात येते.

तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे आणि सभागृहापुढे मी ही गोष्ट मान्य करतो की, काही कंपन्या त्यांची सर्व विक्री राज्यात स्थापन केलेल्या मार्केटिंग कंपनीद्वारे करून, उद्योग विभागाकडून औद्योगिक विकास अनुदान व विक्रीकर विभागाकडून मूल्यवर्धित कर नियमांना अनुसरून खरेदीमधील विक्रीकराचा परतावा घेतात. त्यामुळे महसुलामध्ये फरक पडण्याची शक्यता होती. यामुळे विक्रीकर नियमांमध्ये योग्य ते बदल केलेले आहेत. त्यामुळे सदर कंपन्यांना आता राज्यामध्ये भरण्यात आलेल्या विक्रीकराच्या रकमेएवढेच औद्योगिक प्रोत्साहन अनुदान म्हणून मिळेल. सध्या औद्योगिक अनुदान ज्यांनी गोळा केलेले आहे, हे विक्री कराच्या परताव्याएवढे मर्यादित ठेवलेले आहे. इतर राज्यांशी स्पर्धात्मक वातावरण असल्याने, आपल्या राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित व्हावी यासाठी राज्याच्या औद्योगिक धोरणात वेळोवेळी बदल केला जातो. आज की कालच सभागृहात चर्चा होत असताना माननीय उद्योग मंत्री, राणे साहेबांनीही काही नवीन धोरणाच्या संदर्भात सूतोवाच केलेले आहे.

त्याचबरोबर विरोधी पक्षनेत्यांनी सन २००२ मध्ये पेट्रोल व डिझेलवर प्रतिलिटर १ रुपया प्रमाणे अधिभार लावल्याबाबत क्वांटिटीबेस अधिभार लावण्याचा राज्य शासनास अधिकार आहे का ? असा प्रश्न उपस्थित केला आहे. शासनाला जर अधिकार नसतील तर घेतलेली रक्कम कोणाला परत करणार ? ज्या लोकांकडून तो अधिभार वसूल केला आहे, त्यांना तो परत देणार का असे विचारले आहे. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, सन २००२ मध्ये हा अधिभार लावला गेला, आता ९ वर्षांनंतर राज्य शासनाच्या अधिकारांचा प्रश्न निर्माण करण्यात आलेला आहे. मोटार स्पिरिट अधिनियम, १९५८ मध्ये क्वांटिटी बेस धरून अधिभार लावण्याची तरतूद होती. तथापि, अधिभार कोणत्या दराने लावायचा या अधिकारासंदर्भात अनिश्चितता होण्याच्या दृष्टीने दिनांक ४ मे २००२ रोजी सुधारणा करून, दर आकारणीबाबतचे अधिकार शासनाने घेतले. या सुधारणेनुसार अधिभाराचा दर व लागू करण्याचा दिनांक याचा उल्लेख अधिसूचनेमध्ये करण्याबाबत उल्लेख आहे. वरील सुधारणेनुसार शासनास अधिकार प्राप्त झाले. हे अधिकार वापरुन शासनाने याबाबतची अधिसूचना दिनांक १ जुलै २००२ रोजी जारी केली. त्यानुसार मोटार स्पिरिटच्या प्रतिलिटर विक्रीवर १ रुपया अधिभार लावण्याचे घोषित केले.

[ श्री. अजित पवार ]

तथापि, हा अधिभार कोणत्या दिनांकापासून लागू होईल याचा उल्लेख अधिसूचनेमध्ये करावयाचा राहून गेल्यामुळे कायदेशीर मुद्दा उपस्थित झाला होता. त्या संदर्भात विधी व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात आला. त्यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार ज्या दिवशी अधिसूचना निर्गमित झाली त्या दिवसापासून म्हणजे दिनांक १ जुलै २००२ पासून प्रत्यक्षात अधिभार आकारणीस सुरुवात झालेली आहे. थोडक्यात विधानमंडळाच्या मान्यतेनंतर मोटार स्पिरिट अधिनियम १९५८ मध्ये दिनांक ४ मे २००२ रोजी सुधारणा करून शासनास अधिभार मिळालेला आहे. या अधिभारानुसार प्रतिलीटर रुपये १ या दराने अधिभाराची आकारणी होत आहे. त्यामुळे हा अधिभार परत करण्याचा प्रश्न येत नाही असे शासनाचे मत आहे. मूल्यवर्धित कर कायद्यातील कलम ६ (२) नुसार कर लावता येऊ शकतो. त्यामुळे क्वॉन्टिटि बेस टॅक्स लावण्याचे अधिकार नाही असे म्हणणे योग्य नाही, असे शासनाचे मत आहे. मूल्यवर्धित कायद्यातील कलम ६ (२) नुसार राज्य सरकारने हा निर्णय घेतलेला आहे.

अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, राज्य कर्जबाजारी आहे. राज्याची २६ टक्क्याची कर्ज मर्यादा संपली आहे. राज्याने २६ टक्क्यांची कर्ज मर्यादा ओलांडल्यामुळे सरकारला नव्या कर्जाची उभारणी करता येणार नाही. याबाबत सांगू इच्छितो की, आपण नेहमी सकारात्मक विचारसरणी ठेवली तर आपणास निश्चितपणे पुढे जाता येते. मी अर्थसंकल्पावरील उत्तराच्यावेळी याबाबत स्पष्टीकरण केले होते. असे असताना पुन्हा हा मुद्दा येथे उपस्थित करण्यात आलेला आहे. केंद्र सरकारने कर्ज मिळण्यासंदर्भात तीन निकष ठरवून दिलेले आहेत. पहिला निकष राज्याचे संचित दायित्व हे एकूण स्थूल उत्पन्नाच्या २६.८ टक्क्याच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. सन २०११-२०१२ मध्ये राज्य सरकारची टक्केवारी १९.२ टक्के आहे. म्हणजे आपणास २६ टक्क्याची मर्यादा ओलांडण्यासाठी आणखी ७ टक्क्यांची आवश्यकता आहे.

दुसरा निकष, व्याज प्रदानाची रक्कम राज्याच्या एकूण महसुलाच्या २० टक्के पेक्षा जास्त असू नये असे केंद्र सरकारचे मत आहे. सन २०११-२०१२ मध्ये व्याजाची रक्कम एकूण महसुलाच्या साधारणतः १५ टक्केच्या आत आहे आणि आम्ही ती तेवढीच ठेवणार आहोत. हा निकष देखील पूर्ण होत आहे.

तिसरा निकष म्हणजे ठराविक आर्थिक वर्षात स्थूल उत्पन्नाच्या विशिष्ट टक्के एवढी रक्कम केंद्र शासन त्या आर्थिक वर्षात कर्ज उभारणीसाठी कमाल मर्यादा म्हणून ठरवून देते. यावर्षी केंद्र सरकारने एकूण स्थूल उत्पन्नाच्या तीन टक्के रक्कम मर्यादा कर्ज उभारणीसाठी विहित केलेली आहे. त्यानुसार ३५ हजार १६० कोटी एवढी कर्ज मर्यादा राज्य शासनाला दिलेली आहे. सन २०११-२०१२ मध्ये आपण तीन टक्क्याऐवजी १.९३ टक्के म्हणजे २२ हजार ८०५ कोटी रुपये कर्ज काढण्याचे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे शासनाने कुठेही २६ टक्क्याची मर्यादा ओलांडलेली नाही.

अध्यक्ष महाराज, राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत आहे अशी टीका सातत्याने होत असते. आपण कर्जाचा उपयोग राज्याच्या विकासासाठी करीत आहोत. या कर्जावरील व्याज आणि मुद्दलची परतफेड ठराविक वेळापत्रकामध्ये करीत आहोत त्यामध्ये कोणतीही कसूर केलेली नाही. कर्ज मर्यादित ठेवून रस्ते, बंदरे, इमारती इत्यादी अशा पायाभूत सुविधांसाठी राज्य किंवा सार्वजनिक खासगी सहभागाचा विवेकपूर्ण उपयोग करून घेत आहोत. राज्य सरकार केंद्र सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पूर्णपणे पालन करीत आहे.

[ श्री. अजित पवार ]

अध्यक्ष महाराज, याठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पुन्हा एकदा सांगितले की, राज्याने एक हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढलेला आहे. मी पुन्हा एकदा या चर्चेच्या निमित्ताने सांगतो की, सन २००५ नंतर या राज्याला ओव्हरड्राफ्ट काढावा लागलेला नाही. हा मुद्दा अर्थसंकल्पावरील चर्चेच्यावेळी देखील उपस्थित करण्यात आला होता. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी यलो पुस्तकातील पृष्ठ १६ वर १ हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढल्याचे नमूद केलेले आहे असे सांगितले होते. त्यावेळी माननीय अध्यक्षांनी देखील त्या पृष्ठावर अर्थोपाय रक्कम / ओव्हरड्राफ्ट असे नमूद असून, १ हजार कोटी रुपये ही अर्थोपाय रक्कम असल्याचे सांगितले होते. आज आपण पुन्हा हा मुद्दा काढला. मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्याने ओव्हरड्राफ्ट घेतलेला नाही. ही रक्कम तेथे नमूद करण्यात आली आहे, कारण प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात अंदाज बांधत असताना त्यात अर्थोपाय अग्रिम म्हणून ठराविक रक्कम आपण सुरुवातीला राखून ठेवत असतो, त्यानंतर ८ महिन्यांनी सुधारित अंदाज लक्षात घेऊन त्या रकमा आपण कमी जास्त करतो. अध्यक्ष महोदय, वर्ष अखेरीस त्या उपयोगात आल्या नाहीत तर आपण त्या प्रत्यार्पित म्हणजे सरेंडर करतो. सन २०१०-११ मध्ये अर्थोपाय अग्रीमसाठी ३ हजार कोटी रुपये आपण तरतूद केली होती. सुधारित अंदाज घेताना एवढी रक्कम आवश्यक नसल्याने ही तरतूद १ हजार कोटी रुपये एवढी केली. मार्च, २०११ अखेर या रकमेची आवश्यकता न लागल्याने सुरुवातीच्या अर्थसंकल्पात केलेली ३ हजार कोटी रुपये एवढी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. राज्य सरकारने "६००३-राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण" या प्रधान लेखाशीर्षाखाली सन २०१०-११ या वर्षातील अपेक्षित बचत मागणी क्रमांक जी-८ अंतर्गत प्रत्यार्पित करण्याचे आदेश काढले. आपण महसुली जमा यांचा तपशील, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक पाहिले तर पृष्ठ क्रमांक १६६ वर सुरुवातीचे ३ हजार कोटी आणि त्यानंतर १ हजार कोटी रुपये दाखविलेले आहेत. पुनश्चः यावर्षी ३ हजार कोटी एवढी रक्कम राखून ठेवल्याचे त्यामध्ये निदर्शनास येत आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारे ओव्हरड्राफ्ट घेतलेला नाही हे मी पुन्हा पुन्हा सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) साहेबांना निदर्शनास आणून देऊ इच्छितो. इतरही काही मुद्दे त्यांनी उपस्थित केले होते.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे मुद्दे उपस्थित केले होते. मी त्यासंदर्भात सभागृहाला एवढेच सांगू इच्छितो की, राज्य शासन व राज्य शासनाचा नियोजन विभाग त्या सर्व बाबतीत पॉझिटिव्ह ॲप्रोच घेईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशात पाठविण्यासंबंधीचा एक मुद्दा मांडला. मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्या आणि इतर वेगळ्या समाजाच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशी जाण्याकरिता शिष्यवृत्ती दिली जाते. अल्पसंख्यांक समाजामध्ये वेगवेगळे ६ समाज आहेत. मी सांगू इछितो की, पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये याकरिता ५ कोटी रुपयांची तरतूद निश्चितपणे केली जाईल. अल्पसंख्याक समाजातील गरिबांच्या मुलांना शिक्षणासाठी परदेशात पाठविण्याकरिता त्या रकमेचा उपयोग निश्चितपणे झाल्याशिवाय राहणार नाही.

[ श्री. अजित पवार ]

अध्यक्ष महोदय, बहुतेक सन्माननीय सदस्यांनी आमदार निधीतून ईटीपी चार्जेस रद्द करण्याचे आणि रॉयल्टी चार्जेस परत करण्याचे सूतोवाच केले आहे. अधिवेशन संपण्याअगोदर ईटीपी चार्जेस संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभाग यांच्या प्रमुखांची मी एकत्रित बैठक घेतो. हे सगळ्यांचेच दुखणे आहे, त्याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना एकत्र घेऊन या संदर्भात पाहिले जाईल. सगळ्यांना आपल्या विधानसभा मतदारसंघात काम करताना कारण नसताना रॉयल्टीचा आणि ईटीपी चार्जेसचा भुर्दंड बसतो आणि तो सुद्धा डेव्हलपमेंटच्या कामांना बसतो. सदर बाबतीत कोणती सवलत देता येईल, या संदर्भात निर्णय घेऊन त्या संदर्भात अधिवेशन संपण्याच्या आत आपल्या लक्षात आणून देण्यात येईल. अध्यक्ष महोदय, आमदार निधी २ कोटी रुपयांपेक्षा जास्त जरी मला वाढविता आला नाही, तरी यातून ही रक्कम काही प्रमाणात कमी करून आणखी बेनिफिट मिळवून देण्याचे काम करण्यात येईल. आमदार निधी दीड कोटी रुपयांवरुन २ कोटी रुपये केला आहे. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात पूर्ण डोंगरी तालुक्याला ८० लाख रुपये आणि उपगट डोंगरी तालुक्याला ४० लाख रुपये निधी दिला जातो. साधारणतः शंभर तालुक्यांपेक्षा जास्तीची संख्या आहे. पूर्ण डोंगरी तालुक्यांकरिता ८० लाखांऐवजी १ कोटी रुपये आणि उपगट डोंगरी तालुक्यांकरिता ४० लाखांऐवजी ५० लाख रुपये अशा पद्धतीने तरतूद वाढविण्याचे काम करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांनी सुशिक्षित बेरोजगारांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्य कृषिभूषण श्री. साहेबराव पाटील यांनी त्यांच्या जिल्ह्याला पालक सचिव देण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. निश्चितपणे याबाबत कार्यवाही केली जाईल.

अध्यक्ष महोदय, मानव विकास निर्देशांकाबद्दल यंदाच्या वर्षी कोणत्याही परिस्थितीत त्या त्या भागात पैसा खर्च केला जाईल. मराठवाडा पॅकेजच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. आर. एम. वाणी यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. ही बाब मी तपासून घेऊन त्यामध्ये काय अडचण आलेली आहे, ते बघितले जाईल. सन्माननीय सदस्य, श्री. संजय राठोड यांच्या मुद्द्याला मी यापूर्वीच उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या बहुतेक मुद्द्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. काही राहिले असेल तर निश्चितपणे त्याची दखल घेतली जाईल.

अध्यक्ष महोदय, या मागण्यांवर चर्चा होत असताना मुंबईमधील सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यात असे आले की, अर्थसंकल्प सादर करतांना मुंबईला म्हणावी तशी मदत झालेली नाही. वास्तविक पाहता, म्हाडा, एमएमआरडीए आणि केंद्र सरकार यांच्या विविध योजनांच्या माध्यमातून कामे सुरू आहेत. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांचे हेच मत आहे. मुंबईच्या वाहतुकीच्या संदर्भात किंवा एकंदरीत गोरगरीब जनतेला चांगल्या प्रकारचे जीवन जगता येईल, यासंदर्भातील जी पावले उचलण्याची गरज आहे, ती उचलण्याची भूमिका राज्य शासन निश्चितपणे घेणार आहे. त्यामुळे ज्यावेळी राज्याच्या इतर कामाच्यासंदर्भात आम्ही एकत्रित बसतो, त्यावेळी मुंबईला आणखी कशी भरीव मदत करता येईल, याबाबत राज्य सरकार निश्चिपतणे विचार करेल, अशी खात्री मी देऊ इच्छितो.

[ **श्री. अजित पवार** ]

अध्यक्ष महोदय, वित्त व नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्या सभागृहाने एकमताने मंजूर कराव्यात, अशा प्रकारची विनंती करून मी आपली रजा घेतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, अधिभाराच्या संदर्भात माननीय अर्थमंत्र्यांनी, विभागाने जी माहिती लिहून दिली होती, ती वाचून दाखविली आहे. परंतु, मी केवळ हे निदर्शनास आणून देतो की, अधिभार लावण्याचा अधिकार हा राज्य सरकारला आहे. पेट्रोल आणि डिझेलवर १ रुपया अधिभार लावण्याचा अधिकार आहे, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुंबई मोटार स्पिरिट ॲक्ट रद्द करण्यात आला आहे. सन २००२ ला सुधारणा केली आणि सन २००५ मध्ये मूल्यवर्धित कर प्रणाली आली. त्या कालखंडात हा कायदा रद्द झाला आहे. त्यामध्ये जे सेव्ह केलेले आहे त्यापलीकडे तुम्हाला नवीन काही करता येत नाही. परंतु, घटनेच्या अनुच्छेद ३६६ मधील कलम २९ (अ) अंतर्गत राज्य विधिमंडळाला फक्त विक्री किंवा खरेदी यावर कर लावण्याचा अधिकार आहे. आपल्याला विक्री केलेल्या अथवा खरेदी किमतीवर कर लावता येतो. विक्री झाली म्हणून कर लावणे आणि विक्री किमतीवर कर लावणे, या दोन वेगवेगळा बाबी आहेत. विक्री झाली म्हणून अधिभार लावा, हे भिन्न आहे. तुमच्याकडे ऑईल कंपन्यांनी जवळपास ४ हजार कोटी रुपयांच्या वर जो कर जमा केला आहे, तो परत द्यावा, अशा स्वरूपाचे अपिल दाखल केले आहे. घटनेने विधिमंडळाला अधिकारच दिलेले नाहीत. अधिभार किमतीवर लावता येईल, क्वांटिटिवर लावता येणार नाही, असे घटना म्हणते. त्यामुळे अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही की, यामधील एक रुपया सुद्धा सरकार कंपन्यांना परत देणार नाही. आपण मला सांगितले त्यानुसार एक रुपया देखील रिफंड करण्याची आवश्यकता नाही. हे ४-५ हजार कोटी रुपये जनतेचे आहेत. त्यामुळे ते विकास कामांसाठी आपल्याला वापरता येतील. तशी खात्री माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उद्या करावी.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भात मला एवढेच सांगावयाचे आहे की, दुधाच्या भेसळीसंबंधी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी एक शब्द देखील उच्चारला नाही. दूध भेसळीला सरकारचे अप्रत्यक्ष संरक्षण आहे का ? सन्माननीय सदस्य, श्री. सुरेश धस यांनी अतिशय चांगल्या प्रकारे दूध भेसळीचा उल्लेख सभागृहात केला होता. परंतु, दूध भेसळीबाबत माननीय मंत्र्यांनी काहीही स्पष्टीकरण केलेले नाही. मला असे वाटते की, सरकार दूध भेसळीसंबंधी उदासीन दिसत आहे. या संदर्भातील व्यवस्था व्हावयास पाहिजे होती.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पुन्हा मुद्दा काढलेला आहे. मोटार स्पिरिटच्या विक्रीच्या प्रती लिटरमागे देखील कर लावता येतो, असे विभागाचे म्हणणे आहे. पण मी या सर्व बाबी पुन्हा एकदा तपासून घेतो. त्यासंदर्भात कोणताही कर वसूल झाला तर तो विकासाच्या कामासाठीच खर्च व्हावा, तो पुन्हा परत देण्याची वेळ येऊ नये, त्या करिता आणखी काही गोष्टी कराव्या लागल्या तर करण्यात येतील, या संदर्भातील अधिकची माहिती सभागृहाला देण्यात येईल.

**श्री अमिन पटेल :** अध्यक्ष महोदय, मैं माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार जी का अभिनंदन करता हूं कि उन्होंने मायनोरिटीज के लोगों के लिए फोरेन जाने के लिए ५ करोड़ रुपये स्कॉलरशिप के लिए मंजूर किये हैं. मैं मायनोरिटीज के लोगों की ओर से उनको धन्यवाद देता हूं.

**श्री. प्रवीण देरकर :** अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना मी पुन्हा विनंती करू इच्छितो की, ग्रामीण भागात डोंगर विकास निधीत ८० लाख रुपयांची भरीव वाढ केली आहे. मुंबईत शिवडी, घाटकोपर, जोगेश्वरी, बोरिवली एक्सर व्हिलेज, ताडदेव या भागात गावच्या डोंगराला लाजवतील अशा टेकड्या आहेत. मुंबईतील डोंगरी भागाला निधी देण्यासाठी निकष बदलावे लागले तर ते बदलावेत. मुंबईत ३० ते ३५ टेकड्या आहेत, त्यांच्यासाठी डोंगर विकास निधी उपलब्ध करून देण्यात यावा. अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. तो पुन्हा तपासून घेऊन त्यातून काय सकारात्मक मार्ग काढता येईल याचा विचार करण्यात येईल.

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना माझा असा प्रश्न आहे की, डोंगरी भागासाठी आपण ५० लाख व एक कोटी रुपयांचा निधी जाहीर केला, त्याबाबत मी आपले अभिनंदन करतो. राज्य सरकारने डोंगरी विकास निधी सुरू केला त्यावेळी तालुक्याची निवड करताना जसे-जसे अर्ज आले तशा प्रकारे निधी मंजूर करण्यात आलेला आहे. अनेक पात्र तालुक्यांना या निधीचा लाभ मिळाला नाही. सरकारकडून सर्व्हे करून रिपोर्ट सादर करण्यात आलेला आहे. कोणतेही कारण नसताना तो अहवाल चार वर्षे अडगळीत टाकण्यात आलेला आहे. यासाठी मंत्री मंडळाची उपसमिती नेमली त्या समितीने हा विषय प्रलंबित ठेवला आहे. हा विषय उपस्थित केल्यावर मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही परत कॅबिनेट पुढे प्रस्ताव सादर करू. हे उत्तर सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. नियम व निकषानुसार जे तालुके पात्र असतील, सरासरी भौगोलिक परिस्थितीनुसार पात्र असतील, त्यांना निधी दिला पाहिजे. जे अर्ज अगोदर आले त्यांची मागणी मंजूर करण्यात आलेली आहे. त्यांनाच निधी देण्यात आलेला आहे. या तालुक्यांमध्ये वाढ व्हावयास नको अशी शासनाची भूमिका आहे, यासाठी वेगवेगळी कारणे सांगितली जात आहेत. अशी कारणे सांगून सभागृहाची दिशाभूल करण्यात येत आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, जे पात्र तालुके आहेत त्यांचे निकष ठरविण्यात यावेत. व डोंगरी तालुक्यांसाठी नवीन निकष तयार करण्यात यावेत ही कार्यवाही मंत्री महोदय करणार आहेत काय ?

**श्री. आर. एम. वाणी :** अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, केंद्र सरकार बीपीएल धारकांसाठी ५० हजार रुपये खर्च करीत आहे. तो खर्च बरोबर होतो काय ? अशा प्रकारची एक रिट याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आलेली आहे. त्या याचिकेच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने जस्टिस वाधवा यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला होता. या आयोगाचे अधिकारी संभाजीनगर येथे येऊन गेले आहेत. त्यांना तेथे ७० हजार शिधापत्रिका बोगस असल्याचे दिसून आले आहे. याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. यामध्ये शासनाची काय भूमिका आहे.

**श्री. सुरेश हाळवणकर :** अध्यक्ष महोदय, माझ्या दोन सूचना आहेत. त्याकडे अर्थमंत्री महोदयांचे मी लक्ष वेधू इच्छितो. राज्यात सूताच्या विक्रीवर दोन टक्के टॅक्स आकारणी करावी अशी मागणी होती. राज्यात ९० टक्के सूत परप्रांतातून येते. त्यावर दोन टक्के केद्रींय टॅक्स आहे. राज्याच्या महसुलावर त्याचा परिणाम होतो. अर्थमंत्री महोदयांनी सूतावर दोन टक्के टॅक्स लावला तर राज्याच्या महसुलात ५०० कोटी रुपयांची वाढ होईल. त्यामुळे राज्यात सूत गिरण्यांच्या मालाला भाव मिळेल.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मंत्रालयातील सचिव आणि सह सचिव यांच्या वेतनामध्ये २५ हजार रुपयांचा फरक आहे. त्यासंदर्भात वेतन त्रुटी समिती गठित करण्यात आलेली आहे. त्या समितीने अद्याप आपला अहवाल सादर केलेला नाही. यासंदर्भात मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, तपासून घेण्यात येईल.

**श्री. आर. एम. वाणी :** अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. आर. एम. वाणी यांनी वाधवा समितीच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, वाधवा समितीने ७० हजार बोगस कार्डच्या बाबतीत जो अहवाल दिलेला आहे तो तपासून घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. विजयकुमार गावित** (वैद्यकीय शिक्षणमंत्री) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष देसाई, गोपालदास अग्रवाल, देवेंद्र फडणवीस, दीपक केसरकर, आर. एम. वाणी, बाळा नांदगावकर, अबु आझमी, संजय सावकारे, चंद्रशेखर बावनकुळे, जयकुमार गोरे, संजय राठोड, प्रा. राम शिंदे यांनी भाग घेऊन अत्यंत चांगल्या सूचना केलेल्या आहेत आणि काही त्रुटी सुद्धा निदर्शनास आणून दिलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्रामध्ये १४ मेडिकल कॉलेजेस् आहेत, ४ डेंटल कॉलेजेस्, आयुर्वेदिक कॉलेज आणि नर्सिंग कॉलेजेस् आहेत. काही कॉलेजमध्ये मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या नॉर्म्स प्रमाणे पदे मंजूर नव्हती. एमसीआयच्या नॉर्म्स प्रमाणे सर्व पदे मंजूर करून घेण्याचा आमचा प्रयत्न आहे आणि मला असे वाटते की, येत्या दोन-तीन महिन्यामध्ये आपण ही पदे निश्चितपणे मंजूर करून घेऊ.

अध्यक्ष महोदय, त्याच बरोबर कॉलेजेसमध्ये काही पदे रिक्त होती. आपण रिक्त पदे मोठ्या प्रमाणावर भरण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण जवळजवळ ७५ टक्के पदे भरलेली आहेत. एमपीएससीने परीक्षा घेतलेली आहे. त्यातून आणि पदोन्नतीने साधारणपणे या ६ महिन्यामध्ये ९० ते ९५ टक्के जागा निश्चितपणे भरल्या जातील. या जागा एमसीआयच्या नॉर्म्सप्रमाणे भरल्यानंतर आज ज्या ठिकाणी अंडर ग्रॅज्युएटच्या १०० जागा आहेत त्या ठिकाणी आपल्याला १५० जागा करण्यास वाव आहे, ज्या ठिकाणी २०० जागा आहेत त्या ठिकाणी २५० जागा करण्यास वाव आहे. निश्चितपणे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी येतील आणि मोठ्या प्रमाणावर डॉक्टर निर्माण होऊ शकतील. त्यामुळे लोकसंख्येनुसार जे डॉक्टरांचे प्रमाण आहे त्यामध्ये निश्चितपणे वाढ होईल आणि मला असे वाटते की, त्याचा चांगल्या रितीने फायदाही होऊ शकेल.

[ डॉ. विजयकुमार गावित ]

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झालेला आहे की, सन १९१२ नंतर देशामध्ये वैद्यकीय प्रवेशासाठी एकच परीक्षा घेण्यात यावी. मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, नॅशनल इलॅजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना पूर्वी वेगवेगळ्या १४ परीक्षा द्याव्या लागत होत्या. आता विद्यार्थ्यांना एकच परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांचा बराचसा वेळ जात होता, विद्यार्थ्यांवर ताण पडत होता तो ताण यामुळे निश्चितपणे कमी होणार आहे. फक्त एवढेच आहे की, केंद्र शासन परीक्षा घेणार आहे आणि परीक्षा घेतल्यानंतर १५ टक्के जागा सेन्ट्रलकडे जाणार आहेत. उर्वरित ८५ टक्के जागांसाठी आपण वेगळी मेरिट लिस्ट तयार करणार आहोत. ती मेरिट लिस्ट तयार करून जशा आपण रिजनल लेव्हलवर सीट्स भरतो तशाच पद्धतीने आपण सीट्स भरणार आहोत. जे ५० टक्के आरक्षण होते ते आरक्षण जसेच्या तसे राहणार आहे. सन्माननीय सदस्यांना असे वाटते की, यावर काही परिणाम होईल. परंतु तसा परिणाम होणार नाही.

अध्यक्ष महोदय, एक गोष्ट निश्चित आहे की, वेगवेगळ्या राज्यांमध्ये जो अभ्यासक्रम आहे तो अभ्यासक्रम एकच असावा. तो अभ्यासक्रम सेकन्डरी आणि हायर सेकन्डरीसाठी सारखा असावा अशा पद्धतीचे पत्र आम्ही माननीय केंद्रीय आरोग्य मंत्र्यांना लिहिलेले आहे. आपण त्यांना विनंती केलेली आहे की, प्रथम अभ्यासक्रम एक करण्यात यावा. अशा प्रकारे सेकंडरी व हायर सेकंडरीसाठी एकच सिलॅबस केल्यानंतर पहिल्या बॅचसाठी त्या सिलॅबसचा वापर करावा अशी आम्ही त्यांना विनंती केली आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी मुलांची वाढलेली शैक्षणिक फी कमी करण्यासंबंधी मागणी केली आहे. त्यासंबंधी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, गेल्या १० वर्षांचा विचार करता, मध्यंतरीच्या काळात मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्री खरेदी करणे, विविध मेडिकल कॉलेजेससाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करणे, त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. अशा परिस्थितीत एससी, एसटी, व्हीजेएनटी, ओबीसी, शिक्षकांची व स्वांतत्र्य सैनिकांची मुले यांची १०० टक्के शैक्षणिक फी शासनाकडून भरली जाते. ईबीसी प्रवर्गात ज्यांचे उत्पन्न एक लाख रुपयांपर्यंत आहे त्यांच्या मुलांची शासनाकडून १०० टक्के फी भरली जाते. त्या व्यतिरिक्त १५ ते २० टक्के मुले राहतात, त्यांच्या पालकांचे उत्पन्न एक लक्ष रुपयांपेक्षा जास्त असल्यामुळे, ते आपल्या मुलांची फी भरू शकतात. या संदर्भात असलेल्या कायद्यानुसार वाढीव फी च्या संदर्भात तातडीच्या वेळी जेव्हा जेव्हा निधीची आवश्यकता असेल तेव्हा त्या निधीचा त्यांना वापर करता येईल. या सर्व बाबींचा विचार करता शैक्षणिक फी वाढविलेली आहे व ती योग्य आहे.

सन्माननीय सदस्यांनी लातूर, अकोला येथे एमसीआयच्या नॉम्सनुसार कार्यवाही होत नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश धोक्यात आल्यासंबंधीचा उल्लेख केला होता. आता तेथे शिक्षक व इतर उर्वरित पदे निर्माण केलेली आहेत, त्यामुळे तेथे अडचण येणार नाही.

**[ डॉ. विजयकुमार गावित ]**

अध्यक्ष महोदय, नंदुरबार, मुंबई, अलिबाग येथे नवीन कॉलेजेस सुरू करायची होती, त्यासंबंधीची प्रक्रिया सुरू आहे. ती कॉलेजेस निश्चितपणे सुरू केली जातील.

अध्यक्ष महोदय, काही ठिकाणी डॉक्टर व औषधांचा तुटवडा होता, ही बाब खरी आहे. मधल्या काळात गेल्या २-३ वर्षांची औषधांची बिले थकित होती. त्यामुळे औषधपुरवठा करणाऱ्या काही एजन्सींनी कमी प्रमाणात औषधांचा पुरवठा केला व काही एजन्सींनी औषधांचा पुरवठा करणे बंद केले. परिणामी औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता. यासंबंधी माननीय वित्त मंत्र्यांनी लक्ष घालून आमच्या विभागासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे आता सर्व देणी संपलेली आहेत. एप्रिल महिन्यापर्यंत औषधांच्या पुरवठ्यासंबंधी अडचणी होत्या. आता सर्व ठिकाणी सुरळीतपणे औषधांचा पुरवठा सुरू होईल.

सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी एचएमआयएस प्रकल्पासंबंधी मुद्दा उपस्थित केला होता, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, हा प्रकल्प खरोखर चांगला होता. त्यात मॅनपॉवर कमी असल्याचे दिसत आहे. यासंबंधी चार ठिकाणी कामे सुरू झाली आहेत. परंतु पाहिजे त्या प्रमाणात कामे सुरू झालेली नाहीत. त्यासाठी समिती नेमली जाईल किंवा त्यातील तज्ज्ञ लोकांना नेमून या संदर्भात सुधारणा करण्याकरिता शासनाकडून निश्चितपणे विचार केला जाईल.

अध्यक्ष महोदय, आयुर्वेदिक कॉलेजेसमध्ये सीसीआयएमनुसार पदे मंजूर नव्हती. आम्ही त्यासंबंधी लवकरच मंत्रिमंडळासमोर जाणार आहोत. सुपर स्पेशालिटी रुग्णालय, नागपूर येथे लवकरच जीएमएमसी सुरू केले जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी बॉण्डच्यासंदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता. त्यासंबंधी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अनेक विद्यार्थ्यांकडून बॉण्ड घेतले जात आहेत. परंतु त्यांना नोकरी देण्यासाठी जागा शिल्लक नाहीत. पीजीचा बॉण्ड ५० लक्ष रुपयांपर्यंत आहे, त्यात वाढ करून, विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यासाठी शासनाकडून प्रयत्न केला जाईल. परंतु युजीच्या संदर्भात थोडी अडचण आहे.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी मेडिकल कॉलेजेसमध्ये काम करीत असलेले प्राध्यापक प्रायव्हेट प्रॅक्टिस करीत असल्यामुळे, वैद्यकीय सेवेवर परिणाम होत असल्यासंबंधी उल्लेख केला होता. या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनाने मेडिकल कॉलेजेसमधील प्राध्यापकांची प्रायव्हेट प्रॅक्टिस बंद केली आहे.

माझी सभागृहाला विनंती आहे की, सभागृहाने सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात.

**श्री. गुलाबराव देवकर** (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री) : रोजगार व स्वयंरोजगार योजनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस आणि सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांनी अनेक सूचना केलेल्या आहेत. त्यांनी केलेल्या सूचनांचे मी या ठिकाणी मनापासून स्वागत करतो. माझ्या मागण्या मान्य करण्याबाबत सूचना आलेली असल्यामुळे, रोजगार व स्वयंरोजगारामार्फत मागणी क्रमांक झे-ए योजनेखाली सादर करण्यात आलेल्या योजनेतर योजनेसाठी ३१.४ कोटी आणि १४.४५ कोटी रुपयांच्या एकूण ४५.४९ कोटी रुपयांच्या मागण्यांना मान्यता द्यावी, अशी विनंती करीत आहे.

**डॉ. विजयकुमार गावित :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या संदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, मुस्लिम एरियामध्ये काही ठिकाणी हॉस्पिटल्स काढून युनानींच्या मुलांना सामावून घेतले जाईल.

**उपाध्यक्ष :** आता मी वित्त विभाग, नियोजन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग आणि रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक जी-१, जी-२, जी-४, जी-५, जी-६, जी-७, जी-९, ओ-१, ओ-२, ओ-३, ओ-४, ओ-५, ओ-६, ओ-७, ओ-८, ओ-९, ओ-१४, ओ-१५, ओ-१६, ओ-१७, ओ-१८, ओ-१९, ओ-२०, ओ-२१, ओ-२२, ओ-२३, ओ-२४, ओ-२५, ओ-२६, ओ-२७, ओ-२८, ओ-२९, ओ-३१, ओ-३२, ओ-३३, ओ-३४, ओ-३५, ओ-३६, ओ-३७, ओ-३८, ओ-३९, ओ-४०, ओ-४१, ओ-४२, ओ-४३, ओ-४४, ओ-४५, ओ-४६, ओ-४७, ओ-४८, ओ-१०, ओ-११, ओ-१२, ओ-१३, ओ-१४, ओ-१५, ओ-१६, ओ-१७, ओ-१८, ओ-१९, ओ-२०, ओ-२१, ओ-२२, ओ-२३, ओ-२४, ओ-२५, ओ-२६, ओ-२७, ओ-२८, आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

---

L. A. BILL No. XIII OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY HOMOEOPATHIC PRACTITIONERS' ACT, 1959)

**डॉ. विजयकुमार गावित** (वैद्यकीय शिक्षण मंत्री) **:** अध्यक्ष महाराज, सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक १३-मुंबई मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

**डॉ. विजयकुमार गावित :** अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक १३ मांडतो.

**उपाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

---